भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन

॥वृद्धि:॥

दिनेश द. माहुलकर

‘वृद्धी :..’

भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन

‘वृद्धी :..’

भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन

दिनेश द. माहुलकर

राज्य मराठी विकास संस्था, मुंबई

‘वृद्धी : ..’ भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन

दिनेश द. माहुलकर

‘VRUDDHI : ..’ BHASHECHE AANI BHASHABHYASACHE VIKASAN

DINESH D. MAHULKAR

आय. एस.बी.एन. क्रमांक : ९७८-९३-८५८०६-५

संगणकीय आवृत्ती : २७ फेब्रुवारी, २०१५

पहिली आवृत्ती : २७ फेब्रुवारी २०००

© राज्य मराठी विकास संस्था

प्रकाशक

राज्य मराठी विकास संस्था

एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय,

३ महापालिका मार्ग, धोबीतलाव, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : ०२२-२२६३१३२५, फॅक्स : ०२२-२२६५३९६६

ई-मेल : rmvs_mumbai@yahoo.com

संकेतस्थळ : rmvs.maharashtra.gov.in

अक्षरजुळणी व मांडणी

कुमार कॉम्प्युटर्स

‘अनुष्का’ सर्वे नं.१३/४/१, लेन नं.३०-३१,

धायरी, मुक्ताई गार्डनजवळ, सिंहगड रोड, पुणे ४११ ०४१.

ई-मेल : nandu@kumarcomputers.in

संकेतस्थळ : www.kumarcomputers.in

इ-पुस्तक रुपांतर

सीडॅक, पुणे

सीडॅक-प्रगत संगणक विकास केंद्र,

वेस्टएण्ड सेंटर-III, स.नं. १६९/१, सेक्टर – II

औंध, पुणे – ४११ ००७.

विनामूल्य वितरणासाठी

ह्या इ-पुस्तकाचे सर्व अधिकार राज्य मराठी विकास संस्थेच्या अधीन असून हे पुस्तक जनतेसाठी विनामूल्य स्वरुपात संस्थेच्या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले आहे. हे पुस्तक आपण स्वतःसाठी विनामूल्य उतरवून घेऊ शकता. परंतु त्याची प्रत करताना अथवा दुवा इतरांना देताना पैसे आकारणे, ह्या पुस्तकाची नक्कल करून त्याची विक्री करणे, किंवा या इ-पुस्तकाची प्रत आपल्या संकेतस्थळावर घालणे इ. गोष्टी करणाऱ्या व्यक्ती व संस्था आढळलयास त्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

माझ्या घराण्याचे परमगुरू

परमहंस परिव्राजक वासुदेवानंद सरस्वती,

ज्यांनी मला विद्याभ्यासाची गोडी लावली ते

माझे बाबा

आणि

माझ्या बालपणात ज्यांनी मला

भाषांचे ओनामे शिकविले ते माझे शिक्षक

बाळशास्त्री तेलंग

वामनराव वझे

त्रिंबकराव सिंधकर

या सर्वांच्या पूज्य चरणी

अर्पण

अनुक्रमणिका

निवेदन

मनोगत

प्रस्तावना

१. सोनियाचा दिवस

२. चक्र-नेमी-क्रम

३. गुण-वृद्धींची संरचना

४. ‘शिष्यादिच्छेद् पराजयम्’

५. इतिहासाच्या कोंदणात संस्कृत

६. लॅरिजीअलचा सिद्धांत

७. इंडो –युरपिअनचा नवा नकाशा

८. गुरु-शुक्र-युती

९. नव्या दिशांचा शोध

१०. इतिहासाचा मागोवा

११. भाषेच्या अंतरंगाकडील वाट

१२. उपसंहार

निवेदन

भाषाविषयक विविध प्रश्नांच्या संदर्भात जिज्ञासू वाचकांची जाण अनेक अंगांनी वाढविणे हे राज्य मराठी विकास संस्थेला आपले एक महत्त्वाचे कार्य वाटते. हे उद्दिष्ट डोळ्यांपुढे ठेवून आम्ही पुढील पाच पुस्तके या वर्षी प्रकाशित करीत आहोत. यापूर्वी डॉ. मिलिंद मालशे आणि डॉ. गीता भागवत यांच्या आम्ही पुरस्कृत वा प्रकाशित केलेल्या दोन पुस्तकांना ('आधुनिक भाषाविज्ञान' आणि 'प्रशासनिक मराठी भाषेचा विकास') वाचकांनी उत्तम रीतीने दाद दिली आहे. जाणकारांनी पारितोषिके देऊन त्यांचा सन्मान केलेला आहे.

नव्याने प्रकाशित होत असलेल्या पाच पुस्तकांपैकी कालदृष्ट्या पहिले पुस्तक आहे. कै. प्रा. वासुदेव बळवंत पटवर्धन यांचे 'शिक्षण, शिक्षक व सध्याचा अभ्यासक्रम.' मुंबईच्या हेमंत व्याख्यानमालेत या विषयावर दिलेली व्याख्याने पुस्तकरूपाने १९०६ साली प्रकाशित झालेली होती. परंतु दुर्दैवाने आज त्या पुस्तकाच्या प्रती उपलब्ध नाहीत. अभ्यासक्रमात मराठी कशासाठी शिकवायचे या प्रश्नाचे उत्तर जसे व्याख्यानांत पटवर्धनांनी दिले तसेच सर्व शिक्षणक्रमात,सर्व स्तरांवर मराठीचे स्थान आणि स्वरूप कसे असावे याचे विवरण केले आहे. हे करताना त्या वेळी त्यांच्या डोळ्यांसमोर जर्मनीतील भाषाशिक्षणाचा जो आदर्श होता, त्याच्याशी त्यांनी आपल्याकडील भाषाशिक्षणाच्या वस्तुस्थितीची तुलना केली आहे. शालेय शिक्षणाशी विविध अंगांनी संबंधित असलेले आणि स्वतंत्रपणे लिहिले गेलेले अर्वाचीन मराठी वाङ्मयामधील हे पहिले मराठी पुस्तक आहे. आम्ही हे पुस्तक प्रकाशित करताना त्याला अद्याप वर्तमानकाळातील शैक्षणिक परिस्थितीच्या संदर्भातही अर्थपूर्णता कशी आहे हे लक्षात यावे या दृष्टीने अभ्यासपूर्ण प्रस्तावना व तळटिपांची जोड दिली आहे. आमच्या विनंतीवरून प्रा. रमेश पानसे यांनी हे अत्यावश्यक काम केले. गेली पंधरा वर्षे एक –अभ्यासक कार्यकर्ता या नात्याने

प्रा. पानसे यांचा पूर्वप्राथमिक, प्राथमिक आणि ग्रामीण भागातील माध्यमिक शिक्षणाशी विशेष जवळून संबंध आलेला आहे.

प्रा. वा. ब. पटवर्धन यांचा परिचय त्यांनी प्रगट केलेल्या विचारांवरून वाचकांना होईलच. पण आवर्जून आणखी दोन-चार गोष्टींचा उल्लेख इथे करावयास हवा. पुण्याच्या फर्गसन महाविद्यालयात पटवर्धन हे इंग्रजीचे अतिशय नाणावलेले असे प्राध्यापक होते. शेक्सपिअरची नाटके, आणि शेली, किटस्, बायरन आदी रोमँटिक कवींची कविता उत्तम रीतीने शिकविण्याबद्दल त्यांची महाविद्यालयात विशेष ख्याती होती. त्याचबरोबर मराठीतील प्राचीन संतकवितेपासून त्यांना समकालीन असणाऱ्या रविकिरण मंडळाच्या कवितेपर्यंतच्या मराठीकवितेचे ते एक चोखंदळ समीक्षकही होते. न्या. रानडे, सुधारकाग्रणी गो. ग. आगरकर आदी शंभर–सव्वाशे वर्षांपूर्वीच्या मान्यवर लोकनेत्यांनी शैक्षणिक क्षेत्रात मराठीचा पुरस्कार करताना जो विचार केला होता, त्याच विचारसरणीला धरून काम करणारे पटवर्धन हे एक कार्यकर्तेही होते. त्यांच्या विषयीची ही पूर्वमाहिती सांगण्याचा उद्देश मराठीविषयक त्यांनी केलेल्या प्रतिपादनाचे नेमके वजन वाचकांच्या लक्षात यावे हा आहे.

दुसरे प्रकाशित होणारे पुस्तक 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' – हे कै. श्री. के. क्षीरसागर यांच्या भाषाविषयक लेखांचे श्रीमती शकुंतला क्षीरसागर यांनी केलेले संकलन आहे. विविध भाषांतील दर्जेदार साहित्यावर मनापासून प्रेम करणाऱ्या क्षीरसागरांचे हे लेखन वेळोवेळी अनेक नियतकालिकांतून आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेले होते. आणि त्या त्या वेळी स्वातंत्र्यवीर सावरकर, कविवर्य माधवराव पटवर्धन आदी भाषाशुद्धीच्या पुरस्कर्त्यांशी त्यांनी घेतलेल्या वैचारिक झुंजीसाठी गाजलेलेही होते. हे लेख वाचताना आमच्या असे लक्षात आले की भाषाशुद्धी, परिभाषेची घडण, मराठीचे लेखन आणि उच्चारण आदी आजही चर्चेत असणाऱ्या प्रश्नांवर प्रा. क्षीरसागर यांनी जे विचार व्यक्त केले आहेत ते पुष्कळ अंशांनी स्वीकारले तरी गेले आहेत किंवा अजून स्वीकारावेत इतकी उपयुक्त तरी आहेत. विवेचनात त्यांनी घेतलेल्या काही उदाहरणांशी

आपला मतभेदही होईल. तथापि, आपल्या भाषेच्या संदर्भात सर्वसामान्य शिक्षित माणसाच्या मनात आज जे जे प्रश्न घुटमळत आहेत त्यांचाच क्षीरसागरांनी 'मराठी भाषा : वाढ आणि बिघाड' या पुस्तकामध्ये परामर्श घेतलेला आहे. त्यांचे हे पुस्तक लेखक—वाचकांच्या मराठीबाबतच्या संभ्रमित झालेल्या मानसिकतेला निश्चित दृष्टिकोनाची आणि आधाराची बैठक पुरविल्याखेरीज राहणार नाही. कै. क्षीरसागरांनी हाताळलेल्या भाषाविषयक प्रश्नांच्या संदर्भात, नंतरच्या काळात प्रत्यक्ष कार्यानुभव घेतलेल्या श्रीमती सत्त्वशीला सामंत (निवृत्त उपसंचालक, भाषा संचालनालय) यांची प्रस्तावना आम्ही या पुस्तकाला घेतलेली आहे. तीही विषयाच्याच संदर्भात आजची भाषिक स्थिती सांगत आवश्यक तेवढ्या अधिक माहितीची पुरेशी भर घालणारी आहे.(पूर्वासिद्धी : म. सा. प., जुलै-सप्टेंबर १९९५) मराठी लेखन आणि व्याकरण सत्त्वशीलाबाईंची स्वतःची एक विशिष्ट भूमिका आहे. तिचा आदर राखण्यासाठी प्रस्तावनेतील काही तत्सम शब्दांचे लेखन त्यांच्या मूळ लेखनानुसार आम्ही ठेवलेले आहे. एवढे कृपया, वाचकांनी समजून घ्यावे.

तिसरे पुस्तक आहे डॉ. दिनेश. द. माहुलकर या बडोदा येथे वास्तव्याला असणाऱ्या आणि बऱ्याच मराठी मंडळींना अपरिचित असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कीर्तीच्या भाषावैज्ञानिकांचे —' 'वृद्धिः . .' भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन' 'वृद्धिः' हा पाणिनीच्या अष्टाध्यायी या ग्रंथातील पहिला शब्द आहे. तो शीर्षकात योजण्याबाबत डॉ. माहुलकर विशेष आग्रही होते. त्यांचे म्हणणे असे आहे की, विविध प्रकारची कुंपणे तोडून पलीकडे जा हा पाणिनीचा मंत्रच भाषाविकसनाच्या संदर्भात आज विशेष अर्थपूर्ण ठरतो आहे. पाणिनीचा हा विचार जितका जुना तितकाच नवाही आहे.

भाषा या विषयावरील डॉ. माहुलकरांचे आजवरचे सर्व लेखन इंग्रजीतून झालेले आहे. हे त्यांचे पहिलेच मराठी पुस्तक प्रकाशनासाठी आम्हांला देऊन त्यांनी राज्य मराठी विकास संस्थेचा बहुमान केला आहे, अशी आमची कृतज्ञतेची भावना आहे. डॉ. माहुलकर यांच्या विचारांचा व कार्याचा परिचय

राज्य मराठी विकास संस्थेच्या संस्थापकांपैकीच एक ज्येष्ठ भाषावैज्ञानिक डॉ. अशोक केळकर यांनी प्रस्तावनेत समर्थपणे करून दिला आहे.त्याची पुनरावृत्ती मी करीत नाही. पण, जगभर झालेली भाषाविषयक विचारांची गेल्या काही शतकांतील वाटचाल या पुस्तकात डॉ. माहुलकर यांनी सुबोध बोली मराठीत उलगडून दाखविली आहे तिने वाचक स्तिमित झाल्याखेरीज राहाणार नाहीत एवढे मात्र इथे आवर्जून सांगायाला हवे. डॉ. माहुलकर यांनी पाणिनीचा 'वृद्धी' हा मंत्र उच्चारत काढलेला वरील निष्कर्ष तर आपली मान उंचावणारा आहेच.

या पाच पुस्तकांच्या संचातील चौथे आणि पाचवे ही पुस्तके आहेत अनुक्रमे श्रीमती सुमन बेलवलकर आणि अविनाश बिनीवाले यांची. या दोघांनी 'लोकसत्ता' या मान्यवर दैनिकाच्या साप्ताहिक पुरवणीत १९९४ ते ९९ याकाळात जी भाषाविषयक सदरे लिहिली त्यांचे हे संकलन आहे. 'बेलभाषा' आणि 'भाषा आपल्या सर्वांचीच' ही दोन्ही पुस्तके, भाषाविषयक दोन वेगळ्या विचारक्षेत्रांचा विनोदात्म शैलीत परामर्श घेतात. सुमन बेलवलकर यांना परभाषकांना मराठी शिकवताना स्वभाषेचे आणि महाराष्ट्राच्या संस्कृतीचे जे दर्शन झाले ते त्यांनी मोठ्या खेळकरपणे छोट्याछोट्या लेखांतून टिपले आहे. बिनीवाले यांनी मराठी भाषकाला वर्णमाला, लिपी, उच्चार इत्यादींच्या, संदर्भात, जगातल्या विविध भाषांच्या विश्वातून गमतीजमती सांगत फिरवून आणले आहे. या दोघांनीही स्वतःच्या पुस्तकाला ज्या प्रस्तावना लिहिल्या आहेत त्याही त्यांच्या मूळ विवेचनात अधिक भर घालणाऱ्या आहेत.

अविनाश बिनीवाले यांनी वरील सर्व पुस्तकांची जुळवाजुळव करताना वेळोवेळी विचारविनिमय करण्यामध्ये, पुस्तकांच्या मुद्रणाच्या संदर्भात, विशेष सहकार्य केले आहे. त्यांचे मी मनापासून आभार मानते. त्याचप्रमाणे या प्रकाशन प्रकल्पात सहकार्य देणारे लेखक, प्रस्तावनाकार यांचेही आम्ही ऋणी आहोत.तसेच राज्य मराठी विकास संस्थेच्या कार्यालयातील माझे सहकारी अनिता जोशी, कविता महाजन, गिरीश पतके, स्मिता जोशी, नेहा मोहोड, सरोज भंडारी, ज्योती जोशी यांनीही कामाचा वाटा आनंदाने आणि हौसेने

उचलला आहे. त्यांच्या सर्वांच्या सहकार्यामुळेच दिनांक २७ फेब्रुवारी रोजी, कविवर्य कुसुमाग्रजांच्या जन्मदिनी ही पुस्तके प्रकाशित होत आहेत. गेली काही वर्षे महाराष्ट्रात कुसुमाग्रजांचा वाढदिवस हा मराठी दिवस म्हणून साजरा होत आला आहे. यंदा कविवर्य आपल्यामध्ये नाहीत. राज्य मराठी विकास संस्थेला त्यांचे सहकार्य अनेक प्रकारे लाभले होते. त्यांच्या स्मृतीला कृताज्ञतापूर्वक अभिवादन करून भाषाविषयक वेगवेगळे पैलू दिग्दर्शित करणारी ही पुस्तके आम्ही त्यांच्या जन्मदिनी प्रकाशित करीत आहोत.

-सरोजिनी वैद्य

ओळख

माझे जेष्ठ सुहृद् प्रा. दिनेश माहुलकर यांच्या “ ‘वृद्धी:’ भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन’’ या ग्रंथाच्या प्रकाशनाच्या निमित्ताने त्यांची आणि त्यांच्या ग्रंथाची ओळख मराठी वाचकांना करून देण्याचे काम माझ्यावर सोपवण्यात आले तेव्हा मला मोठा आनंद वाटला. खरे म्हणजे ‘अभिरुची’ मासिकाची बडोदातली वैभवाची कारकीर्द ज्या वाचकांना परिचित आहे त्यांना बडोद्याच्या माहुलकर नावाच्या इंग्रजीच्या तरूण प्रवाहांबद्दलची सारगर्भ टिपणे आठवत असणार. साहित्य, तत्त्वज्ञान, भाषा, अशी क्षितिजे न्याहाळत माहुलकर पुढे बडोद्याच्या विद्यापीठातील भाषाविज्ञान विभागाचे संस्थापक झाले. हे नवी क्षितिजे धुंडण्याचे त्यांचे काम चालूच राहिले. गणिती तर्कशास्त्र, संस्कृत शिक्षा आणि व्याकरण, भाषेचा संगणकीय अभ्यास यांची त्यात भर पडली.पण एक ना धड भाराभर हव्यास यातला हा प्रकार नव्हता. त्यामध्ये, माहुलकरांचा आवडता शब्द वापरून बोलायचे तर, एका जिवंत बुद्धिमत्तेचे विकसन होते.’बनचुके’ मानसांचा घडून चुकलेला असतो तो विकास. निरंतर ‘विद्यार्थ्या’चे होत राहते ते विकसन. मध्यंतरीच्या काळात त्यांचे महत्त्वाचे इंग्रजी ग्रंथ बाहेर पडले —द ग्राउंडवर्क ऑव्ह मॉडर्न लॉजिक १९५९, पाथवेज इन लिंग्विस्टिक्स १९७९, द प्रातीशाख्य ट्रडिशन अँड मॉडर्न लिंग्विस्टिक्स १९८१, प्री — पाणिनियन लिंग्विस्टिक स्टडीज १९९०, मेथडॉलजी ऑव्ह सोशियो —हिस्टोरिकल लिंग्विस्टिक्स १९९६. मध्यंतरी त्यांचे आयरिस मर्डक या इंग्लिश विदुषीचे हृद्य संस्मरण ‘महाराष्ट्र टाईम्स’ मध्ये प्रकाशित झाले. पाठोपाठ या ग्रंथाच्या रूपाने ते पुन्हा एकदा मराठी वाचकांच्या भेटीस येत आहेत. अर्थात माहुलकरांची खरी ओळख या ग्रंथानेच होईल. ग्रंथाला ‘वृद्धी:’ या पाणिनीच्या आद्यसूत्राचा मागोवा घेणारे शीर्षक देण्यामागचा आपला अभिप्राय त्यांनीच ग्रंथारंभी सांगितलेला असल्यामुळे मी त्याची पुनरुक्ती करीत नाही. ‘भाषा : बहिरंग’ या पहिल्या भागात मुख्यत: भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाचे विकसन हा विषय मांडलेला आहे. या मांडणीचा एक आकृतिबंध आहे — तो म्हणजे युरोपीय विद्वानांनी

संस्कृतपासून घेतलेला परिग्रह आणि नंतर त्यांनी संस्कृतविद्येला दिलेले भरघोस प्रतिदान. प्रतिदान म्हणजे नुसती गुरुदक्षिणा नव्हे तर परतभेट.

विश्लेषणात्मक भाषाविज्ञान उपस्थित झाल्यावर ऐतिहासिक भाषाविज्ञान मोडीत निघाले अशी भाबडी समजूत करून घेणारांनी हा सर्व भाग काळजीपूर्वक वाचण्याची गरज आहे. खरे म्हणजे आमच्या मागच्या पिढीने ऐतिहासिक भाषाविज्ञानही पां.दां. गुण्यांच्या पुस्तकाच्या धावत्या परीक्षापारक वाचनापलीकडे नीट समजून घेतले असे वाटत नाही. काळजीपूर्वक वाचन म्हणजे त्यातील विचारांचे स्वबुद्धीने उपयोजन. उदाहरणार्थ, प्रकरण ४ मध्ये ग्रासमानच्या नियमानुसार 'भोधामि' चे संस्कृत 'बोधामि' कसे होते हे वाचल्यानंतर हिंदी ठट्ठा, धंधा यांचे समांतर मराठीत थट्टा, धंदा कसे होते याची आठवण व्हायला पाहिजे, किंवा थोड्या वेगळ्या वळणाने मराठी उन-उन्हात कसे होते हे मनात यायला पाहिजे. व्हेर्नरच्या नियमामधला आघात आणि व्यंजने यांमधला खेळ इंग्रजीमधल्या एक्सरसाइज-इग्झर्ट सारख्या रूपांमध्येही कसा आढळतो किंवा थोड्या वेगळ्या वळणाने लोहा-लोआ, लुहार-लुआर या हिंदी-पंजाबी जोड्यांत लोआ मध्ये लोवर पंजाबीत उन्नत अवरोही सूर तर लुआरमध्ये आवर पंजाबीत अवनत आरोही सूर या रूपाने हा खेळ कसा दिसतो याचा शोध घ्यावासा वाटायला पाहिजे. कदाचित यासाठी ग्रंथाचे दुसऱ्यांदा सबुरीने वाचन करायला पाहिजे. ग्रंथाच्या या पूर्वार्धात धर्म, तत्त्वज्ञान, स्वकीयप्रेम यांना बाजूला ठेवून मानवी जीवनाचा वैज्ञानिक विचार यूरपमध्ये कसा मूळ धरू लागला हाही कथाभाग आलेला आहे. व्यक्तीनिरपेक्ष ध्वनि-नियमांची चर्चा वाचताना अर्थशास्त्राच्या अभ्यासकांना त्याच काळातल्या अॅडम स्मिथच्या मागणीपुरवठा-नियमांची आणि 'अदृश्य हस्तक्षेपाची' आठवण व्हावी इतके या दोन कल्पांमध्ये साम्य आहे.

'भाषा : अंतरंग' ह्या ग्रंथाच्या उत्तरार्धात हाच कथाभाग पुढे नेला जातो. संस्कृतकडून पाश्चात्त्यांनी दुसरा परिग्रह घेतला आहे तो म्हणजे, लाइबनित्सने दिलेल्या गणिती-तार्किकी दृष्टीने मानवी जीवनाचा अभ्यास पाणिनीने केलेल्या

भाषाविश्लेषणाच्या प्रकाशात करणे. आपण मात्र पाणिनीच्या ग्रंथावर गंधपुष्प वाहण्याखेरीज काही केले नाही-आमच्याकडे एक अमोघ रीतिशास्त्र निर्माण झाले पण ते लवकरच लयाला गेले असे माहुलकर कळवळून म्हणतात. ते लयाला जाण्यापूर्वी भर्तृहरीने त्याला भाषेच्या बहिरंगाकडून अंतरंगाकडे आणि भाषेच्या आंतरिक विकसनाच्या शोधाकडे नेण्याचा निकराने प्रयत्न कसा केला याची आठवण मात्र आपण ठेवायला पाहिजे. चोम्स्कीचा विचार जावा तितका पुढे गेला नाही आणि पाश्चात्त्य अजून तरी संस्कृतविद्येला दुसरे प्रतिदान करू शकलेले नाहीत अशी मांडणी तितक्याच कळवळ्याने माहुलकर करतात.

माहुलकरांनी धुंडलेली विविध क्षितिजे उजळणारा हा ग्रंथ भाषेच्या केंद्रबिंदूपासून एका मोठ्या परिघापर्यंत विस्तारत जातो. 'पाथवेज इन लिंग्विस्टिक्स' पासून सुरू होणारा प्रवास एका दृष्टीने इथे पुरा होतो. भारताची बौद्धिक स्वराज्याकडे पुन्हा एकदा वाटचाल चालू झाली आहे (बौद्धिक स्वदेशीचा आग्रह टाळून) त्याचे हे आणखी एक प्रसादचिन्ह!

मनोगत

१९३९ साली मॅट्रिक परीक्षा पास होऊन मी जेव्हा बडोदा कॉलेजात प्रवेश केला तेव्हा माझा प्रथम परिचय झाला तो डॉ. श्री. स. भावे या आमच्या संस्कृतच्या प्राध्यापकांशी नुकतेच ते जर्मनीहून डॉक्टरेट घेऊन परतले होते. त्यामुळे त्यांच्या वागणुकीवर युरपिअन संस्कृतीची झाक होती व शिकविण्यात युरपचा बुद्धिवाद होता. पहिल्याच दिवशी ते माझ्या ज्ञानावर खुष झाले व त्यादिवसापासून त्यांची —माझी आपुलकी वाढत गेली.

डॉ. भावे जरी संस्कृतचे प्राध्यापक होते तरी मराठी, इंग्रजी, जर्मन या भाषांच्या साहित्याचं वाचन उत्तम होतं. त्यामुळे मी जरी माझ्या पदवी—अभ्यासासाठी इंग्रजी हा विषय घेतला तरी आमच्या मैत्रीत खंड पडला नाही. १९४६ मध्ये मी जेव्हा इंग्रजीचा अध्यापक म्हणून कॉलेजात नोकरीस लागलो तेव्हा त्यांना आनंद झाला. त्या सुमारास त्यांच्याकडे पाणिनी — अध्यापनासाठी पं. मणिशंकर नावाचे गुजराती विद्वान येत. मीही लहानपणापासून तेलंगशास्त्री यांच्या मार्गदर्शनाने 'अष्टाध्यायी' थोडीफार अभ्यासली होती. त्यामुळे डॉ. भावे व मी भेटलो की बहुधा पाणिनि हाच आमच्या विवेचनाचा विषय असायचा.

इंग्रजी शिकविण्यासाठी मला सायन्स कॉलेजातील वर्गात जावं लागे. मला विज्ञानाची आवड होती, पण काही कारणांमुळे मला तो अभ्यास —विषय म्हणून शिकता आला नाही. सायन्स कॉलेजातील ग्रंथालयात मला एच. जी. वेल्स, ज्युलिअन हक्स्ली, बरट्रंड रसेल, जेम्स जीन्स यांचे ग्रंथ हाताळायला मिळाले. त्यांच्या विज्ञान —विचारांनी मी प्रभावित तर झालो, पण विज्ञानाची सारी प्रगती गणितामुळे झाली यामुळे मला गणिताचं एक आकर्षण वाटल. गणिताला एक विशिष्ट तर्कपद्धतीचा पाया असतो या रसेलच्या विचारामुळे मी त्याच्या एका श्रेष्ठ ग्रंथाचा पहिला खंड अभ्यासला व डॉ. भावे यांच्याशी पाणिनिच्या विवेचनात त्यातील सिद्धान्तांचा उपयोग करू लागलो. माझ्या या प्रयत्नानं डॉ. भावे खूष झाले व आपण दोघे हे सर्व नव्यानं मांडू अशी त्यांनी

सूचना केली. मी त्या उद्योगाला लागलो. पण गणिती तर्कशास्त्रातील उच्च थराचा अभ्यास कळेनासा झाला. त्यासाठी मी प्रा. मणेरीकर या गणिताच्या प्राध्यापकांना भेटलो. ते मला मदत करण्यास तयार झाले, परंतु त्यांनी हा विषय कधीच अभ्यासला नव्हता. त्यावेळच्या गणिताभ्यासाच्या समितीच्या काही कामासाठी डॉ. फिरोझ मसानी येत असत. त्यांची व माझी भेट प्रा.मणेरीकरांनी घालून दिली. डॉ. मसानी मूळ मुंबईच्या इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये गणिताचे प्राध्यपक असले तरी त्यांची – माझी ओळख झाली त्या वेळी ते अमेरिकेतील एका विद्यापीठात गणिताचे प्राध्यापक होते. त्यांनी मला एका संध्याकाळच्या चार तांसात गणिती तर्कशास्त्राच्या उच्च अभ्यासाची भूमिका समजावून दिली. परत जाता –जाता असही सांगून गेले की तू या विषयावर भारतीय विद्यार्थ्यांना उपयोगी पडेल असं सोपं पुस्तक लिही.

मी त्या उद्योगाला लागलो. दरम्यानच्या काळात पुण्याच्या डेक्कन कॉलेजनं भाषाविज्ञानाचे ग्रीष्मवर्ग सुरू केले. त्यात डॉ. भावे व मी व इतर काही प्राध्यापक एकाच बाकावर भाषाविज्ञान शिकू लागलो. आमच्या त्या वेळच्या शिक्षकांत डॉ. सुनीतिकुमार चटर्जी, डॉ. तारापोरवाला, डॉ. हनिग्झवाल्ड व डॉ. गम्पर्झ हे होते. युरपच्या भाषाविज्ञानापेक्षा अमेरिकन भाषाविज्ञान निराळं होतं. ते अधिक तार्किक व गणिती असल्यामुळे मला ते समजलं, पण पूर्णांशानं पटलं नाही. याचं कारण त्यात भारताच्या परंपरेचा कुठंही उल्लेख होत नसे. ही उणीव भरून काढण्याकरता डॉ. मसानी यांनी सुचविलेल्या पुस्तकात मी त्याची भरपाई करायचं ठरवलं. माझं पुस्तक जवळ –जवळ दोनशे पानांचं हस्तलिखित बनलं.

आता हे कोण प्रकाशित करणार हा माझ्यापुढे मोठा प्रश्न होता. सर्वांकडून नकार आला, कारण असा विषय कोणत्याही विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात नव्हता. शेवटी निराश होऊन एक दिवशी मी ते बाड माझ्या हातानं सूरसागर या बडोद्यातील तलावात फेकून दिलं. माझ्या जीवनाचं एक पर्व संपलं.

माझं हस्तलिखित नाहीसं केल्यानंतरच्या आठवडाभरात ब्रिटिश कौन्सिलची इंगलंडमधील अभ्यासार्थ जाण्यासाठी लागणाऱ्या अर्जासाठी जाहिरात वाचली. त्यात तुम्ही कुठलं तरी पुस्तक प्रकाशित केलं असलं पाहिजे अशी अट होती. माझ्या मनात कालवाकालव झाली. या निराशेत माझे एक प्रकाशक मित्र, मी लहानसं पुस्तक लिहिलं तर छापण्याची व्यवस्था करण्यास तयार झाले. पुस्तक छापलं गेलं The Groundwork of Modern Logic (1959) या नावानं. त्याच वर्षी मी इंग्लंडच्या भूमीवर पाय ठेवले.

माझे वडील इंग्लंडमध्ये १९३०-३३ या वर्षात नोकरीनिमित्ताने राहिले होते. त्यांच्या तोंडून तिथल्या जीवनाच्या अनेक गोष्टी मी लहानपणापासून ऐकल्या होत्या. त्यानंतर कॉलेजात प्रिन्सिपल रोमन्स, प्राध्यापक टिळक, प्रा. साळगावकर यांच्याकडून इंग्रजी साहित्याचे पाठ घेतले होते. त्यामुळे लंडनमधील ज्या हॉटेलात रात्री येऊन ठेपलो तिथल्या राहण्याच्या खोलीची खिडकी सकाळी सात वाजता उघडून वर्डस्वर्थ कवीनं वर्णन केलेल्या त्या शहराच्या विशाल हृदयाचं स्पंदन अनुभवून मी माझं तिथलं जीवन सुरू केलं. माझ्या जीवनाचं हे दुसरं पर्व होतं.

प्रथम काही महिने लंडन विद्यापीठातील MT (Machine Translation) या विभागात प्राध्यापक अॅश्बी व किलमिस्टर यांच्या हाताखाली सायबरनेटिक्स या विषयाचा अभ्यास केला; नंतर केंब्रिज व ऑक्स्फर्ड या विद्यालयांत प्रा. अॅलन व बरो यांच्याबरोबर इंडो-युरपिअन व संस्कृत यांचा अभ्यास केला; व शेवटी एडिंबरा विद्यालयात डॉ. हॅलिडे यांच्या हाताखाली ‘भाषा व समाज’ या विषयावर संशोधन केलं. हे सारं ज्ञान मी कणाकाणांनीच नव्हे तर पोती भरभरून घेतालं, पॅरीस व जिनीवा येथील सोस्युरच्या व्याख्यान-वर्गाचं मंदिरं म्हणून दर्शन घेतलं व शेवटी ‘कर्थेज’ या स्टीमरनं भारताकडे येण्यास निघालो. एका विशाल ज्ञानसागराकडून भारताच्या एका कुजलेल्या गटार गंगेत-जाऊन पडणार या दु:खानं शेवटचे अश्रू ढाळले.

माझ्या जीवनाच्या तिसऱ्या पर्वाची अपेक्षिली होती तशीच सुरवात झाली. इकडे आड, तिकडे विहीर या म्हणीचा अनुभव घेत माझे इंग्रजी विभागातील स्थान व अधिकार डळमळीत करण्याच्या कारवाया मी तेथून परतण्यापूर्वीच सुरू झाल्या होत्या. वरची जागा मला न देता शिफारसीने बाहेरच्या उमेदवारास दिली गेली. M. A. ला सर्व पेपर्स इंग्लिशमध्ये असणारा फक्त मीच या विभागात होतो. ओल्ड इंग्लिश, मिडल इंग्लिश दोन्हींवर माझे खास प्रभुत्व असल्यामुळे माझ्या कारकीर्दीच्या पहिल्याच वर्षापासून एम्. ए. ला मी शिकवीत आलो; ते पेपर्स अभ्यासक्रमातून काढून टाकून माझा गौरव किंवा यश कमी करण्याने आपोआप माझे महत्व कमी करून आर्टस् फॅकल्टीमधून माझी बदली फॅकल्टी ऑफ टेक्नॉलॉजी येथे केली. हा एकप्रकारे मानभंग होता. दुसरीकडे भाषाविज्ञान ह्या नव्या विभागात मुख्य अध्यापक म्हणून दुसऱ्याच एका नावाचा उल्लेख कानी आला. मी इंग्रजी विभाग सोडला व कुठलीही बढती न अपेक्षिता भाषाविज्ञान विभाग चालू केला.

भाषाविज्ञान या विभागात मी वीस वर्ष काम केलं. विषय अवघड, थोडा गणिती स्वरूपाचा यामुळे साहित्य विभागांनी विद्यार्थ्यांना घाबरवलं : “तुमचा क्लास जाईल!” यामुळे जे विद्यार्थी लाभले ते परदेशातून येणारे. तरीपण जे काही नव्यानं सांगावसं वाटलं त्यासाठी अनेक संस्थांनी मला आमंत्रण देऊन मान दिला याबद्दल मला त्यांचे आभार मानायला हवेत. टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च या संस्थेतील संगणक विभागाचे मुख्य डॉ. नरसिंहन यांनी ‘पाणिनीच्या सूत्रांचे गणितीकरण’ या विषयावर माझी व्याख्याने घडवून आणली, टाटा इन्स्टिटयूट ऑफ सोशिअल सायन्सिझ या संस्थेचे डायरेक्टर डॉ. गोरे यांनी ‘भाषा व समाज’ या विषयावर माझी व्याख्याने ठेवली; अलीगढ मुस्लीम विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाचे प्रमुख (नंतर उपकुलपती) डॉ. रईस अहमद यांनी माझी ‘गणिती भाषाविज्ञान’ या विषयावर व्याख्यानं योजिली; मुंबई विद्यापीठाचे डॉ. बॅनर्जी यांनी ‘विल्सन व्याख्यानमाले’साठी मला नियुक्त केलं; डेक्कन कॉलेजनं नव्यानं सुरू केलेल्या श्रीमती राधाबाई कत्रे स्मृति-व्याख्यानांना मला बोलावून मान दिला. या सर्वांचे मन:पूर्वक आभार

मानताना मला हे कबूल करायला हवं की त्या काळात या निरनिराळ्या व्याख्यानांत मी जे विचार मांडले ते त्या-त्या काळाशी सापेक्ष होते. ते आता जुने झाले आहेत व ज्या गणिती तर्कशास्त्राच्या भूमिकेवरून मी ते मांडले तीही आता पुष्कळ मागे पडली आहे. विशेषत: संगणकाच्या प्रवेशानंतर आजची सारी ज्ञानव्यवस्था बदलली आहे. प्रो. बरो यांच्या पुस्तकासंबंधी बोलताना मी त्यांना म्हटलेलं आठवतं की त्यांनी त्यात पाणिनीपूर्वीची व्याकरण-व्यवस्था स्पष्ट केली नाही तसच पाणिनीनंतर काय झालं हेही मांडलं नाही. त्यामुळे पाणिनीचं भारतीय भाषाभ्यासातील स्थान व त्याचं प्रदान अस्पष्टच राहिलं आहे.

नोकरीतून निवृत्त होताच हे कार्य मी करायचं ठरवलं. तसं पत्रही मी डॉ. बरोंना पाठविलं. त्यांचा आशीर्वाद आल्यानंतर विद्यापीठ-अनुदान आयोगानं मला या संशोधनासाठी मदत पाठविली. प्रथम माझी भूमिका मी छोटेखानी पुस्तकात- The Prtiakhya Tradition and Modern Linguistics, (1981) — स्पष्ट केली व संशोधन पूर्ण झाल्यानंतर माझं Pre-Pninian Linguistic Studies, (1990) हे पुस्तक प्रसिद्ध झालं.

या पुढील संशोधनासाठी मी शिमला येथील 'भारतीय उच्च अध्ययन संस्थान' या ठिकाणी जाण्याचा ठरविलं. शिमल्यातील दोन वर्षांचं वास्तव्य इंग्लंडच्या खालोखाल संस्मरणीय ठरलं. पूर्वीच्या 'व्हॉइसरीगल लॉज' मधील दोन सुशोभित दालानांतलं जीवन, विशाल ग्रंथसंग्रहालय, सुंदर उद्यान, हिमालयाच्या शिखरांचं रोज मिळणारं दर्शन, विद्वान मंडळींचा सहवास व संस्थेचे तत्कालीन डायरेक्टर डॉ. ग्रेवाल यांची दक्षता यामुळे शिमल्याचे वास्तव्य नव्या विचारांना पोषक ठरलं. या संस्थेतर्फे मी जे संशोधन केलं ते Methodology of Socio-Historical Linguistics या नावानं १९९६ मध्ये प्रसिद्ध झालं. 'भाषा' व 'भाषाविज्ञान' या विषयाच्या एकोणीसाव्या शतकातील अभ्यासातील उणीवांचा त्यात सविस्तर विचार केला असून सोस्युरच्या विचारांना नव्यानं समजल्याशिवाय भाषाविज्ञान पुढे पाऊल टाकू शकणार नाही हे स्पष्ट केलं आहे.

भारतीय भाषाभ्यासात जिवंतपणा आणायचा असला तर जसा भारतीय परंपरेचा संपूर्ण वैज्ञानिक अभ्यास व्हायला हवा तसं भाषाविज्ञानाला 'विज्ञान' म्हणवून घ्यायचं असलं तर आजच्या संगणक 'आज्ञावलींच' व पाणिनीच्या सूत्रपध्दतीचं नवं गणित रचायला हवं. याचं विवेचन करण्यासाठी शिमल्याच्या अध्ययन संस्थेनं एक चर्चासत्र योजिलं परंतु या चर्चासत्रात भाग घेण्यासाठी जीवनावश्यक नव्या दमाचे संगणक–विशेषज्ञ येणारे होते ते आले नाहीत. जी मंडळी आली ती रूढ पाणिनीय व्याकरण अभ्यासणारी. त्यामुळे माझं समाधान झालं नाही. जे प्रबंध वाचले गेले ते Essays on Panini (1998) या नावानं मला संपादित करून प्रसिद्ध करावे लागले.

पुन्हा एकदा मी 'भाषा' या विषयाविषयी व त्याच्या वैज्ञानिक अभ्यासाविषयी माझी भूमिका सोप्या पद्धतीनं मांडावी असा माझी पत्नी अलकनंदा हिचा आग्रह होता. तिनं त्यासाठी हवा तो मराठी लिहिण्याचा सराव मला व्हावा यासाठी जे परिश्रम घेतले त्याबद्दल मी तिचा आभारी आहे. मराठीत एखादा योग्य अर्थच्छटा असलेला शब्द शोधून काढण्याचं कठीण काम तिनं केलं आहे. Orientalism ला 'पूर्वाभिगम' हा तिनं सुचविलेला शब्द सर्वसामान्य होईल अशी आशा आहे.

या पुस्तकाच्या लेखनाची सुरुवात चांगल्या दिवशी व पवित्र ठिकाणी व्हावी या सदिच्छेनं माझे पूर्वीचे विद्यार्थी व आता आमची आसथेनं विचारपूस करणारे मित्र श्री. प्रकाश कात्रेकर हे आपल्या मोटारीनं आम्हांला गरुडेश्वर या परमहंस परिव्राजक वासुदेवानंद सरस्वती यांच्या पवित्र तीर्थस्थानी दि. ४ नव्हेंबर १९९७ या दिवशी घेऊन गेले. तेथील दत्तमंदिरात बसूनच मी या पुस्तकाचं पहिलं प्रकरण लिहिलं.

माझं हे पुस्तक लिहून पूर्ण व्हावं यासाठी ज्यांनी भाषाविज्ञान हा स्वतःचा विषय नसतानाही अतोनात परिश्रम घेतले ते म्हणजे श्री. निशिगंध देशपांडे. नव्या नव्या वैज्ञानिक ग्रंथाचा सतत भरणा ते माझ्याकडे करीत राहिले त्यांची

सुकन्या सौ. मुकुल तिनं विद्युत-लेखनाचं अवघड कार्य अंगीकारलं. या सर्व कुटुंबाचे आभार मानावे तितके थोडे!

महाराष्ट्र शासन पुरस्कृत राज्य मराठी विकास संस्थेच्या संचालक डॉ. सरोजिनी वैद्य यांनी पुस्तकाच्या प्रसिद्धीसाठी जी आस्था दाखविली तिच्याबद्दल मी त्यांचा अत्यंत ऋणी आहे.

दिनेश द. माहुलकर

१०.मयूर अपार्टमेंट, फत्तेहगंज,

बडोदा -३९० ००२

प्रस्तावना

'भाषा' हा या पुस्तकाचा मुख्य अभ्यास-विषय आहे. गेली दोन-अडीच लाख वर्षं माणूस भाषा बोलत आला असला तरी 'भाषा' या गोष्टीविषयी जाणीवपूर्वक केलेला तिचा विचार गेल्या चार-पाच हजार वर्षावधीतलाच आहे. जैविकदृष्ट्या माणूस हा पशु असला तरी इतर पशूंपेक्षा तो वेगळा व अधिक समर्थ झाला तो केवळ भाषेमुळेच. मानवाचा विकासक्रमातलं भाषेचं हे महत्त्व लक्षात आल्यापासून तत्त्वज्ञांनी भाषाभ्यासाकडे आपलं लक्ष वळविलं. अलीकडील काळात, म्हणजे गेल्या दोनशे वर्षांत, हा भाषाभ्यास 'विज्ञान' या पदवीला पोचला आहे.

भाषाभ्यास हा 'भाषाविज्ञान' केव्हा झाला याची कालमानातील सीमारेखा जरी ठरविता आली नाही तरी ज्या समस्येमुळे हा अभ्यास विज्ञानाच्या दालनात दाखल होऊ शकला ती समस्या आजही अगदी ताजी आहे. ती अशी की, जैविकदृष्ट्या माणसं इथून-तिथून सारखी असली तरी त्यांच्या भाषा वेगळ्या का? सदासर्वकाळ —सर्वत्र माणसं एकच भाषा का बोलत नाहीत? मानवी भाषांच्या या वेगळेपणाचं कारण युरपातल्या विद्वानांनी आपल्या धर्मग्रंथात आढळणाऱ्या काही मिथ्य कल्पना मान्य राखून श्रद्धापूर्वक स्वीकारलं. परंतु अठराव्या शतकाच्या सुरुवातीपासून श्रद्धेऐवजी बुद्धी ही त्यांना श्रेष्ठ वाटू लागली. त्याच सुमारास पूर्वेकडील देशांशी त्यांचं दळणवळण वाढू लागलं. हजारो मैल दूर पूर्वेकडील देशात युरपातल्या भाषांपेक्षा अगदी वेगळ्या भाषा असतील या सर्वसामान्य कल्पनेनं त्यांनी भारताच्या भूमीवर पाय ठेवले. पण आश्चर्य हे की भारतात त्यांना अगदी वेगळी भाषा आढळण्याऐवजी त्यांना ठाऊक असणाऱ्या ग्रीक, लॅटिन, जर्मानिक या भाषांसारखीच, किंबहुना त्यांची बहीण शोभेल अशी, संस्कृत भाषा आढळली. भाषा 'वेगळ्या' का या प्रश्नाला कलाटणी मिळून भाषा 'सारख्या' का असा प्रश्न आता त्यांच्यापुढे उभा राहिला. युरपातल्या भाषाभ्यासात हा प्रश्न निर्माण झाला तो मुख्यत्वे पूर्वेकडील

संस्कृतच्या ज्ञानामुळे. येथूनच भाषाभ्यासाचं स्वरूपांतर भाषाविज्ञानात होऊ लागलं असं म्हणायला हरकत नाही; इतकंच नाही तर युरपातल्या पूर्वाभिगमाची (Orientalism) मुहूर्तमेढही त्याच क्षणी रोवली गेली. पूर्वेकडील संस्कृतच्या संस्पर्शामुले साऱ्या भाषाभ्यासानं वैज्ञानिक वळण घेतलं ही घटना आजच्या विश्वसंस्कृतीच्या अभ्यासाचा महत्त्वाचा भाग ठरली आहे. भारताच्या इतिहासात तर तिला गौरवाचं स्थान दिलं जातं.

आपल्या काव्यभाषेचं वर्णन करताना मोरोपंतांनी तिला 'संस्कृत-प्राकृत-मिश्रित यास्तव कोणी म्हणेल ही कंथा' असं म्हटलं आहे. संस्कृत-ग्रीक-लटिन-जर्मानिक-मिश्रित भाषाविज्ञानाची पहिली कंथा प्रगट झाली ती फ्रान्झ बोप (इ.स. १७९१-१८६७) या विद्वानाच्या इ. स. १८१६ त प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात. संस्कृत भाषा व तिचा पद्धतशीर व्याकरणाभ्यास हा प्राचीन काळापासून आपल्या देशातल्या शिक्षणातला महत्वाचा विषय असला तरी या अभ्यासाला एक नवं बौद्धिक कोंदण पुराविन्याचं काम युरोपातल्या विद्वानांनी बोपच्या या ग्रंथपासून सुरू केलं हे मान्य करायला हवं. संस्कृतच्या ज्ञानाचा उपयोग अशा योग्य प्रकारे व्हावा ही आम्हांला अभिमान वाटावा अशी गोष्ट होती. तसा अभिमान भारतीय विद्वानांनी उघडपणे व्यक्त केला आहे. परंतु विज्ञानांनी मात्र हा अभ्यास आपल्या विज्ञान विषयाच्या तत्त्वज्ञानात एक महत्वाचं परिवर्तन आणणारा ठरेल ही जाणीव तेव्हा नव्हती व अद्यापही नाही . तशी ती व्हावी हा हे पुस्तक लिहिण्यामागचा प्रांजल उद्देश आहे.

आजच्या विज्ञानाभ्यासामुळे जो एक कूटप्रश्न आहे तो असा की विश्वात अशा अनेक व्यवस्था आढळतात ज्यांचं स्वरूप, आकाशातल्या ढगांसारखं, खूपसं संकुलित (complex), अस्थिर व चंचल असतं. अनेक खगोलीय, जैविक. रासायनिक व्यवस्था संकुलित व चंचल असतात. पूर्वी अशी एक कल्पना होती की हे सारं विश्व व त्यातील विविध व्यवस्था घड्याळातल्या यंत्रांप्रमाणे सुघटित, सुविरचित आहेत. कोपर्निकस, गॅलिलिओ, न्यूटन हे विज्ञानीच नव्हे तर प्लेटोपासून कान्टपर्यंतच्या तत्त्वज्ञांनीदेखील हीच मान्यता

प्रगत केलेली आढळते. तिच्या आधारावरच युरपची सारी यांत्रिक संस्कृती उभारली गेली. १८८० नंतरच्य युगात जेव्हा विज्ञान प्रवेश केला तेव्हा ही श्रद्धा हळूहळू कमी होत गेलेली आढळते. त्यानंतरच्या काळात युरपातल्या वैचारिक जगात दोन विचित्र विरोधी गट आढळतात: भाषांच्या वैविध्यातून, तुलनात्मक –पद्धती वापरून, सुघटितता घडविणारा भाषाविज्ञानींचा गट. व सुघटित संरचनांच्या कल्पाकडून संकुलिततेकडे झुकणारा पदार्थविज्ञानींचा गट. भाषाविज्ञानींनी 'इंडो –युरपिअन' ही एकरूप सुघटित कृती घडविली. याउलट न्यूटनला बाजूला सारून पदार्थविज्ञानींनी खगोल व परमाणू यांच्यातील संकुल व्यवस्था प्रगट केल्या. १९२५ च्या सुमारास भाषाविज्ञानींच्या 'इंडो –युरपिअन' या कृतीला भेगा पडू लागल्या; १९४५ तल्या अणु –स्फोटांनी संकुल –व्यवस्थांचं नवं विश्व निर्माण झाल्याची ग्वाही दिली. १९५० नंतरचं विसावं शतक 'व्यवस्था' या कल्पावर आधारलेल्या नव्या बौद्धिक संहितेत 'उद्गम –व –विकास' या सिद्धांताचा अभ्यास कसा करावा या रहस्यात गोंधळून गेलेलं आढळतं.

एखाद्या समस्येनं जेव्हा विज्ञांनी गोंधळून जातात तेव्हा ते आधारासाठी आपल्या क्षेत्रातल्या पूर्वसूरींच्या विचारांचा पुनर्विचार करू लागतात. या उल्लेखिलेल्या दोन विज्ञानी गटांनी ज्या पूर्वसूरींचा नव्यानं शोध सुरू केला ते म्हणजे भारताचा पाणिनी (इ.स.पू. ४ थं शतक) व युरपचा युक्लिड (इ.स.पू. ३ रं शतक) दोघांमध्ये एक शतकाचं अंतर होत तरी त्यांच्या अभ्यास पद्धतीतील तत्त्वं जवळजवळ सारखीच होती. फरक होता तो केवळ त्यांच्या अभ्यास – विषयांचा. पाणिनीचा अभ्यास –विषय 'भाषा' (त्यानं तिला कुठलंही नाव दिलं नाही) हा होता; युक्लिडचा विषय 'भूमिती' हा होता. उपयोग दृष्ट्या भूमितीचा अभ्यास विज्ञानात म्हत्त्वाचा व व्यापक बनला; पाणिनिच्या भाषेचा वापर भारताची संस्कृती बदलत गेली तसा थोड्या विद्वानांपुरता मर्यादित राहिला. जेव्हा पाश्चात्य विज्ञानींनी या दोघांच्याही अभ्यास पद्धतीची तुलना केली तेव्हा त्यांना असं आढळून आलं की हे थोर विचारवंत १९५० नंतरच्या विसाव्या

शतकात अवतरले तर ते एकमेकांना समजू शकतील इतकंच नाही तर त्यांच्या अभ्यासपद्धती नव्यानं आकारू लागलेल्या विज्ञानांना मार्गदर्शक ठरू शकतील.

विज्ञानाभ्यासात 'पूर्व म्हणजे पूर्व व पश्चिम म्हणजे पश्चिम ' असं नसून पूर्व-पश्चिमसारख्या दुहीतून बाहेर पडून स्थल-काल-समाज असल्या परिमाणांपलीकडे प्रतीकाभ्यासात उडी मारल्याशिवाय गती-स्थितींची समस्या कोणत्याही विज्ञानीला सोडविता येणार नाही. खऱ्या विज्ञानाभ्यासाला कुठलंही कुंपण सहन होत नाही. युक्लिडच्या पूर्व-धरणांना झिडकारून भूमितीनं मुक्तता मिळविली होती. याची ग्वाही फेलिक्स क्लेइन यानं आपल्या वयाच्या अवघ्या तेविसाव्या वर्षी एरलांगेन विद्यापीठात दिलेल्या व्याख्यानात (इ. स. १८७२) दिली होती. सोस्युर त्या वेळी लेइपझिग विद्यापीठात अभ्यासासाठी दाखल झाला होता. त्याच्या कानांवर हे शब्द पडले असतील असं मानायला हरकत नाही. विज्ञानाच्या अभ्यासातून 'दुही' (dualities) काढून टाकाव्या अशी सूचना त्यानं आपल्या व्याख्यानात केलेली आढळते इतकचं नाही तर प्रतीकाभ्यासात उडी मारल्याशिवाय भाषाविज्ञान प्रगट व प्रगत होणार नाही हेही सांगितलं आहे. ध्वनिशास्त्र, व्याकरण, शब्दशास्त्र, तौलनिक भाषाभ्यास ही त्याच्या काळातील भाषाविज्ञानाची कुंपणं होती. अशीच काही कुंपणं पाणिनीच्या काळातही असावीत. ती तोडून पुढे जा असा संदेश त्यानं आपल्या भाषाविज्ञानविषयीच्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथाच्या पहिल्या सूत्रातील पहिला शब्द 'वृद्धिः' यात दिला आहे. माझ्या या पुस्तकाचं शीर्षक म्हणून मी तो शब्द योजिला आहे; तो अधिक अर्थवाही ठरावा अशी अपेक्षा करतो; किंबहुना तो शब्द नसून एक मंत्र आहे असं मला वाटतं.

गणिताभ्यासात युक्लिड मागे पडला हे खरं, परंतु तो विसरला गेला नाही. आजही भूमितीचा आद्य प्रणेता म्हणून त्याचा उल्लेख गणिती व विज्ञानी करीत असतात. त्याच्या तुलनेत पाणिनी तसंच सोस्युर मानायला हवेत. सोस्युर अकाली वारला. त्याच्या शिकवणुकीचं पुस्तक त्याच्या विद्यार्थ्यांनी वर्गात केलेल्या व्याख्यानांच्या नोंदीवरून जुळवाजुळव करून छापलं ते १९१६

साली फ्रेंच भाषेत. त्याचं इंग्रजी भाषांतर १९६० साली प्रगट झालं. 'भाषा ही एक प्रतीक—व्यवस्था आहे' हे त्याच्या शिकवणुकीचं आद्यसूत्र समजावण्याला रोलंड बार्थ व जाक देरिदा यांचे ग्रंथ प्रगट व्हायला आणखी एक दशक लागलं.

पाणिनीचंही असचं झालं. पाणिनीनं वापरलेला 'वृद्धिः' हा शब्द फार सूचक आहे हे संस्कृतज्ञांना माहित आहे. पण त्याभोवती अनेक मिथ्यांचं धुकं पसरलं गेलं. आपल्या स्वतःच्या व्यवस्थेला एक नियम मोडून पाणिनीनं हा शब्द वापरला आहे असं सांगणारे व्याकरणकार आपला हा मोठा शोध आहे असं मानतात.

पाणिनीनं आपल्या ग्रंथारंभी कोणत्याही देव —देवतेला नमन केलं नाही असं त्याला 'पणी' (व्यापारी) मानणारे लोक तो शब्द लक्ष्मीवाचक मानतात. गुरुशिष्य परंपरा मानणारे लोक या शब्दानं तो आपल्या शिष्यांना आशीर्वाद देत आहे असं मानतात. पण 'वृद्धिः' हा शब्द गणिती अर्थाचा आहे व एखाद्या विज्ञानीलाच तो एक अर्थ व्यक्त करावासा वाटेल. त्याचा अर्थ 'वाढ', 'विकास' असा आहे. ज्याचा विकास किंवा वाढ होते असा निसर्गसृष्टीतला वृक्ष—वेली यासारखा असतो. पाणिनीचा अभ्यास—विषय भाषा होता. आपल्या या अभ्यास—विषयाच्या अंतरंगात त्याला तिचं जे दर्शन झालं ते तिच्या सदैव नवनिर्मितिक्षम तत्त्वांचं. या तत्त्वांचं द्योतक म्हणून त्यानं हा शब्द वापरला असं म्हणण्याचं धाडस मी करू इच्छित आहे. नदी ही ज्याप्रमाणे पर्वतातल्या कुठल्यातरी अगम्य दरीतून उगम पावते व सदैव पुढे-पुढे आपला मार्ग विकसित जाते, तीरावर राहणाऱ्या प्राणी वनस्पती यांना आपल्यात सामावून, बाजूच्या प्रदेशांना फलद्रूप करीत वाहत राहते त्याप्रमाणे भाषा आपला उगम सुप्त ठेवून पुढील विकास साधत राहते, अधिकधिक विशाल होत राहते असं काहीसं पाणिनीला सूचित करायचं असेल का?

भाषेच्या 'उद्गम-व-विकास' यांच्याविषयीच्या तर्कवितर्काच्या जाळ्यातून या शब्दाला सोडवून त्याला वरील अर्थानं भाषाविज्ञानात दाखल केला तर

भारतीय भाषाविज्ञानाचा तो एक श्रेष्ठ मंत्र होऊ शकेल इतकंच नाही तर पाश्चात्य विज्ञानींना त्यांच्या आजच्या 'विकसनशील व्यवस्था' (developmental systems) या अभ्यासात मार्गदर्शक होऊ शकेल असं मला वाटतं. एके काळी मान्य भाषाभ्यास हा आपल्या अभ्यास-विषयातील नियम व त्यांचे अपवाद हे प्रश्न सोडविण्यात गर्क होता; मग तो आपल्या अभ्यास-विषयाचे घटक व त्यांच्या संरचना शोधण्यात मग्न झाला; त्यानंतर तो आपल्या अभ्यास-विषयाचा 'उद्‌गम-व-विकास' कसा झाला यांची रहस्यं शोधण्यामागे लागला. आजच्या भाषाविज्ञानापुढे जो प्रश्न आहे तो असा की मानवी मेंदूत घडणारी 'भाषा' नावाची प्रक्रिया स्थिती आहे की गती? स्थिती असेल तर कोणताही संगणक तिला आत्मसात करून तिच्याहून वरचढ ठरेल, पण गती असेल तर तिला संगणकाला चीत करून स्वत:चा विजय सिद्ध करावा लागेल.

हा प्रश्न मी निर्माण केला आहे असं नाही. वर ज्या 'व्यवस्था' या कल्पाचा उल्लेख केला त्याच्या अभ्यासातून हा प्रश्न निर्माण झाला आहे. 'व्यवस्था' या कल्पावर अधिष्ठित असणारं सारं विज्ञान आज अशा एका विचाराशी येऊन थबकलं आहे की हे सारं विश्वचक्र सदैव गतिमान असताना माणसाला त्याला थांबवण्याचं, त्याच्या गतीची स्थिती करण्याचा मोह का वाटतो? एका तत्त्वज्ञानं एका सुरवंटाला प्रश्न केला: 'तू तुझ्या शंभर पायांनी कसा चालतोस? सुरवंट विचारात पडला. बिचारा जसजसा विचार करु लागाला तसतशी त्याची गती बंद झाली व चालू लागताच त्याचा विचार बंद पडला! मानवाच्या आजच्या ज्ञानाभ्यासात असं काहीसं घडत आहे व या समस्येतून बाहेर पडायला माणूस कुठलातरी बौद्धिक मार्ग शोधत आहे.

भाषाविज्ञान सुरू झालं ते अशा विचारानं की भाषेचा उगम एकच आहे. पण नदीला जसे फाटे फुटतात तसे काल-व-स्थल या परिमाणांमुळे भाषा वेगळ्या बनल्या. त्या सर्वात काहीतरी साम्य आढळतं. तेव्हा या साम्याचा अभ्यास करून त्यांच्या घडलेल्या परिवर्तनाचे नियम हाती लागतील व त्यांच्या आधारानं त्यांचा उगम प्रत्यक्षात सापडला नाहीतरी तो कल्पनेनं रचता येईल.

या प्रयत्नासाठी भाषाविज्ञानींना आपली पहिली पावलं टाकावी लागली ती व्याकरणाभ्यासांनी रचलेल्या स्थिर नियमांच्या अधारांनी, संस्कृतचे संधिनियम अगदी बालसुलभ म्हणून ते प्रथम हाती आले. त्यांच्या नियमावल्या बनविल्या गेल्या. पण काही अपवादांनी आपली डोकी वर काढली. त्यांना ग्रंथांच्या पानांच्या पदतळी घातली. पण जसजसा हा हव्यास वाढला तसतशी भाषांच्या अंतरंगातून भलतीच भूते बाहेर पडली. एक +विंशति यांचा संधी 'एक विंशति', पण मग एक +दश यांचा 'एकादशी' का? 'अव +गाह्' या धातूचा प्रयोग 'अवगाह्य' असा असताना कालिदासाने 'वगाह्य' असा केला तो कोणत्या नियमानं? भाषेच्या 'परिवर्तना' चा (change) प्रश्न सोडविता–सोडविता युरपातले भाषाविज्ञानी थकले. ब्रुगमानसारख्या श्रेष्ठ भाषाविज्ञानीच्या शेवटच्या लेखनात ही कबुली आढळते.

खरं पाहता या समस्येचा उकल अगदी सोपा होता. पण त्यासाठी पूर्वेकडे पाणिनी व त्याच्या अभ्यासाची परंपरा नव्यानं हाताळयला हवी होती. पाणिनीनं आपल्या ग्रंथात 'परिवर्तन' हा शब्द वा कल्प वापरलेला नाही. 'क्' चा 'ग्' होतो असं तो कधीही म्हणत नाही. क् च्या ऐवजी ग् प्रतिष्ठापित होतो असं म्हणण्याची त्याची प्रथा आहे. त्याच्या या प्रथेत फार मोठा तार्किक अर्थ होता. जैमिनीसारख्या मीमांसकाला तो चटकन कळला. 'दध्यत्र' या शब्दात 'दधि+अत्र' असे घटक आहेत, परंतु इथं 'इ' चा 'य्' असा 'विकार' (परिवर्तन) होतो असं म्हणणं चुकीचं आहे, 'इ' च्या ऐवजी 'य्' असं 'वर्णान्तर' आहे असं म्हणायला हवं असं तो सांगतो.

पाश्चात्त्यांची दिशाभूल झाली ती पाणिनीची 'व्यवस्था' त्याला नको त्या काटेरी व्याकरणी कुंपणात अडवून ठेवण्यामुळे झाली. पाणिनीनं जसं आपण जिचा अभ्यास केला त्या भाषेला नाव दिलं नाही तशा काल–स्थल–मर्यादाही आखल्या नाहीत. ज्या भाषेची सूत्र त्यानं रचली ती एक चंचल गतिमान गोष्ट होती. घटका- घटकांनी व त्यांच्या संरचनांनी चंचल, जिवंत राहणारी, स्वतःला घडवत राहणारी गोष्ट आहे याची त्याला जाणीव होती. वेदकाळात

‘विशाखा’ असा एका नक्षत्रनामाचा एकवचनी प्रयोग होता, आता ‘विशाखे’ असा द्विरचनी प्रयोग होतो असं सांगण्यानं त्यानं आपल्या काळातील खगोलज्ञानातील प्रगतीचा परिचय आपणाला करून दिला आहे. त्याच्या या प्रथेमुळे त्याच्या शिष्यांनी त्याच्या नव्या नव्या ‘वार्तिकां’ ची भर घातली. त्यांचं हे करणं नव्यानं येणाऱ्या व्याकरणकारांना पसंत पडलं नसावं. याचं कारण मूळ नियमांपेक्षा वर्तिकांचीच गर्दी वाढेल अशी त्यांना भीती वाटली असावी. त्यांच्या या भीतीचं मूळ ‘व्यवस्था’ या विषयातल्या एका उदाहरणानं समजविता येईल. ग्रीक तत्त्वज्ञानात अशी एक समस्या आढळते की, समजा एक जहाज आहे व त्याची एकेक लाकडी फळी रोज काढून तिच्याजागी नवी फळी जोडली जाते. यावरून ते जुनं जहाज नवं केव्हा झालं हे तुम्ही सांगू शकाल का? आधुनिक व्यवस्थांच्या अभ्यासात असे गोंधळात टाकणारे अनेक प्रश्न निर्मान झाले आहेत. ज्याला ‘रसेलचा विसंवाद’ म्हणतात तो देखील असाच आहे. रसेल म्हणतो : एका विशिष्ट गावी एक न्हावी आहे तो अशा माणसांची दाढी करतो की जे स्वतःची दाढी करीत नाहीत. मग तो न्हावी स्वतःची दाढी करतो की नाही?- तुम्ही काहीही उत्तर द्या : ‘हो’ किंवा ‘नाही’, तुम्ही भाषेच्या एका विषचक्रात सापडता.

भाषेची ‘व्यवस्था’ स्थिर करण्यामुळे असं घडतं हे लक्षात आल्यामुळे पाणिनी आणि सोस्युर यांनी तिचं स्थितीकरण टाळून तिला प्रतीक-व्यवस्थेत स्थापन केली व तिच्या व्यवस्थेची पेटी बंद करण्याऐवजी ती उघडी ठेवली. यामुळे कोणत्याही व्यवस्थेचा ‘उगम-व-विकास’ हा प्रश्न डावलला जाऊन त्याऐवजी तिच्या नवनिर्मितीक्षम तत्त्वांचा अभ्यास, त्यांच्यात घडविल्या जाणाऱ्या रचना व रचनांचं रचनान्तर कसं होत राहतं हा विकासक्रम अभ्यासता यावा.

भाषाविज्ञानाला अशा परोक्षरीतीनं हाताळता यावं या उद्देशानं पाणिनीनं भाषा व तिच्यातल्या संगती समजविण्यासाठी एक ‘पराभाषा’ (meta-language) निर्माण केली. युक्लिडनंही एक पराभाषा निर्माण केली व

तिच्यायोगे तो आपल्या अभ्यासविषयातील सिद्धान्तांच्या सिद्धी साधू शकला. पाणिनीला ज्या सिद्धी अभिप्रेत होत्या त्या युक्लिडच्या सिद्धिंप्रमाणे गणिती स्वरूपाच्या नव्हत्या. आपल्या साऱ्या सूत्रांचा (algorithms) 'संगणक' पाणिनी स्वत: बनला व त्याची सूत्रं ही त्यातल्या 'स्मृति' व 'आज्ञावली' बनल्या. युक्लिडच्या सिद्धिंना जसं गणिती स्वरूप होतं तसं पाणिनीच्या सिद्धिंना भाषेच्या उपयोगितेचं किंवा अर्थ वहनतेचं 'गणित' अभिप्रेत असावं. पण ते इतकं गूढ होतं की त्याचा ठाव घेणं शक्य नव्हतं. पाणिनीच्या या साऱ्या प्रयत्नाचा रोख जाणणारा एक विद्वान होऊन गेला तो म्हणजे धारा-नरेश भोजदेव (११ वं शतक). सरस्वती-कंठाभरण' या आपल्या व्याकरण-ग्रंथात त्यांन या परंपरेचं सातत्य प्रगट केलं आहे व जिथं या सातत्याला खीळ बसते – आधुनिक भाषेत, जेव्हा हा संगणक बंद पडतो – अशी स्थळं निश्चित केली आहेत.अशी ठिकाणं भाषेची 'व्यवस्था' बदलण्याच्या खुणा मानल्या आहेत. 'विकल्प' हे त्या व्यवस्थेचा बदलता क्रम व्यक्त करणारी तत्त्वं मानली आहेत. आधुनिक कालमानतंत्र वापरून ती भाषा कुठल्या गतीनं व प्रकारानं बदलत गेली हे स्थूलपणे ठरविणं शक्य होऊ शकेल. पाणिनि-परंपरेच्या अभ्यासाचं हे रहस्य नंतरच्या विद्वानांच्या लक्षात आलं नाही. या संबंधात युरपिअन भाषाविज्ञानात विवेचन मिळतं, पण त्यांना अद्याप त्याचे सिद्धान्त बनविता आले नाहीत. 'निरर्थक' (non-sense) वाक्यं बनविण्याचा खेळ काही भाषाविज्ञानींनी खेळून पहिला. चोम्स्कीनं एक वाक्य बनविलं : 'रंगहीन हिरव्या कल्पना खवळून झोपतात.' मग अशा वाक्यांना 'चोम्स्की-वाक्ये' असं म्हणण्याचा प्रघात पडला. पण चोम्स्कीपूर्वी रसेलनं हा खेळ खेळून पहिला. १९४०त प्रसिद्ध झालेल्या आपल्या एका ग्रंथात त्यानं 'चतुष्कता दिरंगाई पिते' (Quadruplicity drinks prorastination) हे वाक्य दिलं होतं. कोणताही संगणक असं वाक्य निर्माण करू शकणार नाही किंवा कोणी ते निर्माण करून संगणकाला भरवलं तर तो ते अर्थहीन म्हणून थुंकून टाकील. पण योगायोग असा की गेल्या महायुद्धाच्या मध्यात अमेरिका, इंग्लंड, रशिया व फ्रान्स या राष्ट्रांच्या चार पुढाऱ्यांनी एक भेट-प्रसंग योजिला व युद्ध चालू ठेवावं की बंद करावं यासंबंधी विचार-विनिमय

केला. शेवटी त्यांनी निर्णय घेतला की हा प्रश्न सध्या लांबणीवर टाकावा. त्या वेळच्या लंडन टाईम्सनं या चार पुढाऱ्यांचा हा निर्णय जाहीर करताना त्यांचा एक फोटो छापला.त्यात त्या चौघांच्या हातात मद्याचे पेले होते व ते त्याचे घोट घेणार होते. फोटोच्या वर मोठ्या ठळक अक्षरात जे शीर्षक छापलं होतं ते : 'चतुष्कता दिरंगाई पिते'. अगदी अर्थपूर्ण!

संगणकापेक्षा मानवी मेंदू अधिक निर्मितीक्षम आहे हे वेगळं सिद्ध करायला नको. जीवनाच्या अर्थसमृद्धीची पेटी कोणी कधीही भाषेने अथवा तिच्या व्याकरणानं बंद करू शकणार नाही हेच पाणिनीच्या 'वृद्धिः' या मंत्राच रहस्य होतं.

'Colorless green ideas sleep furiously.' (भारतीय व्याकरणकारांनी अशा वाक्यांचा विचार केला होता. R. H. Robins : A short History of Linguistics, p.139)

१. सोनियाचा दिवस

प्राचीन काळापासून भाषेसंबंधी ज्या एका प्रश्नानं माणसाला खूप गोंधळात टाकलं आहे तो असा की, भाषा वेगवेगळ्या का असतात? सर्वत्र, सार्वकाल माणसं एकाचा भाषा का बोलत नाहीत? युरपातल्या ज्या विद्वानांनी या प्रश्नाचं उत्तर देण्याचा प्रयत्न केला त्यांनी त्यासाठी आपल्या ख्रिस्ती धर्मातल्या एका कथेचा आधार घेतलेला आढळतो. बायबल (जेनेसिस ११) मधली ती कथा अशी की, पृथ्वीवरील माणसांनी देवाच्या स्वर्गापर्यंत पोचण्यासाठी एक उंच मनोरा बांधायचं ठरवलं. मनोरा खूप उंच उंच रचला गेला आणि एके दिवशी तो देवाच्या नजरेस पडला. आपल्याला न विचारता बांधायला घेतलेल्या या मनोऱ्यावर चढून माणसं लौकरच स्वर्गात पाय ठेवतील हे जाणून देवाला राग आला. त्यानं त्या मनोरा बांधणाऱ्या माणसांना शाप दिला की, तुम्ही वेगवेगळ्या भाषा बोलाल. झालं, लगेच बांधकाम करणारी ती माणसं वेगवेगळ्या भाषा बोलू लागली. कोणाचं म्हणणं कोणाला कळेनासं झालं. त्यामुळे मनोऱ्याचं बांधकाम अर्धवट राहिलं; माणूस देवाच्या स्वर्गात पाय टाकू शकला नाही. भाषाभाषांमधल्या वेगळेपणामुळे माणसं एकमेकांचं मनोगत समजू शकली नाहीत, तेव्हापासनं ते आतापर्यंत!

भाषा वेगवेगळ्या का? या प्रश्नाचं हे उत्तर युरपातली माणसं जोपर्यंत श्रद्धाळू होती तोपर्यंत त्यांना खरं वाटलं. पण सोळाव्या शतकाच्या सुरुवातीपासून त्यांना श्रद्धेपेक्षा बुद्धी श्रेष्ठ वाटू लागल्यानंतर मात्र या उत्तरानं त्यांचं समाधान होईना. बुद्धी ही शक्ती श्रेष्ठ मानल्यानंतर प्राचीन ग्रंथ किंवा गुरू यांच्यावर विसंबून राहता येत नाही. कोणत्याही गोष्टीचा अभ्यास अवलोकन व प्रयोग यांच्या साह्यानं करण्याची त्यांना नव्यानं सवय झाली. जसजशी युरपकडली माणसं समुद्रमार्गांनी इतर देशांकडे जाऊ लागली तशी भाषांची विविधता त्यांना अधिकच जाणवू लागली. भाषांच्या या वैविध्यासंबंधी त्यांनी पुष्कळ विचार केला. परंतु अठराव्या शतकात भारतात पदार्पण करीपर्यंत त्यांना

वरील प्रश्नाचं बौद्धिक उत्तर सुचलं नाही. ते सुचायला त्यांच्या हाती एक परीस लागायला हवा होता तो त्यांना भारतात मिळाला. तो परीस म्हणजे भारतातली संस्कृत भाषा.

त्या काळातल्या भारतात संस्कृत भाषा ही सामान्य लोकांची बोलण्याची भाषा नव्हती. ती प्राचीन विद्वानांच्या ग्रंथातली भाषा होती. भारताचं सारं प्राचीन साहित्य, कला, विज्ञान व अध्यात्म या भाषेत जोपासलं गेलं होतं. भारतातली संस्कृती व तिची परंपरा यांचं संरक्षण व संवर्धन तीन –चार हजार वर्षं संस्कृत भाषेनं केलं होतं. या दृष्टीनं संस्कृत भाषेच्या अभ्यासाचं महत्त्व भारतीय शिक्षणक्रमात प्राचीन काळापासून मान्य झालं होतं.

इतिहासदृष्ट्या पाहिलं तर संस्कृत ही काही भारतातली आद्य किंवा अतिप्राचीन भाषा नव्हे. इ. स. पू. १५०० ते १२०० पर्यंतच्या काळात भरताच्या वायव्य प्रदेशाकडून ज्या काही जमाती भारतात आल्या त्यंच्या अनेक बोलींपैकी ही एक बोली होती. या जमातींच्या प्रवेशापूर्वी भारतात, काही इथल्या, काही बाहेरून आलेल्या निग्रॉइड, ऑस्ट्रिक, द्रविड यांसारख्या भाषाकुलातील भाषा बोलणाऱ्या अनेक जमाती राहत होत्या. त्यांच्या भाषा संस्कृतच्याही अगोदरच्या. परंतु या भाषांविषयींची तत्कालीन काहीही माहिती आज मिळत नाही. त्या भाषा केवळ बोली स्वरूपात होत्या. इ. स. पू. १५०० च्या अगोदरच्या भाषेचे जे काही लेखी नमुने मिळाले आहेत ते सिंधू-संस्कृतीच्या मोञनजो-दडो, हडप्पा, लोथल वगैरे अनेक स्थळांतील उत्खननातील अवशेषांत सापडले आहेत. परंतु या लेखी चिन्हांवरून त्यांची भाषा कोणती हे ठरविण्याच्या बाबतीत विद्वानांना अद्याप यश मिळालेलं नाही. यामुळे ज्याला भारताच्या भाषिक भूतकाळाचा अभ्यास करायचा आहे त्याला आजदेखील संस्कृतपासूनच सुरुवात करावी लागते.

संस्कृतभाषी जमातींच्या प्रवेशानंतर भारतातील विविध जमातींचं, त्यांच्या धर्मांचं, संस्कारांचं, विचार-भावनांचं जे एकीकरण घडू लागलं त्यात संस्कृत

भाषेचं कार्य फार मोठं होतं. संस्कृत भाषेद्वारा व्यक्त होणाऱ्या भावना व विचार यांची संपदा इतकी विपुल होती की त्या काळातील भारतातील इतर संस्कृती तिनं भारावून गेल्या. संस्कृतच्या या संपदेनं त्यांनी आपल्या भाषा समृद्ध केल्या; संस्कृतनंही या भाषांना ओवळ्या मानलं नाही. तिनंदेखील त्यांची शब्दसंपत्ती हवी तिथं स्वीकारली. भाषाभाषांच्या या देवघेवीत विचार-भावनांचं जे संमिश्रण झालं त्यानं भारतवासीयांचा मन:पिंड घडला गेला.

संस्कृतभाषी जमातींनी आपल्याबरोबर आणलेल्या विविध बोलींत आपलं श्रेष्ठ साहित्य रचलेलं होतं. त्यांचा आद्य ग्रंथ ‘ऋग्वेद’. विश्वसाहित्यातील प्राचीनतम काव्यग्रंथ म्हणून तो प्रसिद्ध आहे. त्यातील बऱ्याचशा भागांची रचना भारतात प्रवेश करण्यापूर्वी झाली असावी. त्यातील नितांतसुंदर कल्पना व वर्णनं, सुमधुर शब्द व लय यांना तत्कालीनच काय, पण नंतरच्या साहित्यातही तोड नाही. आपल्या या साहित्य-संपदेचा त्यांना अभिमान वाटावा हे साहजिक होतं. तिच्याइतकं श्रेष्ठ दुसरं काहीही वैभव जवळ नसल्यामुळे आपल्या या साहित्य-लक्ष्मीचं रक्षण करण्यासाठी त्यांनी प्रथमपासून आटोकाट प्रयत्न केले. त्या काळात त्यांना लेखनकला अवगत होती की नाही हा वादाचा विषय आहे. त्यांना ती अवगत असली तरी भारताच्या हवामानात लिखित ग्रंथ फार काळ टिकून राहतील याची खात्री नव्हती. अशा परिस्थितीत त्यांनी या साहित्याच्या मौखिक रक्षणाची जबाबदारी आपल्यातल्या काही मंडळींवर टाकली. त्यांनी ज्या कसोशीनं या साहित्याचं जतन केलं तितकी कसोशी या बाबतीत जगात इतरत्र कुठंही आढळत नाही. साहित्यरक्षणाची त्या विद्वानांची ही खंत लौकरच त्या भाषेच्या सर्वांगीण व सखोल अभ्यासाची स्फूर्ती बनली.

साहित्याचं रक्षण म्हणजे ते ज्या भाषेत रचलं गेलं त्या भाषेचं रक्षण. त्या भाषेतला एक शब्दच काय, पण एक ध्वनी किंवा आघातदेखील इकडचा तिकडे न झाला पाहिजे. यासाठी दोन गोष्टी महत्वाच्या असतात. एक, पाठांतर, सारं साहित्य स्मृतीत ठेवायला हवं. स्मृतीतही त्याच्यात फरक होऊ नये, एका शब्दाला जोडून दुसरा शब्द आल्यानं साहचर्यवशात त्यांचं मुळापेक्षा वेगळं

विभाजन होऊ नये म्हणून प्राचीन विद्वानांनी पाठांतराच्या विविध पद्धती रचल्या, त्यांच्या ध्वनींचा सूक्ष्म वैज्ञानिक अभ्यास केला व त्या अभ्यासाचं 'शिक्षा' नावाचं शास्त्र रचलं. दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे त्या भाषेचा विश्लेषणात्मक अभ्यास. या अभ्यासाचं कार्य वि –आ – कृ म्हणजे 'जोडलेले भाग वेगळे करणं', थोडक्यात व्याकरण. भाषेतील ध्वनी व त्यांचे प्रकार, शब्द त्यांचे वर्ग, प्रत्यय व त्यांच्या प्रक्रिया यांचा जितका सुव्यवस्थित अभ्यास प्राचीन काळी संस्कृत भाषेच्या बाबतीत झाला तितका जगातील इतर कोणत्याही भाषेचा झाला नाही. हा अभ्यास निश्चितपणे केव्हा सुरू झाला ते सांगणं कठीण असलं तरी शिक्षा, प्रातिशाख्य निरुक्त या नावांचे ग्रंथ त्याची साक्ष देत आहेत. या अभ्यासाचं परिणत स्वरूप गांधार देशातील शलातुर गावी राहणाऱ्या दाक्षी नावाच्या स्त्रीचा मुलगा पाणिनी यानं रचलेल्या 'अष्टाध्यायी' या ग्रंथात पाहवयास मिळतं. या ग्रंथाचा रचनाकाल सुमारे इ.स.पू. ४५० ते ५०० हा मानला जातो.

भारतातील संस्कृत साहित्याच्या संरक्षणासाठी झालेल्या वर उल्लेखिलेल्या दोन प्रयत्नांचं जितक कौतुक आपल्याला वाटतं त्यापेक्षाही अधिक कौतुक अठराव्या शतकात जे पाश्चात्य विद्वान भारतात आले त्यांना वाटलं. संस्कृत भाषेतील साहित्याची मोहिनी त्यांच्या मनावर पसरली व त्यांना त्या साहित्याची केवळ स्मृतीनंच नव्हे तर कृतीनं, अभ्यासानं व अनुवादानं भरपूर सेवा केली. त्यांना खरं कौतुक वाटलं ते संस्कृत भाषेच्या व्याकरणाभ्यासाचं. इतका काटेकोर, पद्धतशीर अभ्यास त्यांना व त्यांच्या पूर्वजांना स्वतः च्या भाषांच्या बाबतीत कधीच साधला नव्हता. म्हणूनच त्या देशांत पा पाणिनीचा ग्रंथ "मानवी बुद्धिमत्तेची एक श्रेष्ठ अमरनिर्मिती" [१] या शब्दांनी गौरविला गेला.

संस्कृतचा अभ्यास करीत असता एक महत्वाची गोष्ट या पाश्चात्त्य विद्वानांच्या लक्षात आली. भाषावैविध्याला सरावलेल्या त्यांच्या मनानं दूर-दूर भारतातली संस्कृत भाषा युरपातल्या भाषांपेक्षा अगदी वेगळी असेल अशी कल्पना केली होती. पण घडला तो प्रकार निराळाच. युरपातल्या भाषा आणि

संस्कृत यांच्यात हजारो मैलांचं अंतर असलं तरी त्यांच्या शब्दांत त्यांना विलक्षण सारखेपणा आढळला. फिलिप्पो सास्सेत्ती[२] हा इतालिअन ख्रिस्ती धर्मप्रसारक इ. स. १५८३ ते १५८८ च्या दरम्यान गोव्यात राहिला होता. तेथून आपल्या वडिलांना लिहिलेल्या एका पत्रात त्यानं संस्कृतमधले 'देव', 'सर्प' हे शब्द व सहापासून नऊपर्यंतच्या अंकांची नावं इतालिअन भाषेतील शब्दांशी अगदी जुळती येतात याबद्दल आश्चर्य व्यक्त केलं. त्यानंतर इ. स. १७६७ -६८च्या सुमारास भारतातील फ्रेंच ख्रिस्ती धर्मप्रसारक क्योरदू[३] यालाही लॅटिन व संस्कृत यांच्यात साम्य आढळलं. यासंबंधी त्यानं आपल्या देशातील एका विद्वत्सभेकडे पृच्छा केली व उदाहरणादाखल पुढील संस्कृत व लॅटिन शब्द लिहून कळविले :

संस्कृत	**लॅटिन**
दानम्	dnum
देवस्	deus
जानु	gen
मध्यस्	medius
विधवा	vidua

यासंबंधात त्या विद्वत्सभेकडून क्योरदू याला काहीच उत्तर आलं नाही. स्वत: क्योरदूला मात्र अशी श्रद्धा वाटली की आपल्या धर्मातल्या पुराणकथेप्रमाणे बावेलचा मनोरा बांधायला घेण्यापूर्वी सर्व मानवांची भाषा एकच होती या गोष्टीचा हा पुरावा उरलेला असावा. यानंतर नॅथॅनिएल हालहेड[४] नावाच्या ईस्ट इंडिआ कंपनीतल्या एका अधिकाऱ्यानं इ. स. १७७८ साली 'बंगाली भाषेचं व्याकरण' लिहिलं. त्याच्या प्रस्तावनेत तो म्हणतो : "संस्कृतच्या

शब्दांचं फारसी शब्दांशीच नव्हे तर लॅटिन व ग्रीक भाषातील शब्दांशी साम्य पाहून मला फार आश्चर्य वाटतं."

युरपिअन विद्वानांच्या स्वभावात कुठल्याही घटनेमागे श्रेद्धेपेक्षा बौद्धिक कारण शोधण्याची जी जिज्ञासा जागृत झाली होती ती आता 'भाषा वेगवेगळ्या का?' या प्रश्नाऐवजी त्याच्या उलट 'दूरदूरच्या प्रदेशांमधील भाषांमध्ये सारखेपणा का? या प्रश्नाचं निराकरण करण्याच्या मागे लागली. पृथ्वीवरील एकमेकाजवळच्या भौगोलिक विभागांतील भाषांत थोडाफार सारखेपणा असणं स्वाभाविक आहे, परंतु युरप व अशिआतील भारतासारख्या दूरच्या प्रदेशातल्या भाषांमध्ये बराच सारखेपणा असणं यामागे काहीतरी गूढ रहस्य असावं असं तत्कालीन विचारवंतांना वाटलं. ईस्ट इंडिआ कंपनीच्या भारतातील शासनकाळाच्या सुरवातीला कलकत्त्याला न्यायाधीश म्हणून विल्यम जोन्झ[१] या तरुण वेल्श विद्वानाची नेमणूक झाली. इ. स. १७८३ मध्ये आपल्या वयाच्या ३७ व्या वर्षी जोन्झनं भारताच्या भूमीवर पाय ठेवले. जोन्झला विविध भाषा शिकण्याची आवड होती. भारतात येण्यापूर्वी त्याला ग्रीक व लॅटिन या युरपच्या प्राचीन भाषा, जर्मन, फ्रेंच, इतालिअन इत्यादी आधुनिक भाषा व अरबी, फारसी या मध्य-पूर्वेतील भाषा उत्तम प्रकारे येत होत्या. पाठांतराच्या बाबतीत जोन्झची स्मरण शक्ती अगाध होती. कलकत्त्याला येताच त्यानं संस्कृत शिकण्याचा ध्यास धरला व दोन वर्षात तिच्यावर उत्तम प्रभुत्व मिळवलं.

जोन्झला संस्कृत शिकण्याची जशी आवड होती तशी भारतातील धर्म, कला, साहित्य, तत्त्वज्ञान यांच्याविषयी माहिती गोळा करण्याचीही आवड होती. त्यासाठी त्यानं भारतात येताच वर्षभरात कलकत्त्याला 'एशिअॅटिक सोसायटी' ही संस्था जानेवारी १७८४ मध्ये स्थापन केली. या संस्थेत त्यानं रविवार दिनांक २ फेब्रुआरी १७८६ रोजी एक महत्वाचं भाषण दिलं. भाषाभ्यासाच्या इतिहासात हा दिवस 'सोनियाचा' मानायला हवा. दूर युरपातील ग्रीक, लॅटिन इत्यादी भाषा, मध्यआशिआतील अवेस्तन, फारसी या भाषा व भारतातील संस्कृत ही भाषा एकमेकींपासून अगदी दूर-दूर असूनही

त्यांच्यात साम्य का आढळतं, या प्रश्नाला त्या काळातील कोणीही विचावंत उत्तर देऊ शकला नाही. जोन्झनं आपल्या भाषणात आपल्या कुशाग्र बुद्धिमत्तेच्या जोरावर एक तार्किक उत्तर सुचविलं ते असं की या भाषांमध्ये जे साम्य आढळतं ते कुठल्याही दैवी किंवा आकस्मिक रहस्यांमुळे नसून ते एका ऐतिहासिक कारणामुळे आहे. ते कारण असं की या सर्व भाषा एकाच मूळ भाषेपासून उगम पावून इतिहासक्रमात हळूहळू बदलत गेलेल्या तिच्या आवृत्त्या आहेत. ती मूळ भाषा जरी आज लुप्त झाली असली तरी नंतरच्या त्या भाषांच्या अभ्यासावरून आपण तिची कल्पना करू शकतो[६].

जोन्झनं मांडलेली ही उपपत्ती आधुनिक भाषाविज्ञानाची कोनशिला बनली इतकेच नव्हे तर आधुनिक तत्त्वज्ञानातील एका महत्त्वाच्या ज्ञानमीमांसेची ती जननी ठरली आहे. यामुळे ती अत्यंत शास्त्रशुद्ध रीतीनं समजून घेतली पाहिजे.

मनुष्याला आपल्या संवेदनांच्या योगे जी विश्वाची प्रतीती होते तिच्यातून तो दोन प्रकारे ज्ञान घडवितो असं मानलं जातं. एकाच वेळी किंवा एकामागून एक अशा क्रमानं घडणाऱ्या काही घटनांमधला संबंध आपल्या अनुभवास पुष्कळ वेळा आला तर तो नेहमी सर्वत्र तसा असतो असं ज्ञान मानवी मनात घडविलं जातं. उदाहरणार्थ, दूर अंतरावर कोणी तोफ फोडली तर आपणाला प्रथम प्रकाश दिसतो व नंतर आवाज ऐकू येतो. अनेकदा असा अनुभव आला तर आपण असं एक वस्तुनिष्ठ निरीक्षण रचतो की प्रकाश आणि ध्वनी यांच्यात प्रकाश हा ध्वनीपेक्षा अधिक लौकर प्रवास करतो. बहुसंख्य अवलोकनांवरून घडविलेलं हे ज्ञान एक प्रकारचं म्हटलं जातं. ज्ञानाचा दुसरा प्रकार असा की ते अबलोकनापेक्षा विशिष्ट कल्प, त्यांच्या व्याख्या, प्रमेयं यांच्या आधारावर घडवलं जातं. उदाहरणार्थ, एखादा गणितज्ञ सांगतो की कागदावर काढलेल्या कोणत्याही आकाराच्या त्रिकोणाच्या अंतर्गत कोनांची बेरीज नेहमी १८० अंश असते. हे ज्ञान त्या गणितज्ञानं असंख्य त्रिकोण काढून त्यांच्या कोनांच्या अंशांची बेरीज करून मग त्या आधारावर रचलेलं असतं असं नाही. असं करणं

त्याला शक्यही नसतं. पण मग त्याच्या विधानाला जी सत्यता लाभली आहे ती कशाच्या आधारावर? याचं उत्तर असं की त्यानं आपल्या विशिष्ट 'भूमिती' या ज्ञानक्षेत्रासाठी बिंदू, रेषा, कोन, अंश इत्यादी जे कल्प त्यांच्या व्याख्या त्यांचे संबंध इत्यादी तत्त्वं रचली त्यांच्या तार्किक आधारांवर त्यांचं विधान खरं आहे असं म्हणता येतं.

सामान्य व्यवहारातील या दोन ज्ञानप्रकारांचा विचार केला तर जोन्झची उपपत्ती कोणत्या वर्गात टाकावी? ती जशी बहुसंख्य अवलोकनांच्या मार्गानं घडविली गेलेली नाही तशी ती कोणत्याही व्याख्या, प्रमेयं वगैरे तत्त्वांवर आधारलेली नाही. मग जोन्झच्या या उपपत्तीवर शास्त्रीयतेचं शिक्कामोर्तब करायचं की नाही? अद्यापपर्यंत या प्रश्नाचं उत्तर देणं जरा कठीण होतं. रूढ तर्कशास्त्राच्या चौकटीत जरी ही उपपत्ती बसत नसली तरी तिच्यात भरपूर जोम होता हे नंतरच्या भाषाभ्यासाच्या प्रगतीवरून स्पष्ट होतं. शिवाय अद्यापपर्यंत कोणीही या उपपत्तीला खोडून तिच्या जागी नवी उपपत्ती प्रस्थापित केली नाही. उलट जोन्झच्या या उपपत्तीनं भाषिक संशोधनाचा जो नवा मार्ग खुला करून दिला त्या मार्गाचा अवलंब करून भाषांच्या स्वरूपासंबंधी व इतिहासासंबंधी कितीतरी महत्त्वाच्या गोष्टी प्रगट झाल्या व वास्तवात त्या सिद्धही झाल्या आहेत.

जोन्झच्या या उपपत्तीचा नीट विचार केला तर असं आढळून येतं की मुख्यत्वे 'साम्य' या तत्त्वावर आधारलेली एक अध्याहृती आहे. साम्य हे तत्त्व तर्कशास्त्रानं समजावता येत नाही, ते स्वयंसिद्ध आहे अशी कबुली प्रतिष्ठित तर्कज्ञांनी दिली आहे. दोन अथवा अधिक घटनांतील सारखेपणा लक्षात येताच त्या घटनांना जोडणारी 'ऐतिह्य' म्हणजे हे अशामुळे असेल अशा अर्थाची उपपत्ती मानवी मनाला सुचते. ही उपपत्ती अगदी पूर्णांशानं खरी असते किंवा तीच एकमेव ठरते असं नाही. कोणीतरी एक उपपत्ती सुचवितो, त्या मार्गानं संशोधन होतं, नव्या गोष्टी, नवे संबंध निदर्शनाला येतात, मग ती उपपत्ती टिकते अथवा बदलावी लागते किंवा ती सोडून दुसरी रचावी लागते.

साधारणपणे निरनिराळ्या भाषा एकमेकींपासून पुष्कळ वेगळ्या असतात. परंतु त्यांच्यातले थोडे शब्द जर काही अंशी सारखे आढळले तर प्रथम आपण या गोष्टीला भाषिक उसनवारी म्हणतो. 'अ' या भाषेनं 'ब' या भाषेचें अथवा 'ब' नं 'अ' चे शब्द उसने घेणं संभवनीय ठरतं. परंतु भाषाभाषांमधील सारखेपणा खूप शब्दांच्या बाबतीत व तोही विशिष्ट नियमांना धरून घडलेला आढळला तर ते शब्द त्या त्या भाषांच्या इतिहासक्रमात विकसित झाले असावेत व त्या आपल्या पूर्वापार कालक्रमात एकरूप असं मानायला हरकत नाही. जोन्झच्या उपपत्तीला चार्ल्स पर्स या तर्कज्ञानाच्या मताप्रमाणे abduction म्हणजे 'ऐतिह्य —अनुमान' असं मानता येईल.[७] केवळ भाषाभ्यासातच नव्हे तरे गेल्या दोन शतकात प्रगत झालेल्या बऱ्याचशा सामाजिक विज्ञानांमध्ये असल्या प्रकारच्या उपपत्तींना फार महत्त्वाचं स्थान दिलं गेलं आहे.

पाश्चात्त्य विद्वानांना अवगत झालेल्या संस्कृत भाषेच्या ज्ञानामुळे ग्रीक, लॅटिन, गोथिक, पर्शियन इत्यादी भाषांशी संस्कृतचं नातं निर्देशनाला आलं. या भाषांतील सारखेपणा भारतीय व्याकरणकारांच्या नजरेस पूर्वी कधीच आला नाही. ग्रीक, रोमन, पर्शिअन इत्यादी लोकांशी व त्यांच्या भाषांशी भारतीयांचा बराच संबंध आला होता. मुसलमानी काळात तर संस्कृतबरोबर फारशी भाषेचा प्रसार भारतात पुष्कळ झाला होता. परंतु या भाषेच्या बाबतीत इथले विद्वान उदासीन राहिल्यामुळे भाषाभाषांमधील सारखेपणा त्यांच्या निर्देशनाला आला नाही. हा सारखेपणा जोन्झची उपपत्ती प्रसिद्ध झाल्यानंतर प्रगट होताच संस्कृतच्या अभ्यासाचं एक नवं अंग व महत्त्व विद्वानांना स्पष्ट होऊ लागलं. त्या दृष्टीनं केलेल्या संस्कृतच्या अभ्यासाला एक नवं नाव दिलं गेलं : 'युरपिअन संस्कृत विज्ञान'.[८] या अभ्यासाला भारतीय रूढ संस्कृत भाषाभ्यासाची खूप मदत झाली तरी त्याचं उद्दिष्ट वेगळं असल्यामुळे त्याचं वेगळेपण ध्यानात घेणं फार महत्त्वाचं आहे.

जोन्झनं कलकत्त्याला स्थापन केलेल्या 'एशिअॅटिक सोसायटी'च्या कार्यामुळे संस्कृतच्या ज्ञानाचा प्रसार युरपात जोरानं होऊ लागला. अलेक्झांडर

हॅमिल्टन[९] हा इंगज या सभेचा सभासद होता. त्याला संस्कृत भाषा उत्तम प्रकारे येत होती. भारतातून आपल्या देशी परत जात असता वाटेत १८०२ साली पॅरिस येथे त्याला युद्धकैदी म्हणून राहण्याचा प्रसंग आला. तिथे फ्रीडरिख श्लेगेल[१०] या जर्मन विद्वानाशी त्याची मैत्री झाली. हॅमिल्टनकडून श्लेगेल संस्कृत भाषा शिकला व लगेच १८०८ साली श्लेगेलनं संस्कृत भाषा व भारतीय संस्कृती यांचं महत्त्व या विषयावर एक पुस्तक लिहिलं. या पुस्तकात श्लेगेलनं संस्कृत, ग्रीक, लॅटिन, फारसी व जर्मानिक या भाषांतील समान शब्द उद्धृत करून, विल्यम जोन्झच्या थोडं पुढं जाऊन, असं म्हटलं की या सर्व भाषा ज्या मूळ भाषेवरून उत्क्रांत झाल्या असं मानावं लागतं ती मूळ भाषा दुसरी-तिसरी कुठली नसून या सर्वात जी अधिक प्राचीन ती म्हणजे संस्कृत भाषाच होय.

श्लेगेलनं संस्कृत भाषेला दिलेलं आद्यस्थान त्या काळात सर्वसामान्य झालं व त्या दृष्टीनं संस्कृतचा अभ्यास युरपात चांगलाच फोफावला. या अभ्यासाचा मुख्य रोख संस्कृत ही सर्व प्राचीन भाषा आहे या मान्यतेला हाताशी धरून तिच्या आधारावर भाषाभाषांमधील साम्य व्यक्त करणाऱ्या ध्वनिनियमांची प्रस्थापित करण्याकडे होता. या अभ्यासाला श्लेगेलनं नाव दिलं : ‘तुलनात्मक व्याकरण’.[११] हे व्याकरण म्हणजे संबंधित भाषांच्या वैज्ञानिक अभ्यासपद्धतीचं पहिलं पाऊल. तुलनात्मक व्याकरणामुळे संबंधित भाषांच्या एकत्रित अभ्यासाचा एक नवा मार्ग खुला झाला. तोपर्यंत भाषापंडितांना केवळ व्याकरण एवढाच अभ्यास ठाऊक होता. कोणत्याही भाषेचं व्याकरण कितीही संपूर्ण व शास्त्रशुद्ध असलं तरी, जोपर्यंत त्याला तुलनात्मक दृष्टी प्राप्त झाली नाही तोपर्यंत ते ज्ञान अपुरं, किंबहुना चुकीचं, असण्याचा संभव असतो. खुद्द संस्कृतच्या बाबतीतच जेव्हा हे प्रतीतीस आलं तेव्हा विद्वानांमध्ये मोठी गडबड उडून गेली. ‘ सत्याचं मुख सोन्याच्या पात्रानं झाकलेलं असतं’ असं एक प्राचीन वचन आहे. पाश्चात्यांनी सोन्याच्या लोभानं ते पात्र दूर केलं खरं. पण आपल्याला त्यामुळे सत्याच दर्शन घडलं हे महत्त्वाचं नाही का? सत्यस्य अमितं मुखं य त्वं सुवर्णेनं अपावृत.

संदर्भ व टीपा

१. “This grammer is one of the greatest monuments of human intelligence.” L.

Bloomfield : Language (Holt, 1933, P11)

२. Flippo Sassetti 1540-1588

३. Father Coeurdoux

४. Nathaniel Brassey Halhed (1751- 1830): “9 have been astonished to find this

similitude of Sanskrit with those of persian and Arabic, and even of Latin and Greek.”

५. Sir Williams Jones, 1746 -1794

६. “The sancrit language, whatever may be its antiquity is one of a wonderful structure;

more perfect than the Greek, more copious than the Latin, and more exquisitely refined than either; yet bearing to both of them a stronger affinity, both in the roots of verbs and in the forms of grammar, than could have been produced by accident; so strong that no philologer could examine the Sancrit, Greek, and Latin, without believing them to have sprung from some common source, which perhaps, no longer exists”.

৭. Charles S. Peirce (1839- 1914) "Accepting the conclusion that an explaination is

needed when facts contrary to what we should expect emerge, it follows that the explaination must be such a proposition as would lead to the prediction of the observed facts, either as necessary consequences or at least as very probable under the circumstances. A hypothesis then, has to be adopted, which is likely in itself and renders the facts likely. This step of adopting a hypothesis as being suggested by the facts, is what I call abduction."(Collected Papers of C.S Peirce, Vol VII, Harvard U. Press 1958, p121-2)

৮. W.D. Whitney (1827-1894) : Sanskrit grammer (1879)

৯. Alexander Hamilton, 1762-1824

১০. Friedrich Von Schlegel, 1772-1829

১১. 'Comparative grammer' (Uber die sprache und weisheit der Indier, 1808)

२. चक्र-नेमी-क्रम

श्लेगेल यानं सुचविलेल्या तुलनात्मक व्याकरणाच्या दिशेनं पाहिलं पाऊल टाकलं ते डेनिशभाषी रासमुस रास्क[१] यानं. १८१४ त लिहिलेल्या, परंतु १८१८ त प्रसिद्ध केलेल्या आपल्या ग्रंथात [२] त्यानं जर्मानिक भाषांची बाल्टिक, स्लाव्हिक तसंच ग्रीक व लॅटिन या भाषांची तुलना केली. रास्कानं जरी आपल्या या ग्रंथात संस्कृत भाषेचा विचार केला नसला तरी पुढे तो भारतात आला असताना त्याला संस्कृत व द्राविड भाषांचा परिचय झाला. दुर्दैवानं दारिद्र्य व अशक्त प्रकृती यांच्यामुळे निर्माण झालेल्या वैफाल्यानं रास्कचं जीवन अकालीच संपलं. इतक्या अल्प जीवनातही त्यानं जे बौद्धिक कार्य केलं त्यावरून त्याची गणना थोत विद्वानांत केली जाते.

रास्कनं आपल्या ग्रंथात ग्रीक व (जर्मानिक भाषांपैकी) प्राचीन नॉर्स या भाषांच्या तुलनेसाठी घेतलेल्या शब्दांपैकी काही शब्द पुढील प्रमाणे आहेत;

ग्रीक	**नॉर्स**	**अर्थ**
patr	fapir	बाप
phro	ber	(मी) नेतो
tres	prr	तीन
thra	dyrr	दार
dam	tamr	पाळलेला

chol	gall	पित्त
gun	kona	स्त्री

वर दिलेल्या ग्रीक व नॉर्स शब्दांच्या आद्य व्यंजनांच्या अवलोकनावरून रास्कनं तुलनात्मक सामिकारणं मांडली ती अशी :

प-वर्ग			**त-वर्ग**			**क-वर्ग**		
ग्रीक		**नॉर्स**	**ग्रीक**		**नॉर्स**	**ग्रीक**		**नॉर्स**
p-	:	f-	t-	:	p-	-	:	-
ph-	:	b-	th-	:	d-	ch-	:	g-
-	:	-	d-	:	t-	g-	:	k-

भाषाभाषांमधील समानार्थी शब्दांत असली ध्वनिसमीकरणं शोधणं व ती पद्धतशीरपणे-ध्वनिशास्त्रीय तत्त्वाधारे- मांडणं हे तुलनात्मक पद्धतीच्या अभ्यासाचं पहिलं पाऊल रास्कनं टाकलं. याकोब ग्रिम[३] यानं जर्मानिक भाषांच्या अभ्यासावरील आपला ग्रंथ[४] प्रथम १८१९ मध्ये प्रसिद्ध केला होता. त्याच्या सुधारून वाढविलेल्या १८८२ च्या आवृत्तीत त्यानं रास्कच्या ध्वनिसमीकरणांचा अधिक सखोल अभ्यास केला. रास्कच्या समीकरणांमध्ये आढळणाऱ्या तीन

ध्वनिवर्गांना त्यानं थोड्या वेगळ्या पद्धतीनं मांडून त्या वर्गांना पुढे दिलेल्या लघुचिन्हांनी संबोधिलं :

ध्वनिवर्ग	**नाव**	**लघुचिन्ह**
p, t, k	Tenius	T
ph, th, kh,	Aspiratus	A
b, d, g	Media	M

नंतर एक वर्तुळाकार आकृती काढून



तिच्याद्वारे ग्रिमनं एक महत्त्वाचा नियम समजावून दिला तो असा की ग्रीक भाषेत T या वर्गाचा ध्वनी असला तर त्याच्या जागी जर्मानिकमध्ये A वर्गाचा ध्वनी आढळतो; ग्रीकमध्ये A वर्गाचा ध्वनी असला तर जर्मानिकमध्ये त्या ठिकाणी M वर्गाचा ध्वनी असतो; व ग्रीकमध्ये M वर्गाचा ध्वनी असला तर जर्मानिकमध्ये त्या ठिकाणी T वर्गाचा ध्वनी आढळतो. या वर्तुळाकृतीला ग्रिमनं **kreislauf** म्हणजे चक्र-नेमि-क्रम असं नाव दिलं. ग्रिमच्या या पद्धतशीर मांडणीमुळे या

समीकरणांचा मूळ शोधक जरी रास्क असला तरी त्यांच्याद्वारे व्यक्त होणाऱ्या नियमाला 'ग्रिमचा नियम' **(Grim's Law)**[५] असं म्हणण्याचा प्रघात पडला.

रास्कचा दुसरा महत्त्वाचा शोध म्हणजे त्यानं आपल्या १८५१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या नॉर्स भाषेच्या व्याकरणामधील पुस्तकात विशद केलेला भाषाविज्ञानातील एक नवा दृष्टीकोन. नॉर्स भाषेत 'रक्त' या अर्थाच्या शब्दाचं एकवचनी रूप *असं आहे व बहुवचनी रूप *आहे. या रूपांचा एकमेकांशी जो संबंध आहे तो कसा स्पष्ट करता येईल यासंबंधी त्यानं जे विचार मांडले ते फार अभिनव होते. कोणत्याही भाषेच्या व्याकरणात तिचा इतिहास दडलेला असतो. असं रास्कचं मत होतं. हा इतिहास शोधून तिच्या व्यवस्थेत पूर्वी काय घडलं असेल या ज्ञानाची मांडणी करणं फार महत्त्वाचं आहे.प्राचीन डेनिश भाषेच्या उपलब्ध पुराव्यावरून वरील शब्दाच्या दोन रूपांविषयी रास्कनं असा विचार मांडला की बहुवचनी रूपाच्या प्रयोगात पूर्वीच्या काळी शब्दान्ती -u- असा प्रत्यय होता. म्हणजे * या एकवचनी शब्दाचं पूर्वीच्या भाषेत बहुवचनी रूप * असं होतं. यानंतर रास्कच्या मते, शब्दान्ती **-u** या पश्वस्वराचा परिणाम अगोदरच्या -a- या स्वरावर होऊन तो स्वरही पश्व बनला व ध्वनिशास्त्राप्रमाणे त्याचं -- असं चिन्ह लिहिण्यात आलं. ही क्रिया झाल्यानंतर अशी घटना घडली की त्या भाषेतल्या शब्दान्तीचे स्वर सर्वत्र नाहीसे झाले. याप्रमाणे शेवटी * हे रूप उरलं. रास्कच्या या मांडणीला नॉर्स भाषेच्या इतिहासाचा आधार होता तरीदेखील हा सारा सिद्धान्त केवळ हवेतला मनोरा आहे असं ग्रिमला वाटलं. म्हणून त्यानं रास्कचा हा विचार "सत्य असण्यापेक्षा चतुर"[६] आहे असा त्यावर शेरा मारला. खरं तर रास्कच्या विचारांची झेप आपल्या काळाच्या फार पुढे गेली होती.

रास्क व ग्रिम यांनी केलेल्या तुलनात्मक अभ्यासात संस्कृतचा अंतर्भाव नसला तरी त्यांनी रचलेली तुलनात्मक पद्धती संस्कृत व इतर भाषांच्या तसल्या अभ्यासासाठी उपयुक्त ठरली. तत्पूर्वीचे विद्वान वेगवेगळ्या भाषांतील एकेकट्या शब्दातील ध्वनींची सुटी- सुटी समीकरणं मांडीत असत. रास्क व

ग्रिम यांच्या मांडणीवरून भाषांतील शब्दांच्या ध्वनींच्या समूह-व्यवस्थेचा अभ्यास अधिक महत्त्वाचा आहे हे स्पष्ट झालं भाषेतील ध्वनींच्या व्यवस्थात्मक **(structural)** अभ्यासाचा हा दृष्टीकोन भाषाविज्ञाच्या प्रगतीतील एक वैज्ञानिक टप्पा ठरला. या गोष्टीची साद ज्याला प्रत्यक्ष ऐकू आली तो म्हणजे फ्रान्झ बोप[७]. बोपचा पहिला महत्त्वाचा ग्रंथ[८] १८१६ साली प्रसिद्ध झाला. या ग्रंथात बोपानं युरपातील ग्रीक, लॅटिन वगैरे भाषांची संस्कृतशीतुलना केली. ही तुलना करताना बोपला एक महतत्त्वाची गोष्ट आढळली. श्लेगेलनं संस्कृतशी साम्य असणाऱ्या सर्व भाषांची जननी संस्कृतचा होती असं मत मांडलं होतं. संस्कृतमध्ये काही ध्वनी व शब्दांची रूपं त्यांच्या प्राचीन स्वरूपात रक्षिली गेली होती म्हणून तुलनात्मक अभ्यासात मूळ भाषेचे ध्वनी किंवा रूपं कशी असतील याचा अंदाज करताना इतर भाषांपेक्षा संस्कृतची मदत अधिक होते ही गोष्ट बोप्च्या निदर्शनास आली होती. परंतु काही वेळा याच अंदाजासाठी इतर भाषांची देखील तितकीच मदत होते असं बोपला आढळून आलं. तुलनात्मक पद्धती ही एक तार्किक पद्धती आहे; तिला या किंवा त्या भाषेविषयी भावनात्मक जिव्हाळा वाटण्याचं कारण नाही यामुळे भाषा भाषांचा तुलनात्मक अभ्यास जसजसा अधिक सखोल होऊ लागला तसं संस्कृत ही सर्वात प्राचीन भाषा आहे. ती विदग्ध आहे, विशुद्ध आहे असं जे तिच्याविषयी भावनात्मक मत बनलं होतं ते नाहीसं होऊन तिच्याविषयीचं मत अधिक वास्तव बनू लागलं. या दृष्टीनं बोपचा ग्रंथ भाषाभ्यासातील वास्तविक अवलोकनाचा आग्रह धरणारा पहिला महत्त्वाचा ग्रंथ ठरला. असली वास्तविक अवलोकनं प्रदर्शित करताना बोपनं असंही सुचवून ठेवलं की काही बाबतीत संस्कृतचं प्राचीन स्वरूप समजून घेण्यासाठी इतर भाषा देखील उपयोगी ठरण्याची शक्यता आहे. काही उदाहरणांवरून त्यानं तसं स्पष्ट करूनही दाखविलं."एका भाषेद्वारे दुसऱ्या भाषेवर प्रकाश टाकणं, एका भाषेतल्या रूपांरून दुसऱ्या भाषेतील रूपं समजावून देणं, हे काम बोपपूर्वी कोणीही केलं नव्हतं" असं म्हणून सोस्युरनं[९] तुलनात्मक पद्धतीचा खरा जनक हा मान बोपला दिला हे या दृष्टीनं योग्य आहे.

संस्कृत ही देववाणी होती, ती अत्यंत शुद्ध, स्थिर, नियमबद्ध व स्वत:सिद्ध होती असं मानणाऱ्यांना अर्थातच बोपची ही मतं रुचली नाहीत. खुद्द बोपनं देखील आपली मतं ठामपणे व्यक्त केली नाहीत. त्याचे बरेचसे विचार उत्स्फूर्त असत. पुष्कळदा उत्स्फूर्त विचार व त्यांचं पद्धतशीर विवेचन बराच कालावधी जातो असं विज्ञानांच्या इतिहासात वारंवार घडलेलं आढळतं.

बोपचे विचार पुष्कळदा उत्स्फूर्त असत हे पुढील एका हकीकतीवरून स्पष्ट होईल. बोपच्या वर उल्लेखिलेल्या ग्रंथाच्या सुधारलेल्या नव्या आवृत्तीचं इंग्रजी भाषांतर १८२० साली प्रसिद्ध झालं.[१०] या ग्रंथात संस्कृतच्या स्वरांसंबंधी बोपनं आपलं एक महत्त्वाचं अवलोकन नमूद करून ठेवलं आहे. भाषेचं बोललं जाणारं स्वरूप व तिचं लिहिलं जाणारं स्वरूप यांच्यात पुष्कळदा मेळ नसतो. इंग्रजीत बोलला जाणारा ‘क’ हा ध्वनी लेखी भाषेत **k (king), c (cat), ch (character), q (queen)** अशा अनेक अक्षरांनी दर्शविला जातो. संस्कृतचं बोललं जाणारं स्वरूप कसं होतं ते आपणाला तिच्या लेखी स्वरूपावरूनच अंदाजावं लागतं. संस्कृत भाषेच्या लेखी स्वरूपात बोपला एक मोठा दोष आढळला तो हा की तिच्यातल्या बऱ्याच शब्दांत चुकीनं ‘अ’ लिहिलेला असतो. इंग्रजीत **fate** हा शब्द बोलताना त्यातील स्वराचा आपण **e** (ए) असा उच्चार करतो, पण लिहितो मात्र – **a**, असा काहीसा विचार बोपच्या मनात घोळत असावा.ज्या ठिकाणी संस्कृतमध्ये ‘अ’ लिहिलेला असतो अशा बऱ्याच शब्दांत त्यांच्या उच्चारात ‘ए’ किंवा ‘ओ’ असे स्वर असावेत असं बोपला वाटलं. तो लिहितो: “असं मानलं तरच संस्कृत व ग्रीक यांची तुलना करता त्यांच्यातील ज्या शब्दांत साम्य आढळतं त्यात संस्कृतमधील ‘अ’ च्या समीकरणात ग्रीकमध्ये **e** आणि **o** ही अक्षरं का आढळतात याचं कारण स्पष्ट होईल.’’ आपलं हे अवलोकन स्पष्ट करण्यासाठी त्यानं पुढील उदाहरणं दिली आहेत:

ग्रीक	**संस्कृत**	**अर्थ**

esti	asti	आहे
ptis	patis	पती
mbros	ambaram	आकाश

बोपला काय सांगायचं आहे ते त्याच्या ह्या वाक्यात तितकंसं स्पष्ट झालेलं नाही. त्याला संस्कृतच्या लेखनात 'चूक' आढळते.या चुकीच्या लेखनामागे त्याला प्रतीत होतात ते स्वर अगदीच वेगळे. त्याच्या मते संस्कृत शब्द 'एस्ति', 'पोतिस्', ओम्बरम् असे बोलले जात होते; परंतु लेखनात ते चुकीचे लिहिले गेले आहेत. बोपचे हे सारे विचार इतके उत्स्फूर्त व अस्पष्ट होते की त्यानं स्वतःच आपली स्फूर्ती नष्ट होताच ते सोडून दिले.

१८२० मध्ये बोपला स्फुरलेल्या या विचारामागील शास्त्रीय तत्त्व समजायला नंतरचा साठ वर्षाचा काळ जावा लागाला यावरून बोपचे विचार त्याच्या जीवनकाळाच्या किती पुढे गेले होते ते स्पष्ट होईल. संस्कृत भाषा ही इतकी स्थिर, शुद्ध आणि नियमबद्ध आहे की तिच्यात जे ध्वनी व जी रूपं आहेत तीच खरी, इतर संबंधित भाषांची रूपं पार बदलेली म्हणून अशास्त्रीय ही भावना तत्कालीन विद्वानांच्या मनात इतकी दृढ झाली होती की, "संस्कृत भाषेत जिथे 'अ' हा स्वर आहे तिथे ग्रीकमध्ये 'ए' किंवा 'ओ' आढळतात, मग मूळ भाषेतला ध्वनी कोणता, 'अ' की 'ए/ओ'?" या बोपपुढे ठाकलेल्या प्रश्नाचं उत्तर इतर विद्वानांनीच नव्हे तर जणू हतबुद्ध बनलेल्या बोपनंदेखील असं दिलं की संस्कृतमध्ये जो ध्वनी तोच मूळ भाषेतला ध्वनी, म्हणजे प्राचीन भाषेत वरील शब्दांत 'अ' च होता. ज्या संस्कृत भाषेच्या लेखी 'अ' या अक्षराच्या उच्चारात बोपच्या अंतर्मनाला एके काळी 'ए' आणि 'ओ' हे ध्वनी ऐकू आले तो लेखी 'अ' कार पुन्हा स्थानापन्न झाला. अक्षर आणि ध्वनी यांच्या लढ्यात अक्षर विजयी ठरलं!

पण हे मत पुढील काळात चुकीचं ठरलं. साठ वर्षांनंतर, म्हणजे १८८० च्या सुमारास बऱ्याचशा विद्वानांच्या ध्यानात ही गोष्ट आली. जोपर्यंत संस्कृत भाषा सर्व बाबतीत स्थिर, शुद्ध व नियमबद्ध आहे असं मानलं जात होतं तोपर्यंत 'अ' की 'ए/ ओ' असे समीकरणात खरं- खोटं काय ते स्पष्ट होणं कठीण होतं १८७५ च्या सुमारास विलहेल्म टॉमसेन[११] यानं आपल्या एका व्याख्यानात[१२] या गोष्टीला प्रथम स्पर्श केला. दुसरा एक विद्वान योहान्नेस श्मिट[१३], हा याच प्रश्नावर लिहित आहे असे ऐकिवात आल्यानं टॉमसेननं आपलं व्याख्यान अप्रसिद्धच ठेवलं. त्याच सुमारास एसैआस तेग्नेर[१४] या स्वीडिश विद्वानाला या प्रश्नाचं रहस्य स्वतंत्रपणे प्रतीत झालं व त्यावर त्यानं आपल्या पुस्तकाची[१५] पाच पानं प्रसिद्ध केली, पण कोलिट्झ[१६] व सोस्युर[१७] यांनी आधीच आपलं मत बोलून दाखविलं आहे असं आढळून आल्यामुळे त्यानं आपल्या पुस्तकाचं छपाईकाम बंद करविलं. कार्ल व्हेर्नेर[१८] यालादेखील या प्रश्नाचं रहस्य स्वतंत्रपणे प्रतीत झालं होतं असं त्याच्या लेखनावरून[१९] आढळून येतं.

'अ' की 'ए/ओ' या समीकरणाचं रहस्य सोडविण्यासाठी वरील सर्व विद्वानांना ज्या एका दुसऱ्या समीकरणाची मदत मिळाली ते म्हणजे 'क् : च्' पुष्कळशा भाषांमध्ये आपणाला क् व च् हे पर्याय एकाच अर्थाच्या शब्दाच्या दोन निरनिराळ्या रूपांत आढळतात. उदाहरणार्थ संस्कृतमध्ये वाक् (प्र. ए.व.) : वाचि (स.ए. व.), पाक : पचति, इंग्रजीत **cook : chicken,** इत्यादी. संस्कृत लॅटिन यांची तुलना केली तर आपणाला संस्कृतमध्ये जिथे च् आहे तिथे लॅटिनमध्ये क् आढळतो. विशेष महत्त्वाची गोष्ट अशी की जिथे लॅटिनमध्ये अशा प्रकारचा क् आढळतो तिथे त्याचानंतर येणारा स्वर अवश्यपणे 'ए' हा असतो. संस्कृतमध्ये मात्र या 'ए' च्या तुलनेत 'अ' आढळतो. उदाहरणार्थ

लॅटिन	**संस्कृत**	**अर्थ**
que	ca	आणि

quinque	pance	पाच

'क् : च्' ध्वनिसमीकरणाची उपपत्ती बोपनंतरच्या सर्व विद्वानांनी रास्कची पद्धत स्वीकारून अशी लावली की इथे प्राचीन भाषेत मुळात क् व त्यानंतरचा स्वर 'ए' हे ध्वनी मुख्य मानायला हवेत.'ए' चा पुरोग स्वराआधी 'क्' हे प्रश्न व्यंजन आल्यामुळे त्या 'क्' चं पुरोगीकरण होऊन त्याच्या जागी 'च्' हा पुरोग (तालुपटलीय) ध्वनी प्रस्थापित झाला. या दृष्टीनं प्राचीन भाषांचा विचार करता संस्कृत भाषा बदलली आहे असं मानावं लागेल. उलट लॅटिननं आद्य भाषेचा ध्वनी कायम ठेवला आहे. तात्त्विक पद्धतीनं सांगायचं तर आद्य भाषेत 'आणि' या अर्थाचा शब्द **k^{w}e** असा आता मनाला गेला आहे. त्याचं प्राक्-संस्कृत भाषेत परिवर्तन **ee** असं झालं व नंतरच्या अवस्थेत **e** या स्वराचं परिवर्तन **a** (अ) झालं: संस्कृतमधील 'आणि' या अर्थाचा 'च' हा या इतिहासक्रमानं घडविला गेला आहे. पुरोग स्वराआधी येणाऱ्या पश्च व्यंजनांच्या या पुरोगीकरणाला तालुपटलीय परिवर्तन किंवा 'तालव्य नियम' **(Law of Palatals)** असं नांव देण्यात आलं. या टाळाव्या नियमामुळे भाषांच्या ध्वनिपरिवर्तानातली अनेक रहस्यं खुली झाली. ही रहस्यं शोधण्याचा मार्ग संस्कृतच्या तुलनेत ग्रीक व लॅटिन या भाषांमधून अधिक स्पष्टपणे दिसल्यामुळे त्या भाषांच्या अभ्यासाचं तात्त्विक मूल्य वाढून संस्कृतचं मूल्य जरा कमी झालं. गेऑर्ग कुर्तिउस[२०] या प्राध्यापाकानं या संबंधात १८८५ साली आपल्या वर्गातील विद्यार्थ्यांपुढे असे उद्‌गार काढले की, "नव्यानं उदय पावणाऱ्या भाषाविज्ञानाला एके काळी संस्कृत भाषा म्हणजे अगदी आकाशवाणी आहे असं वाटत असे. तिच्यावर सर्व अभ्यासूंनी आंधळेपणानं विश्वास ठेवला. आता तिला बाजूला सारावं लागत आहे. 'पूर्वेकडे प्रकाश आहे' या आतापर्यंत मान्य झालेल्या म्हणीऐवजी आता एक नवी म्हण प्रचारात आणावी लागत आहे. ती म्हणजे 'पूर्वेकडे अंधार आहे.'"[२१]

संस्कृतच्या भाग्यातील या चक्र-नेमि-क्रमाबद्दल दु:ख वाटून घेण्याचं कारण नाही. सत्य शोधण्याच्या कामात भावना किंवा रूढ समजुतींपेक्षा बौद्धिक तत्त्वांना अधिक महत्त्व असतं. भाषाविषयक संशोधनात कोणत्याही एका भाषेविषयी आपुलकी, अभिमान, भावना बाळगण्याची जरूर नाही. विज्ञानाच्या दालनात सर्व भाषांचं मूल्य सारखंच. सत्याचा प्रकाश कधी विदग्ध मानल्या गेलेल्या भाषेतून जसा प्रगट होईल तसा तो एखाद्या रानवट बोलीतूनही होऊ शकेल. तसंच एखादी भाषा कितीही प्राचीन व साहित्याच्या दृष्टीनं श्रेष्ठ असली तरी ती स्थिर, स्वत:सिद्ध, शुद्ध असते असं मानणं चुकीचं आहे. भाषा ही नदीप्रमाणे सतत वाहत राहणारी गोष्ट आहे; तिचा प्रवाह नेहमी बदलत असतो. हा प्रवाह तिच्या ध्वनिस्वरुपातून प्रगट होतो, लेखनातून नव्हे. लेखन हे भाषेच्या प्रवाहाला अडवून ठेवणारं झालं आहे. वाहत्या प्रवाहात ते जास्त काळ टिकत नसतं. भाषाविज्ञानीला भाषेचा प्रवाह अनुभवास हवा. तिच्या प्रवाहात टाकलेल्या जाळ्यात अडकतात ते मासे-ते लौकरच मारतात.

संदर्भ व टीपा

१. Rasmus Rask. 1787 — 1832

रास्क हा सप्टेंबर १८२० मध्ये मुंबईत राहिला होता व डिसेंबर १, १८२२ रोजी कलत्त्याहून मायदेशी परतला.

Undersgadre orn det gamle nordiske eller islandske Sprogs Oprindelse (Investigation into Origin of the Old Norse or Icelandic Language), 1818

३. Jacob Grimm, 1785 - 1863

४. Deutsche Grammatik, 1819

F. Max Miuller (1823-1900) यानं आपल्या १८६१ मध्ये प्रसिद्ध केलेल्या ग्रंथात हा शब्दप्रयोग प्रथम प्रचारात आणला. बोपनं या नियमाला 'the law of displacement of consonants' असं संबोधिलं आहे.

६. 'more a state than true'

७. Franz Bopp, 1791-1867

Uber das konjugationssystem der Sanskritsprache in Vergleichung mit jenen der griechischen, lateinischen, persischen and germanischen Sprache, 1816

"I do not believe that Greek, Latin and other European Laguages are to be considered as derived from Sanskrit ... I feel rather inclined to consider them altogether as subsequent variations of one original tongue, which Sanskrit has preserved more perfectly." (Bopp)

"But while the language of the brahmins more frequently enables us to conjecture the primitive forms of Greek and Latin... the latter may not infrequently elucidate Sanskrit grammer ." (Bopp)

"To illuminate one language by means of another, to explain the forms of one through the forms of the other, that is what no one had done before him (i.e., Bopp)." —F.de Saussure, Course in General Linguistics. 1916; Eng. ed. 1960. p. 2

'तुलनात्मक व्याकरणा'चे आद्य प्रणेते म्हणून जरी श्लेगेल, रास्क, ग्रिम व बोप यांची नावं भाषाविज्ञानाच्या इतिहासात दिली जात असली तरी या प्रकारच्या भाषाभ्यासाची सुरवात युरपात सुमारे ११५० त इंग्रजी व आइसलँडिक भाषांच्या तुलनात्मक अभ्यासानं झाली. ज्यानं ही सुरवात केली त्या विद्वानाचं नाव मिळत

नाही. त्याला आद्य व्याकरणकार असं संबोधण्यात येतं. त्यानंतर या प्रकारच्या भाषाभ्यासाचा उद्‌गाता म्हणून प्रसिद्ध जर्मन गणिती व तत्त्वज्ञ लीबनिझ (१६४६-१७१६) याचं नाव घ्यावं लागेल. युरपातील हंगेरिअन व फिनिश या भाषांचा तुलनात्मक अभ्यास त्यानं प्रथम केलेला आढळतो. त्याच्यानंतर याच भाषांचा तुलनात्मक अभ्यास J. Sajnavics याने आपल्या पुस्तकात (१७७०) व S. Gyrmathi याने १७९९ त प्रसिद्ध केलेल्या पुस्तकात आढळतो. संस्कृतच्या शोधानंतर संस्कृतशी साम्य असणाऱ्या भाषांचा अभ्यास इतका महत्वाचा ठरला की हंगेरिअन व फिनिश यांचा हा तुलनात्मक अभ्यास विद्वानांच्या दृष्टीआड झाला असावा.

याचप्रमाणे संबंधित भाषांच्या मूलस्त्रोताविषयी जी अध्याहृती विल्यम जोन्झनं मांडली तशी त्याच्या आगोदर लंडन रॉयल सोसायटीचा एक विद्वान सभासद James Parsons याने १७६७ मध्ये मांडलेली आढळते. तो लिहितो :

“My leisure hours, for some time past, have been employed in considerering the striking affinity of the languages of Europe; and finding, every day, new and most engaging entertainment in this pursuit, I was insensibly led on to attempt following them to their source.”

अशाच प्रकारची अध्याहृती ‘Lord Monboddo’ या टोपणनावावर Ancient Metaphysics (Vol. I-IV, 1779-99, p. 326) हे ग्रंथ लिहिणाऱ्या James Burnett याच्या मनात घोळत होती. तो म्हणतो:

“when we find that two languages practise the three great arts of lanugage, derivation, composition, and flexion in the same way we may conclude that one language is the original of the other, or that way are both dialects of the same language.”

૧૦. Analytical Comparision of the Sanskrit, Greek, Latin and Teutonic Languages, 1820.

૧૧. Vilhelm Thomsen, 1842-1927

૧૨. Samlede Afhandlinger, Vol. II, 1920

૧૩. Johannes Schmidt, 1843-1901

૧૪. Esaias Tegner, 1843-1928

૧૫. De ariska Sprahens

૧૬. Collitz, 1855-

૧૭. Ferdinand de Saussure, 1857-1913

૧૮. Karl Verner, 1846-1896

૧૯. Afhandlinger of Breve, 1903

૨૦. Georg Curtis 1820-1855

૨૧. Zur Kritik der neuesten Sprachforschung, 1855

३. गुण-वृद्धींची संरचना

विल्यम जोन्झच्या भाषणानंतरच्या पाऊणशे वर्षांच्या काळात तुलनात्मक भाषाभ्यासाठी संस्कृत किती उपयोगी पडते हे ठरविताना त्या दृष्टीनं केलेल्या तिच्या गुणवत्तेच्या बाबतीत जे चढउतार झाले त्यांचा अभ्यास भाषाविज्ञानाच्या रचनेसाठी मार्गदर्शक ठरतो. तो करताना तुलनात्मक पद्धतीची अधिकाधिक तार्किक बनत गेलेली भूमिका व भाषांच्या अभ्यासाच्या बाबतीत घडली जाणारी नवी संरचनात्मक पद्धती, या गोष्टी महत्त्वाच्या ठरतात. १८६१ साली प्रसिद्ध झालेल्या ओगुस्त श्लेइखेर[१] यांच्या ग्रंथानं संसकृतचं तिच्या समकालीन प्राचीन भाषांच्या संबंधात काय स्थान राहणार आहे हे अगदी निश्चित झालं. सर्व विद्वानांनी संस्कृत ही ग्रीक, लॅटिन, अवेस्तन, गोथिक इत्यादी प्राचीन भाषांची जननी नसून ती त्यांच्यासमवेत उत्क्रान्त होत गेलेली त्यांची भगिनी मानायला हवी असं एकमतानं निर्वाळा दिला. या सर्व भाषांची मूळ जननी आपणाला आज प्रतीत होणं अशक्य असलं तरी या सर्व भाषाभगिनींच कुळ एकच होतं असं तुलनात्मक भाष्याभ्यासाधारे नक्की झालं. मग या भाषाकुळाचं नाव काय? विविध नावं सुचविली गेली. शेवटी मान्य झालं व प्रचारात आलं ते विल्यम जोन्झचा समकालीन पदार्थविज्ञानी व इजिप्शिअन लिपीचा प्रथम वाचक टॉमस यंग[२] यानं 'कार्टरली रिव्ह्यू' च्या १८१३ मधील आपल्या एका लेखात सुचविलेलं 'इंडो-युरपिअन' हे नाव.

इंडो-युरपिअन भाषाकुळाचा इतिहास साधारपणे गेल्या चार ते पाच हजार वर्षांचा जुना आहे असं तेव्हापासून मानलं गेलं आहे.या भाषाकुळाचा अभ्यास केवळ एकाच भाषेला प्राधान्य देऊन होणार नाही. कधी संस्कृत, कधी ग्रीक व लॅटिन व जर्मानिक व स्लाव्हिक इतकंच नव्हे तर कधी या कुळांच्या जवळपास इतर भाषा कुळांच्या- उदाहरणार्थ, द्राविड, फिनो-उग्रिक इ. अभ्यासावरून करता येईल. हे सारं शास्त्रशुद्ध रीतीनं करण्यासाठी तुलनात्मक व्याकरणाची तर्किक पद्धती, मूळ भाषेच्या रचनेसाठी आवश्यक असणाऱ्या

ध्वनिशास्त्रीय संगती, त्या त्या विशिष्ट भाषांच्या व्याकरणातून प्रगट होणारी त्यांची अंतर्गत रचनात्मकता, पुरातत्त्वविज्ञानाच्या संशोधनाद्वारे प्रगट होणारे प्राचीन भाषांचे पुरावे इत्यादी अनेक गोष्टींचा त्यात भाग असला पाहिजे हे सर्वमान्य झालं.

१८६१ पर्यंतच्या या काळात विविध विद्वानांनी भाषांची एकमेकीशी तुलना करून स्पष्ट होणारी ध्वनिसमीकरणं शोधली व वर्णशास्त्रानं मान्य केलेल्या चिन्हपद्धतींनी ती मांडली. हे करीत असता श्लेइखेरच्या मनात असा विचार आला की भाषाभाषांच्या या समीकरणांवरून इंडो-युरपिअन या कुलाच्या मूलभूत भाषेच्या ध्वनींची, शब्दांची व रूप-व्यवस्थेच्या अनुमानित प्रक्रियेची पुनर्रचना (reconstruction) आपण मांडू शकू. ही पुनर्रचना कशी करायची याचं विवेचन श्लेइखेरनं आपल्या ग्रंथात[३] केलं व असले पुनर्रचित शब्द हे इंडो-युरपिअनच्या व्यवहारातील प्रत्यक्ष शब्दांऐवजी उपलब्ध भाषांच्या अभ्यासावरून ठरविलेल्या तात्त्विक स्वरूपाचे आहेत हे स्पष्ट करण्यासाठी त्यांना तारांकित करून लिहिण्याची प्रथा त्यानं घालून दिली. श्लेइखेरचा हा प्रयत्न निर्विवादपणे स्तुत्य असला व मान्य झाला तरी त्यानं या पुनर्रचित शब्दांनी बनविलेल्या भाषेत एक छोटीशी लघुकथा लिहिण्याचं धाडस केलं. नंतरच्या विद्वानांना त्याचा हा प्रयत्न वैज्ञानिक दृष्ट्या बालिश वाटला. संस्कृत, ग्रीक, लॅटिन इत्यादी भाषांच्या उपलब्ध सामग्रीच्या आधारे व तुलनात्मक व्याकरणाच्या शास्त्रीय पद्धतीनं या भाषाकुळाच्या मूळ भाषेची जी अनुमानित रचना आपण करू शकतो ती त्या भाषेचं अस्सल स्वरूप नसून तिची केवळ आकृती किंवा तार्किक प्रतिकृती असते. जसजसा हा भाषाभ्यास प्रगत होत जाईल, प्राचीन भाषांतील ध्वनिव्यवस्थांची नवनवी तत्त्वं प्रगट होतील तसतशी आपण कल्पिलेले ध्वनी, शब्द, रूपं इत्यादी पुन:पुन्हा नव्यानं रचावे लागतील. उदाहरणार्थ, 'घोडा' या अर्थाच्या पुढील भाषातील शब्दांच्या ध्वनिसमीकरणांवरून

संस्कृत	:	ava

लॅटिन	:	equus
गोथीक	:	aiha
ग्रीक	:	hippos
अवेस्तन	:	aspa

सुरवातीच्या भाषाभ्यासूंनी मूळ भाषेतला जो शब्द कल्पिला तो प्रथम * akvas असा होता. तुलनात्मक विवेचन जसजसं अधिक तात्त्विक बनलं तसं या कल्पिलेल्या शब्दाचं रूप बदलून त्या जागी *ak, vas, नंतर *ek, vos इत्यादी रूपांची क्रमानं रचना झाली व १९ व्या शतकाअखेर जे रूप मान्य ठरलं ते *ek^w -o-s असं दर्शविलं गेलं. तेही कशावरून बदललं जाणारा नाही? असंच जर होत राहणार असलं तर तो मूलभूत प्रश्न निर्माण होतो तो असा की, या पुनर्रचनेचं महत्व काय? सदैव दूर दूर पळणाऱ्या या मृगजळामागे धावण्यात काय अर्थ?

कोणताही भाषाभ्यासू या प्रश्नाच समर्पक उत्तर त्याकाळी देऊ शकला नाही आणि तरीही ज्यांना तुलनात्मक व्याकरण व पुनर्रचना या तार्किक करामतींची आवड होती त्यांनी त्यांनी हा खेळ चालू ठेवला. कदाचित या करमतीतच त्यांना आनंद वाटत असावा. अशाच एका तार्किक करमतीचा विलक्षण नमुना सोस्युर[४] या प्रतिभावंत स्विस भाषाविज्ञानीच्या १८७९ मध्ये प्रसिद्ध झालेल्या प्रबंधात[५] आढळून येतो. हा प्रबंध सोस्युरनं आपल्या वयाच्या अवघ्या एकविसाव्या वर्षी पॅरीस विद्यापीठाच्या स्नातक परीक्षेसाठी लिहिला होता. सोस्युरनं विद्यापीठात पदार्पण केलं त्या सुमारास बहुतेक सर्व विद्वानांना अशी खात्री पटली होती की संस्कृत भाषेची व्यंजन-व्यवस्था इंडो-युरपिअन कुळाच्या मूळ भाषेशी बरीच एकनिष्ठ राहिली असली तरी तिची स्वर-व्यवस्था

मात्र मूळ भाषेतल्या व्यवस्थेपेक्षा बरीच बदलेली आहे. इंडो-युरपिअन कुळाच्या मूलभूत स्वर-व्यवस्थेविषयी त्यांच्या लेखात व विवेचनात जे नवे विचार सुरू झाले होते त्यात सोस्युरच्या या प्रबंधानं फार महत्वाची भर घातली इतकंच नाही तर एकंदर तुलनात्मक पद्धतीची तार्किकता किती चोख व सूचक करता येईल या दृष्टीनं त्याचा प्रबंध आजपर्यंतच्या भाषाभ्यासात अद्वितीय मानला जातो. पुनर्रचनेच्या संबंधात वर उल्लेखिलेल्या प्रश्नाचं समर्पक उत्तरही त्यात आढळतं.

सोस्युरच्या प्रबंधातील विचार समजून घ्यायचे असले तर भाषेतील एकाच अर्थाच्या दोन अथवा अधिक शब्दांतील व्याकरणी रुपात जे ध्वनिपार्याय आढळतात त्यांचा अभ्यास करायला हवा. असली रूप साधारणतः दोन प्रकारची असतात : विभक्ति-प्रत्यय लावताना करावी लागणारी, उदाहरणार्थ, मासा/ माशाला यात स श हा पर्याय व अख्यातिक प्रत्यय लावताना करावी लागणारी रूपं. उदाहरणार्थ, मुनि/मौन यातला उ औ हा पर्याय.

संस्कृतच्या रूढ व्याकरणकारांनी संस्कृत भाषेतील दोन विशिष्ट स्वर-पर्यायांना 'गुण' व 'वृद्धी' अशी नावं दिली होती. हे पर्याय समजविण्यासाठी त्यांनी

अ इ/ई उ/ऊ ऋ/ॠ ऌ

या पाच स्वरांना मूलभूत स्वर मानले. विशिष्ट व्याकरणीरुपात या स्वरांचे अनुक्रमे

अ ए ओ अर् अल्

असे पर्याय आढळतात. या वरून त्यांनी असं मानलं की हे नवे वर्ण त्या मूलभूत स्वरांचे 'गुण' होत. तेव्हा वरील प्राथमिक स्वरांच्या जागी अनक्रमे

आ ऐ औ आर् आल्

असे वर्ण प्रस्थापित होतात तेव्हा त्यांना मूलभूत स्वरांची ‘वृद्धी’ असं नाव दिले. ‘गुण’ व ‘वृद्धी’ ही नावं ध्वनींच्या गणिती परिमाणांची द्योतक असावीत. उदा. ३ २ = ६ (गुण), $३^{२}$ = ९ (वृद्धी) संस्कृत व्याकरणकारांना या पर्यायव्यवस्थेत संस्कृत भाषेच्या मूलभूत मानलेल्या स्वरांचं दोन पायऱ्यांनी घडलेलं परिमाणातमक दीर्घीकरण (quantitative lengthening) प्रतीत झालं असावं असं स्पष्ट आहे.

संस्कृत प्रमाणे ग्रीक भाषेतही स्वर-पर्याय होते, पण प्राचीन ग्रीक व्याकरणकारांना या घातेनातालं रहस्य उमगलं नाही. युरपातल्या भाषाभ्यासूंना तेव्हा संस्कृत व्याकरणाचं ज्ञान झालं तेव्हा त्यांना संस्कृत व्याकरणकारांच्या या संबंधीच्या निरीक्षणाचं कौतुक वाटलं. ग्रिमनं प्रथम या गोष्टीचा स्वतंत्रपाने अभ्यास केलेला आढळतो. स्वरांच्या पर्याय-घटनेला त्यानं ablaut असं नाव दिलं. या घटनेत नव्या वर्णांचं प्रस्थापन होतं ते त्या शब्दांच्या अर्थपरिवर्तनामुळे होत असावं असं त्याला वाटलं : उदा. इंग्रजीत वर्तमानकाळवाचक sing भूतकाळवाचक sang होतो. बोपला ग्रिमचा हा दृष्टीकोन मान्य झाला नाही. ध्वनींच्या परिवर्तनाला ‘अर्थ’ हा कारण ठरू शकत नाही असं त्याचं मत होतं. आपल्या एका ग्रंथात[६] त्यानं असल्या ध्वनिपार्यायांचं विवरण ‘भार’ या ध्वनितत्त्वांमुळे होतं असं मतं मांडलेलं आढळतं. ग्रिमप्रमाणे बोपचं हे मत विवादास्पद बनलं.

सोस्युरनं आपल्या प्रबंधात संस्कृतमधील गुण-वृद्धी नावानं ओळखल्या जाणाऱ्या या स्वर-पर्यायांचं खरं रहस्य उलगडून दाखविलं. या स्वर-पर्यायांच्या मुळाशी जसं ध्वनीपरिवर्तन नाही तसं अर्थामुळे त्यांच्यात दुसऱ्या ध्वनींचं प्रस्थापन होतं असंही नाही. संस्कृतमधील गुण-वृद्धी हे प्रकार इंडो-युरपिअन काळातल्या भाषांच्या मूलभूत ध्वनिव्यवस्थेतील एका विशिष्ट स्वर-रचनेचा आविष्कार आहे. इंडो- युरपिअनच्या दृष्टीनं संस्कृतकडे पाहिलं तर संस्कृत व्याकरणकारांची गुण-वृद्धीची मीमांसा, एखाद्या गवंड्यानं जमिनीवर ज्या फारशा बसविल्या त्या भग्न झाल्यानंतर त्या बसविणाऱ्या कलाकाराच्या

मूळ आकृतीची कल्पना नसल्यानं त्यांची वेगळीच आकृती बनावी, तसा काहीसा प्रकार घडला आहे असं वाटतं.

इंडो-युरपिअन कुळातल्या भाषांमध्ये घडणाऱ्या या विशिष्ट प्रक्रियेला सोस्युरनं ‘स्वर-परिक्रमा’ (apaphony) असं नाव दिलं आहे. संस्कृत, ग्रीक वगैरे भाषांमधील गुण-वृद्धी या प्रक्रिया या स्वर-परिक्रमेचे त्या त्या भाषांतील प्राचीन अवशेष आहेत. संस्कृत भाषेच्या आवलोकनावरून संस्कृत व्याकरणकारांना गुण, वृद्धी हचोयवायाव: (अष्टाध्यायी, ६-१-७८) इत्यादी नियम निश्चित करताना त्या नियमांनी व्यक्त होणाऱ्या घटनांमागे काहीतरी रचना प्रतीत झाली होती हे नक्की, पण त्या रचनेची जुळवाजुळव केवळ संस्कृतच्या अभ्यासावरून करता येण्यासारखी नव्हती. याचे कारण संस्कृतचे स्वर इतर भाषांच्या तुलनेत मूळ भाषेतल्या स्वरांपेक्षा बरेच बदलले होते. संस्कृतच्या ऐवजी ग्रीक भाषेतील स्वर त्यामानानं फारसे न बदलल्यामुळे ग्रीक भाषेच्या सखोल अभ्यासावरून त्या मूलभूत स्वर-परिक्रमेचं रहस्य खुलं होण्याची शक्यता अधिक होती. त्यामुळे सोस्यूरनं पुढील ग्रीक शब्दांमधील स्वर-पर्यायांवर नजर रोखली.

ptomai pte eptmai

(s)kha (s)khos eskhn

वरील शब्दांत जे स्वर-पर्याय आढळतात ते असे :

(शून्य किंवा लोप)

आता ग्रीकमधील पुढील उदाहरण घ्या

Lepo Lloipo lipon

यात

ei   oi   i

असे स्वर-पर्याय आढळतात. या दोन स्वर-पर्यायांची तुलना केली तर असं आढळून येतं की पहिल्या पर्याय-व्यवस्थेत आपण जर i हां शब्द घातला तर दोन्ही व्यवस्था एकत्र करता येतील

e + i   o + i   + i

यावरून असा अंदाज करता येतो की मूळ पर्याय-व्यवस्थेत संयुक्त स्वर होता; त्यातील पहिला e किंवा o होता व दुसरा i होता. तसंच या परिक्रमेच्या तीन अवस्था होत्या. ei ही त्या परिक्रमेची सामान्य अवस्था होती; e च्या जागी o ही तिची दिर्घावस्था होती व e च्या (शून्य अभाव) ही शून्यावस्था होती. ही परिक्रमा आकृतीच्या साह्यानं पुढीलप्रमाणं दाखविता येईल :

परिक्रमा

शून्यावस्था   सामान्य अवस्था   दिर्घावस्था

i   ei   oi

ग्रीक भाषेतील या स्वर- परिक्रमेच्या आधारावर सोस्युरनं असं मत मांडलं की इंडो – युरपिअन कुळामध्ये जी आद्य परिक्रमा होती तिच्या अवस्था पुढीलप्रमाणं होत्या :

शून्य   सामान्य   दीर्घ

अ   आ

ही परिक्रमा आपल्याला संस्कृतमधील पुढील शब्दांच्या रूपात आढळते.

शून्य   सामान्य   दीर्घ

अदभुत	दभ्नोति	अदाभ्य
(द् भ्)	(द-)	(-दा-)
जक्षाति	हसति	हास्य
(हस्)	(ह-)	(हा-)

इंडो – युरपिअनच्या या परिक्रमेतील सामान्य अवस्थेतल्या ‘अ’ पुढे ‘इ’ व ‘उ’ हे स्वर आल्यानंतर त्या संयुक्त स्वरांची परिक्रमा पुढीलप्रमाणे घडली गेली :

शून्यावस्था	**सामान्य अवस्था**	**दीर्घावस्था**
इ	अइ	आइ
	अउ	आउ

या प्रकारची परिक्रमा इंडो – युरपिअन (म्हणजे संस्कृत, अवेस्तन व फारसी या भाषांची स्त्रोत भाषा) भाषेत निर्माण झाली असावी व तिच्यात कालांतरानं पुढील संस्थापन घडलं असावं :

शून्यावस्था	**सामान्य अवस्था**	**दीर्घावस्था**

इ	ए (अइ)	ऐ (आइ)
	ओ (अउ)	औ (आउ)

हे संस्कृतमध्ये आढळतं. यातले ‘ए’ व ‘ओ’ हे ध्वनी मुळात संयुक्त स्वर असले तरी संस्कृतमध्ये ते स्वतंत्र स्वर बनले. संस्कृत व्याकरणकरांना या स्वरांच्या मूळ ‘संयुक्त’ स्वरूपाची जाणीव असावी व म्हणूनच त्यांनी या स्वरांना दीर्घ मानलं आहे. या बाबतीत युरपातील विद्वानांनी संस्कृत व्याकरणकरांना शाबासकी दिली आहे. याच क्रमानं

ऋ	अऋ(अर्)	आऋ(आर्)
ऌ	अऌ(अल्)	आऌ(आल्)

अशी ही परिक्रमा पुढे नेता येते, या सर्व परिक्रमेची संस्कृतातील उदाहरणं पुढील प्रमाणे आहेत :

जित	जेतुम्	अजैषम्
श्रुत	श्रोतुम्	अश्रौषम्
कृत	कर्तुम्	कार्य
क्लृप्ति *	कल्पते	-

सोस्युरनं स्पष्ट केलेल्या मूलभूत स्वर-परिक्रमेचा हा सिद्धान्त भाषेतील व्यवस्थेच्या अभ्यासाच्या दृष्टीनं सुरेख व सयुक्तिक वाटतो.

त्याच्या या मांडणीमुळे भाषाविज्ञानाच्या अभ्यासात अनेक महत्त्वाच्या तत्त्वांची भर पडली. स्वर-परिक्रमेच्या चौकटीत संस्कृतमधील 'गुण' व 'वृद्धि' या गोष्टी अधिक स्वाभाविकपणे समजाविल्या गेल्यामुळे एखाद्या व्याकरणाचा अभ्यास कितीही काटेकोरपणे झालेला असला तरी त्या अभ्यासाला तुलनात्मक व्याकरणाच्या चौकटीत बसविल्याखेरीज त्याचं खरं रहस्य स्पष्ट होत नाही ही गोष्ट सर्वमान्य झाली. एक सामान्य दृष्टान्त देऊन सांगायचं झालं तर असं समजा की एखाद्या प्राचीन इमारतीच्या दगडांवर पूर्वी एक विशाल चित्र कोरलेलं होतं. ती इमारत ढासळून पडून जमिनीखाली गडप झाल्यानंतर शेकडो वर्षानंतर पुरावस्तुशास्त्रज्ञांना खोदकामात त्या विशाल चित्राचा एक फलक मिळतो. त्यावरून त्या चित्राचा काहीच बोध होत नाही. समजा की तो फलक असा आहे :



त्याला उलट –सुलट निरनिराळ्या दिशांनी पाहून काहीच बोध होत नाही. कोणीतरी म्हणतो ही आकृती मूळ चित्रातल्या एखाद्या पक्ष्याच्या पायाची असावी. ते मत मान्य होतं, नंतर काही वर्षानी दुसरा फलक सापडतो तो असा :



पहिल्या फलकातील पक्ष्याच्या पायाप्रमाणे हा पाय वाटत नाही. मग या दोन फलकांची जुळवा –जुळव केली जाते व कोणीतरी त्यांना पुढीलप्रमाणे जोडतो :



जुळवणूक उत्तम झाली पण अद्यापही मूळ चित्राची उत्कल होत नाही. इतकं नक्की की या फलकांवरील आकृती पक्ष्याच्या पायाची नाही. आणखी काही काळानंतर दुसरे काही फलक हाती येतात व सबंध चित्र आता स्पष्ट होतं ते हरणाच्या मुखाकृतीचं :



अशाच रितीनं तुलनात्मक व्याकरणाचा अभ्यास भाषा-भाषांतीमधील ध्वनिप्रतिष्ठापनाच्या जुळवाजुळवीसाठी बहुमोल ठरतो.

सोस्युरच्या शोधानं आणखी एक गोष्ट निदर्शनाला आली. पण ती त्याचे विद्यालयीन प्राध्यापक कार्ल ब्रुगमान[७] यांनी आपल्या एका प्रबंधात[८] अगोदरच स्पष्ट केली असल्यानं मूळ संशोधकाचा मान ब्रुगमानलाच द्यायला हवा. ब्रुगमान यांनी आपल्या प्रबंधात असं निदर्शनाला आणलं की संस्कृत भाषेत जसे ‘ॠ’ व ‘ॡ’ हे स्वर आढळतात व त्यांच्या गुण-वृद्धि अवस्था ‘अर्-आर्’ व ‘अल्-आल्’या मिळतात त्याच धर्तीवर आपल्याला संस्कृतमध्ये ‘अन्-आन्’ व ‘अम्-आम्’ या गुण-वृद्धि अवस्था आढळतात. संस्कृत व्याकरणकरांच्या नजरेस ही गोष्ट आली नाही. उदाहरणार्थ,

अन्/अम्	आन्/आम्
हन्ति	जघान
गमन	जगाम

ही परिक्रमा वर दिलेल्या, सोस्युरच्या परिक्रमेचाच भाग मानली तर तिची शून्यावस्था कोणती? संस्कृतात वरील शब्दांच्या या शून्यावस्थेची जी रूपं मिळतात ती अशी :

हत

गत

या रूपांसंबंधी ब्रुगमान यानं असं मत व्यक्त केले की

शून्यावस्था	**सामान्य अवस्था**	**दीर्घावस्था**
?	अन्	आम् आन्
?	अम्	

या व्यवस्थेत जिथं प्रश्नचिन्हं मांडली आहेत तिथं भाषाव्यवस्थेच्या दृष्टीनं जी शून्यावस्था कल्पायला हवी ती न् व म् या ध्वनींची स्वरावस्था असायला हवी. तसे स्वर संस्कृतमध्ये नसल्यानं ते दर्शविण्यासाठी ब्रुगमाननं * व * अशी चिन्हं वापरली व असा सिद्धान्त मांडला की इंडो – युरपिअन कुळाच्या मूळ भाषेतल्या * व * या स्वरांचं संस्कृतमध्ये 'अ' हे प्रतिष्ठापन झालं. याचा अर्थ असा की ज्या ठिकाणी 'हत', 'गत' सारख्या संस्कृत शब्दांच्या स्वर-परिक्रमेच्या व्यवस्थेत 'अ' हा ध्वनी आढळतो त्या ठिकाणी मूळ भाषेतले स्वर * व * असे होते. तेव्हा 'हत' व 'गत' या शब्दांची इंडो – युरपिअन पुनर्रचना ब्रुगमाननं * व * अशी केली. ब्रुगमान व सोस्युर यांचे इंडो – युरपिअनमधील स्वर-परिक्रमेचे सिद्धान्त परस्परपूरक इतकंच नव्हे तर भाषिक अज्ञाताचा वेध घेणारे ठरले. त्यांच्या सिद्धान्तावर आधारलेल्या मूळ भाषेच्या एकंदर स्वर-परिक्रमेचं जे संरचनात्मक स्पष्टीकरण मान्य झालं ते असं :

शून्यावस्था	**सामान्य अवस्था**	**दीर्घावस्था**

β	अβ	
इ	अइ	आइ
उ	अउ	आउ
ऋ	अऋ	आऋ
* * लृ	अलृ	आलृ
*	अ*	आ*
*	अ*	आ*

ब्रुगमान व सोस्युर यांच्या या संशोधनाच्या मार्गानं हाती आलेली प्राचीन भाषेची स्वर-व्यवस्था मान्य केली तर संस्कृतच्या रूढ व्याकरणाचे नियम थोडे निराळे, पण अधिक सयुक्तिक बनतील. या दृष्टीनं लिहिलेलं पहिले संस्कृत व्याकरण म्हणजे डब्ल्यू. डी. व्हिटनी (१८२७-१८९४) याचं Sanskrit Grammer (१८७९) त्यानंतर ए. ए. मॅकडोनल (१८५४-१९३०) यानं१९३० साली लिहिलेल्या आपल्या Vedic Grammer या ग्रंथानं या अभ्यासाला परिपूर्ण केलं.

या अभ्यासानंतर असा प्रश्न उद्भवतो की रूढ संस्कृत व्याकरणाची वाट काय? रूढ व्याकरणातील नियम खोटे किंवा निकामी नाहीत. मात्र इंडो-युरपिअन या रचनेच्या दृष्टीनं ते कधीकधी पारदर्शी असले (उदा. ए, ओ यांना संयुक्त स्वर मानणे) तरी कधीकधी ते अपारदर्शी ठरतात (उदा. मत/गमन,

हन्ति या जोड्यांचे वास्तव स्वरूप). हे विधान केवळ संस्कृत व्याकरणाविषयीच नव्हे तर कोणत्याही एका भाषेच्या संबंधात खरं म्हणावं लागेल. तुलनात्मक पद्धतीचा अवलंब करून भाषांच्या इतिहासात भूतकाळात घडलेल्या गोष्टी लक्षात न घेता व्याकरणकारानं एखाद्या भाषेच्या व्यवस्थेचा विचार करून तिचं व्याकरण लिहिलं तर ते अपूर्णच ठरणार. काही अंशी चुकीचं देखील! किंबहुना भाषेच्या अभ्यासात 'काय?' किंवा 'कसं?' या प्रश्नापुढे जाऊन 'का?' या प्रश्नाच उत्तर तो देऊ शकणार नाही. रूढ व्याकरणांची असली ऐतिहासिक अपारदर्शकता आधुनिक भाषाविज्ञानातील तुलनात्मक पद्धतीच्या भाषाभ्यासाशिवाय कधीच कळली नसती.

संदर्भ व टीपा

१. August Schleicher, 1821-1868

२. Thomas Young, 1773-1829

३. Compendium der Vergleichende Grammatik, 1861

४. Ferdinand de Saussure 1857-1913

५. Mmoire sur le systme primitif des voyelles dans les langues indo-europeennes, 1879

६. Vocalismus, 1827

७. Karl Brugmann 1849-1919

८. Nasalis Sonans in der indo-germanische Grundsprache,1876

*स्वर-स्वरूप * व * हे ध्वनी संस्कृतमध्ये उरले नसले तरी इंग्रजीतील button व bottom या शब्दांतील अंत्य ध्वनींवरून त्यांचे उच्चार ध्यानात येतील.

ऌ या स्वराचा उच्चार देखील इंग्रजीतील cattle, bottle असल्या शब्दांतील अंत्य ध्वनीवरून स्पष्ट होईल. मात्र हे शब्द इंग्रज माणूस बोलतो त्याप्रमाणे बोलायला हवेत. ** संस्कृतमधील 'कृ' हे अक्षर 'क्+ऋ' याचं द्योतक आहे तसं 'ऌ' हे अक्षर नाही हे लक्षात ठेवावं. 'ऌ' म्हणजे 'ल्+ऋ' असं नाही, 'ऌ' हे 'ल्' या व्यंजनाचं स्वररूप आहे. 'क्+ ऌ' यांचं लेखन 'क्ऌ' असं केलं जातं. संस्कृतात हे लेखन 'क्ऌप्ति' या एकाच शब्दापुरतं मर्यादित आहे त्याचा उच्चार वर दिलेल्या इंग्रजी शब्दांतील अंत्य ध्वनीसारखा करायला हवा.

४. ‘शिष्यादिच्छेद् पराजयम्’

विल्यम जोन्झ उपपत्तीपासून ब्रुगमान-सोस्युर यांच्या सिद्धांतापर्यंत आपण जी वाटचाल केली तिची मुख्य फलश्रुती ही की प्राचीन भारताचा भाषिक इतिहास अभ्यासायचा असला तर संस्कृतच्या अभ्यासापासून सुरूवात करावी लागते हे खरं, परंतु संस्कृतचा अभ्यास केवळ भारतीय परंपरेच्या अभ्यासापुरता मर्यादित ठेवून करता येणार नाही. तुलनात्मक व्याकरणानं आपल्याला संस्कृतचा अभ्यास इंडो-युरपिअनच्या कोंदणात व इतर भाषांच्या साहचर्यात करायला शिकवलं. या मार्गानं जाता संस्कृतचा इतिहास लिहायचा झाला तर भारताच्या वायव्य व उत्तर दिशेकडील प्रदेशांकडे बघायला हवं इतकंच नाही तर त्याही पलीकडील युरपातील प्रदेशांचा विचार करायला हवा. त्या दूर-दूरच्या देशांकडून संस्कृतकडे पाहण्याची दृष्टी आपण आत्मसात केली तर असं आढळून यीएल की इतिहासकाराप्रमाणे भाषाविज्ञानीला भाषांच्या भूतकाळाचा विचार करताना परोक्ष दृष्टीची फार आवश्यकता आहे. भाषाविज्ञानातील तुलनात्मक व्याकरण पद्धतीनं ही दृष्टी प्राप्त होऊ शकते ही या विज्ञानाची फार मोठी देणगी आहे.

भाषाविज्ञानाच्या अभ्यासाला जी शास्त्रीयता लाभली ती संस्कृत भाषेचं ध्वनिशास्त्र रचणाऱ्या विद्वानांच्या कसोशीमुळे. ‘शिक्षा’ नावाचे ग्रंथ रचणाऱ्या विद्वानांनी संस्कृत भाषेतील ध्वनींचा व त्यांचे उच्चार करणाऱ्या मौखिक इंद्रियांशी संबंध दाखविणाऱ्या नियमांचा जितका कसोशीनं अभ्यास केला तितका इतर कोणत्याही देशातल्या अभ्यासूंनी केला नव्हता. यामुळे भाषाविज्ञानाच्या शास्त्रीय अभ्यासाची बैठक भाषेतील ध्वनींच्या अभ्यासावरूनच व्हायला हवी हा भारतीय विद्वानांचा दृष्टीकोण सर्वमान्य झाला.

आणखीही फार महत्वाची गोष्ट संस्कृतच्या अभ्यासावरून प्राप्त झाली ती ही की कोणत्याही अभ्यासाला स्वत:ला विद्वान म्हणवून घ्यायाचं असलं तर त्याचा आधार ज्या कल्पांवर व तत्त्वांवर करायचा व त्यांच्या आधारानं जी

विधानं, प्रमेयं व सिद्धांत रचायचे ते सारं तर्कग्राह्य हवं. ज्याप्रमाणे प्लेटोने आपल्या 'अकॅडमी'त भूमितीचे ज्ञान ही प्रवेशाची अट ठरवली त्याच चालीवर आनंदवर्धनाने व्याकरणकारांना 'प्रथमेहि विद्वांसो वैयाकरणा:' म्हणून अभिवादन केले. ही तर्कग्राह्यता साध्य करण्यासाठी प्रथम आपल्या तत्त्वांना मन किंवा अर्थ या कल्पांवर आधारलेल्या मानसशास्त्रीय उपपत्तींपासून शक्य तो दूर ठेवलं पाहिजे इतकंच नाही तर 'भाषा जगते, ती वाढते, बदलते, मरते, इ'. भाषाविषयक मानवकल्पित जीवधारणांपासून दूर ठेवलं पाहिजे; संस्कृतची व्याकरणपद्धती पूर्वीपासून अत्यंत तर्कग्राही ठेवली गेली यात शंका नाही. भाषाविज्ञानाच्या सुरुवातीला अभ्यासाला संस्कृत ध्वनिशास्त्राचं व व्याकरणपध्दतीचं हे वैज्ञानिक मार्गदर्शन लाभलं नसतं तर भाषाविज्ञान इतक्या लौकर प्रगत पावू शकलं नसतं.

संस्कृत ध्वनिशास्त्र व व्याकरणाभ्यास यांच्या मदतीनं जेव्हा युरपात भाषाविज्ञान चांगलंच फोफावलं त्या वेळी असं एक मत प्रगट झालं की भाषांच्या तुलनात्मक अभ्यासावरून जेव्हा एखादी भाषाविज्ञानी एखाद्या विशिष्ट ध्वनिसमीकरणाला 'ध्वनिपरिवर्तनाचा नियम' असं संबोधितो तेव्हा हा नियम जर वैज्ञानिक मानायचा असला तर त्याला त्या भाषेच्या विशिष्ट संदर्भात अपवाद असू शकणार नाही.[१] मागे दुसऱ्या प्रकरणात आपण ज्या 'ग्रिमच्या नियामा'चा विचार केला तो ध्वनिपरिवर्तनाचा नियम ग्रीक व लॅटिन यांची जेव्हा जर्मानिक भाषांशी तुलना केली जाते तेव्हा दृष्टोत्पत्तीस येतो. त्या दृष्टीनं या भाषांतील पुढील शब्द तपासू :

संस्कृत	**ग्रीक**	**जर्मानिक (गोथिक)**
pitr	patr	fadar
bhrtar	phr:ter	brothar

dnt	odnt	tunthu
atm	ekatn	hund

या उदाहरणात संस्कृत व ग्रीक या भाषांतील शब्दांच्या मध्यात व अन्ती येणारा t हा ध्वनी गोथिकमध्ये काही शब्दांत d (media) व इतर शब्दांत th (aspirate) आढळतो. म्हणजे आपल्यापुढे दोन समीकरणं उभी राहतात :

t : th

t : d

यातलं शास्त्रीय कोणतं?

रूढ व्याकरणात एखाद्या नियमाला अपवाद मानले जातात. ज्या वयोवृद्ध भाषाविज्ञानींच्या मनावर या रूढ व्याकरणाचा पगडा बसला होता ते म्हणू लागले की वरील दोन समीकरणांपैकी पाहिलं हे नियम मानावं व दुसरं त्याचा अपवाद मानावं. यावर नव्या, तरुण भाषाविज्ञानींनी असा प्रश्न केला की ‘ग्रिमचा नियम’ हा वैज्ञानिक नियम असला तर तो अपवादरहित असायला पाहिजे. दुसरं असं की, समीकरण हे नियम मानून पहिलं त्याचा अपवाद का मानू नये? असं जर करता येत असलं तर नियमित काय अनियमित काय याला काहीही धरबंध राहणार नाही व भाषाभ्यास खऱ्या अर्थानं ‘विज्ञान’ होऊ शकणार नाही.

विज्ञानाच्या अस्सल कसोटीवर भाषाभ्यासाचं भवितव्य असं डळमळू लागलं तेव्हा संस्कृत ‘शिक्षा’कारांनी संस्कृतची जी एक गोष्ट कसोशीनं जोपासली होती तिचा फार उपयोग झाला. याची ग्वाही कार्ले व्हेर्नेर याच्या १८७५ च्या प्रबंधात[२] मिळते. व्हेर्नेर एकदा नोकरीच्या कामानिमित्त एका गावी

हॉटेलात राहिला होता. बराच वेळ बिछान्यात पडून झोप येईना म्हणून त्यानं भाषाविज्ञानाचं एक जाडजूड पुस्तक वाचायला घेतलं. त्यात छापलेल्या वरील सारख्या शब्दांवरून नजर फिरविताना त्यानं एक अवलोकन नमूद केलं व त्याला वरील कूट प्रश्नाचं उत्तर सुचलं. संस्कृत 'शिक्षा'कारांनी संस्कृत शब्दातील स्वराघात (जो येथे स्वरावरील तिरप्या रेषेनं दाखविला आहे) काळजीपूर्वक नोंदून ठेवला असल्यानं व्हेर्नेरला आढळून आलं की जेव्हा संस्कृत व ग्रीकमधील t स्वराघातापूर्वी येतो तेव्हा जर्मानिकच्या समीकरणात d आढळतो, परंतु हा t जेव्हा स्वराघातानंतर येतो तेव्हा जर्मानिकच्या समीकरणात th आढळतो.

संस्कृतमधील स्वराघाताचा हा पुरावा व्हेर्नेरच्या अवलोकनात आला तेव्हा एकंदर भाषाविज्ञानात तीन गोष्टी स्पष्ट झाल्या. पहिली अशी की व्हेर्नेरकालीन तरुण भाषाविज्ञानी 'नियमाला अपवाद नसतात' या गोष्टीचा जो उदोउदो करतात तो योग्य आहे. व्हेर्नेरच्या अवलोकनानं दुसरी गोष्ट स्पष्ट झाली ती अशी की वरील दोन समीकरणं दोन वेगवेगळे नियम आहेत; एक नियम व दुसरा त्याचा अपवाद असा त्यांचा एकमेकांशी संबंध नाही. अवलोकनानं स्वराघात ही गोष्ट संस्कृत पाठकारांनी इतक्या काळजीपूर्वक नोंदून ठेवली नसती तर आपणाला हा शोध लागणं कठीण होतं अशी कबुली व्हेर्नेरनं दिली आहे. व्हेर्नेरच्या शोधानं तिसरी महत्त्वाची गोष्ट साधली ती अशी की भाषेच्या वैज्ञानिक अभ्यासात तिच्यातील ज्या घटकांचा विचार भाषाविज्ञानी करतो ते घटक तिच्या कोणत्या भाषागत परिसरात आढळतात यांचं सूक्ष्म अवलोकन त्यानं करायला हवं. भाषेतील प्रत्येक घटकाचा भाषागत परिसर भाषाभ्यासात स्पष्ट व्हायला हवा हे वैज्ञानिक तत्त्व तेव्हापासून भाषाभ्यासात दाखल झालं.

ग्रीमच्या नियमाचा विचार करता व्हेर्नेरप्रमाणेच ग्रासमान यालाही एका अडचणीला तोंड द्यावं लागलं. ग्रासमान हा तत्कालीन जर्मनीतील एक प्रसिद्ध गणिती होता व भाषाविज्ञान, विशेषतः वेदाभ्यास, हा त्याच्या आवडीचा छंद

होता. संस्कृतमधील काही शब्दांची गोथिकमधील शब्दांशी तुलना करता त्याला असं आढळून आलं की

संस्कृत	**गोथिक**	**अर्थ**
omi	ana-iuan	मी जाणतो
nigha	ags	उन्हाळा

जिथे गोथिकमध्ये b व d हे ध्वनी येतात त्यांच्या समीकरणात संस्कृतमध्ये ग्रिमच्या नियमाप्रमाणे bh व dh हे ध्वनी असायला हवेत. पण तसे ते वरील उदाहरणात आढळत नाहीत. मग हे ग्रिमच्या नियमाचे अपवाद मानावेत का? ग्रासमान हा गणिती असल्यानं त्याच्या बुद्धीला ही गोष्ट पटण्यासारखी नव्हती. या उदाहरणांचं सूक्ष्म अवलोकन करता त्याला एक वैशिष्ट्य आढळलं ते असं की ज्या ज्या शब्दात b : b किंवा d : d अशी समीकरणं मिळतात त्या वेळी संस्कृतमधील शब्दात त्या b/d यांच्यापुढे एक दुसरा हकारयुक्त स्फोटक ध्वनी असतो. *यावरून त्यानं असा अंदाज केला की मूलभूत भाषेत प्रथम एकामागून एक येणारे असे दोन हकारयुक्त स्फोटक ध्वनी असावेत, व त्यातला पहिला कालांतरानं हकाररहित बनला असावा. म्हणजे वर दिलेल्या संस्कृत शब्दांची मूळ रूपं

* bhodhmi

* nidhgha

अशी मानवी त्यायोगे bh : b व dh : d ही समीकरणं ग्रिमच्या नियमानुसार सिद्ध होतात. जरी असे शब्द संस्कृतच्या कोशात आढळत नसले तरी या नियमाला पाणिनीच्या व्याकरणात आधार* आहे. ग्रासमानच्या या

विचारानं 'ध्वनिनियमांना अपवाद नसतात' या नियमांचं समर्थन होतं इतकंच नव्हे तर भाषाभ्यासातील व्यवस्थांतर्गत घटनेसंबंधीच्या ज्ञानाच्या दिशेनं त्याचा विचार एक महत्त्वाचं पाऊल ठरणार होतं.

संस्कृत व्याकरणकारांचं वर उल्लेखिलेलं ऋण मान्य केल्यानंतर भाषाविज्ञानाच्या अभ्यासामुळे संस्कृतकडे बघण्याचा दृष्टीकोन शास्त्रीय दृष्टीनं थोडा बदलावा लागला तर त्यात संस्कृतचा अवमान नसून आपण मिळविलेल्या नव्या ज्ञानाचा उपयोग, औदार्याची सुरवात जशी घरापासून करावी लागते त्याप्रमाणे आपल्या भाषेपासून करायला हवा. संस्कृत व्याकरणातली एक साधी गोष्ट उदाहरणादाखल घेऊ. संस्कृत शिकणाऱ्या विद्यार्थ्याला 'संधिनियम' शिकावे लागतात. पण 'संधि' म्हणजे काय असं जेव्हा तो विद्यार्थी आपल्या शिक्षकाला विचारतो तेव्ह्जा शिक्षक एवढंच सांगतात की 'संधि' म्हणजे संस्कृत भाषेत एका ध्वनिजवळ दुसरा ध्वनी आला की त्यांना एकमेकाशी जोडण्याचा नियम. भाषाविज्ञानानं 'संधि' या घटनेकडे पाहण्याची यापेक्षा अधिक व्यापक दृष्टी निर्माण केली आहे. व्याकरणकारांनी कसोशीनं रचलेले संधिनियम म्हणजे त्या त्या भाषेत घडलेल्या ध्वनींच्या परिवर्तन व प्रस्थापन या प्रक्रियांच्या जणू गोठून गेलेल्या मुशी असतात.[३] या मुशींचा अभ्यास करून त्यांच्या द्वारा भाषेच्या स्वरूपात काय काय घडामोडी होत होत्या, कोणते ध्वनी बळकट, कोणते निर्बल ठरत होते, त्यांचे परिसर काय होते, त्यांचे कोणते उच्चारगुण कशाप्रकारे बदलत होते या सर्व ऐतिहासिक माहितीची शास्त्रशुद्ध मांडणी केली तर त्या माहितीचा त्या त्या भाषेचं सर्वांगीण बदलणारं स्वरूप समजायला पुष्कळ उपयोग होऊ शकतो. भाषा ही एका अशी व्यवस्था असते की जिचे घटक एकमेकांशी विशिष्ट गुणांनी बांधले जाऊन विशिष्ट गटात व विशिष्ट रचनेत गोठवले जातात. त्यांच्या या क्रियेमुळे भाषेची व्यवस्था स्वत:ची अशी एक रचना साधू लागते. कोणत्याही भाषेची रचना ही अगदी पूर्णत्वाला पोचलेली, म्हणजे पूर्णांशानं समतुल नसते. भाषा ही सतत व्यवहारात वापरली जात असल्यानं तिच्या रचनेत सदैव एक प्रकारचं अस्थैर्य असतं. भाषेच्या ध्वनिव्यवस्थेच्या अभ्यासावरून तिच्यातले कोणते ध्वनी स्थिर व कोणते अस्थिर होते हे शोधता

येतं. अस्थिर ध्वनी हे त्या भाषेला विशिष्ट दिशेला कलंडून टाकणारे घातक असतात. उलट काही ध्वनी त्या भाषेच्या स्थैर्यप्रवृत्तीला आधारभूत बनतात. भाषेच्या संधिनियमांचा अभ्यास या दृष्टीनं तिच्या ऐतिहासिक अभ्यासासाठी फार महत्वाचा ठरतो. संस्कृतच्या संधिनियमांच्या अभ्यासावरून हे कसं स्पष्ट होतं ते पाहू.

संस्कृतमध्ये मुख्यत्वे एका शब्दाच्या अंती येणारा ध्वनी व पुढील शब्दाच्या सुरवातीस येणारा ध्वनी यांचा एकमेकांशी जो मेळ होतो त्याला 'संधि' असं म्हणतात.या प्रक्रियेत बहुधा शब्दान्ती येणारा ध्वनी आपले उच्चारणगुण बदलत असे. यावरून असं म्हणायला हरकत नाही की शब्दान्त हा परिसर संस्कृत भाषेच्या व्यवस्थेत अस्थिर होता. या त्याच्या अस्थिरतेची साक्ष अशी की नंतरच्या प्राकृत भाषांत हे शब्दांत ध्वनी लोप पावले; उदा. जगत् – जग, राजन् –राजा, विद्युत् – वीज्जु – वीज. इ.

भाषेतील निरनिराळ्या परिसरातील निरनिराळ्या ध्वनींच्या 'संधि'या प्रक्रियेचा अभ्यास केला तर तिच्यात अनेक प्रकार आढळतात. काही ध्वनी दुसऱ्या ध्वनींना आपल्यासारखे बनवितात, काही वेळा सारखे ध्वनी एकमेकांच्या सान्निध्यात आल्यामुळे विसदृश बनतात. व्याकरणांच्या अभ्यासात असल्या विविध प्रकारांची नुसती यादी केली जाते. पण केवळ यादी करून भागणार नाही. या प्रकारांवरून भाषेत साकल्यानं काय घडत होतं ते समजायला हवं. ध्वनींच्या या विविध घटनांच्या योगे भाषेची व्यवस्था कशा प्रकारे चलित बनत राहते व तिची ही चालितता तिच्या नंतरच्या इतिहासात कशी वळणं घेत जाते याची साक्ष पटवायला हवी.

संस्कृतच्या अभ्यासावरून तिच्यातल्या शब्दान्ती अथवा पदान्ती येणाऱ्या ध्वनीत अधिक प्रमाण 'स्' या ध्वनीचं होतं.* संस्कृतमध्ये नामांना जे प्रत्यय लागतात त्यात प्रथम विभक्तीच्या एकवचनाचा प्रत्यय 'स्' हा आहे. हा 'स्'

किती विविध प्रकारे आपले वेष बदलत होता हे पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होईल :

१.	रामस् करोति	=	: (विसर्ग)	रामः करोति
२.	रामस् आगच्छति	=	(लोप)	राम आगच्छति
३.	रामस् गच्छति	=	उ	रामो गच्छति
४.	रामस् त्रासते	=	स्	रामस्त्रासते
५.	रामस् टीकते	=	ष्	रामष्टीकते
६.	हरिस् चलति	=	श्	हरिश्चलति
७.	हरिस् गच्छति	=	र्	हरिर्गच्छति

'स्' या ध्वनीच्या अस्थिरतेला तुलनात्मक अभ्यासावरून काय पुरावा मिळतो तो पाहू. 'केश' या संस्कृत शब्दाची अवेस्तन gasa शी तुलना करता मुळात तो 'केस' असा असावा असे दिसते. अवेस्तन hvasura शी तुलना करता संस्कृत 'श्वशुर' हा शब्द मुळात 'स्वसुर' असा असावा. या दोन्ही उदाहरणांत मुळातल्या 'स्' चं तालव्यीकरण झालं आहे. हाच प्रकार लिथुआनिअन smakr ची संस्कृत 'श्मश्रु' तुलना करता आढळतो. म्हणजे मूळ शब्द, 'स्मश्रु' असावा. याच्या उलट प्रकारही आढळतो. म्हणजे 'श्' नंतर येणारा 'स्' देखील तालव्य बनतो; उदा. खोताजीज saha (ससा) वरून असं अनुमान काढता येतं की मूळ

शब्द ‘शस’ असा असावा. या उलट प्रकार ‘शुष्क’ च्या बाबतीत झाला. अवेस्तन huska (मऊ) वरून त्या आधीच्या भाषेत suska होऊन नंतर येणाऱ्या भाषेत * (ष्) मुळे अगोदरच्या ‘स्’ चे तालव्यस्वरूप बनलं. “षट्’ या शब्दाचा इतिहासही काहीसा असाच आहे. मूळ इंडो-युरपिअन satus असा शब्द कालान्तराने sats बनून संस्कृतमध्ये sat रूपानं उरला.

आता संस्कृतमध्ये इतर काही प्रयोगांत येणाऱ्या ‘स्’ चा विचार करू. संस्कृतात ‘स्तृ’ (पंचम गण) या क्रियापदाची रूपं ‘स्तृणोति’ ‘तस्तार’ अशी आढळतात. या रूपांत स्त ~ त असे पर्याय आढळतात. याचा अर्थ असा आहे की व्याकरणी रूपांत ‘स्’ चा लोप होत असे. हा लोप ‘तारा’ या संस्कृत शब्दात स्पष्ट आहे. जर्मानिक भाषेत तो टिकून राहिला आहे; उदा इंग्लिश star याप्रमाणे जर्मानिक sneu-s (इंग्लिश : sneeze) शी तुलना करता संस्कृत ‘तत्’ (शिंकणे) हा धातू मुळात ‘स्नत्’ असा मानावा लागेल. याच दृष्टीनं संस्कृत ‘पश्य’ व ‘स्पश्’ (हेर) हे शब्द एकमेकांचे संबंधी आहेत व त्याचा मूळ धातू ‘स्पश्’ मानावा लागेल (लॅटिन : specio)

वरील विवेचनावरून संस्कृतमधील ‘स्’ हा काही परिसरात अतिशय अस्थिर होता याची खात्री पटेल. याच विवेचनाचं सूत्र हातात धरून आपण जरा खोल पाण्यात शिरू. ‘न+छिद्यते’ या शब्दांचा संधी करायचा असला तर संस्कृत व्याकरणकार असे नियम देतात (अष्टाध्यायी, ६.१.७३-७६) की पहिल्या शब्दान्तीचा स्वर व पुढील शब्दातील ‘छ्’ यामधे ‘त्’ हे व्यंजन घालावे :

न+ त् छिद्यते

यानंतर दुसऱ्या नियमाने(अष्टाध्यायी, ८.४.४०) हा संधी

न+ च् + छिद्यते

असा करून ‘नच्छिद्यते’ असे रूप बनवावे. या संधिनियमांकडे बघून कोणी असा प्रश्न करील की ‘न’ आणि ‘छ्’ यामध्ये ‘त्’ का घालायचा? तो ‘त्’ कुठून

येतो? संस्कृतच्या व्याकरणात या प्रश्नांना उत्तर नाही. *संस्कृत व्याकरणकारांचं संधि-प्रकारांचं अवलोकन अतिशय सूक्ष्म होतं. यामुळे या 'त्'ला कुठंतरी आधार असावा एवढंच आपण मानू शकतो.

आता या प्रकाराकडे तुलनात्मक व ऐतिहासिक दृष्टीकोनातून बघू.

संस्कृत व ग्रीक यांच्यातील पुढील समानार्थी शब्दांची तुलना करता

संस्कृत	**ग्रीक**
छाया	Skia
छिद्	skhizo

असं आढळून येतं की संस्कृत 'छ्' हा मुळातल्या इंडो-युरपिअनमधील sk वरून बनला असावा. 'छ्'च्या या मूळ स्वरूपात दोन व्यंजनं होती व त्यात प्रथम 'स्' होता. त्या अर्थी 'नच्छिद्यते' मध्ये संधी होता तो

न् + अ + स्+ क + इ

या ध्वनींमध्ये होता. तो ज्या प्रक्रियेनं झाला तिच्या नंतरच्या पायऱ्या पुढीलप्रमाणे असाव्यात :

न् + अ + स् + च् + इ

न् + अ + च् + च् + इ

न् + अ + च् + छ् + इ

या संधीत ‘त्’ घालण्याची जरूर उरत नाही. त्यामुळे ‘त्’ कुठून आला, किंवा ‘त्’च का? असले प्रश्न उद्भवत नाहीत. संस्कृत व्याकरणकारांना आपल्या भाषेचा फार पूर्वीचा इतिहास माहीत नसल्याने त्यांना आपल्या व्याकरणव्यवस्थेत असा ‘आगंतुक’ त् आणावा लागला.

यावरून आपण एक निष्कर्ष काढू शकतो तो हा की संस्कृत व्याकरणाचा अभ्यास करताना जिथं-जिथं आपणाला असं का?’ हा प्रश्न पडतो तिथं त्याचं समाधानकारक उत्तर संस्कृत व्याकरणात मिळालं नाही तर इंडो-युरपिअनच्या अभ्यासाकडे बघायला हवं. याचं आणखी एक उदाहरण घेऊ या.

संस्कृत व्याकरणकार ‘गम्’ या धातूच्या वर्तमानकाळाची रुपं बनविण्यासाठी ‘गम्’ च्या ऐवजी ‘गच्छ्’ असं रूप आधारभूत म्हणून घ्या असं सांगतात. या ठिकाणी आपण त्यांना विचारलं ‘असं कां ?’ तर ते सांगतात की संस्कृत व्याकरणकारांना हा ‘आदेश’ आहे. ‘आदेश’ हा मान्य करायचा असतो, त्याच्या बाबतीत ‘असं कां? ’ असा प्रश्न विचारायचा नसतो. खरं पाहता ज्ञान हे ‘परिप्रश्नेन’ मिळतं असं सांगणाऱ्या गुरूंना हा ‘आदेश’ द्यावा लागावा हा त्यांच्या शास्त्राचा दोष मानावा लागेल . युरपातले भाषाविज्ञानी असला ‘आदेश’ मान्य करून स्वस्थ बसले नाहीत. त्यांनी आपल्या विज्ञानाच्या दृष्टीनं ‘गच्छ्’ कडे पाहिलं. तिच्यातून त्यांना त्याच्या पूर्वस्वरूपाचं जे दर्शन झालं ते क्रमाक्रमाने पुढीलप्रमाणे उलगडत गेलं.

संस्कृत ‘गच्छ्’ = ग् + अ+ च् + छ

ग् + अ+ च् + च्

ग् + अ+ स् + च्

ग् + अ+ स् + क्

ग् + म + स् + क् (ब्रुगनचा नियम)

या भाषाशात्रज्ञांनी जे इंडो-युरपिअन रूप रचलं ते

$$*g^w + m + s + k = g^w msk\text{-}$$

‘आदेश’ चा दंड उभारून ‘गम्’ च ‘गच्छ्’ करा असं सांगण्याची आता जरूर उरली नाही. * या इंडो-युरपिअन रूपावरून ‘गच्छ्’ हे रूप सरळपणे सिद्ध होतं. ‘आदेश’ चा दंड उभारणारा आद्य संस्कृत व्याकरणकार आज हयात असता तर त्याला या आपल्या पाश्चात्य शिष्यांच्या परीप्रश्नाचं व त्यासंबंधी संशोधन करून मिळविलेल्या त्यांच्या उत्तराचं कौतुक वाटून मान डोलवून त्यानं नक्की म्हटलं असतं : ‘शिष्याद् इच्छेत् पराजयम्’ *[४]

सारांश, इंडो-युरपिअनची व्यवस्था निर्माण करण्यासाठी जितका संस्कृतचा उपयोग झाला तितकाच संस्कृतचं भूतकाळातलं अज्ञात रूप समजण्यासाठी इंडो-युरपिअनचा उपयोग झाला. परस्परांना उपयोगी पडणाऱ्या या भाषाभ्यासांनी १९ व्या शतकाच्या अखेरच्या दशकात मानवाच्या ज्ञानशास्त्राला नवी दिशा देऊन एक नवं विज्ञान निर्माण केलं याची ग्वाही तत्कालीन सर्व विद्वानांनी दिली आहे. *[५]

संदर्भ व टीपा

१. ‘ Sound laws know exception.’ (A Leskien, 1876)

२. Karl verner : Eine ausnahme der ersten lautverschiebung 1875

“The sandhi alternations of sanskrit are largely the fossilized remains of an earlier period.” (W. S. Allen. Sandhi, Mouton, 1962, p. 33)

४. ज्या सूत्रांचा उपयोग केला आहे ती पुढीलप्रमाणे आहेत :

७.३.७७ इषगमियमां छः।

६.१.७३ छे च।

८.४.४० स्तोः श्चुना श्चुः।

"It is the boast of modern discovery to have made the world more thinkable and human life more full of meaning in a thousand ways; and before the century reaches its close, comparative philology, that is, the History of Language will have attained no mean rank in the great sisterhood of sciences whose task is to explore the History of man." R. Seymour Conway and W. H. D. Rouse, traslators of 'A comparative Grammar of the Indo-German languages' by Karl Brugmann, vol. II, 1891, preface (p. xiii)

*या दृष्टीनं आपल्या 'क् ख् ग् घ्' इ. लेखनपद्धतीपेक्षा इंग्रजी (किंवा ध्वनिशास्त्रीय) लिपी अधिक उपयोगी ठरते : k, kh, g, gh: t, th, d, dh; इ.

*(शलाम्) अभ्यासे चर्चा। (अष्टाध्यायी ८ : ४. ५४)

*प्रो. अॅलन यांनी ऋग्वेदातील ऋचांची या दृष्टीनं एक सहज-गणना केली. त्यांच्यात अधिकात अधिक वेळा पदान्ती येणाऱ्या चार ध्वनींची गणनसंख्या त्यांना पुढीलप्रमाणे आढळली :

ख् - १४०, ग् -११०, त् -३२, त्र् -१४

(W. S. Allen, sandhu, Mouten, p. 69n)

*ऋग्वेदात पदान्तीच्या 'न्' पुढे 'स्' आला तर त्या दोघांत 'त' उच्चारण करण्याची प्रथा होती. उदा. 'योधो न शत्रून् त्स वना न्यृग्जते (१.१४३.५) याचा पदपाठ 'शत्रून्। सः।' असा दिलेला आहे.

*पाणिनीच्या 'अष्टाध्यायी'प्रमाणे पुढील पायऱ्या मानाव्या लागतात :

७.३.७७ : इष्, गम्, व यम् या धातूंच्या शेवटच्या वर्णाच्या ऐवजी छ् हा वर्ण शित् प्रत्ययांपूर्वी ठेवावा:

गम् + श = गम् + अ

गछ् + अ

६.१.७३ : छ् या वर्णापूर्वीच्या अ नंतर त् ठेवावा :

गत्छ् + अ

८.४.४० : दंत्य वर्णाचा लगेच येणाऱ्या तालव्य वर्णाशी गोत्र झाला तर दंत्य वर्णाचा अनुक्रमे तालव्य वर्ण होतो : गच्छ् + अ = गच्छ

५. इतिहासाच्या कोंदणात संस्कृत

कोणत्याही भाषेचा वैज्ञानिक अभ्यास व तिच्या ऐतिहासिक स्वरूपातील प्राचीन अवशेषांच्या मदतीशिवाय होऊ शकत नाही हे गेल्या प्रकरणातल्या विवेचनावरून स्पष्ट झालं. या दृष्टीनं कोणत्याही भाषेच्या अभ्यासासाठी तिच्यात लिहिले गेलेले जुने ग्रंथ हे असल्या अभ्यासाची महत्वाची साधनं बनतात. संस्कृत, ग्रीक, लॅटिन, अवेस्तन, गोथिक वगैरे विदग्ध भाषांच्या बाबतीत सर्व प्राचीन समाजांनी आपापल्या जुन्या ग्रंथांचं संरक्षण फार कसोशीनं केलं असल्यामुळे त्यांचा अभ्यास भाषाविज्ञानाच्या उभारणीला फार मोलाचा ठरला.

संस्कृत भाषेचा व्याकरणात्मक अभ्यास अगदी काटेकोरपणे प्राचीम भारतात भरपूर झाला असला तरी तिला तिच्या ऐतिहासिक कोंदणात जडवून व तुलनात्मक पद्धती वापरून तिचा अभ्यास आपल्याकडे झाला नाही. संस्कृतच्या असल्या अभ्यासाची जाणीव पाश्चात्य विद्वानांनी आपणाला दिली. ऐतिहासिक अभ्यासाची ही आवश्यकता पाश्चात्यांकडून जाणूनही असल्या अभ्यासाचं वैज्ञानिक महत्व आपल्या विद्वानांना फारसं वाटलं नाही. याला दोन कारणं होती एकत्र या ऐतिहासिक दृष्टीमुळे संस्कृतच्या त्यांनी मानलेल्या व्याकरण -व्यवस्थेत गोंधळ उडेल अशी त्यांना भीती वाटत असावी. दुसरं म्हणजे संस्कृतला तिला तिच्या ऐतिहासिक कोंदणात जोडायचं इतकंच नव्हे तर तिच्या व्यापक परिसरातील इतर भाषांशी तिला जोडायचं या दोन्ही गोष्टींना प्राचीन परंपरागत अभ्यासात स्थान नव्हतं.

वेद-ग्रंथांचा काल सामान्यतः इ. स. पूर्व १५०० ते इ. स. पूर्व ८०० हा मानला जातो. या कालाच्या उत्तरार्धात त्यांना व्यवस्थित रूप दिलं गेल्यामुळे या ग्रंथांना ‘संहिता’ असं म्हणण्याचा प्रघात पडला असावा व त्यांचा अभ्यास करणारे विद्वान निरनिराळ्या कुळाचे असल्यानं त्यांनी लिहिलेल्या त्या त्या शाखांच्या भाषिक अभ्यासांना ‘प्रातिशाख्य’ हे नाव प्रचारात आलं. या वेदकालाच्या उत्तरार्धातल्या एखाद्या बोलीचं मान्य, प्रशिष्ट रूप गद्यभाषेत विशेष

प्रमाणात वापरलं जात असावं. हे तिच रूप उपनिषद् या ग्रंथांपासून स्पष्टपणे दिसू लागलं. तत्पूर्वीच्या वेद-ग्रंथांत जी भाषा आढळते ती शब्द व व्याकरणदृष्ट्या बरीच वेगळी असल्याची जाणीव संस्कृत भाषाभ्यासूंना होती. त्यांनी तिला 'छांदस्' असं उल्लेखिलं आहे. (प्राचीनांनी ज्यांना छांदस् आणि संस्कृत म्हटले त्यांना आधुनिक मंडळी अनुक्रमे वैदिक संस्कृत आणि अभिजात संस्कृत म्हणतात.) ऋग्वेदापासून 'ब्राह्मण' ग्रंथांपर्यंतची भाषा ही 'छांदस्' आहे व तिची कालमर्यादा इ. स. पू. १५०० ते इ. स. पू. ८०० मानली तर संस्कृतची कालमर्यादा इ. स. पू. १००० मानावी लागेल.

ज्या काळात (इ. स. पू. ५ वं शतक) संस्कृतच्या व्याकरणाची रचना पूर्ण झाली त्या काळात छांदस् ही सामान्य व्यवहारातून नाहीशी होऊन समजायला बरीच कठीण झाली असावी. म्हणूनच यास्क या विद्वानानं या भाषेतील अवघड शब्दांचे अर्थ समजविण्यासाठी 'निरुक्त' (नीर् +उक्त- उलगडून सांगितलेले) नावाचा ग्रंथ तयार केला. अशाच प्रकारचा प्रयत्न व्याकरणांच्या बाबतीत झाला असावा. 'प्रातिशाख्यं' ही वेगवेगळी व्याकरणं होती. या सर्व व्याकरणांत जे सर्वसामान्य नियम होते त्यांचं एकीकरण करण्यात आलं व ते 'सामान्य' या नावानं वापरात आलं. पाणिनीनं आपल्या अष्टाध्यायीत जे छांदस् भाषेचे नियम दिले आहेत ते या 'सामान्य' संग्रहातले असावेत.

भारतात 'छांदस्' किंवा वैदिक ही भाषा केवळ धार्मिक व्यवहारात टिकून राहिली, बाकीच्या इतर सर्व ज्ञान-विज्ञानांची भाषा 'संस्कृत' (म्हणजे अधिकृत, संस्कारित) म्हणविली गेली. या दोन भाषांमधली दरी भरून काढण्याचा प्रयत्न कोणीच केलेला आढळत नाही. पाश्चात्यांना या देशात पाउल टाकताच ज्या प्राचीन भारतीय भाषेची प्रथम ओळख झाली ती संस्कृतची. संस्कृतचा त्यांचा अभ्यास जसजसा परिणत झाला तशी त्यांना आपल्या ऐतिहासिक अभ्यासाच्या आवडीमुळे संस्कृतच्या पूर्वीच्या वैदिक भाषेची ओळख करून घेण्याची इच्छा झाली. 'फ्रीडरिख रोझेन'[१] यानं १८३० साली ऋग्वेदाच्या काही भागातील भाषेचे नमुने प्रसिद्ध केले. पाणिनीनं आपल्या अष्टाध्यायीत पुष्कळ ठिकाणी

वैदिक भाषेचे नियम दिले असले तरी बहुतांशी हे स्थान त्याच्या सूत्रबंधांच्या शेवटी दिलेलं आढळतं; नंतरच्या व्याकरणकारांनी तर त्या सर्व नियमांना एकत्र करून परिशिष्टात ढकलून दिलं. रोझेंच्या प्रयत्नामुळे ऐतिहासिकदृष्ट्या संस्कृतपेक्षा प्राचीन म्हणून वैदिक भाषेच्या नियामांचं पारडं वर जाऊ लागलं व १८७५ मध्ये व्हिटनीनं[२] जेव्हा आपलं संस्कृत व्याकरणावरील पुस्तक प्रसिद्ध केलं तेव्हा इतिहासदृष्ट्या आवश्यक तिथं त्यानं वैदिक भाषेच्या नियमांना आद्य स्थान दिलं. लौकरच १८९६ च्या सुमारास ओल्डेनबर्ग[३] यानं आपल्या एका ग्रंथात संस्कृतच्या अभ्यासापेक्षा वैदिक भाषेच महत्व ठासून सांगितलं. तो लिहितो: "संस्कृतमधील महाकाव्यं ही काही फार प्राचीन नाहीत. उलट वैदिक ऋचांमधील साहित्य व भाषा किती प्राचीन आहेत...भाषाविज्ञानींना या प्राचीन भाषेचा साद्यंत इतिहास रचण्याचं नवं साहस अंगीकारण्याचं आव्हान हे वैदिक साहित्य देत आहे. '' या कार्याला मदत व्हावी या उद्देशानं मकडोनेल[४] या विद्वानानं वैदिक भाषेच्या व्याकरणावरील आपला ग्रंथ १९१० त प्रसिद्ध केला. वैदिक आणि संस्कृत या दोन ऐतिहासिक अवस्थांच्या एकाच भाषाप्रवाहाला आता नवं नाव मिळालं – इंडिक. भारताच्या भूमीवर भारताच्या प्राचीन भाषेच्या ऐतिहासिक अभ्यासाची भूमिका इत:पर इंडिककडे पाहून घडली जाणार होती.

इंडो-युरपिअनपेक्षा किंवा इंडो-युरपिअनपर्यंत एकदम लांब उडी मारण्यापूर्वी इंडिकचा अभ्यास करणं महत्वाचं होतं. इंडिकमुळे वैदिकपासून संस्कृतपर्यंत एक सरळ रेषा आखता आली इतकंच नव्हे तर ती रेषा पुढे प्राकृत, पाली, अपभ्रंश व आधुनिक भारतीय भाषांपर्यंत लांबविता आली. संस्कृतच्या अधिकारशाही नियमांमुळे थिजून गेलेल्या भाषेच्या वरच्या कठीण थराखालाचा जिवंत बोलभाषेचा स्पर्श भाषाभ्यासूंना आल्हादक वाटला व हाच खरा भारतीय भाषाविज्ञानाचा विषय व्हावा अशी त्यांना जाणीव झाली.

इंडिकमुळे घडलेली भाषाभ्यासाची ही नवी दृष्टी युरपातल्या भाषाविज्ञानाच्या बाबतीत काही दशकांपूर्वी निर्माण झाली होती. तिचा इतिहासही महत्वाचा आहे. जोपर्यंत युरपातील ज्ञानक्षेत्रावर ग्रीक व लॅटिन या

भाषांनी घडविलेल्या संस्कृतीचा पगडा होता तोपर्यंत ‘विदग्ध’ भाषा या प्रमाणभूत भाषा मानल्या जात होत्या व जिवंत बोलभाषांना काहीच स्थान नव्हतं. पण या बोलभाषांपैकी रोमान्स व जर्मानिक कुळातल्या भाषांचा तुलनात्मक अभ्यास जसा मूळ धरू लागला तशी भाषाविज्ञानाच्या अभ्यासात एक नवी क्रांती घडू लागली. ग्रंथात थिजून गेलेल्या ग्रीक व लॅटिन या विदग्ध भाषांची वरची पुटं खरवडून काढल्यानंतर त्यांच्या खालचं जिवंत रक्त भाषाभ्यासासाठी अधिक महत्वाचं वाटू लागलं. अशी जाणीव ग्रिमचा समकालीन फ्रीडरिख् डीत्स[५] यानं आपल्या रोमान्स भाषांचं व्याकरण (१८३६-३८) या ग्रंथात प्रथम व्यक्त केली आहे. परंतु ती कोणी लक्षात घेतली नाही. बोपानं १८१६ तील आपल्या ग्रंथांन तुलनात्मक अभ्यासाची जी सुरवात केली ती व्हेर्नेर, ग्रासमान वगैरेंचे ध्वनिसमीकरणाचे नियम प्रसिद्ध झाले त्या सुमारापर्यंत, म्हणजे १८८० पर्यंत, उच्चांकास पोचली होती. या समीकरणांमुळे व भाषाविज्ञानाच्या तुलनात्मक अभ्यासातील रचनात्मक पद्धतीमुळे विज्ञानाचं एक महत्वाचं साधन आपल्या हातात आल्याचा आनंद व गौरव तत्कालीन ‘नव्य-व्याकरणकार’[६] म्हणविल्या गेलेल्या विद्वानांना झाला होता. तशात इंडो-युरपिअनच्या रचनेमुळे प्राचीन, अज्ञात भाषेची एका प्रतिसृष्टी निर्माण करण्याची शक्ती प्राप्त झाल्याचा अभिमानही त्यांना वाटत होता.तत्कालीन जर्मनीतील लाइपत्सिक विद्यापीठ हे या नव्य-व्याकरणकारांचं मुख्य केंद्र बनलं याचा विद्यापीठात १८७० साली शुखार्ट[७] या तरुण भाषाविज्ञानीची प्राध्यापक-पदावर नेमणूक झाली. ते पद स्वीकारताना शुखार्टनं जे भाषण केलं त्यात त्यानं तोपर्यंत प्रगत झालेल्या भाषाविज्ञानाच परामर्श घेऊन काही शंका व्यक्त केल्या. शुखार्टच्या टीकेचा रोख १८६१ साली प्रसिद्ध झालेल्या श्लेइखेरच्या ग्रंथात उभारलेल्या इंडो-युरपिअनच्या आखीवरेखीव, निरपवाद पुनर्रचनेविरुद्ध होता. त्याला हा भाषाभ्यास, त्याची पद्धती व तिनं घडविलेली इंडो-युरपिअन ही वाक सृष्टी हा सारा उपक्रम बराचसा कृत्रिम वाटत होता. या साऱ्या अभ्यासानं भाषेची एक कोरीव दगडी मूर्ती बनविली आहे, पण तिचं जिवंतपण कुठंही प्रतीत होत नाही असे उद्‌गार शुखार्टनं काढले.

शुखार्टला आपल्या भाषाणातल्या विचारांची प्रेरणा फ्रीडरिख् दिएच्या १८३६-३८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या 'रोमान्स भाषांचं व्याकरण' या ग्रंथानं मिळाली होती. बोपपासून श्लेइखेरपर्यंतच्या तुलनात्मक भाषाभ्यासाला उच्च पद प्राप्त होण्याला ज्या गोष्टी कारणीभूत झाल्या त्यांचा अभाव रोमान्स व जर्मानिक भाषांच्या अभ्यासात स्पष्टपणे जाणवत होता. एकतर या भाषांत त्यांच्या विदग्ध स्वरूपाचं प्रशिष्ट, मान्य असं एकजिनसी रूप नव्हतं आणि त्यांच्या प्रत्यक्ष जिवंत शब्दांवरून जी पुनर्रचना करण्याचा प्रयत्न झाला ती पुनर्रचना त्यांच्यातल्या पुराण समजल्या गेलेल्या भाषांशी कुठंही समरूप होत नव्हती. त्यांच्यात बोलींचं वैपुल्य, त्यांची विविधता व त्यांचं इतर भाषांशी व आपापसात इतकं संमिश्रण होतं की त्यांचा पद्धतशीर अभ्यास जवळजवळ अशक्य होता. कशावरून इंडो-युरपिअन कुळातही असं झालं नसेल?

शुखार्टला दिएची ही भूमिका महत्त्वाची वाटली. बोलींची विविधता व त्यांच्यातलं संमिश्रण ही तर स्पष्ट गोष्ट होती. विदग्ध भाषांचं एकजिनसी व्याकरणी रूप त्याला कृत्रिम वाटलं. व्याकरणात आढळणाऱ्या लॅटिन या भाषा बोलणारे समाज त्याला अशक्य वाटले. विशाल भौगोलिक परिसरात कोणतीही भाषा इथून-तिथून सारखी राहू शकत नाही ही गोष्ट डोळ्याआड (किंवा कानाआड) करता येण्यासारखी नाही. यामुळेच नव्यानं व्याकरणकारांच्या भाषेसंबंधीच्या कल्पनेवर, त्यांच्या तुलनात्मक पद्धतीवर व त्यांच्या पुनर्रचनेच्या सिद्धान्तावर शुखार्टनं १८८५ मध्ये लिहिलेल्या ग्रंथात[८] खडसून आक्षेप घेतले.

ज्या सुमारास शुखार्टनं तुलनात्मक भाषाभ्यासावर हे आक्षेप घेतले त्या सुमारास सोस्युर लाइपत्सिक विद्यापीठात आपला अभ्यास पुरा करून पॅरीस विद्यापीठात संस्कृतचा प्राध्यापक बनला होता. पॅरीसच्या भाषाविज्ञानींच्या एका संस्थेचं चिटणीस हे पदही तो सांभाळीत होता. त्या निमित्तानं त्याचा तत्कालीन युरपातल्या जिनिवा, प्राग, व्हिएन्ना, कझान इत्यादी ठिकाणच्या भाषाविज्ञानींशी परिचय झाला होता. या सर्वांच्या मनात भाषेविषयी एक नवी जाणीव आली होती ती ही की प्रात्यक्षिक स्वरूपात भाषा ही एकजिनसी नसून ती आपल्या

बोलींच्या वैविध्यात व दैनंदिन नाविन्यात जगते. एकजिनसीपणाची व तिच्या आधारावर मानलेल्या तिच्या एकत्वाची पुनर्रचना हा विद्वानांनी घडविलेला एक तात्त्विक खेळ आहे. या तात्त्विक खेळामुळे प्रत्यक्ष वस्तुस्थिती डोळ्याआड होऊन मानवी व्यवहारात भलतेच दुराग्रह निर्माण होण्याची भीती आहे.

शुखार्टनं भाषेच्या स्वाभाविक वस्तुस्थितीविषयीची निर्माण केलेली ही जाणीव लाइपत्सिक काही विद्वानांना पटली. उदाहरणार्थ, ब्रुगमान व देलब्रुक यांच्या १८७८ मधल्या शोधनिबंधात[९] ती स्पष्ट आहे. परंतु इंडो-युरपिअनच्या पुनर्रचनेचं त्यांनी हाती घेतलेलं काम १९०० त पूर्ण होईपर्यंत ते मूग गिळून स्वस्थ बसले. त्या वर्षी शुखार्टनं[१०] पुन्हा एकदा तुलनात्मक भाषाभ्यासावर जोराचा हल्ला केला. त्याला कोणी उत्तर देण्यास धजलं नाही. सोस्युरचा विद्यार्थी (व पुढे पॅरीस विद्यापीठात भाषाविज्ञानाचा प्राध्यापक बनलेला) आंत्वान मेये[११] यानं मात्र उद्‌गार काढले की "आम्ही भाषाविज्ञानी १९०० च्या सुमारास अशा सीमेपर्यंत येऊन ठेपलो की तिच्यापलीकडे पाऊल टाकणं त्यानंतर अशक्य होतं."

नव्या भाषाभ्यासानं आता आपलं पाऊल कुठं व कसं टाकावं हे शोधण्याचं काम सोस्युर व मेये यांनी हाती घेतलं. १९०९ साली जिनिवा विद्यापीठानं सोस्युरला भाषाविज्ञानावर व्याख्यानं देण्याचं निमंत्रण केलं. सोस्युरनं ते आनंदानं स्वीकारलं व १९०६ पासून त्यानं आपल्या व्याख्यानांचा उपक्रम सुरू केला. त्याच वर्षी मेयेनं इंडो-युरपिअनच्या अभ्यासावर कोलेज द फ्रान्स या संस्थेतर्फे व्याख्यानं दिली. ही व्याख्यानं पुस्तकरूपानं १९०८ साली प्रसिद्ध झाली.[१२] आपल्या या पुस्तकाला लिहिलेल्या प्रस्तावनेच्या पहिल्याच वाक्यात मेयेनं अशी कबुली दिली की, "पूर्णत्वानं भाषिक एकत्व कुठंही सापडत नाही." शुखार्टचा नामनिर्देश न करता त्याचा विजय मेयेनं घोषित केला.

सोस्युरचा देखील हाच दृष्टिकोन होता हे त्याच्या विद्यार्थ्यांनी १९१६ साली प्रसिद्ध केलेल्या त्याच्या व्याख्यानांच्या पुस्तकात[१३] स्पष्ट आहे. सोस्युर व

मेये यांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या झूल ब्लोक यानं १९३४ साली आपला 'इंडो-आर्यन'[१४] हा ग्रंथ प्रसिद्ध केला. भारतीय भाषांच्या अभ्यासाला आवश्यक असणाऱ्या 'इंडिक' या भूमिकेचा आविष्कार या ग्रंथात पूर्णत्वानं पाहावयास मिळतो. कोणत्याही प्रदेशातील समाज जसा संस्कृतीत एकजिनसी नसतो तसा तो भाषाव्यवहारातही नसतो. माणसं बोलतात त्या बोली दोन तत्त्वांच्या अंकित असतात. पहिलं तत्त्व तिचं स्वतःचं परिवर्तन व दुसरं भाषाभाषांचं परिसरण. परिवर्तनाचा परिसर 'काल' आहे तर परिसरणाचा परिसर 'स्थल' आहे. या दोन परिसरांच्या अंकित असलेल्या बोली आपली व्यवस्था घडवीत उत्क्रान्त होतात. ही व्यवस्था साध्य करण्याच्या मार्गात अनेक अडचणी असतात. परिसर बदलत जातात; जनजातींच्या पिढ्या बदलतात; बोलल्या जाणाऱ्या बोली बदलत जातात. तरीपण या सर्व स्थल-काल-लोक या बंधनांना बाजूस ठेवून आपल्या ज्ञानव्यवहारासाठी विद्वान एखादी प्रशिष्ट संभाषण कृती घडवीत राहतात. संस्कृत ही एक अशी प्रशिष्ट कृती (a-culturated artefact) होती; ती प्रत्यक्ष बोली नव्हती.

भारतातील बोलींचा दीर्घ कालक्रम, त्यांचा विशाल भौगोलिक परिसर, अत्यंत विविध अशा जमातींच्या संस्कृतींनी रंगलेला त्यांचा दैनंदिन वापर या सर्व गोष्टींचा विचार केला तर या बोलींचं जे प्रवर्तन होत गेलं ते जुन्या विद्वानांनी मानलं तसं एका दिशेनं सरळ रेषेत घडणारं नव्हतं. ते इतकं सरमिसळरूपी होतं की त्याचं सुस्पष्ट दर्शन घडणं कठीण आहे.

संस्कृत कोशकारांना 'आटवी'(रान) हा शब्द अगदी स्वाभाविक वाटला होता; पण वैदिक बोलीत तो 'आतवी' असा आढळतो. संस्कृत 'वन' (रान) हा शब्द रामायणात एके ठिकाणी 'वृक्ष' अशा अर्थानं वापरलेला आढळतो, पण वैदिक बोलीत तो सर्रास 'वृक्ष' या अर्थानंच येतो. वैदिकामध्ये 'अर्धा' या अर्थानं 'निम' शब्द आढळतो; मराठीत तो अनेकदा आढळतो, पण इतर भाषांत तो मिळत नाही. संस्कृतमध्ये 'कुत्रा' या अर्थाचा शब्द 'श्वन' आहे. तुलनात्मक पद्धतीनं इंडो-युरपिअन शब्द *K^won असा असावा. परंतु श पासून K^w

घडवायला मधली एक 'च्' अवस्थाद्योतक शब्द अद्याप असायला हवा. तसा तो आता भारताच्या वायव्य सरहद्दीवरील तिराही (Tirh) भाषेत * (चूं) असा मिळाला आहे.

वैदिकाच्या व वायव्य सरहाद्दीकडच्या प्रदेशातल्या भाषांच्या अभ्यासावरून एक गोष्ट स्पष्टपणे निदर्शनाला येते ती ही की प्राचीन काळी इराण-अफगाणिस्तानपासून पंजाबपर्यंतच्या प्रदेशाभर इंडिक बोली पसरलेल्या होत्या. त्यातले काही फरक आपल्या नजरेत चटकन् भारतात. उदा. ऋग्वेदाच्या भाषेत काही शब्दांच्या विशिष्ट परिसरात 'ळ्' हा ध्वनी आढळतो; संस्कृतमध्ये मात्र त्याचा संपूर्ण आभाव आहे. वैदिकमध्ये पन्, भन् असे धातू आहेत; तेच संस्कृतमध्ये पण्, भण् असे आढळतात. संस्कृतच्या ह्र या धातूच्या ठिकाणी वैदिकमध्ये भृ धातू मिळतो. खुद्द वैदिकमध्येही सर्वत्र सारखेपणा नाही. अक्षि (न. डोळा) या शब्दाचं प्र. द्वि. / बहु. 'अक्षाणि' असं ऋग्वेदात मिळतं; परंतु अथर्ववेदात 'अक्षीणी' असं मिळतं. अस्थि (न. हाड) याचं अथर्ववेदातील ब. ब. रूप 'अस्थीनी' आहे; उलट ऋग्वेदात 'अस्थानि' असं आहे. वेडात आढळणाऱ्या ईदृश्, तादृश्, यादृश् या शब्दानऐवजी ब्राह्मणग्रंथात ईदृश, तादृश, यादृश अशी रूपं मिळतात. ऋग्वेदात येणारी तकम्, तकद् (त्याला) ही रूपं नंतरच्या वैदिकमध्ये कुठंही आढळत नाहीत. तो' या अर्थाच्या सर्वनामाची ए. व. रूपं संस्कृतमध्ये पुढीलप्रमाणे आहेत. सः, तम्, तेन, तस्मै, तस्मात, तस्य, तस्मिन्. वैदिकमध्ये 'तेन' च्या बरोबरीनं 'तेना', 'तस्मै' च्या बरोबरीनं 'तस्मए', 'तस्मिन्' च्या बरोबरीनं 'सस्मिन्' अशीही रुपम मिळतात. 'तस्माद्' च्या ऐवजी 'सस्माद्' असं रूप छांदोग्य-उपनिषदात मिळतं. 'न' या अव्ययाचे वैदिक बोलीत दोन अर्थ होते; १. नकार, २. सारखा. (उपमेच्या प्रयोगात 'पक्का शाखा न ' म्हणजे 'पिकलेल्या शाखेसारखे') 'न' या अव्ययाचे हे दोन्ही प्रयोग ऋग्वेदात पुष्कळ आहेत; अथर्ववेदात दुसरा अर्थ क्वचितच आढळतो; ब्राह्मणग्रंथात व नंतरच्या संस्कृतमध्ये तो मुळीच नाही.

संस्कृतमुळे झाकल्या गेलेल्या बोलींवराचा पडदा इ. स. पू. सहाव्या शतकात उचलला गेला. त्या शतकात गौतम बुद्ध व महावीर यांनी आपापल्या धर्माची शिकवण सामान्य जनतेला त्यांच्या बोलभाषांतून दिली. संस्कृत नाटकातून व क्वचित स्वतंत्रपणे प्रगट झालेल्या या बोलींना 'प्राकृत' ही संज्ञा सर्वसामान्यपणे दिली जाते. वररुचि हा या प्राकृतांचा पहिला व्याकरणकार . त्याच्यानंतर हेमचंद्र, कच्चायन, विविक्रम, मार्कण्डेय, लक्ष्मीधार इत्यादींनी प्राकृतांच्या व्याकरणावर लिहिलं आहे. प्राकृतांचा हा अभ्यास प्रत्यक्ष बोलीरुपापेक्षा त्यांच्या साहित्यातल्या प्रशिष्ट रूपांचा असल्यामुळे प्राकृतांच्या खऱ्या अभ्यासासाठी भाषाविज्ञानींना पुनश्च पाश्चात्यांचीच वाट पहावी लागली.

१८३४ ते १८३६ च्या दरम्यान जेम्स प्रिन्सेप[15] यानं अशोककालीन (इ.स.पू. २५६ – २३०) शिलालेखांच्या लिपीचं कोडं उलगडल्यापासून प्राकृतांच्या खऱ्या अभ्यासाची सुरवात झाली. अशोकाचे शिलालेख भारताच्या निरनिराळ्या भागांत विखुरलेले आहेत. त्यांचं आरेखन त्या त्या प्रदेशातल्या प्राकृतात केलेलं आहे. या शिलालेखांच्या अभ्यासावरून प्राकृतांचं भौगोलिक विस्तरण व त्यापरत्वे बोलीभेद ही महत्वाची गोष्ट भाषाभ्यासाच्या कक्षेत आली. यानंतर १८९० ते १९१० या वीस वर्षात सर ऑरेल स्टेइन[16] यानं उत्तर भारतापलीकडील चीनी तुर्कस्तानच्या तुर्फान, खोतान इत्यादी प्रदेशात केलेल्या उत्खननात इ. स. १०० च्या सुमाराचे कुशान-संस्कृती-काळातील जे ग्रंथ शोधून काढले त्यावरून तत्कालीन प्राकृतात लिहिलेलं बरंच लेखन हाती आलं. मध्ययुगीन प्राकृतांची ही अधिकृत माहिती मिळाल्यानंतर या विषयावरचा पहिला महत्वाचा ग्रंथ पिशेल[17] यानं १९०० साली जर्मन भाषेत प्रसिद्ध केला.

आतापर्यंत जी माहिती उपलब्ध झाली आहे ती देखील अजून अपुरी आहे असं पुष्कळदा वाटतं . उदा. मराठीत जिथं 'दोन' असं आपण म्हणतो तिथं हिंदीत 'दो' म्हटलं जातं व गुजरातीत 'बे' असा शब्द आहे. या साध्या गोष्टीचा विचार करायचा म्हटला तरी किती प्रश्न उद्भवतात. मराठी व हिंदी 'दो' हा शब्द संस्कृत द्वी/द्वा यावरून आला म्हटलं तर मराठीतला न कुठून आला?

गुजरातीत ‘बे’ आहे, पण मराठीत नाही असं न्हन्ता येत नाही. कारण मराठीत बारा, बावीस, बत्तीस, बेचाळीस असे ‘ब’ ने सुरु होणारे शब्द आहेत. लॅटिनमध्ये bipes biped असल्या शब्दांत ‘ब’ आहे. मराठीतील ‘दो’ ला ‘दु’ असा पर्याय मिळतो.. दुरकी (दोन), दुतोंडी, दुचाकी, दुभंग इ. पाली भाषेत दुबे, दुतिय हे शब्द मिळतात. लॅटिनमध्ये duo, duplex, इंग्रजीत two, अंब्रिअनमध्ये duti (दुसरून) लेटिशमध्ये duceles (दोन चाकांची गाडी) असे शब्द मिळतात. आजच्या भाषांतील परिवर्तन व परिसरण हे गुंतागुंतीचे विषय आहेत. या अभ्यासाला इतिहास, भूगोल व समाजशास्त्र यांचा पाया असावा लागतो. तसंच या अभ्यासासाठी सुंदर पैलू पाडलेल्या विदग्ध भाषांइतकं पृथ्वीच्या मातीशी निगडित असलेल्या समाजाच्या बोलींचंही महत्व आहे. यासाठी ग्रंथालयातील आराम-खुर्च्या सोडून डोंगर कपारीतल्या अज्ञात, खेडवळ प्रदेशात हिंडण महत्वाचं आहे. नवं भाषाविज्ञान हे या दृष्टीनं एका सामाजिक आव्हान आहे.

संदर्भ व टीपा

१. Friedrich Rosen : Rig-vediae specimen, 1830

२. W. D. Whitney : Sanskrit Grammer, 1875

३. H. Oldenberg : Ancient India, Its Languages and Religions (tr. 1962)

४. A. A. Macdonell : vedic grammer. 1910

५. Friedrich Diez (1794-1876) : Grammatik der romanischen sprachen, 1836-8

६. ‘yunggrammatiker’

७. H. Schuchardt. 1842-1927

८. Uber die Lautgesetz gegen die Junggrammatiker, 1885

९. K. Brugmann and B. Delbruck : Morphologische Untersuchungen. 1878, I ix-x

१०. Uber die klassifikation der romanischen Mundarten, 1900

११. Antoine Meillet, 1866-1936

१२. The indo-European Dialects, 1908

१३. F. de Saussure : Course in GenaralLinguistics (Fr. 1916)

१४. JulesBloch : Indo-Aryan, 1734

१५. James Prinsep : 1799-1840

१६. Sir Aurel Stein, 1862-1943

१७. R. Pischel : Grammatik der Prkrit-Sprachen, 1900

६. लॅरिजीअलचा सिद्धांत

शुखार्टनं १८७०-८५ या पंधरा वर्षांच्या अवधीत इंडो-युरपिअनच्या अभ्यासावर, विशेषतः या अभ्यासातील ध्वनि परिवर्तनाच्या नियमांवर लक्ष केंद्रित करून जी टीका केली तिच्यामुळे या अभ्यासाला आपली भूमिका, आपल्या अभ्यासाविषयाचं स्वरूप, आपली पद्धती व उद्दिष्टं नव्यानं तपासण्याचा पहिला प्रसंग प्राप्त झाला. विज्ञानाच्या प्रगतीसाठी असली टीका अवश्य असते. शुखार्टच्या टीकेमुळे तीन महत्त्वाचे फरक भाषाविज्ञानात घडून आले: प्रथम म्हणजे भाषाविज्ञानात 'भाषा' या अभ्यासविषयाची जी व्याकरणीय पुस्तकी भूमिका होती ती बदलून भाषा म्हणजे लोकांच्या जिभेवरील जिवंत बोली हे मत निश्चित झालं. त्यामुळे व्याकरणं, शब्दकोष व शब्दार्थप्रामाण्यवादी अभ्यास यांच्या बंधनातून सुटून प्रत्यक्ष सामाजिक परिसरात वापरलं जाणारं संप्रेषण साधन या दृष्टीनं भाषेचा अभ्यास – या नव्या भूमिकेमुळे भाषाविज्ञानाला बरंच मोकळं वातावरण मिळालं. दुसरं असं की बोलींना भौगोलिक परिसर असतो व त्या परिसरात वावरताना त्यांच्यात अनेक प्रकारची विविधता निर्माण होते. भाषांच्या ऐतिहासिक अभ्यासानं निर्माण केलेल्या त्यांच्या स्वरूपाचा, कुळांच्या व मुळाच्या आदर्श स्वरूपापेक्षा भौगोलिक अभ्यासातील या सत्यदर्शी अवलोकनाचं मूल्य अधिक ठरलं. त्यामुळे भाषांच्या केवळ एक मार्गी ऐतिहासिक अभ्यासापेक्षा भौगोलिक अभ्यासानं भाषाविज्ञानाची कक्षा थोडी व्यापक झाली.तिसरं असं की केवळ ध्वनि –नियमांचा अभ्यास यापेक्षा या नियामांमुळे व समीकरणांमुळे सिद्ध होणारी भाषारचना व तिच्याजोगे मानवजातीच्या प्रगतीवर जो प्रकाश टाकता येईल त्याचं महत्त्व अधिक गणलं पाहिजे. थोडक्यात, शुखार्टच्या टीकेमुळे कल्पनेचे पंख लावून वाटेल त्या प्रकारे आकाशात स्वैरपणे हिंडणाऱ्या भाषाविज्ञानाला जमिनीवर पाय ठेवून चालण्याच्या वास्तववादी भूमिकेचा स्वीकार करावा लागला.

भाषाविज्ञानाचा या नव्या दृष्टीकोनातून अभ्यास करणाऱ्या श्राडर[१] या विद्वानाचा ग्रंथ १८९० मध्ये प्रसिद्ध झाला. त्यात त्यानं असं सुचविलं की सर्व इंडो-युरपिअन भाषांचे भौगोलिकदृष्ट्या दोन महत्त्वाचे विभाग पाडता येतील. ते असे की ज्या भाषा (ग्रीक, लॅटिन, केल्टिक व जर्मानिक) युरपच्या पश्चिमेकडे आढळतात त्यांच्यात '१००' या संख्या वाचक शब्दाच्या आद्य स्थानी क् हा ध्वनी आढळतो व ज्या भाषा (बाल्टिक- स्लाविक, इंडो-आयरॅनिअन, आर्मीनिअन व आल्बेनिअन) पूर्वेकडे आहेत त्यांच्यात त्या शब्दांच्या आद्य स्थानी श्/स् हा ध्वनी आढळतो. याची काही उदाहरणं पुढील प्रमाणे आहेत:

भाषा	पश्चिमेकडे	पूर्वेकडे	भाषा
ग्रीक	he-katon	atam	संस्कृत
लॅटिन	Kentum	satam	अवेस्तन
आयरिश	Ke:	*imtas	लिथुआनिअन
गोथिक	hund	soto	स्लाविक (जुनी)

वरील शब्दातील K: s/ या समीकरणानुसार श्राडरनं पश्चिमेकडील भाषांना केन्तुम् (Kentum) व पूर्वेकडील भाषांना सतम् (satom) अशा संज्ञा दिल्या. या दोन गटांना विभागणाऱ्या रेषेचा मध्यभाग युरपचा दक्षिणेकडील प्रदेश असल्यानं तो प्रदेश इंडो-युरपिअन जमातीचं मूळ वसतिस्थान मानला व तिथून त्या जमातीचे दोन गट पूर्व व पश्चिम दिशांकडे पसरले असं मत त्यानं व्यक्त केलं.

श्राडरचं मत 'सिद्धान्त' म्हणून स्वीकारून बऱ्याच भाषाविज्ञानींनी त्या दिशेनं संशोधन केलं. सर्वात महत्त्वाचा शोध म्हणजे १९०६ साली तुर्कस्तानची राजधानी अंकारा या शहराच्या पूर्वेस ९० मैलांवर ब्योगाजकोय (Bgaz-koy) या गावी पुरावस्तुशास्त्रज्ञांना उपलब्ध झालेली एक प्राचीन संस्कृती. ही संस्कृती इ. स. पू. २५०० ते १२०० या काळातील हिटाइट (Hittite) संस्कृती होती असं मान्य झालं. तिच्यात सापडलेल्या लेखनाचा अभ्यास होऊन तिथली एक महत्त्वाची भाषा –जिला हिटाइट हे नाव देण्यात आलं-इंडो-युरपिअन कुळाची होती असं ऱ्होझ्नी[२] यानं १९१५ साली सिद्ध केलं. इंडो-युरपिअन कुळाच्या आतापर्यंतच्या उपलब्ध भाषांत वैदिक ही सर्वात प्राचीन होती. आता वैदिकपेक्षा हजार वर्षांअगोदरची जुनी अशी एक इंडो-युरपिअन भाषा हाती आली.

ज्या सुमारास हिटाइट संस्कृतीचा शोध लागला त्याच्या थोडं अगोदर म्हणजे १९०१ पासून दहा-पंधरा वर्षं आजच्या चीनच्या पश्चिमेस चिनी तुर्कस्तान या प्रदेशात तुर्फान या ठिकाणी पुरावस्तुविज्ञानींनी खोदकाम केलं. त्यातून जे प्राचीन अवशेष हाती आले त्यात इ. स. च्या ६ व्या ते ८ व्या शतकातल्या भाषेचे नमुने मिळाले. या भाषेला तोखारिअन (Tocharian) असम नाव दिलं गेलं. तिच्या दोन बोली A आणि B या संज्ञांनी संबोधिल्या जातात.

हिटाइट व तोखारिअन या भाषांचे शोध भाषाविज्ञानदृष्ट्या फार महत्त्वाचे होते. श्राडरच्या सिद्धन्ताची परीक्षा घेण्यासाठी हा एक सुयोग होता. या दोन्ही भाषा श्राडरनं कल्पिलेल्या पूर्व भागात म्हणजे 'सतम्' विभागात होत्या. साहजिकच सर्वांची अपेक्षा होती की त्यांच्यात '१००' वाचक जे शब्द असतील ते श्/स् नं सुरू होणारे असणार. पण प्रत्यक्षात जे आढळलं ते अगदी उलट, म्हणजे हिटाइटमधला शब्द होता तो व तोखारिअनमधला होता तो (A) Knt (B) Kante म्हणजे दोन्ही क् नं सुरू होणारे.* यामुळे श्राडरचा इंडो-युरपिअन भाषांच्या पूर्व-पश्चिम विभागणीचा सिद्धान्त पार कोलमडून पडला इतकंच नाही तर इंडो-युरपिअन समाजाच्या मूळ प्रदेशाची व स्थलांतराची त्याची कल्पनाही साफ खोटी ठरली. इंडो-युरपिअन भाषाकुळाच्या तात्त्विक इतिहासाला या

प्रत्यक्ष भौगोलिक पुराव्यानं चांगलाच हादरा बसला. भाषाविज्ञानाच्या तत्त्वांनी व पद्धतींनी रचलेला भाषेचा 'तात्त्विक' इतिहास व प्रत्यक्षातला भौगोलिक पुरावा हे परस्परांना पूरक असले तरच एखादा सिद्धान्त टिकू शकतो हे यानंतरच्या भाषाविज्ञानातलं महत्त्वाचं तत्त्व बनलं.

हिटाइटचा शोध दुसऱ्या एका गोष्टीमुळे इंडो-युरपिअन अभ्यासाला फार सहायभूत झाला. मागे प्रकरण ३ मध्ये सोस्युरच्या एका स्वर-परिक्रमेच्या विवेचानासंबंधी माहिती दिली आहे. तशीच आणखी एक परिक्रमा त्याच्या १८७९ च्या प्रबंधात आढळते.

तिची ग्रीक भाषेतील उदाहरणं पुढीलप्रमाणे आहेत :

phmi phme phats

histmi - stats

- dnum datus

या उदाहरणात जी स्वर-परिक्रमा आढळते ती अशी :

-- -- -a-

या परिक्रमेचा मागे अभ्यासिलेल्या इंडो-युरपिअन मूलभूत स्वर-परिक्रमेशी मेळ कसा घालायचा हा प्रश्न सोस्युरपुढे होता. त्यासाठी त्यानं आपल्या प्रबंधात जे विवेचन केलं आहे ते भाषान्तर्गत संरचनांचं रहस्य हुडकून काढणाऱ्या त्याच्या श्रेष्ठ बुद्धिमत्तेचं निदर्शक आहे.

मागे पान २७ वर दिलेल्या ग्रीक उदाहरणांचा पुन्हा विचार करू.

ptomai pte eptmai

(s)kh (s)khos eskhon

या रुपांकडे जरा निराळ्या दृष्टीनं पाहिल्यास जो क्रम आढळतो तो असा:

-t- -t- -t-

-kh- -kh- -kh-

व्यवस्था दृष्ट्या तो

+ c* + c + c

असा मांडता येईल. सोस्युरच्या मते इंडो-युरपिअनमधील सर्व धातूंच्या मूळरुपात e हा स्वर होता म्हणून त्यानं ग्रीकमधील या स्वर-परिक्रमेचं मूळ स्वरूप

e +c o + c + c

असं असावा असं मानालं. या मान्यतेच्या आधारे त्यानं ग्रीकमधील क्रियापदांची

-- -- -a-

ही परिक्रमा समजविण्यासाठी असं अध्याहृत धरलं की या ठिकाणी

च्या जागी मुळात e + c

च्या जागी मुळात e + c

a च्या जागी मुळात + c

अशी व्यवस्था होती. यात मुळातलं व्यंजन कोणतं होतं यावर सोस्युरनं असं उत्तर दिलं की ते व्यंजन रक ईषत्-स्वर (sonant) होता. त्याचे दोन उप्ध्वनी होते व ते दर्शविण्यासाठी सोस्युरनं A व * अशी चिन्हे योजिली. ती चिन्हं वापरून त्यानं वर उल्लेखिलेल्या क्रियापदांची तात्त्विक रुपं पुढीलप्रमाणे समजावली :

phmi चं मूळ रूप ph-A-mi

phne चं मूळ रूप ph-*-ne

phots चं मूळ रूप ph- -ts

तसेच

histmiचं मूळ रूप hist-A-mi

statsचं मूळ रूप st--ts

dnumचं मूळ रूप d-*-num

datusचं मूळ रूप d- —tus

आपण कल्पिलेल्या A व * या ध्वनि चिन्हांचा सोस्युरनं ईषत्-स्वर-रूप व्यवच्छेदक दर्शकांश' (coefficients sonantiques) अशी संज्ञा दिली व त्यांच्यासंबंधी असा नियम रचला की या व्यंजनांमुळे त्यांच्या आधी येणारा आघातयूक्त e हा स्वर a किंवा o बनून दीर्घ होतो. जर आघात नाहीसा झाल्यामुळे हा स्वर लुप्त झाला असला तर दर्शकांश ऱ्हस्व a बनतो. हे नियम पुढीलप्रमाणे थोडक्यात मांडता येतील:

१. A

२. *

३. a

सोस्युरची ही उपपत्ती तार्किक असली तरी तिला एक महत्त्वाचा आधार संस्कृतमध्ये होता. संस्कृत धातूंविषयी विचार करता सोस्युरला असं आढळून आलं की संस्कृतमधील बहुसंख्य धातूंची (उदा. पत्, सद्, खाद् इ.) ध्वनिव्यवस्था 'व्यंजन + स्वर +व्यंजन' अशी असते. परंतु या नियमाला थोडे अपवाद आहेत; उदा. स्था, धा, दा, इ. सोस्युरनं ठरवलं की मूळ इंडो – युरपिअनमध्ये या अपवादांची व्यवस्था नियमित धातूंप्रमाणे 'व्यंजन + स्वर +व्यंजन' अशीच करायची. म्हणजे 'स्था' सारख्या धातूमधील मूळ व्यवस्था

व्यंज स्वर व्यंजन

स्थ् आ *

अशी मानून तारांकित जागी कुठलंतरी व्यंजन असावं असं मानायचं. ते कोणतं याचा शोध करता सोस्युर्ल्स असं आढळून आलं की संस्कृतमधील 'स्था' या धातूचं ग्रीकच्या ste या क्रियापदाशी साम्य आहे व या दोन धातूंची व्यवस्था पुढीलप्रमाणे मांडायला हरकत नाही :

संस्कृत - s t h

ग्रीक - s t e

या त्याच्या तुलनेवरून दोन निष्कर्ष निघतात : संस्कृतपेक्षा ग्रीकची स्वरव्यवस्था मूळ इंडो –युरपिअनशी अधिक मिळती असल्यानं ग्रीकमध्ये आहे तो स्वर, म्हणजे e मुळातल्या भाषेत होता व कधी-कधी धातूच्या रूपातल्या या स्वराचं स्थानपरिवर्तन होऊन सर्व व्यंजनं एकत्र येऊ शकत होती. यावरून संस्कृतच्या 'स्था'चा इतिहास प्रथम

संस्कृतपूर्व — sthe

व तत्पूर्वी

इंडो -युरपिअन — steh

असा असावा. या क्रमानं विचार केला तर मूळ धातूची जी ध्वनि-व्यवस्था आपण मान्य केली ती म्हणजे 'व्यंजन + स्वर +व्यंजन' अशी सिद्ध होते. हे जे दुसरं व्यंजन होतं ते ईषत्-स्वर-रूप (आणि म्हणून सघोष) असावं व त्याच्या बाबतीत

A

हा नियम लागू पडत असल्यानं A हे चिन्ह ज्या घोष-ध्वनीचा दर्शकांश म्हणून आपण वापरलं त्या घोष-ध्वनीचं उच्चारण h असं असावं.

सोस्युरची ही उपपत्ती तुलनात्मकदृष्ट्या कितीही सयुक्तिक असली तरी ती मांडली गेली त्या काळापर्यंत उपलब्ध भाषांतील कुठल्याही प्रकारचा पुरावा तिच्या आधाराला नव्हता. तथापि सोस्युरची उपपत्ती ज्यांना पटली त्यात हेर्मान म्योलर[३] मुख्य होता. म्योलर हा सेमिटिक भाषांमधील एका विशिष्ट प्रकारच्या h या घोष-ध्वनीला ध्वनिशास्त्रात लॅरिंजीअल (laryngeal) ही संज्ञा होती. तीच संज्ञा म्योलरनं सोस्युरच्या या ध्वनीसाठी १८८० पासून प्रचारात आणली. म्योलरनंतर आल्बेर्त क्युनी[४] यानं ही संज्ञा चालू ठेवून तिचे काही उपवर्ण असावेत अशी सूचना मांडली. हे उपध्वनी शोधण्याचं काम होल्गार पेडेरसेन[५] यानं १८९३ मध्ये केलं. *सोस्युरच्या या सिद्धान्ताचा यानंतर कित्येक वर्षं कोणी काहीही समाचार घेतला नाही.

१९२७ साली येर्झि कुरिलोविच[६] या पोलंडच्या भाषाविज्ञांनीनं आपल्या एका लेखात हिटाइटकडे लक्ष वेधलं व असं दाखविलं की सोस्युरनं इंडो -युरपिअनमधील स्वर-परिक्रमा समजविण्यासाठी जो घोष-ध्वनी केवळ

तर्काधारे निर्माण केला तो ध्वनी हिटाइटमध्ये प्रत्यक्षपणे अस्तित्वात होता. मलरनं सुचाविलेलं ‘लॅरिंजीअल’हे नाव कुरिलोविचनं मान्य केलं व त्यानंतर वा सिद्धान्ताला ‘लॅरिंजीअल सिद्धान्त’ हे नाव प्रचारात आलं.

या सिद्धान्ताप्रमाणे संस्कृतमधील ‘धा’, ‘स्था’ व ‘दा’ या धातूंच्या इंडो -युरपिअनमधील स्वरुपास्म्बंधी अशी उपपत्ती मांडण्यात आली की त्यांची मूळ रूपे

dhe*, ste*, de*

अशी मानावी व त्यातील तारांकित जागी तीन प्रकारचे लॅरिंजीअल उपध्वनी होते असं कल्पावं. त्यापैकी पहिल्या शब्दातल्या ध्वनीला H_1 , दुसऱ्यातल्या ध्वनीला H_2 व तिसऱ्यातल्या ध्वनीला H_3 असे संबोधण्यात आले व त्याप्रमाणे वरील धातूंची मांडणी

$dheH_1$ $steH_2$ deH_3

अशी करण्यात आली. लॅरिंजीअल ध्वनीमुळे या धातूंमधील e या स्वराचे परिवर्तन पुढीलप्रमाणे झाले:

* $dheH_1$	dhH	dh	dh
* $steH_2$	stH	sth	
* deH_3	dH	d	d

वरील उदाहरणात लॅरिंजीअल ध्वनी e या स्वरानंतर आला आहे. तोच जर e च्या पूर्वी आला तर e ची अनुक्रमे e, a व o ही परिवर्तनं त्याच्या तीन

प्रकारांत नंतरच्या भाषांतून झालेली आढळतात. उदाहरणार्थ,

अर्थ	इं-युo	हिटाइट	संस्कृत	greek	लॅटिन
‘असणे’	H_1 es	*esh	as	ei	es
‘समोर’	H_2 enti	*ant	anti	anti	ante
‘हाड’	H_3 esti	*astai	asthi	osteon	os

या सिद्धान्तानं संस्कृतमधील आणखी काही शब्दांचं रहस्य उलगडलं जातं. धातूंच्या अंती येणाऱ्या च मूळ रूप aH असं कल्पिता येतं. तसच ज्या धातूंच्या अंती (ई) व (ऊ) येतात त्यांची रुपं iH व uH अशी मानण्यास हरकत नाही. त्या योगे संस्कृतमधील ‘नी’ व ‘हू’ या धातूंच्या मूळ रूपांचा अंदाज करता येतो तो असा: या धातूंच्या मूळ रूपात संयुक्त स्वर असून त्यानंतर लॅरिंजीअल ध्वनी येत असावा. या दृष्टीनं त्यांची मूळ रुपं neiH व heuH अशी मानता येतील. लॅरिंजीअलच्या परिणामामुळे ei च्या जागी ay/y (अय्/आय्) व eu च्या जागी av/v (अव्/ आव्) निर्माण झाले व त्यानंतरच्या काळात लॅरिंजीअल ध्वनी लोप पावला:

इं-यु	संस्कृत				
		ई/ऊ	ए/ओ	अय्/ अव्	आय्/ आव्

neiH	n (नी)	नीत्वा	नेतूम्	नयति	नायक
heuH	h (हू)	हूत	होमन्	हवन	जुहाव

हिटाइटचा शोध व त्यामुळे निर्माण झालेला लॅरिंजीअल सिद्धान्त यांनी संस्कृतचंच नव्हे तर साऱ्या इंडो –युरपिअन या उपक्रमाचं क्षेत्र खूप ढवळून निघालं "लॅरिंजीअलवरचं लेखन इतकं विपुल आहे की वर्षांमागून वर्षं जशी जातात तसतशी त्यांची सूची वाढतच आहे; इतकी की तिचा केवळ संक्षिप्त इतिहास लिहायचा झाला तरी कित्येक ग्रंथ लिहावे लागतील," असे उद्‌गार एमिल बँव्हनिस्त[७] या भाषाविज्ञानीनं १९६२ साली लिहिलेल्या आपल्या 'हिटाइट व इंडो -युरपिअन' या ग्रंथाच्या सुरवातीसच काढले आहेत. इंडो -युरपिअन भाषांचा महासागर जसा प्रचंड विस्तृत आहे तसा तो प्रचंड खोलाही आहे ही जाणीव या उद्‌गारांच्या मुळाशी आहे.

संदर्भ व टीपा

१. O. Sahrader: Sprachvegleichung and Urgesehichte, 2 nd ed., 1890

२. B. hrozny, 1879-1952

३. H. Mller, 1850-1923

४. A. Cuny

५. H. Padersen

Jerzy Kurylowwicz: 'a indo- europen et * hittite' (symbolae Grammaticae in Honorem Ioannis Rozwadowski, Cracow, 1927, p.

95-104)

७. E. Benveniste

* भारतातील उत्तर प्रदेशातील उत्तर काशीच्या काही भागात ‘बंगानी’ (bangani) नावाची बोली बोलली जाते. तिचा अभ्यास करणारे सी. पी. झोलर (C. P. Zollar) यांनी नमूद केलं आहे की तिच्यात ‘१००’ वाचक शब्द Konto असा आहे.

* c = consonant (व्यंजन)

* संस्कृतमध्ये नवम गणाच्या धातूंना ‘ना’ हे विकरण लागतं. ‘ना’ या विकरणाची व्यंजनांनी सुरु होणाऱ्या weak प्रत्ययांपूर्वी ‘न्’ अशी रूपं होतात. उदा. क्री (विकत घेणे):

क्री + ना + ति = क्रीणाति

क्री + नी + मः = क्रिणीमः

क्री + न् + अन्ति = क्रीणन्ति

पेडेरसनच्या मते ‘ना’ च्या या रुपात मूळ प्रत्यय

n + H

असा असावा.

७. इंडो –युरपिअनचा नवा नकाशा

हिटाइट व तोखारिअन या भाषांच्या शोधांनी इंडो -युरपिअनचा नकाशा पार बदलून टाकला इतकंच नाही तर इंडो –युरपिअनच्या अभ्यासासाठी आतापर्यंत भारत व युरप या प्रदेशांवर अभ्यासूंचं लक्ष केंद्रित झालं होतं ते आता विकेंद्रित होऊन भूमध्य –समुद्राकडील आशिया मायनरपासून चीनच्या उत्तरेकडील सिंकीयांगपर्यंतच्या चंद्रकोराकृत्ती प्रदेशावर केंद्रित झालं. इंडो –युरपिअनभाषी लोक मध्य युरपकडून इराणमार्गानं उत्तर भारतात इ.स.पू.१५०० च्या सुमारास दाखल झाले असं आतापर्यंत मानलं गेलं होतं. हिटाइतच्या शोधानं हे स्पष्ट झालं की इंडिकभाषिक जमातींचं अस्तित्व मध्य-पूर्वेत इ.स.पू. ९००० ते २५०० च्या सुमारास होतं व तोखारिअन ही जरी पुष्कळ नंतरची भाषा असली तरी तिच्या ध्वनिव्यवस्थेवरून हे स्पष्ट दिसतं की चिनी –तुर्कस्तान या भागातही इंडो –युरपिअनभाषी समाजाचं अस्तित्व प्राचीन काळी होतं. आशिया मायनर (सध्याचा तुर्कस्तान) व चिनी – तुर्कस्तान या दोन दूरदूरच्या प्रदेशांत '१००' या संख्येच्या नावातला आद्य ध्वनी एकच असून त्यामधल्या प्रदेशांत तो वेगळा आहे यावरून असं स्पष्ट होतं की मूळ इंडो –युरपिअनभाषी लोक प्रथम या प्रदेशांच्या मध्यात म्हणजे रशिअन स्टेप्स या भागात राहत असावेत व त्यांचं विस्तरण आशिया मायनर व चिनी तुर्कस्तान या भूभागांकडे झाल्यानंतर त्या मध्यातल्या प्रदेशात आलेल्या इतर जमातींच्या साहचर्यामुळे क् या मूळ ध्वनीचं श्/स् असं परिवर्तन घडून आलं असावं

क्	क् श्/स्	क्
आशिया-मायनर	रशिअन स्टेप्स	चिनी – तुर्कस्तान

आशिया मायनरच्या प्रदेशातल्या उत्खननावरून पुरावस्तुशास्त्रज्ञांनी तेथील संस्कृतींचं बरंच सूक्ष्म अवलोकन प्रसिद्ध केलं आहे. त्यावरून

तुर्कस्तानच्या अनातोलिया या प्रदेशात इ. स.पू. ३००० ते २००० या काळात आठ विविध भाषा होत्या. त्यापैकी Luwain व Calaic या प्रादेशिक बोलींची – त्या इंडो-युरपिअन असाव्यात – उपलब्ध माहिती फारच अपुरी आहे.सेमिटिक कुळातल्या दोन महत्त्वाच्या भाषा, सुमेरिअन (Sumerian) व अक्काडिअन (Akkadian) यांचा या प्रदेशांत लेखनासाठी खूप वापर केला जात होता. त्यांना विदग्ध भाषांचा मान असून राजकीय व्यवहारात त्यांचा उपयोग कायदे, करार वगैरे लिहिण्यात केला जात होता. बाकीच्या भाषांपैकी हुरिअन (Hurrian) त्या काळातलं नाव हुर्रिली –ही बहुसंख्य जनतेची बोली असावी. बाबिलोनमधे लोकप्रिय असलेलं व या बोलीत लिहिलेलं 'गिलगामेश' (Gilgamesh) नावाचं महाकाव्य या प्रदेशात सापडलं आहे. तसचं या प्रदेशातल्या मितन्नी (Mitanni) लोकांचा राजा तुश्रत्त(Tushratta) यानं इ. स. पू. १४०० च्या सुमारास या बोलीत लिहिलेलं एक सुदीर्घ पत्र मिळालं आहे. सर्वात महत्वाचं म्हणजे किक्कुली (Kikkuli) नावाच्या मितन्नी अश्वविद्यातज्ज्ञानं घोड्यांची परीक्षा व त्यांची कवायत यावर या बोलीत लिहिलेले चार मृत्फलक हाती आले आहेत. या फलकांवरील किक्कुलीच्या लेखनात aika (एक), tera (त्रि), panza (पंच), satta (सप्त), na (नव), wartanna (वर्तन, वर्तुळाकार फेरा) हे शब्द आढळतात. हे शब्द जरी अगदी संस्कृत नसले तरी इंडिकचे आहेत हे नक्की असं भाषाविज्ञानींचं मत आहे. मितन्नी लोकांच्या राजांची नावं –ऋतमन्य, वृद्धाश्व – तसंच त्यांच्या देवांची नावं – इन्दर, मित्रश्, नाशतिअ- हीदेखील इंडिक भाषेतील आहेत. या वरून असा अंदाज केला जातो की अनातोलीयाच्या या प्रदेशातील प्रजा जरी हुरिअन बोली बोलत असली तरी तिचे राज्यकर्ते हे कुठले तरी इंडिक-भाषी असावेत.

वेदांच्या अभ्यासावरून वेदकाळापूर्वी मध्य आशिया व उत्तर भारत या प्रदेशात विविध प्राकृत बोली असाव्यात या भाषाविज्ञानींच्या समजुतीला मध्य-आशियातल्या या शोधांनी महत्त्वाची पुष्टी मिळते. मध्य पूर्वेकडून भारताच्या दिशेनं अनेक बोली बोलणाऱ्या जमाती आल्या. त्यातल्या काही भारतात येऊन पोचल्या, काही सरहद्दीजवळच्या प्रदेशात इतस्ततः विखुरल्या गेल्या. इंडिक-

भाषा- कुटुंबाचा अभ्यास करताना वैदिक, अवेस्तन, संस्कृत, जुनी फारसी, प्राकृत, पाली या भाषांच्या बरोबरीनं मध्यपूर्वेतल्या पाश्तो, काफिरी इत्यादी बोलींचाही अभ्यास करायला हवा. या संबंधात एमेनो[१] याचे उद्‌गार महत्त्वाचे आहेत तो म्हणतो, “भारत –इराण यांच्या सरहद्दीमधील प्रदेश भाषाविज्ञानदृष्ट्या अत्यंत महत्त्वाचा असला तरी त्याकडे कोणीही लक्ष दिलेलं नाही. त्यातील भाषिक पुराव्याच्या अभावी इंडो –आर्यन किंवा आयरॅनिअन या भाषाकुलातील बोलींचं भित्तीचित्र खंडितच राहील.”

भारताच्या वायव्य सरहद्दीजवळचा प्रदेश बिकट भौगोलिक कारणांमुळे व तिथं राहणाऱ्या पहाडी जमातींच्या हिंसकपणामुळे अद्याप अज्ञात राहिला असला तरी प्राचीन काळी त्याचा इतिहास महत्त्वाच्या घटनांनी व्यापलेला होता. इंडिक जमातींची ये-जा याच प्रदेशातून होत होती. इथल्या नद्या, पर्वत, व वनश्री यांनी मोहित झालेल्या वैदिक कवींनी आपल्या भाषेला नवनव्या स्वरूपात नटविली. नंतरच्या काळात प्रसिद्ध झालेला गंधार देश, त्यातलं पुरुषपुर (पेशावर) हे नगर व तक्षशिला विद्यापीठ इतिहासप्रसिद्ध आहेत. पाणिनी या श्रेष्ठ भाषाविज्ञानीचं जन्मस्थान शलातुर याच प्रदेशातलं. अलेक्झांडरची स्वारी (इ.स.पू. ३२६) याच प्रदेशाकडून झाली. याच प्रदेशात भारतीय, ग्रीक, इजिप्शियन विद्वान एकमेकांना भेटले असावेत. या प्रदेशावर राज्य करणाऱ्या ग्रीक प्रतिनिधींनी आणि पुढे स्वतंत्र झालेल्या राजांनी (उदा.दिमेत्रिओस इ.स.पू. २०० -१९०, मिनांडर इ.स.पू. १५५ – १३०, इ.स.पू. १८०-१६०) ग्रीक व भारतीय संस्कृतींच व कलांचं एकीकरण करण्याचा प्रयत्न केला होता. कनिष्क (इ.स.१२०-१४४) या कुशानवंशी राजाचं वर्णन ‘गांधारचा राजा’ असं आढळतं व त्याची राजधानी पुरुषपुर असावी असं इतिहासकार सांगतात. कनिष्कानं ग्रीक, आर्य, बौद्ध, झोरोअॅस्टर इत्यादी सर्व धर्मांना उत्तेजन दिल्याचे दाखले आहेत. त्याच्याच्म प्रोत्साहनानं नागार्जुन, अश्वघोष, व्सुमित्र, चरक यांसारख्या विद्वानांना राजाश्रय मिळून त्या प्रदेशात विविध विद्यांचा विस्तार झाला. या प्रदेशात आढळून येणाऱ्या अशोकाच्या (इ.स.पू. २७३-२३२) शिलालेखांच्या

अभ्यासावरून या प्रदेशातील भाषिक संमिश्रणाचं चित्र डोळ्यासमोर स्पष्ट उभं राहतं. या प्रदेशातील अशोकाची वचनं पैशाची नावाच्या प्राकृतात असून ज्या लिपीत ती कोरली आहेत ती खरोष्ठी लिपी या भागात सर्वसामान्य व्यवहारात वापरली जात होती. ही खरोष्ठी लिपी अॅरमेइक या मध्य-पूर्व प्रदेशातील भाषेच्या लिपीवरून घडली गेली होती. अशोकाच्या शिलालेखांच्या खाली किंवा बरोबरीनं अॅरेमॅइक भाषेत व क्वचित ग्रीक भाषेत त्या त्या भाषांच्या लिपीत त्यांचं भाषांतर केलेलं आढळतं. यावरून पैशाची, अॅरेमॅइक, ग्रीक इत्यादी भाषा बोलणाऱ्या व्यक्ती इथे राहत असाव्यात किंवा ये-जा करीत असाव्यात. त्यातील काही दुभाषी, तिभाषी असण्याचा संभव आहे. आपल्या बोलीत साहित्य रचण्याचे यत्नही इथं होत असल्यास नवल नाही. आता उपलब्ध नसलेला, पण त्या काळी प्रसिद्ध असलेला, गुणाढ्य नावाच्या लेखकानं या पैशाची या प्राकृतात लिहिलेला, ‘बृहत्कथा नावाचा ग्रंथ, तसेच मुळातलं ‘पंचतंत्र’ व ‘मिलीन्दपन्हो’ सारख्या कृती असल्या प्रयत्नांची दृश्य फळे होत. ज्या बोलींना संस्कारित करण्याचे प्रयत्न झाले व या प्रयत्नांना यशस्वी बनविण्यासाठी ज्या मान्य बोलीत ग्रंथ रचना झाली अशा बोलींचं ज्ञान भाषिक इतिहासात कायम राहिलं. बाकीच्या सामान्य व्यवहाराच्या बोली कालप्रवाहात लुप्त झाल्या. बलुचिस्तान प्रदेशात जाहुइ नावाची द्रविड कुळातली भाषा बोलणारा मोठा जनसमूह आहे हे ज्ञान ब्रिटिश कालापर्यंत कोणालाच नव्हतं. बोलींची माण्यास रुपांपर्यंत येण्याची धडपड, त्यासाठी घडलं जाणारं त्यांचं व्याकरण, त्या व्याकरणाच्या कचाट्यातून सुटलेली बोलींची स्वाभाविक रुपं, बोलीबोलींची देवघेव इत्यादी अनेक गोष्टींचा अभ्यास भाषाविज्ञानीनां या भूभागाच्या संबंधात करायचा आहे. यासाठी जी माहिती हवी ती पुरावस्तुविदांच्या व प्रवाशांच्या प्रयत्नांनी उपलब्ध झाली आहे.या बोलींच्या क्षेत्रातला भाषिक इतिहास मात्र अगदी मुका आहे. या गोष्टीचा खेद वाटून जोन्झनं एकेठिकाणी म्हटलं आहे: “किती दु:खाची गोष्ट की अलेक्झांडरबरोबर भारताकडे जे ग्रीक आले त्यांनी अथवा बॅक्ट्रिअन राजपुरुषांशी ज्यांचा कित्येक

वर्षं संबंध आला अशांनी या प्रदेशात जेव्हा प्रवेश केला तेव्हा त्यांना इथं कोणत्या बोली आढळल्या यासंबंधी काहीही लिहून ठेवलेलं नाही."[२]

भारताच्या प्राचीन इतिहासाच्या दृष्टीनं वरील प्रदेशातली महत्त्वाची घटना म्हणजे इ.स.पू.३२६ मध्ये झालेली अलेक्झांडरची भारतावरील स्वारी. भारताच्या भूमीवर ते पहिल्या युरपिअनाचं पाऊल होतं. आपल्या प्राचीन भाषाबंधुत्वाची आठवण त्या काळात, भारतीय काय, किंवा युरपिअन काय, कुणालाच राहिलेली दिसत नाही. अलेक्झांडरच्या आक्रमणानंतर जवळ-जवळ हजार वर्षांपर्यंत भारताची वायव्य सरहद्द उघडी होती. राजा अशोकानं बौद्धधर्मीय लोकांसाठी हा मार्ग मोकळा ठेवला इतकंच नाही तर बौद्धधर्माच्या रक्षणासाठी व प्रसारासाठी त्या मार्गावर गुंफा, विहार, इत्यादी तयार करवून त्यांच्या आसपासच्या प्रदेशात आपले शिलालेख कोरवून ठेवले. या हजार वर्षांच्या काळात ज्या अनेक जमाती त्या बाजूनं भारतात आल्या त्या साऱ्या भारतीय प्रजेत सामावून गेल्या.याचं एक सुंदर उदाहरण आजही भारताच्या नकाशाच्या मध्यात उभं आहे ते म्हणजे मध्य-प्रदेशातील विदिशाजवळील भिलसा या गावी असलेला एक स्तंभ. हा स्तंभ हेलिओडोरोसचा स्तंभ[३] या नावानं प्रसिद्ध आहे. अन्तिआल्किदस (इ. स. पू. १४०-१३०) या तक्षशिलेच्या ग्रीक राजानं हेलिओडोरोस याला आपला राजदूत म्हणून विदिशाचा राजा भगभद्र याजकडे पाठविलं होतं. हेलिओडोरोसनं उभारलेल्या स्तंभावर आपल्याला स्वतःला वासुदेवभक्ती (भागवतधर्म) आवडल्याचं जाहीर केलं आहे. समाज-समाजांचं घडत जाणारं हे संमिश्रण इतकं सुरेख होतं की त्या वेळच्या या प्रदेशात या देशचं कोण व परदेशचं कोण हे सांगणं कठीण झालं असावं.

बौद्धधर्मीय व मध्यमवर्गीय राज्यकर्त्यांनी घडवून आणलेली एकी इ.स. च्या सातव्या शतकाच्या मध्यापर्यंत टिकून राहिली. राजा हर्षवर्धन (इ. स. पू. ६०६-६४७) याचा काळ या एकीकरणाचा उच्चांक मानावा लागेल. हर्षवर्धनानं घडवून आणलेल्या भारतीय ऐक्याचं वर्णन तत्कालीन संस्कृत लेखक बाणभट्ट

याच्या 'हर्षचरित' या ग्रंथात, स्वतः हर्षवर्धनानं लिहिलेल्या 'नागानंद' या नाटकात व तत्कालीन चिनी प्रवासी हिउएन-त्संग (अथवा युवान च्वांग)[४] यानं भारतात केलेल्या (इ. स. पू.६३०-६४३) प्रवासवर्णनात मिळते.

हिउएन-त्संग या बुद्धधर्मीय विद्वानाला सन्मानण्यासाठी हर्षवर्धनानं आपली राजधानी कनौज येथे मोठा दरबार भरवला. या दरबाराला हर्षवर्धनाचे वीस मांडलीक राजे हजर होते. हिउएन-त्संगचा सन्मान मोठ्या थाटात पार पडला. त्यानंतर हर्षवर्धनानं एक मोठी मिरवणूक काढून आपल्या पाहुण्याला तीर्थक्षेत्र प्रयाग इथं नेलं. तिथं भारताच्या सर्व धर्माच्या साधूंना व विद्वानांना दानं देण्यात आली. सर्वधर्मसहिष्णू हर्षवर्धन अशा प्रकारचे दानधर्माचे प्रसंग आपल्या राज्यात दर पाच वर्षांनी घडवून आणीत असे. इ.स.पू. ६४३ मध्ये योजिलेला प्रयाग येथील हा समारंभ त्याच्या कारकीर्दीतला शेवटचाच ठरला कारण त्यानंतर लौकरच त्याचं देहावसान झालं. इतकंच नाही तर त्यानं साधलेली भारताची एकताही ही लुप्त झाली.

हर्षवर्धन राज्यावर आला त्यापूर्वी पश्चिम बंगालचा (गौडचा) राजा नरेंद्र गुप्त —शशांक (इ. स. ६०५) यानं बुद्धधर्मीयांवर शस्त्र उगारलं होतं. गया इथं ज्या बोधिवृक्षाखाली बुद्धाला ज्ञान प्राप्त झालं त्या बोधिवृक्षाचं छेदन केलं गेलं. हर्षवर्धनानं असली असहिष्णुता रोधून ठेवण्यात जरी यश मिळविलं तरी त्याच्या मृत्यूनंतर बुद्धधर्माचं भारतात भविष्य ठीक नाही अशी जी चिंता हिउएन-त्संगच्या लेखनात डोकावते ती खरी झाली. नालंदा विद्यापीठाच्या ज्या ग्रंथसंग्रहालयात बसून या चिनी विद्वानानं बुद्धधर्माचा अभ्यास केला ते हर्षवर्धनाच्या मृत्यूनंतर थोड्याच अवधीत (इ. स. ६५५ मध्ये) भस्मीभूत केलं गेलं.

भारताच्या पूर्व दिशेला ही असहिष्णूता प्रगत होत होती त्याच वेळी पश्चिम दिशेकडे दुसरी असहिष्णूता आपले पाय रोवू लागली. मध्यपूर्वेत इस्लामचा संस्थापक मुहम्मद याचा मृत्यू (इ. स. ६३२) झाल्यानंतर त्याच्या जागी उमर

हा पहिला खलीफ बनला. त्याच्या सेनापतीनं जेव्हा अलेक्झांड्रिया हे शहर जिंकलं तेव्हा खलीफ उमर याला सेनापतीनं तेथील प्रसिद्ध ग्रंथसंग्रहालायाचं काय करायाचं यासंबंधी विचारलं. उमरनं त्याला कळविलं: "ग्रीक लोकांनी लिहिलेल्या तिथल्या ग्रंथांत कुराणात जे म्हटलं आहे तेच सांगितलं असेल तर त्या ग्रंथांचा काहीच उपयोग नाही आणि त्यात जर कुराणाविरुद्ध काही असेल तर ते ग्रंथ जाळण्याच्या लायकीचे आहेत," असं म्हणतात की नऊशे वर्षांपर्यंत काळजीपूर्वक सांभाळल्या गेलेल्या त्या अमोल ग्रंथांना आग लावण्यात आली व त्या आगीचा उपयोग सैनिकांना स्नानाकरता पाणी तापविण्यासाठी केला गेला.[५]

मध्य-पूर्व व पूर्व-भारत या भागात हा विनाश चालू होता त्या वेळी भारताच्या पश्चिम किनाऱ्याला इस्लामधर्मी अरबी व्यापारांच्या नावा नांगरल्या जाऊ लागल्या. अरबांचा पुढारी मुहम्मद बिन-कासिम यानं इ. स. ७१२ मध्ये सिंध प्रांत जिंकला. त्या काळी पंजाबातून वाहणारी हक्रा किंवा घग्गर नदी सिंध प्रांताच्या उत्तर भागात सिंधू नदीला मिळत होती. हीच पूर्वीच्या काळात सरस्वती म्हटली जात असावी. ही नदी नव्या अरबी जेत्यांची आक्रमणसीमा ठरली. सर्व धर्मांबद्दल सहिष्णुता दाखविणाऱ्या राजा हर्षवर्धनाचं युग संपलं, आता या पुढील इतिहास आपल्याला दिसायला नको या भीतीनं की काय, सिंधमधली ती सरस्वती लैकरच वाळवंटात लुप्त झाली.

मूळचे अरबस्तानातले अरब इ. स. च्या ७ व्या शतकापासून जसजसे मध्यापूर्वेकडे सरकू लागले तसतसं तिथल्या इंडो-युरपिअन कुळातल्या भाषा व बोलींवर अरबीच वर्चस्व वाढू लागालं. त्या काळात मध्यपूर्वेतल्या देशात इंडो-युरपिअन कुळातल्या भाषा बोलणाऱ्या दोन मोठ्या जमाती होत्या : मीड व पर्सिक. मीड जमातीचा पुढारी झोरोस्तर यानं इ. स. पूर्व १००० मध्ये एका नव्या धर्माची स्थापना केली होती. ही त्याची धर्मरचना 'अवेस्ता' व 'गाथा' नावाच्या ग्रंथांत ग्रथित केली गेली होती. अरबांच्या हल्ल्यांना भिऊन मीड्झ जमातीचा एक समूह मध्य-पूर्वेकडून समुद्रमार्गानं भारताच्या पश्चिम किनाऱ्यावरील संजाण गावी इ. स. च्या ७ व्या शतकात येऊन पोचला. * हेच भारतात 'पारसी'

म्हणविले गेले. पारसी हे आपल्या अग्निपूजेच्या धर्मामुळे भारतात सुरक्षितपणे राहू शकले, परंतु त्यांना किंवा भारतीयांना आपण एकमेकांचे भाषाबंधू आहोत याची जाणीव त्या काळात किंवा त्यानंतरही झालेली दिसत नाही.

मध्य-पूर्वेत राहणारी दुसरी महत्वाची इंडो-युरपिअनभाषी जमात पर्सिकांची होती.त्यांची भाषा पार्सिक ही इंडो-युरपिअन कुळातली होती. या जमातीनं अरबांच्या आक्रमणापुढे नमतं घेऊन इस्लाम धर्म स्वीकारला. हा धर्म स्वीकारण्यापूर्वीचा त्यांच्या भाषेचा नमुना बॅबिलोनकडून एकवाताना[६] या गावाकडे जाणाऱ्या वाटेवर असणाऱ्या बेहिस्तुन[७] नावाच्या पर्वताच्या एका अतिशय उंच खडकावर कोरलेल्या लेखात मिळतो. हा लेख त्या जमातीच्या दारिअस्[८] या राजानं आपल्या इ. स. पूर्व ५९१-५४८ च्या दरम्यानच्या राजवटीत कोरवून घेतला होता. या प्राचीन पार्सिकवरून पुढे मध्ययुगीन काळात पहेलवी व नंतर पर्शिअन किंवा फारसी या भाषा विकास पावल्या. इ. स. ११७५ मध्ये अफगाणिस्तानातील हेरात[९] गावच्या आग्नेय दिशेकडील पर्वतमय प्रदेशातल्या घूर या परगण्याचा पुढारी महंमद घूरी यानं जेव्हा उत्तर भारतातील मुलातानावर हल्ला करून ते जिंकलं तेव्हा या पश्तू वा ताजिकभाषी इस्लामधर्मीयांचा भारतात प्रथम प्रवेश झाला. भारतातल्या लोकांच्या व आपल्या मूळच्या भाषाबंधुत्वापेक्षा आपल्यातील धार्मिक विरोधाची त्यांना जाणीव इत:पर प्रभावी ठरणार होती.

महंमद घूरीच्या मुलातानावरील हल्ल्यानंतर थोड्याच वर्षात ज्या एका प्रचंड हल्ल्यातून भारताचा बचाव झाला तो म्हणजे चंगीझखान (इ. स. ११६२-१२२७) या मंगोलवंशी पुढाऱ्यानं केलेला इ. स. १२२१-२२ मधला हल्ला. सिंधू नदीपर्यंत येऊन त्याच्या सैनिकांनी पश्चिम पंजाबपर्यंत लुटमार केली. लौकरच ही लाट परत गेली. याच मंगोलवंशी लोकांनी आणखी दोन शतकांनंतर, १४ व्या शतकात, इस्लाम धर्म स्वीकारला.* दरम्यानच्या काळात त्यांचा तुर्की लोकांशी संबंध आला. हे इस्लामधर्मी तुर्की-मंगोल-ज्यांना चुगताई असं नाव होतं- हे भारतावर हल्ला करून त्यावर स्वामित्व गाजविणारे मुघल

म्हणविले गेले. चंगीजखानच्या वंशातला काबुलाचा राजा बाबर यानं इ. स. १५२५ मध्ये भारतावर हल्ला करुन मुघलांचं राज्य सुरू केलं. या मुघल घराण्याचा शेवटचा राजा बहादूरशहा इ. स. १८५७ मध्ये इंग्रजांच्या हातात सापडला व रंगून (ब्रह्मदेश) येथील तुरुंगात इ. स. १८६२ मध्ये वयाच्या ८७ व्या वर्षी वारला.

मुघल राजे रसिक, सौंदर्यभोक्ते होते. विलासी राहणीचे, बगिचे व फुलझाडांचे ते शौकीन होते. संगीतानं भारून जाणारे, चित्रकला व स्थापत्य जोपासणारे होते इतकंच नव्हे तर भाषाप्रेमीही होते. त्यांच्या भाषेचा मुख्य विषय होता ते स्वत: प्रत्येक मुघ राजानं आत्मवृत्त लिहिलं आहे. बाबारानं आपलं आत्मवृत्त तुर्की भाषेत लिहिलं आणि नंतरच्या राजांनी पर्शियनमध्ये. या पर्शियन भाषेचं व तत्कालीन उत्तर भारतीय भाषांच्या संगमाचं एक नावं अत्तर निर्माण झालं ते म्हणजे उर्दू ! इंडो-युरपिअन कुळातली ही सर्वात लहान भाषा — सिन्डरेला!

इ. स. पूर्व ३२६ मध्ये भारताच्या भूमीवर पाय ठेवणारा अलेक्झांडर हा पहिला युरपिअन. इ. स. च्या ७ व्या शतकापासून अराबांचं मध्य-पूर्वेत साम्राज्य सुरू झाल्यानंतर युरप व भारत यांच्यातील जमिनीवरील दळणवळणाचा मार्ग बंद झाला. म्हणून समुद्रावरून दुसरा मार्ग शोधण्याचा प्रयत्न पोर्तुगाल या युरपिअन राष्ट्रानं पंधराव्या शतकात सुरू केला. त्या राष्ट्राचा दर्यावर्दी वास्को-द-गामा यानं नवा समुद्री मार्ग शोधला. २० मे १४९८ या दिवशी भारताच्या पश्चिम किनाऱ्यावर त्यानं पाऊल ठेवलं. भारताच्या भूमीवर पाऊल ठेवणारा हा दुसरा युरपिअन. इ. स. पू. ३२६ मध्ये उत्तरेत अलेक्झांडरनं आखलेली भारताची भाग्य रेखा वास्को-द-गामानं वळवून दक्षिणेत नेली-भूमीवरून सागराकडे!

आता या नव्या मार्गानं युरपचे व्यापारी, धर्म प्रचारक व जिज्ञासू भारताकडे येऊ लागले. भारताची संस्कृती झपाट्यानं बदलू लागली. या

कार्यात पाश्चात्यांची जी बहुमोल मदत झाली ती भारताच्या प्राचीन भाषांच्या अभ्यासासाठी. या अभ्यासाचं वैज्ञानिक स्वरूप जसं पाश्चात्यांच्यामुळे घडलं गेलं तसं त्यांचं मध्यपूर्वेशी व युरपशी नातंही त्यांच्यामुळे स्पष्ट झालं. हा सारा इतिहास जितका सुरस आहे तितका तो रहस्यपूर्णही.

या अभ्यासाची सुरवात झाली ती कलकत्त्याच्या एस्प्लनेड रो या भागातील समुद्रकिनाऱ्यावरील चंडपाल घाटाला दि. २५ सप्टेंबर १८७३ रोजी इंग्लंडहून येणारं 'क्रॉकोडाइल' (मगर) नावाचं जहाज नांगारलं त्या दिवसापासून. या दिवशी विल्यम जोन्झ आपल्या हातात आपण स्वतः बारा वर्षांपूर्वी लिहिलेलं (१७७१) 'पर्शिअन भाषेचं व्याकरण' घेऊन या जहाजातून उतरला. पर्शिअन भाषा ही त्या वेळच्या राज्य-व-व्यापार-व्यवहाराची भाषा होती. ज्ञान-विज्ञानाची भाषा संस्कृत होती. जोन्झनं दोन वर्षात संस्कृतवर प्रभुत्व मिळविलं व संस्कृत आणि पर्शिअनच नव्हे तर ग्रीक, लॅटिन, गोथिक इत्यादी युरपातल्या भाषा एकमेकींच्या बहिणी आहेत-त्यांची आई एकच असावी असा आपला शोध दि. २ फेब्रुआरी १८७६ या दिवशी जाहीर केला. युरपिअन विचारवंतांच्या पौर्वात्य देशांशी आलेल्या संबंधातून उमललेल्या 'पूर्वाभिगम' (Orientalism) या वेलीवर उमललेलं हे पहिलं गोड फुल ठरणार होतं.

भारत, मध्य-पूर्व व युरप या प्रदेशातल्या भाषांच्या एकसूत्री अभ्यासाची मुहूर्तमेढ जोन्झच्या१७८६ मधल्या या उपपत्तीनं झाली असे भाषाविज्ञानाचे सर्व इतिहासकार म्हणतात. १७७१ मध्ये आंकेतिल दु पेरॉं[१०] यानं अवेस्ताचा आपला अभ्यास आधीच करून ठेवला होता. १७९९ त रोझेटा स्टोनचा शोध लागल्यानंतर थोड्याच वर्षात टॉमस यंग यानं १८१५ साली इजिप्शिअन भाषेचं कोडं उलगडलं. १८३४ ते १८३८ या वर्षात जेम्स प्रिन्सेपनं[११] अशोकाचे शिलालेख उकलून भारताच्या मध्ययुगीन भाषांच्या अभ्यासाचा मार्ग खुला केला. एच.सी. रॉलीन्सन[१२] याच्या बेहिस्तुनच्या शिलालेखांच्या अभ्यासानं (इ.स.१८५१) भारतीय, आयरॅनिअन व द्राविड या भाषांच्या संगमाची करून दिलेली जाणीव ही या साऱ्या भाषाभ्यासाची सुरंगी कमान ठरली. ऑरेल

स्टेइननं[१३] १८९० ते १९१० मधील आपल्या शोधांनी हा सारा अभ्यास चीनच्या 'रेशमी' रस्त्यापर्यंत पोचविला.

विसाव्या शतकातल्या भारतीयांना या पाश्चात्त्यांनी जे भाषाभांडार उपलब्ध करून दिलं त्यावरून त्यांना पुष्कळ नवे सिद्धान्त रचता आले असते. पण तसं काही घडलं नाही. आम्ही आमच्या नव-काव्यात, नव-कथांत आणि राष्ट्रवादाच्या साहित्यात एवढे गर्क होतो की या प्राचीन भाषेतिहासाकडं लक्ष द्यायला कुणाला फुरसत होती? हा सारा इतिहास लिहायला एखादा ग्रंथ विशाल ग्रंथही अपुरा पडेल. तथापि या साऱ्या अभ्यासाला एक जुनी युरपिअन शेजारीण भेटल्याचा जो आनंद झाला तो मात्र व्यक्त केल्याशिवाय राहवत नाही.

इ.स.पू. ५०००-३००० च्या दरम्यान इंडो-युरपिअन भाषी जनसमुदाय मुखत्वे कॅस्पिअन समुद्राच्या पूर्वेस अराल समुद्राच्या भोवतालच्या अमू दर्या व सिर दर्या या नद्यांच्या प्रदेशात पसरलेला असावा. मग चीन-रशिया यांना जोडणाऱ्या प्रदेशातल्या मंगोल, तुर्क वगैरे भटक्या जमातींचे त्यांच्यावरील आक्रमण वाढत गेले व त्यामुळे इंडो-युरपिअनभाषी लोक आपला प्रदेश सोडून उत्तर पश्चिम दिशेनं युरपकडे व दक्षिण-पूर्व दिशेनं मध्य-पूर्वेकडे सरकू लागले. या दोन दिशांत विखुरल्या गेलेल्या इंडो-युरपिअन गटांना अनुक्रमे युरपिअन गट व एशियाटिक गट अशी नावं देता येतील. या दोन गटांच्या मधला प्रदेश, म्हणजे रशियातल्या व्होल्गा नदीच्या प्रवाहापासून यूरल (Ural) पर्वतरांगेपर्यंतचा प्रदेश, हा ज्या जमातींनी व्यापला त्यांच्या भाषा फिनो-उग्रिक या भाषाकुळाच्या होत्या. इंडो-युरपिअनपेक्षा हे भाषाकुळ अगदी वेगळं होतं.

इंडो-युरपिअन या कुळाची इंडो-आयरॅनिअन ही शाखा वेगळी फुटण्यापूर्वी त्या कुळाचा फिनो-उग्रिक कुळाशी सहवास घडला असावा. याचे काही प्रत्यक्ष दाखले मिळाले तरच या दोन शेजारणींचा इतिहास स्पष्ट होईल असं भाषाविज्ञानींना वाटलं. या दृष्टीनं एच्. याकोबसोन[१४] यानं १९२२ साली

लिहिलेल्या आपल्या प्रबंधात हा विषय हाताळला व हवे असलेले दाखले आपल्या प्रबंधात प्राप्त करून दिले.

याकोबसोननं जे मुद्दे मांडले आहेत त्यात पुढील महत्त्वाचे आहेत. त्याच्या मते ज्या ध्वनींच्या बाबतीत इंडो-आयरॅनिअन व फिनो-उग्रिकचे ध्वनी जुळते येतात. यावरून या दोन भाषाकुळांची फारकत होण्यापूर्वी त्यांची एकमेकांशी मैत्री झाली असली पाहिजे. उदाहरणार्थ, '१००' वाचक शब्द

संस्कृत – atam : अवेस्तन satam

पुनर्रचना *

पुढे दिलेल्या फिनो-उग्रिक शब्दांवरून हीच पुनर्रचना खरी ठरते.

Finnish	:	sata	votyak	:	u
Mordwin	:	ado	Vogul	:	*t
*eremis	:	suqo	Ostyak : st	:	
Zyuyan	:	o			

याचा अर्थ फिनो-उग्रिक भाषांनी हा शब्द इंडो-आयरॅनिअनवरून घेतला त्या वेळी ती एकरूप भाषा होती.

याकोबसोनचा दुसरा मुद्दा असा की इंडो-युरपिअन S चं आयरॅनिअनमध्ये जे h असं परिवर्तन घडलं तसं कोणत्याही फिनो-उग्रिक कुळातील बोलीच्या S

चं घडलेले आढळत नाही. त्या अर्थी या परिवर्तनाच्या काळात या जमाती वेगळ्या झाल्या असाव्यात. याचे दाखले :

(एक) संस्कृत - sura : अवेस्तन – ahura

फिनो-उग्रिक बोलींमधील शब्द :

Mordwin : azoro

Votyak : uzir

Zyryan : ozir

(दोन) संस्कृत – vasar : अवेस्तन - xinhar

फिनो-उग्रिक शब्द :

Mordwin : sazor

ceremis : suzar

Finnish : sisar

(तीन) संस्कृत – stu : अवेस्तन - hatu

फिनो-उग्रिक

Mordwin : se

तिसरा मुद्दा असा की इंडो-युरपिअनच्या zh, jh या ध्वनींचं इंडिकमध्ये घडलेलं h हे परिवर्तन फिनो-उग्रिक बोलीमध्ये आढळत नाही :

संस्कृत – varh : अवेस्तन – varza

फिनो – उग्रिक शब्द :

Finnish : aras

Mordwin : ur

याकोबसोनच्या मते फिनो-उग्रिक बोलींनी जसे इंडो-आयरॅनिअन शब्द उसने घेतले तसे त्या बोलींकडून इंडो-आयरॅनिअननंदेखील काही शब्द घेतले; उदा.

(एक)	Hungarian	:	hab	Sanskrit	:	kapha
	Veps	:	kobe	Avestan	:	kafa
	Samoyede	:	khw	Persian	:	kaf
(दोन)	Finnish	:	kuoppa			
	Lapp	:	gupp	Sanskrit	:	kupa
	ceremis	:	kup			
	Votyak	:	gop			
(तीन)	Hungarian	:	szilank	Sanskrit	:	alk

Finnish : sale

संस्कृतकडून इंडो-युरपिअनकडे प्रवास करताना फिनो –उग्रिक भाषांच्या अभ्यासामुळे वाटेत एक महत्वाचा विसावा मिळाला आहे. तुलनात्मक व्याकरणपद्धतीमुळे भाषांच्या उगमाकडे जाण्याचा रस्ता मोकळा झाला तरी त्या रस्त्यावरील ऐतिहासिक टप्पे भाषांच्या भौगोलिक वितरणाच्या अभ्यासानंच स्पष्ट होतात हे तत्त्व त्यामुळे निश्चित झालं, कसं ते पुढील उदाहरणावरून स्पष्ट होईल. संस्कृतच्या 'अर्भक' (बालक) याशाब्दाविषयी विचार करता पूर्वीच्या काही विज्ञानींनावाटतं की या शब्दाचा संबंध

ग्रीक : Orphans

लॅटिन : Orphanus

यांच्याशी असावा. परंतु ग्रीक/ लॅटिनमध्ये या शब्दाचा अर्थ 'विभक्त'. 'टाकून दिलेला' असा आहे. वैदिकमध्ये 'अर्भ' याचा अर्थ 'लहान' हा आहे. * यामुळे या दोन शब्दांचं साम्य मानावं की नाही याविषयी शंका होती. आता फिनो-उग्रिक भाषांच्या ज्ञानानं

Finnish : orpo, orvo

Lap : varbes

हे शब्द 'विभक्त', 'टाकलेला' अशा अर्थानं त्या भाषांत मिळतात. तसंच

Armenian : orb

Gothic : arbi

या भाषांत त्याच अर्थाचे शब्द मिळतात. यावरून असं अनुमान काढता येतं की फिनो-उग्रिक भाषांचा शब्द या इतर भाषांनी उसनवारीनं घेतला असावा. या सर्व शब्दांचं मूळ क्रियापद हिटाइटमध्ये 'harp' (विभक्त हिने) असं मिळतं. वैदिकमधील 'अर्भ' (लहान) व संस्कृतमधील 'अर्भक' यांना समान शब्द अद्याप इतरत्र आढळले नाहीत.

ध्वनिशास्त्राचं साधन हातात घेऊन व संस्कृतच बोट धरून इंडो-युरपिअनच्या शोधार्थ निघालेल्या भाषाविज्ञानाला आपल्या वैज्ञानिक पद्धतीनं वाटचाल करता करता फिनो-उग्रिक भाषाकुळापर्यंतपोचून थोडा विसावा घ्यावा लागला आहे. हा एक विलक्षण योगायोग आहे. 'विलक्षण' अशा अर्थानं की संस्कृतचा शोध लागून तुलनात्मक पद्धतीच्या साह्यानं भाषाविज्ञानाला संबंधित भाषांच्या सामान्य उगमभाषेची तात्त्विक रचना करता आली ही गोष्ट आजच्या ज्ञानमार्गातील मोठी सिद्धी होती यात शंका नाही. आतापर्यंत विज्ञानाच्या कळसाला पोचण्यासाठी दोनच तार्किक मार्ग मान्य होते, निगमन (deductive) व विगमन inductive) तर्कशास्त्रदृष्ट्या या दोन्ही मार्गांचा पुष्कळ अभ्यास झाला. परंतु दोन बऱ्याच अंशी सारख्या दिसणाऱ्या, पण वेगवेगळ्या ठिकाणी राहाणाऱ्या मुली एकमेकींच्या बहिणी असाव्यात व त्यांची आई एकच असावी या सामान्य व्यवहारी तर्काला विज्ञानात स्थान नव्हतं. व्यवहारातील या सामान्य कल्पनेला भाशाभ्यासात मोठ्या मानाचं स्थान मिळून त्यायोगे ऐतिह्याच्या शोधार्थ निघालेल्या मानवाला तर्कापेक्षाही अधिक महत्वाचं असं काही तरी हाती लागावं ही गोष्ट 'विलक्षण' नाही का? तुलनात्मक अभ्यासामुळे 'उद्भवन' (genetic) हा एक नवा तर्कमार्ग मनुष्यांच्या हाती यावा ही त्याची विलक्षण सिद्धी होती यात शंका नाही.

आता 'योगायोग' अशा अर्थाने की भाषाविज्ञान आपल्या शैशवावस्थेत म्हणजे भारतातील संस्कृत भाषेच्या साह्यानं आशिया व युरप यातील भाषांच्या संबंधावर प्रकाश टाकण्यापूर्वीच्या काळात आपली पहिली पावलं टाकायला शिकलं ते फिनो-उग्रिकच्या क्षेत्रात! याची जाणीव पुष्कळ भाषाविज्ञानींना

नव्हती. विल्यम जोन्झच्या एक शतकभर अगोदर जन्मलेल्या न्यूटनचा समकालीन गणिती व तत्त्वज्ञ लीबनिझ (१६४६-१७१६)[१५] यानं युरपातील फिनलंडमधील लॅप लोकांची फिनिश भाषा (लॅप आर्क्टिक महासागराच्या किनारी, फिन बाल्टिक समुद्राच्या किनारी, भाषाकुल एक, पण लोक वेगळे) व हंगेरीतील हंगेरिअन भाषा या जरी एकमेकींपासून आठशे मैल दूर असल्या तरी त्यांच्या व्याकरणिक साम्य आहे. म्हणून त्यांचा उगम कुठल्यातरी एका सामान्य भाषेत झाला असला पाहिजे हे त्या भाषांच्या रूपव्यवस्थेच्या साम्यावरून ताडलं. बोपच्याही पूर्वीचा हा भाषाभ्यास इंडो-युरपिअनच्या क्षेत्रातला नसला तरी तुलनात्मक पद्धतीचा पहिला शोध व तिची प्रथम घडण एका थोर गणिती तत्त्वचिंतकाच्या हातून त्या क्षेत्रात झाली[१६] हे मान्य करायला हवं. काही अंशी अज्ञात राहिलेल्या या चिंतकाच्या विचारातच आजच्या युगातील संगणक सिद्धीचं रहस्य दडलेलं होतं व त्यायोगेच त्याचं अंतरंग खुलं होणार.

मग प्रश्न उरतो तो असा की या अभ्यासाचा युरपातात्या विद्वानांना विसर का पडावा? आजच्या व्यक्तिपूजावादी समाजव्यवस्थेत या गोष्टींची कारणं देणं सोपं आहे. पूर्वाभिगमाचं कौतुक करता करता जर्मन विद्वानांना आपला अहं इंडो-युरपिअनच्या प्राचीनतेनं व राजकीय महत्त्वामुळे पोसणं जितकं शक्य होतं तितकं फिनो-उग्रिकसारख्या सामान्य व तिऱ्हाईत क्षेत्रामुळं शक्य नव्हतं. दुसरं कारण असं की अनुभववादाच्या (empiricism) भूमिकेवर जे प्रत्यक्ष व प्रयोगगम्य असतं तेच वैज्ञानिक मानलं जातं ही भूमिका १९ व्या शतकाच्या सुरवातीपासून वैश्विक मान्यता पावली होती. भाषा विज्ञानातील ध्वनिनियमांची लोकप्रियता यामुळेच सर्वतोमुखी झाली. भाषेच्या अंतरंगात ध्वनीखेरीज इतर काही असणं शक्य नव्हतं अशी त्यावेळची ठाम समजूत होती. यामुळे भाषेची रचना ‘यांत्रिकी’ व्याकरणानं घडली जाते असं मानलं गेलं. भाषा ही मानवी विचारशक्तीची मूस आहे; ती ध्वनिपरिवर्तनापेक्षा सर्जानातेच्या मार्गानं पुढे जाते ही दृष्टी अद्याप आली नव्हती. भाषेचं बाह्यांग कळलं पण तिच अंतरंग मात्र अज्ञाताच राहिलं. ते शोधण हे यानंतरच्या भाषाविज्ञानींपुढचं ध्येय ठरलं.

संदर्भ व टीपा

M. B. Emeneau : "The Indo-Iranian border area is both neglected and of extreme interest, without its evidence the dialect jig-saw puzzle picture, wheyher of Indo-Aryan or of iranian, shows many mising pieces." 'The Dialects of Old Indo-Aryan'.

२. W. Jones : Works. Vol. III p. 33

३. 'Heliodoros' Pillar' (y. V. Smith : The Oxford History of India, 1958, p. 144)

४. Hiuen Tsang or yuan chwang

५. A. J. Toynbee : A Shidy of History (Oxford, 1947, p. 518)

६. Ecbatane

७. Behistun

८. Darius

९. Herat

१०. Anquetil du Perron, 1731- 1805

११. James Prinsep, 1799- 1840

१२. H. C. Rawlinson, 1810-1895

१३. Sir Aurel Stein, 1862-1943

१४. H. Jacobsohn : Arier and Ugrofinnen (GoHingon, 1922)

१५. G.W. Leibniz. 1646-1716

"...he (Leibniz) is the first known scholar to propose that all these Languages were derived from a common prehistoric ancestor." J. T. Waterman, Perspectives in Linguistics, Chicago, 1863, p. 14)

* भारतात आलेले पारसी हे झोरोस्त्रिअन म्हणविले जातात. झोरोस्तर याचा धर्म पाळणारे यझिदी (Yezidi) लोक इराण-इराक या देशांच्या पर्वतीय प्रदेशात अद्याप आहेत. ('Yazidiस in Iran face extermination', by Amir Taheri, The Times of India. 9-12-1982)

*तैमुरलंग (इ. स. १३६२-८०) हा तुर्क, त्याचे अनुयायी मुघल) या राजानंतर दोनशे वर्षांनी इस्लामचा मोंगोल जामातींवरील प्रभाव संपला. सोळाव्या शतकात बऱ्याच मोंगोल जामातींनी महायान बुद्धधर्म स्वीकारला.

* अर्भाको न कुमारको धि तिष्ठत् नवं रथम् |

८. गुरु-शुक्र-युती

शुक्राच्या ताऱ्याला लौकिक इंग्रजीत दोन नावं आहेत : प्रभात-तारा व सायं-तारा. लीबनिझ (१६४६-१७१६) हा युरपातल्या अठराव्या शतकातील भाष्याभ्यासाचा शुक्राचा तारा मानला तर तो जसा तुलनात्मक पद्धतीचा प्रभात-तारा होता तसाच या भाषाभ्यासावर शुखार्टच्या टीकेमुळे (१८७० ते १८८५ च्या दरम्यान) जी संध्याकाळ ओढवली त्यावेळी तो सायं-तारा बनून पुन्हा क्षितिजावर चमकू लागला.

या पुस्तकाच्या पहिल्या प्रकरणाच्या सुरुवातीला भाषाभाषांमधील वैविध्यासंबंधी बायबलमधली जी गोष्ट सांगितली तिचा मथितार्थ ज्याला आपल्या वयाच्या विशीच्या आतच समजला तो म्हणजे लीबनिझ. स्वाभाविक भाषांच्या वैविध्यामुळे आपण मानव एकमेकांपासून भावनात्मक दृष्ट्या विभक्त झालो आहोत इतकंच नाही तर एकमेकांना झालेल्या बौद्धिक ज्ञानापासूनही वंचित राहतो. सामान्य व्यवहाराचं किंवा साहित्याचं जाऊ द्या, पण बौद्धिक ज्ञानाच्या देवघेवीसाठी तरी मानवांनी एकच वैश्विक भाषा रचायला हवी. सुदैवानं गणित ही तसली भाषा रचली गेली होती व ती सर्व जगभर विज्ञानाचं मुख्य माध्यम व साध्य बनली होती. सर्वसामान्य स्वाभाविक भाषा त्या त्या समाजाच्या दैनंदिन व्यवहारापुरत्या मर्यादित राहिल्या, पण गणित हे वैश्विक बनलं होतं. जगात सर्वत्र सदासर्वकाळ ३+२=५ हे सत्य कोणीही नाकारणार नाही अथवा ते ज्या प्रतीकात मांडलं आहे त्यातही कोणी दोष काढला नाही. मग असल्या ‘प्रतीक’-भाषेचा अभ्यास पुढे नेला व तिची रचना तर्कदृष्ट्या सुनिश्चित केली तर जगातलं कितीतरी बौद्धिक ज्ञान झपाट्यानं पुढं जाण्याची व सार्वत्रिक बनण्याची शक्यता आहे हे विचार ह्या वयात लीबनिझच्या मनात चमकून गेले.

गणित म्हणजे अंकरूपी प्रतीकांचा वापर करून गणणं, मोजणं, मापणं इत्यादी क्रिया करणं एवढंच लीबनिझला अभिप्रेत नव्हतं. कुठल्याही प्रतीकांनी व त्यांच्या तार्किक संयोजनेनं सुनिश्चित अर्थ व्यक्त करण्याचं तंत्र म्हणजे गणित

असं त्याला सुचवायचं होतं त्यासाठी त्यानं १६६६ साली De Arte Combinatoria नावाचं पुस्तक लिहून ars combinatoria म्हणजे ‘प्रतीक-संयोजन-कला’ असं व्यापक नाव या शास्त्राला दिलं. या प्रकारच्या शास्त्रद्वारा बौद्धिक ज्ञानात ऐक्य साधण्याचं लीबनिझचं स्वप्न साकारलं ते १८४७ त प्रसिद्ध झालेल्या जॉर्ज बूल[१] (१८१५-१८६४)* याच्या ‘तर्कशास्त्रचं न्गीती विश्लेषण’ या छोट्याशा पुस्तकात. अॅरिस्टॉटलप्रणीत रूढ तर्करचनांना लीबनिझच्या प्रतीक-संयोजन पद्धतीनं मांडलं तर त्यांच्यातील कितीतरी गोष्टी चुकीच्या आहेत हे स्पष्ट होतं इतकचं नव्हे तर तिच्यातून वैचारिक संशोधनाच्या अनेक नव्या वाटा प्रगट होऊ शकतात हे बूलनं शोधलं. बूलच्या या प्रयत्नामुळे त्याचं नाव इंग्लंडभरात बरचं गाजलं. याच सुमारास तुलनात्मक भाषाविज्ञानालाही युरपात नवा भर आला होता. ध्वनींच्या समीकरणातून कितीतरी नवी सत्यं प्रगट होऊ लागली होती व भाषांच्या प्राचीन इतिहासात दडलेल्या गोष्टी नव्यानं आकारू लागल्या होत्या. लीबनिझच्या बुद्धीतून उगम पावलेल्या या दोन गंगा-यमुनांना आपला संगम साधायला मात्र त्या काळी कुठंही प्रयाग सापडलं नाही.

शुखार्टच्या टीकेनंतर भाषाविज्ञानात जो ‘गलबला’ (सोस्युर[२]) माजला त्यातून बाहेर पडायला भाषाविज्ञानींना त्या काळी मार्ग मिळेना. आपण लाइपत्सिक विद्यापीठात शिकत असताना हा गलबला इतका वाढला होता की भाषाविज्ञान म्हणजे काय ते आपल्याला कळेनासं झालं होतं असे उद्‌गार सोस्युर आपल्या वर्गात काढीत असे. असं त्याचे विद्यार्थी सांगतात.आपण आता भाषाविज्ञानाची नवी मांडणी करावी असा निर्धार करून सोस्युरनं या विज्ञानाच्या ‘भाषा’ या अभ्यास-विषयाचं स्वरूप, त्याच्या अभ्यासाच्या पद्धती व या अभ्यासाच्या उद्दिष्टांची पद्धतशीर मांडणी करायाचं ठरविलं. तशी संधीही त्याल लौकरच मिळाली.जिनिव्हा विद्यापीठानं त्याला ‘भाषाविज्ञान व इंडो-युरपिअन’ या विषयावर व्याख्यानं देण्याचं निमंत्रण दिलं. १९०६ ते १९११पर्यंत त्यानं आपल्या व्याख्यानांची तीन सत्रं पुरी केली. दुर्दैवानं १९१३ साली त्याचं अकाली देहावसान झालं. त्याच्या व्याख्यानांच्या वर्गात केलेल्या टिप्पणींवरून त्याच्या विद्यार्थ्यांनी १९१६ साली एक पुस्तक प्रसिद्ध केलं.[३] भाषाविज्ञानाच्या

अभ्यासात या पुस्तकानं एक मन्वंतर घडवून आणलं. पण ते पुस्तक फ्रेंचमध्ये असल्यामुळे इंग्लिशभाषी प्रदेशात त्याचा फारसा बोलबाला झाला नाही.

हिच दशा लीबनिझच्या प्रतिक-संयोजन-कलेची झाली. १९०० साली पॅरीस येथे भरलेल्या आंतरराष्ट्रीय तत्त्वज्ञान परिषदेत भाग घेण्यासाठी इंग्लंडहून व्हाइटहेड व रसेल हे तिथं गेले. लीबनिझच्या विचारांची प्रेरणा घेऊन नव्या तर्करचना घडविणाऱ्या बूल. फ्रेगे, पेआनो इत्यादी श्रेष्ठ गणिती तत्त्वज्ञांचे विचार व त्यांच्या तार्किक पद्धती जाणून ते भारले गेले. इंग्लंडात परत येताच त्यांनी हा सर्व अभ्यास इंग्रजीत मांडण्यासाठी पुष्कळ परिश्रम करून १९१० ते १९१३ पर्यंतच्या काळात तीन विशाल ग्रंथ[४] प्रकाशित केले. "तुमचे ग्रंथ अथपासून-इयीपर्यंत किती जणांनी वाचले?" असं जेव्हा कोणीतरी रसेलला त्यासुमारास विचारलं तेव्हा तो उत्तरला : "अवघ्या तिघांनी – व्हाइटहेडनं, मी व आमच्या टाइपजुळाऱ्यानं!"

ज्या गंगा-यमुना आपल्या संगमासाठी प्रयागाचा शोध करीत होत्या ते त्यांना १९१३ पर्यंत तरी सापडलं नाही हे स्पष्ट आहे. लौकरच १९१४ साली पहिल्या महायुद्धाची रणभेरी वाजली. युरपातल्या राष्ट्रांची मोडतोड झाली अनेकांची जीवनं उध्वस्त झाली; युरपातील सुंदर संध्याकाळ लौकरच मध्यरात्रीचा भयाण काळोख बनली. यातून कसंबसं स्वत:ला सावरून युरप उठून बसतं न बसतं तोच १९३९ मध्ये दुसऱ्या महायुद्धाच्या तोफा गरजल्या. युरपातील हवालदिल झालेले लोक अमेरिकेकडे आश्रयासाठी धावले. अमानुष क्रूरता, रक्तपात व शेवटी प्रचंड नरसंहार करणारा अणु-बॉँब!

१९४५ सालच्या ऑगस्ट महिन्यात जपानच्या हिरीशिमो व नागासाकी या शहरांवर अणु-बॉँब झोकले गेले त्याच महिन्यात भयग्रस्त युरपातून अमेरिकेत येऊन (१९४१साली) स्थायिक झालेल्या युरपिअन भाषाविज्ञानी रोमां याकोबसोन[५] यानं न्यूयॉर्कमधील एका संस्थेत भाषाविज्ञानावर व्याख्यानं दिली. ही भाषणं ज्यांनी मन:पूर्वक ऐकली त्यात (पुढे मानवसंस्कृतीशास्त्रज्ञ म्हणून

प्रसिद्धीस आलेला) लेव्हिस्ट्रॉस[६] हा होता याकोबसोनच्या व्याख्यानांनी तो इतका प्रभावित झाला की लगेच त्यानं भाकीत केलं की "पदार्थविज्ञानात अणु-सिद्धान्तानं जे कार्य केलं आहे तस्म सामाजिक विज्ञानात भाषाविज्ञान निश्चितच करणार !" अणु-विज्ञानाच्या सिद्धान्तानी निर्माण केलेल्या बाँबच्या प्रचंड संहारशक्तीविषयी नुकतंच ज्यांनी ऐकलं होतं त्यांना लेव्हि-स्ट्रॉसच्या या वाक्यानं चांगलाच हादरा बसला. या विज्ञानाचा प्रणेता कोण ? अशी सर्वत्र विचारपूस झाली. याकोबसोननं सोस्युरचं नाव जाहीर केलं. कोण सोस्युर? कुठला? त्याचे ग्रंथ कोणते? अशी सर्वत्र प्रुच्छा झाली. सोस्युर मूळचा स्विस, स्विट्झरलंडहून जर्मनीत शिक्षणासाठी गेलेला, पॅरीस विद्यापीठात संस्कृतचा प्राध्यापक बनलेला, त्याची पुस्तकं फ्रेंचमध्ये लिहिलेली ... इत्यादी फुटकळ गोष्टी अमेरिकेच्या युद्धाविजयाच्या उन्मादात कुठंच विरून गेल्या.

मग अमेरिकनांना सोस्युर समाजला का? असं जर कोणी विचारलं तर त्याला स्पष्टपणे उत्तर द्यावं लागतं : 'मुळीच नाही.' याची अनेक कारणं देता येतील. एकतर सोस्युरचं सारं लेखन फ्रेंचमध्ये होतं; त्याच्या विद्यार्थ्यांनी संपादिलेल्या 'कोर्स' या ग्रंथाचं इंग्रजी भाषांतरदेखील फारच उशिरा म्हणजे १९६० साली प्रगट झालं. दुसरं म्हणजे इंग्रजांना सोस्युर मुळीच समजला नाही.[७] विट्‌गेनस्टाइन (१८८९-१९५१)[८] याच्या भाषा-विश्लेषणविषयक तत्त्वज्ञानाचा त्या काळात इंग्लंडभरात उदोउदो होत असताना सोस्युरचा कोणी नामनिर्देशही केलेला आढळत नाही. तिसरं असं की ज्या तुलनात्मक भाषाविज्ञानात सोस्युरनं सर्वश्रेष्ठ कामगिरी केली होती तो अभ्यास अनेक विदग्ध भाषांच्या ज्ञानामुळे, पुरावस्तुविदांनी शोधून काढलेल्या प्राचीन भाषांच्या अभ्यासामुळे व नव्यानं प्रगट झालेल्या युरपातील भौगोलिक बोलीवैविध्यामुळे इतका अच्ध्द बनला होता की दोन महायुद्धांमधल्या तीस वर्षांच्या दीर्घ अवकाशात जवळ-जवळ लुप्त झाला होता. आणखीही एक महत्त्वाचं कारण असं होतं की सोस्युरच्या मतांना युरपातल्या रने देकार्त (१५९६-१६५०) या तत्त्वज्ञापासूनच्या ज्ञानमार्गांची जी पार्श्वभूमी होती तिचं ज्ञान अस्पष्टपणेच नव्हे तर काही अंशी विपरीतपणे अमेरिकेत पसरलं होतं. भाषाविज्ञानाच्या संदर्भात

या ज्ञानमार्गाचा परिचय करून देण्यासाठी नोअम चोम्स्की[९] यानं 'कार्तेझिअन भाषाविज्ञान' नावाचं पुस्तक १९६६ साली लिहिलं. त्यावर जी प्रखर टीका युरपातल्या विद्वानांनी[१०] केली त्यावरून अमेरिकनांना आपलं अज्ञान चांगलंच प्रतीतीस आलं. मग भारतात अमेरिकेच्या ज्या भाषाविज्ञानाचा १९५५ पासून बोलबाला झाला ते कुठलं व कसं प्रगटलं? अमेरिकेला दुसऱ्या महायुद्धात मिळालेल्या विजयामुळे व त्यामुळे सर्व राष्ट्रांचं पुढारीपण लाभल्यामुळे भारताला आपल्या स्वतंत्र्याच्या सुरुवातीच्या काळात परराष्ट्रांकडून ज्या शैक्षणिक मदती मिळाल्या त्यात भाषाविज्ञानाच्या अभ्यासासाठी अमेरिकेकडून मोठी देणगी मिळाली. अमेरिकेनं आपल्या व्यापारीवृत्तीचा त्या वेळीच परिचय करून दिला हे काहींनी ओळखलं कारण या भाषाविज्ञानावर Made in U. S. A. असा ठळक शिक्का मारला होता इतकचं नव्हे तर जाहिरातवाजीच्या प्रवृत्तीनुसार काही भारतीयांना त्याच्या प्रसारासाठी मधाची बोटंही चाटवली होती. अमेरिकेत तिचं स्वत:चं असं भाषाविज्ञान युद्धकाळात कसं निर्माण झालं या घटनेचं सर्वांनाच कुतूहल वाटलं. विशेष तपास करता असं आढळलं की दुसऱ्या महायुद्धात अमेरिकेला यश मिळण्याचं एक कारण असं होतं की अमेरिका व जपान यांच्यात पसरलेल्या विशाल पॅसिफिक महासागरातील अनेक बेटांवर अमेरिकेनं तत्काळ कब्जा मिळवून तिथं आपले लष्करी तळ निर्माण करून विमानं उतरविण्याची सोय केली होती. या बेटांवर राहणाऱ्या जमातींच्या भाषा शिकण्यासाठी व त्यांना वश करण्यासाठी अमेरिकन सरकारला तिथल्या अनेक मिशनरी संस्थांची मदत घ्यावी लागली. या मिशनरी संस्थांतील पाद्यांनी आपल्या धर्मप्रचारासाठी तिथल्या भाषांचा अभ्यास काही सोप्या शाळकरी पद्धतींनी केला होता व त्या भाषांसाठी लेखनपद्धतीही तशाच सोप्या, व्यवहारी मार्गांनी तयार केल्या होत्या. हा मिशनरी अभ्यास 'अमेरिकन भाषाविज्ञान' म्हणविला गेला व तो खपविण्यासाठी उत्तम छपाईची पुस्तकं भारतीय बाजारात आली. ती छातीशी धरून आमचे विद्वान विद्यापीठातील दालनांत भरणाऱ्या परिसंवादांमध्ये 'भाषाविज्ञानी' म्हणून मिरवू लागले. या

साऱ्या नाटकी व्यवहारात युरपचं भाषाविज्ञान व आमचा व्याकरणाभ्यास कुठंच दृष्टीआड झाले!

हा तोटा झाला; तशी नफ्याची बाजूही होती. १९५१ नंतरच्या दशकात अमेरिकेला जागतिक राजकारणात अग्रेसरत्वाचा मान मिळाला होता. त्यामुळे आपलं पुढारीपण टिकविण्यासाठी अमेरिकेला आपल्या तरूण पिढीला जे शिक्षण द्यायचं होतं ते नव्या दृष्टीचे. यासाठी अमेरिकेनं युरपातील विद्यापीठांच्या धर्तीवर रचलेले आपल्या विद्यापीठातील पारंपारिक स्वरूपाचे अभ्यासक्रम झटकून टाकून नवे ज्ञानमार्ग खुले केले. त्यात दोन महत्त्वाचे होते ते म्हणजे 'परमाणु-विज्ञान' व 'संगणक-विज्ञान'. लीबनिझच्या बुद्धीतून उगम पावलेल्या गंगा-यमुनांना शेवटी आपल्या संगमासाठी प्रयाग सापडलं ते अमेरिकेत. जरी अणूचं पहिलं विभाजन इंग्लंडातील प्रयोगशाळेत घडलं होतं व पहिले संगणक (पास्काल, लीबनिझ व बॅबेज यांचे)[११] युरपात बनविले गेले होते तरी या दोन्ही विज्ञानांचा अभ्यास अमेरिकेत वाढीस लागला. लीबनिझचं १ व ० या दोन संख्यांचं संगणक अंकगणित संगणक –सिद्धान्तात एकदम अर्थपूर्ण ठरलं; बूलचं 'बीजगणित' [१२] ही त्या संगणकांची भाषा बनली; व पाणिनीची सूत्रपद्धती ही त्या गणिती भाषेची नियमावली बनली. ही त्या संगणकांची भाषा बनली; व पाणिनीची सूत्रपद्धती ही त्या गणिती भाषेची नियमावली बनली. पाणिनी व लीबनिझ हे एकमेकांना भेटले ते अमेरिकेत. या त्यांच्या भेटीला आपण गुरु-शुक्र- युती हे नाव देऊ. जगाच्या अत्याधुनिक बौद्धिक अभ्यासाची मुहूर्तमेढ त्यांच्यामुळे झाली!

ज्या न्यूटनवादी विज्ञानाची व त्यातून निर्माण झालेल्या भौतिकवादाची पकड युरपच्या ज्ञानपरंपरेवर होती ती आइनस्टाइनच्या (१८७९-१९५५) सापेक्षता सिद्धातानंतर (१९१५) सैल झाली. त्यातूनच नव्या परमाणु-सिद्धान्ताचा जन्म झाला. 'अणोरणीयान् महतो महीयान्' असा विश्वात संचाराऱ्यासाठी ज्या नव्या गणिती रचना हव्या होत्या त्यांचा शोध सुरू झाला. तर्कशास्त्रात ज्याप्रमाणे अरिस्टॉटल व त्याची तर्क पद्धती बूलच्या

बीजगणितामुळे मागे पडली त्याप्रमाणे युक्लिडची भूमिती व तिची पूर्वधारणापद्धती युरपातल्या बोलयायी (१८०२- १८६०)[१४] इत्यादींच्या युक्लिडेतर भूमिति रचनांमुळे मागे पडली. या सर्व नव्या गणिती रचनांना बीजगणितीय आकार देण्यासाठी फेलिक्स क्लेइन (१८४९-१९२५) यानं १८७२ मध्ये 'एरलांगेर प्रोग्राम'[१५] नावाचा एक नवा गणिती कार्यक्रम जाहीर केला होता. यात भूमिती, बीजगणित व गणितीय विश्लेषण या वेगळ्या रचनांचं एकीकरण करणं कसं शक्य आहे हे स्पष्ट करण्यात आलं व ते समजल्याशिवाय आता गणित-विषयात एक पाऊलही पुढं टाकता येणार नाही असं सिद्ध करण्यात आलं. पण तसं करायच तर सर्व बौद्धिक ज्ञानात ठाण मांडून बसलेली ग्रीक तत्त्वज्ञांची तार्किक निगमन-पद्धती ढासळून पडेल अशी भीती गणितज्ञांना वाटू लागली. मग काय करायचं? असं जेव्हा त्यातल्या एकानं क्लेइनला विचारलं तेव्हा क्लेइन म्हणाला: "गणितज्ञांपेक्षा ते जे प्रतीकं निर्माण करतात ती अधिक शहाणी असतात. त्यांना विचारा." क्लेइनच हे उत्तर लीबनिझला आवडलं असतं व पाणिनीलादेखील. त्यानं तर 'वृद्धि:' असा आशीर्वादही देऊन ठेवला होता. आपल्या सर्व सूत्ररचनेची सुरवात त्यानं या शब्दानं केली आहे. 'वृद्धि' कोणाची ? कोणत्याही व्यक्तीची अथवा समाजाची नव्हे. आपण स्वत: निर्माण केलेल्या प्रतीक-व्यवस्थेची! ज्या भारतानं प्राचीन काळी '०' हे प्रतीक निर्माण करून साऱ्या आशियाखंडातल्या गणितशास्त्रात प्राण भरला, कुठलाही संगणक हाती नसताना ज्या भारतीय रचनाकारांनी हजारो सूत्रांच्या 'स्मृति'[१६] गुंफल्या त्या देशाला भाषेचा 'वैज्ञानिक' अभ्यास म्हणजे का या प्रश्नाचं उत्तर देता आलं नसेल असं वाटत नाही. कदाचित ते उत्तर इतकं सरळ व सोपं होतं की त्यावर फारसा विचार करण्याची कोणाला गरज वाटली नसावी. मीमांसाकार जैमिनी यानं 'दध्यत्र' या संस्कृतमधील शब्दप्रयोगावर भाष्य करताना असं म्हटलं आहे की या वचनात 'दधि+अत्र' या शब्दातील 'इ' व 'अ' यांचा य् झाला आहे तो ध्वनिविकार नाही , इथं 'वर्णान्तर' झालं आहे: वर्णान्तरं अविकार:|[१७] जैमिनीचा हा सहजोद्गार भारतीय ज्ञानपरंपरेतील प्रतीक-रचनेचा आधार स्तंभ आहे! पण त्यावर कितीजणांनी विचार केला आहे?

भाषा म्हणजे अक्षरं नव्हेत ; भाषा म्हणजे ध्वनी नव्हेत; भाषा म्हणजे शब्द नव्हेत; भाषा म्हणजे वाक्य नव्हेत. भाषा म्हणजे प्रतीक-व्यवस्था! जी कधीही स्थिर नसते. तिच्यात जे घडतं ते परिवर्तन नव्हे; तिच्यात जे घडतं ते प्रतियोजन. एकोणीसाव्या शतकातले युरपातले विद्वान भाषेच्या ध्वनींच्या परिवर्तानामागे लागून वात चुकले. त्यांनी या परिवर्तनाभ्यासातून निर्माण केली ती एक स्थिर, थिजलेली इंडो-युरपिअन. तिच्यामुळे त्यांचा सारा भाषाभ्यासही थिजून गेला. पाणिनीनं आपल्या काळातली सदैव बदलत राहणारी वैविध्यपूर्ण बोली, तिची स्थलकाळाप्रमाणे बदलणारी रुपं अभ्यासून सूत्र रचली व हीच प्रथा चालू ठेवा असा आपल्या शिष्यांना आदेशही देऊन ठेवला. काही शतकं त्यांच्या अनुयायांनी त्याची प्रथा चालू ठेवून त्याच्या रचनेत ते वार्तिकांची भर घालीत राहिले. मग एक दिवशी कोणीतरी ही सारी 'वृद्धी' बंद करून 'संस्कृत' या नावानं तिला स्थिर करून थिजवून टाकलं. मंद वाऱ्यावर मिणमिणाऱ्या पणत्या विझल्या. व्याकरण नावाचा एक नवा कंदिल जन्मास आला.

संस्कृत भाषेच्या या कंदिलाच्या प्रकाशझोतानं विल्यम जोन्झनं १७८६ साली साऱ्या युरपभरात नवा ज्ञानाची जागृती केली. नंतरच्या थोड्याच वर्षांत रास्क (१७८७-१८३२), ग्रिम (१७८५-१८६३), बोप (१७९१-१८६७) व हुंबोल्ट (१७६७-१८३५)[१८] यांनी या नव्या भाषा भ्यासात लक्ष घातलं तेव्हा हाच कंदिल, अल्लाउद्दीनचा जादूई चिराग बनून, त्या अभ्यासाला शब्दशास्त्रीय जंजाळातून सोडवून विज्ञानाच्या क्षेत्रात आणून सोडण्यास उपयोगी ठरला. रास्क व ग्रिम हे जरी संस्कृतज्ञ नव्हते तरी त्यांना भाषांच्या वर्णव्यवस्थांचं जे दर्शन झालं ते नव्या गणिती स्वरूपाचं होतं. भाषाविज्ञानाचं उद्दिष्ट काय या प्रश्नाचं उत्तर देताना ग्रिमनं आपल्या ग्रंथात म्हटलं आहे की "स्थलकालाबरोबर बदलणाऱ्या आपल्या भाषेतील स्थिर तत्त्वांचा शोध"[१९] हे! फेलिक्स क्लेइनला ग्रिमचं हे उद्दिष्ट पटलं असावं, कारण त्याचा 'एरलांगेर' कार्यक्रम याच प्रकारचा होता. बोप हा संस्कृतचा तसंच पर्शिअन, ग्रीक, लॅटिन, गोथिक वगैरे भाषांचा विद्वान होता.त्यानं विविध भाषांच्या रूपव्यवस्था तुलनात्मक पद्धतीनं अभ्यासून त्यांच्यात कालक्रमानं प्रतियोजन कसं होतं जातं याचा अभ्यास केला, व त्या

भाषांच्या स्थिर तत्त्वांच्या व्याकरणिक रचनांचा शोध केला.ग्रिम व बोप यांचा समकालिन हुंबोल्ट याचे विचार तर फारच मोलाचे आहेत व त्यामागील बीजगणितीयरहस्य अलीकडील काळात सुस्पष्ट झालं आहे. युरपातला प्रसिद्ध जर्मन तत्त्वज्ञ कान्ट (१७२४- १८०४)[२०] यानं १८७१ साली आपला श्रेष्ठ ग्रंथ ('विशुद्ध बुद्धितत्त्वांचा विश्लेषणात्मक अभ्यास') प्रसिद्ध केला. या ग्रंथावर हर्डर[२१] या भाषाभ्यासूनं अशी टीका केली की या ग्रंथात कुठंही कान्टनं मानवी भाषेविषयी काहीही लिहिलेलं नाही. जर मानवी बुद्धितत्त्वांचं विश्लेषण करायाचं तर मनुष्यांना आपल्या बुद्धीचा विकास ज्या साधनानं साधता येतो त्या भाषेचा विचार केला नाही तर ती सर्व चर्चा पोकळ ठरते. हर्डरचं हे मत हुंबोल्टला पटलं व कान्टच्या अभ्यासातील ही उणीव भरून काढण्याचं त्यानं ठरविलं. जावा बेटावर राहणाऱ्या एका जमातीच्या 'कावी' या प्राचीन भाषेवर लिहिलेल्या आपल्या ग्रंथाच्या[२२] प्रस्तावनेत त्यानं आपले विचार विस्तारानं मांडले आहेत. भाषाभाषांमधील काही ध्वनी समान आढळतात हे तो मान्य करतो, परंतु त्या ध्वनींची समीकरणं मांडून ती जणू निसर्गाचे कायदे (laws) आहेत असं म्हणणं त्याला चुकीचं वाटलं. त्याच्या मते ही समीकरणं म्हणजे केवळ सापेक्ष संबंध (correlations) आहेत. तो म्हणतो: "भाषा ही काही वस्तू नाही, क्रिया नाही, किंवा स्थिर गोष्ट नाही. ती एक स्वत:ला सदैव क्षणोक्षणी घडवत जाणारी (arzeugung) व्यवस्था आहे. तिचे ध्वनी, शब्द, रूप इत्यादी स्थिर मानून त्यांचा तुलनात्मक अभ्यास कारणं हा अशास्त्रीय उपद्व्याप आहे. खरा भाषाभ्यास तिच्यातल्या प्रतीकांच्या जिवंत सृजनशक्तीचा अभ्यास असायला हवा."

वर उल्लेखिलेल्या सर्व भाषाविज्ञानींना केवळ ध्वनिपरिवर्तनापेक्षा प्रतियोजन व त्याच्या तत्त्वांचं दर्शन हे भाषाविज्ञानाच्या अभ्यासाचं महत्त्वाचं उद्दिष्ट वाटत होतं. परिवर्तन हे ध्वनिशास्त्राच्या प्रात्यक्षिक आधारे मांडता येतं, हे खरं परंतु त्याजोगे भाषेच्या 'स्थिर' तत्त्वांचं रहस्य उकलता येत नाही. भाषाविज्ञानाच्या भाषेत बोलायचं झालं तर असं समजा की एखाद्या मूळ भाषेत * प् हा ध्वनी होता. हा प् ध्वनी नंतरच्या एका भाषेत प् हा असाच राहिला व

दुसऱ्या भाषेत व् असा ‘परिवर्तित’ झाला तर आपण ही दुसरी भाषा बोलणाऱ्या लोकांना तो मूळ प् ध्वनी बोलायला अवघड होता म्हणून त्यांनी तो बदलला असं म्हणू शकत नाही. ज्यांना व् बोलता येतो त्यांना प् बोलणं अवघड का व्हावं? या साध्या गोष्टीवरून ध्वनिसमीकरणं मांडणं म्हणजे काही मोठा शोध लावणं असं नसून केवळ काय सापेक्ष आहे हे स्पष्ट करणं आहे. भाषेच्या अस्थिरतेचं ते एक तथ्य असतं, पण तिच्या विकासशक्तीचा तो उलगडा (explaination) होऊ शकत नाही.

दुसऱ्या एका साध्या उदाहरणानं परिवर्तन व प्रतियोजन यांच्यातील फरक समजविता येईल. संस्कृतमध्ये ‘१’ या संस्थेसाठी ‘एक’ हा शब्द आहे व तो संस्कृतमध्ये ‘एकविंशति,’ ‘एकत्रिंशत्’ वगैरे शब्दांत ‘एक’ असाच आढळतो. परंतु ‘११’ ही संख्या बोलताना मात्र ‘एकादश’ असं बोलावं लागतं. इथं पूर्वीच्या संस्कृतभाषी लोकांना ‘एकदश’ बोलणं काही अवघड नव्हतं. पण मग त्यांनी ‘एक’ चं ‘एका’ का केलं? त्यामागे तर कुठलंही ध्वनिशास्त्रीय कारण नाही. असल्या गोष्टींवर भाष्य करताना बोपचा अनुयायी शेरेर[२३] यानं आपल्या एका ग्रंथात थोडं भीत-भीत असं म्हटलं की आपल्या उदाहरणात कुठल्यातरी ‘प्रमादी’ प्रतियोजनेमुळे[२४] असं घडलं असावं. संस्कृतमधील संख्यापठनक्रमात पुढे येणाऱ्या ‘द्वा-दश’ या शब्दामुळे त्याच्या अगोदरच्या ‘एकादश’ शब्दातील ‘एक’ ऐवजी ‘एका’ असं प्रतियोजन ‘चुकून’ झालं असावं.

शेरेरच्या या भाष्यामुळे भाषाविज्ञानात नवे प्रश्न उदभवले. एकतर, या प्रमादामागे जी अपवादात्मक व अव्याकरणीय प्रेरणा आहे ती कशी समजवायची? दुसरं असं की एका बोलणारानं केलेला हा प्रमाद सर्वजण कसा करू लागतात? आणि तिसरं असं की हा प्रमाद ज्या वेळी घडतो त्या वेळी सर्व विद्वानांनी मानलेला ‘कारण परिणाम’ यांचा क्रम बदलून आधी परिणाम व कारण नंतर (परिणाम कारण) असा कसा बनतो? भविष्यात काय येणार हे मानवी मनाला कळून त्याअन्वये ते आधीच त्यासाठी तयारी कशी करू शकतं?

थोडक्यात, काळ हे तत्त्व मागे कसं जातं? किंवा मानवी मनाला भविष्यज्ञानाची शक्ती कशी साधते?

प्रश्न अवघड होते. प्रथमत: त्यांचं महत्त्वही कोणाच्या नजरेत आलं नाही. पण हे मान्य करायला हवं की शेरेरनं मांडलेल्या 'प्रमादी प्रतियोजन' या कल्पामुळे आपण भाषाविज्ञानाच्या अभ्यासाच्या अशा एका मुद्यापाशी येऊन ठेपलो की ज्या ठिकाणी सामान्य विज्ञानाभ्यासातील निगमन ही तर्कपद्धती कुचकामाची ठरते व तिच्याऐवजी मानवी मनाच्या सृजनशक्तीच्या म्हणजे प्रतियोजन तत्त्वांचा शोध नव्यानं करावा लागतो. या दृष्टीनं विचार केला तर बूलप्रमाणे शेरेर हादेखील 'एका नव्या युगाचा माणूस' होता. शेरेरच्या विचारांचं महत्त्व सोस्युरला चांगलं पटलं होतं. त्याचे प्राध्यापक ओस्थोप व ब्रुगमान यांनी त्याच्याविषयी काढलेले उद्‌गार[२५] सोस्युरच्या चांगले ध्यानात राहिले असावेत. "शेरेरनं आपल्या 'प्रमादी प्रतियोजने'च्या विचारानं भाषाभ्यासात एक सर्रास 'समानीकरणा'चं जे तत्त्व (principle of levelling) दाखल केलं आहे त्यामुळे काही भाषासंशोधक गोंधळून गेले आहेत. परंतु भाषाविज्ञानाच्या अभ्यासापुरतं बोलायचं तर हे तत्त्व आजपर्यंतच्या सर्व व्याकरणिक रूढींविरुद्ध आहे म्हणून त्याच्याविषयी अविश्वास प्रगटझाला तरी नव्या विचारांच्या तरुण अभ्यासकांच्या मनात त्यामुळे नवी सुगी प्रगट होईल असं आम्हांला वाटतं," असं त्यांनी म्हटलं आहे. सोस्युरला त्यांचे हे विचार चिंतनीय वाटले असावेत. नव्या विचारकांच्या तरुण अभ्यासकांत तो आघाडीवर होता आणि म्हणूनच आपल्या 'कोर्स' मध्ये त्यानं ध्वनिपरिवर्तनापेक्षा भाषेत प्रतियोजन कसं होत राहतं यावर विशेष भर दिला आहे. भाषेच्या व्यवस्थेत जी विविधता असते व समानीकरण या तत्त्वानुसार तिच्यात सदैव जे प्रतियोजन घडत राहतं याविषयी ओस्थोप व ब्रुगमान यांनी जरी सहमतीचे विचार मांडले तरी त्यांनी "आपण या क्षेत्रात धारिष्ट्य करून फार वर न जाता आपल्या कुवतीप्रमाणे बेताच्या उंची इतकंचवर उडण्याचा प्रयत्न केला आहे." असं म्हटलं आहे. सोस्युरला त्यांच्या पलीकडे वर उडावंसं वाटलं!

आणि म्हणूनच त्यानं 'कोर्स' मध्ये एक अगदी सरळ प्रश्न विचारला आहे: "प्रतियोजन हा प्रकार अगदी स्पष्टपणे पाहिला तर काय आहे? लोकांना सामान्यत तो परिवर्तन वाटतो. पण खरोखर तो परिर्तन आहे का? ... अगदी स्पष्ट भाषेत बोलायचं तर हा प्रकार परिर्तन नसून सर्वसामान्य मानवी मनातील ते एक नवनिर्मितीचं तत्त्व आहे... प्रतियोजन या तत्त्वामागे भाषेच्या रचनेतील घटकांच्या परस्परसंबंधांचे भान आणि ज्ञान असतं... त्यासाठी अर्थ हा आवश्यक आहे. ध्वनिपरिवर्तनात अर्थाचं काहीच कार्य नसतं, प्रतियोजनेत अर्थ असलाच पाहिजे."[२६]

सोस्युरनं मांडलेल्या विचारांच्या दृष्टीनं ओस्थोप व ब्रुगमान यांनी लिहिलेल्या प्रबंधाचा नीट अभ्यास केला तर असं आढळून येतं की त्यांचही मत असं होतं की, "माणसांची भाषा आणि तिच्यात ती जे नावीन्य ओतत राहतात या गोष्टी केवळ ध्वनिशास्त्राच्या तात्त्विक चर्चेनं समजविता येत नाहीत. त्यासाठी भाषांतील ध्वनिपरिवर्तनाची असंख्य आवर्तनं, त्यांच्यात नव्यानं घडत राहणारी व्याकरणिक रूपं व त्यांचे अर्थ, व अलीकडे विचारात घेतली जाणारी प्रतियोजनेची उदाहरणं यांचा एकत्रित विचार करायचा म्हटला तर या सर्व भाषिक गोष्टींचा विचार करणारं एक व्यापक विज्ञान हवं. पूर्वीच्या तुलनात्मक भाष्याभ्यासात केवळ ध्वनिशास्त्रावर भर दिला गेल्यामुळे भाषाव्यापारांमागील मानसशास्त्रीय तत्त्वांकडे दुर्लक्ष झालं आणि त्यामुळे पुष्कळ प्रमाद घडले आहेत.या प्रमादांच्या मुळाशी जे कारण होतं ते हे की बाह्यतः परिवर्तन वाटणाऱ्या काही घटनांच्या पोटात जी मानसशास्त्रीय तत्त्वं कार्य करीत असतात त्यांची आपणाला जाणीव झाली नाही व झाली तरी ती वैज्ञानिक रीतीनं कशी मांडावी याविषयी अज्ञान होतं. मौखिक अवयावांद्वारा ध्वनिरूप बाह्यांग धारण करून प्रत्यक्षात अवतरण्यापूर्वी भाषाघटकांतअसल्या मानसिक तत्त्वांची धारणा झालेली असते."[२७] ओस्थोप व ब्रुगमान यांच्या अवतरणातील शेवटच्या वाक्यातील आशय एका सध्या उदाहरणानंसमाजाविता येईल तो असा की मराठी बोलणाऱ्या माणसानं आपल्या वाकप्रयोगातालं नाम अद्याप न उच्चारताही

ते पुल्लिंगी आहे की स्त्रीलिंगी आहे हे तो ते बोलण्याआधीच्या विशेषणान्तीच्या किंवा सर्वनामान्तीच्या प्रयोगात कसं ठरवू शकतो? उदाहरणार्थ,

काळा कोळी त्याचा मुलगा

■ ■

पिवळी पाकोळी त्याची मुलगी

■ ■

आपल्या काळातलं भाषाविज्ञान रूढ ध्वनिशास्त्रीय व व्याकरणिक बेड्यांमध्ये अडकून पडलं आहे असं सोस्युराला वाटत होतं. त्यासाठी त्याची इच्छा होती की बव्या भाषाविज्ञानींनी भाषांच्या कित्येक शतकांच्या उत्क्रमणात जी तत्त्व त्यांच्यात लपून नवसर्जनाचं कार्य करीत राहतात त्यांचा अभ्यास करायला हवा. यासाठी ओस्थोप व ब्रुगमान यांचा मानसशास्त्राचा आधार त्याला पसंत नसावा, कारण कोणत्याही विज्ञानात एकदा मानसशास्त्राला प्रवेश मिळाला की जो मनोनिगमवाद (psychologism) बोकाळतो तसं काही भाषाविज्ञानात होऊ नये असं त्याला वाटलं असावं. भाषांच्या उत्क्रमणतत्त्वांच्या अभ्यासानं त्यांच्यात संततपणे घडत राहाणारं प्रतियोजन त्यांना "एका व्यवस्थेतून दुसऱ्या व्यवस्थेत " साकारण्यात कसं मदतरूप होतं याचा विचार करायला हवा असं त्याला वाटलं. त्यासाठी भाषांचा बीजगणिती अभ्यास व्हायला हवा. त्यायोगे सांधे जोडणं हे भाषाविज्ञानाचं कार्य व्हायला हवं."

सोस्युरनं ज्या वेळी हे विचार प्रगट केले त्यावेळी ब्रुगमान[२८] हयात होता. शेरेरनं १८६८ मध्ये मांडलेल्या 'प्रमादी प्रतियोजन' या तत्त्वामुळे भाषाविज्ञानानं आता नव्या दिशेनं पुढील प्रवास करायला हवा याची आपणाला जाणीव झाल्याची कबुली त्यानं आपल्या Morphologische Untercushungen (१८७८) या ग्रंथाच्या प्रस्तावनेत दिली होती. त्याच्या सुप्रसिद्ध Grundriss या ग्रंथाची (मूळ ग्रंथ १८८६-१९००) दुसरी आवृत्ती १९१६ त प्रसिद्ध झाली.

तिच्यात ध्वनिनियामांची 'अंध निश्चितता' (blind necessity) आणि त्यांचे 'यांत्रिकशरीरशास्त्रीय' (mechanical-physiological) निर्णय या संबंधी त्यानं अवाक्षरही लिहिलं नाही असं त्यांच्या ग्रंथांचा सूक्ष्म अभ्यास करणाऱ्या अॅना मॉरपुर्गो डेविज[२१] या विदुषीनं म्हटलं आहे. आपल्या विषयाचं वैज्ञानिक स्वरूप टिकविण्यासाठी ध्वनिशास्त्रीय उपपत्तीपेक्षा अधिक व्यापक अशा दुसऱ्या एखाद्याउपपत्तीची जरूर आहे याची ब्रुगामानला खात्री पटली असावी, असं तिला वाटतं, एकोणिसाव्या शतकात ध्वनि नियमानं सुरु झालेल्या भाषाविज्ञानाची परिपूर्ती १९१६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ब्रुगामानच्या या ग्रंथानं झाली असं म्हटलं तर नव्या युगाच्या भाषाभ्यासाचा उषःकालदेखील त्याच वर्षी प्रसिद्ध झालेल्या सोस्युरच्या 'कोर्स' मध्ये प्रगट झाला असं म्हणायला हवं. या उषेच्या प्रकाशात प्रथम प्रगटला तो प्रभात-तारा-लीबनीझ! व्याकरणाच्या कंदिलाची किंवा अल्लाउद्दीनच्या चीरागाची आता जरूर नव्हती.

संदर्भ व टीपा

१. Grorge Boole (1815-1864): The Mthematical Analysis of Logic, 1847

२. F. de Saussure: Course in General Linguistics (Peter Owen,1960), xiii; 99

३. Course de Linguistique gnrale (Payet, Paris, 1916)

A. N. Whitehead aand B. Russell : Principia Mathematica, Vot. I-III (Cambridge; 1910-12)

५. Roman Jakobson (1896-1982)

६. C. Lvi – Strauss (1908 -)

७. Edwin Ardener Social Anthropology and Language (Tavistock, 1971)

८. Ludwing Wittgenstein (1889- 1951)

९. Noum Chomsky: Cartesian Linguistics (Harper, 1966)

Hans Aursloff :'The History of Linguistics and Professor Chomsky', Language, 46: 3 1970.

११. B. Pascal (1623- 1662); Charles Babbage (1792-1871)

१२. Booleawan Algebra

१३. Bolyayi (1802-1860)

१४. Lobatchevsky (1793- 1856)

१५. Flix kline (1849-1925): 'Erlanger Prograamme' (1872)

१६. पाणिनिना स्मृतिर्निबद्धा (काशिका)

१७. जैमिनी : मीमांसा, १.१, १० १६

R. Rask (1787-1832), J. Grimm (1785-1863), F. Boop (1791-1867), W. Humboldt (1767-1835)

"to explore the ever-resting element of our language which changes with time and place."

२०. I.Kant(1724-1804) Critique of Pure Reason (1781)

२१. J. G. Herder (1744-1803)

२२. W. Humboldt: Uber die Kawisprache out der Inset Jawa (1836-40)

२३. W. Schere (1841- 1886): Zur Geschichte der deutschen Sprache (Berlin. 1868)

२४. 'Faser analogy'

W. P. Lohamann : A Reader in Nineteenth-Century Historical Indo-Europran Linguistics (Indiana U. Press, 1967. p. 198 f. 'prefece to Morphological Investigations in the spkere of Indo-Europran Language I,' by H. Osthoff and K. Brugmann)

२६. Course, p. 165.

२७. W. P. Lohmann. 162-3

२८. Karl Brugmann (1849-1919)

Anna Morpurgo Davies: 'Karl Brugmann and Late Nineteenth Century Linguistics' (Shidies in the History of Western Linguistics. ed. T. Bynon and F. R. Palmer, Cambridge, 1986)

R. Rask (1787-1832): Underspgelse om det gamle nordiske eller islandske sprogs oprindelse. Copenhagen, 1818.

* बुलचं नाव भारतापर्यंत आलं होतं हे 'टाइमस ऑफ इंडिया'च्या सप्टेंबर ११, १८८६ च्या अंकातील एका सदरातील पुढील वाक्यांवरून स्पष्ट होईल. कोण आहे हा बूल? ...जरी त्याचं नाव व कीर्ती भारतापर्यंत पोचली नसली तरी

तो एका नव्या युगाचा माणूस आहे. ‘अॅथेनियम’ नावाच्या मासिकात जॉर्ज बूलची विद्यार्थिनी व नंतर त्याची पत्नी (१८५५-६४)हिनं असं लिहिलं आहे (ऑगस्ट २३, १८८४) की जर बूल व तात्कालिन तर्कज्ञ जेव्हन्स (W. S.Jevans, १८३५-८२) यांच्यात मतभेद असला तरी जीव्हॉन्सनं असे उद्गार काढले आहेत की, ‘बुलचं जीवन हा मानवी बुद्धिमत्तेच्या वैचारिक क्षेत्रातील एक महत्वाचा टप्पा आहे. त्यानं तर्कशास्त्राच्या क्षेत्रात अशी क्रांती केली आहे की अॅरिस्टॉटलच्या प्राचीन युगापासून आजपर्यंतच्या ज्ञानक्षेत्राच्या इतिहासात तिला तोड नाही.”

*उदाहरणार्थ, इंडो-युरपिअन ap, संस्कृत *pas ap*sआपस, ग्रीक appos, पर्शिअन b.

९. नव्या दिशांचा शोध

युरोपातल्या १९ व्या शतकाच्या सुरुवातीच्या भाषाविज्ञानाच्या संशोधकांपैकी प्रमुख भाषाविज्ञानी ग्रिम (१७८५ -१८६३) याच्या मृत्यूची शतसंवत्सरी १९६३ साली अमेरिकेत साजरी होणार होती. त्या निमित्तानं जॉन वॉटरमन[1] यानं 'भाषाविज्ञानातील दृष्टीकोन' नावाचं एक छोटंसं पुस्तक प्रसिद्ध केलं. आपल्या या पुस्तकात वॉटरमननं युरपातल्या एक शतकभराच्या भाषाविज्ञानाची वाटचाल स्पष्ट केली. अमेरिकेत प्रसिद्ध झालेलं हेच पहिलं पुस्तक होतं की ज्यात भाषांच्या अभ्यासात युरपातल्या ग्रिमपासून सोस्युरपर्यंतच्या भाषाभ्यासूंनी ध्वनिरचनांच्या आधारावर जी संरचना-पद्धती रचली व इंडो-युरपिअनची उभारणी केली त्यांचा थोडक्यात, पण पद्धतशीरपणे परामर्श केलेला आढळतो.

वॉटरमनचं पुस्तक प्रसिद्ध झालं त्याच सुमारास, म्हणजे १९६३-६४ सालात, विल्यम ब्राइट[2] यानं 'सामाजिक भाषाविज्ञान' नावाचा नवा भाषाभ्यास आता रूढ करायला हवा असा विचार मांडला. हा विचार आपणाला कसा सुचला हे सांगताना ब्राइट लिहितो :

"१९४९ च्या उत्तरार्धात व १९५० च्या सुरुवातीस मी जेव्हा भाषाविज्ञानाचा विद्यार्थी होतो तेव्हा जे भाषाविज्ञान रूढ होतं ते मुख्यत्वे नव-ब्लूमफील्ड-वादींचं, मन किंवा अर्थ असल्या कल्पांना दुरूनही स्पर्श न करणारं होतं. सुदैवानं मी जिथं शिकत होतो तिथं म्हणजे बार्कली विद्यापीठात सापिर याच्या विचारांचं मोहन आम्हांला दिल्या जाणाऱ्या भाषाविषयक विचारांच्या पावरोटीत घातलेलं असायचं...

माझं अमेरिकेतलं शिक्षण संपल्यानंतर १९५६ ते १९५८ ही दोन वर्षं मी भारतात राहिलो. १९५६ मध्ये एके दिवशी पुण्यात जॉन गम्पर्झ याच्याशी विचार-विनिमय करीत असता भाषांच्या अभ्यासात त्यांच्या सामाजिक

स्वरूपाचा विचार प्रामुख्यानं दाखल करायला हवा ही कल्पना मला चाटून गेली."

याच सुमारास विल्यम लाबोव्ह[३] – हा शिक्षणानं जरी आद्योगिक रसायनशास्त्राचा विद्यार्थी होता तरी आवड म्हणून भाषाविज्ञानाकडे वळला होता, त्यानं लिहिलं :

"१९६१ माझी कोलंबिया विद्यापीठातील उरिएल वेइनरेइख याच्याशी ओळख झाली. तो माझ्यापेक्षा वयानं थोडा मोठा होता व त्यानं १९६६ मध्ये मला व मार्विन हेरझोग याला आपल्याला एक निबंध लिहिण्यात साहाय्य करण्यासाठी बोलाविलं. आम्ही तिघांनी तो प्रबंध टेक्सास विद्यापीठात १९६६ च्या एप्रिल २९-३० रोजी भरलेल्या एका परिसंवादात वाचला गेला. या प्रबंधाचा भर भाषा ही एक ऐतिहासिक परिमाणात घडली जाणारी व्यवस्था असून तिचा अभ्यास सामाजिक दृष्टीनंच व्हायला हवा या गोष्टीवर होता."

खरं पाहता व्हिटनी (१८२७-१८९४)[४] या १९ व्या शतकातील प्रसिद्ध संस्कृतज्ञ व अमेरिकन भाषाविज्ञानीनं "भाषा हे मानवी सामाजिक व्यवस्थेत व त्या व्यवस्थेच्या संदर्भात घडवलं जाणारं महत्त्वाचं संवाद-साधन आहे" हा विचार मांडलेला होता. व्हिटनीच्या या विचारानं भारावून जाऊन सोस्युरनंदेखील भाषांच्या निव्वळ ध्वनिसमीकरणांच्या अभ्यासाकडून भाषेच्या व्यापक सामाजिक स्वरूपाच्या अभ्यासाकडे आपण वळलो असा आपल्या 'कोर्स'मध्ये (१९१६) निर्वाळा दिला आहे. भाषाविज्ञानाच्या अभ्यासात भाषेचं स्वरूप समजून घेण्यासाठी तिच्या ऐतिहासिक परिवर्तनशीलतेचा अभ्यास अत्यावश्यक आहे असं ब्लूमफील्डनं आपल्या 'भाषा' (१९३३)[५] या ग्रंथात म्हटलं आहे. एकंदरीत भाषेच्या वैज्ञानिक अभ्यासासाठी तिच्या ऐतिहासिक परिवर्तनशीलतेचा व तिच्या सामाजिक चौकटीचा अभ्यास आवश्यक आहे हे विचार खुद्द अमेरिकेतील भाषाभ्यासात अगोदरच प्रगट झाले असताना १९६३ ते

१९६६ या दोन-तीन वर्षांत त्यांचा अगदी नव्यानं भारपूर्वक उच्चार का करावा लागला?

याचं कारण असं की अमेरिकेत ज्या 'मिशनरी' भाषाभ्यासाची रचना १९४५ नंतर झाली तिच्यात या दोन्ही गोष्टींना स्थान नव्हतं. एका अ-वैज्ञानिक व्यवहारवादानं अमेरिकन विद्वान त्या वेळी झपाटले गेले होते. या गोष्टीचं दृश्य स्वरूप म्हणजे झेलिग हॅरीस[६] याचं 'संरचनात्मक भाषाविज्ञानातील रीती' (१९५१) हे पुस्तक. या पुस्तकाचं अमेरिकेत एवढं कौतुक झालं की स्वत: हॅरीसनं जरी म्हटलं की "मी माझंच पुस्तक जेव्हा पुन्हा वाचलं तेव्हा मला ते कळलं नाही" तरी ते कौतुक ओसरण्याऐवजी द्विगुणित झालं! हॅरीसच्या या पुस्तकाच्या नावातला एकच शब्द पुरे होता, तो म्हणजे 'संरचना'. १९५१ पासून १९६१ पर्यंत या शब्दानं अमेरिकनांना वेड लावलं होतं. त्यामुळे 'संरचना' हा कल्प नवा नसून रास्क-ग्रिम यांच्यापासून सोस्युरपर्यंतच्या युरपातल्या भाषाविज्ञानींनी या दृष्टीनंच भाषांचा अभ्यास केला असं वॉटरमनला आपल्या पुस्तकात नव्यानं स्पष्ट करावं लागलं. अमेरिकनांच्या या शब्दाच्या कौतुकामुळे त्यांचं युरपातील भाषाविज्ञानाच्या इतिहासाचं अज्ञान मात्र प्रगट झालं. हे अज्ञान पुढेही बरीच वर्षं टिकलं. १९६८ च्या मार्च महिन्यात पॅरिसजवळील नांतेरे विद्यापीठातील स्थापत्यविभागातील विद्यार्थ्यांनी आपल्याला शिकविल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमाविरुद्ध बंड पुकारलं. या अभ्यासक्रमातील जो एक दृष्टिकोन शिळा झाला होता तो काढून टाकून नवा दृष्टिकोन स्वीकारून पुढं जायला हवं अशी त्यांची मागणी होती. तो जुना दृष्टिकोन होता 'संरचनावाद'. विद्यार्थ्यांच्या या बंडानंतर दीड महिन्यांनी नांतेरेच्या एका सूचना-पटावर एका अध्यापकानं ठळक अक्षरांत लिहिलं.

"जगाच्या इतिहासात मे १९६८ हा केवळ पॅरिस मधील विद्यार्थ्यांच्या बंडाचा महिना म्हणून नव्हे तर युरपमध्ये संरचनावादाचा मृत्युघंट वाजल्याचा महिना म्हणून नमूद करायला हवा."

अमेरिकेत या मृत्युघंटेचा काहीही पडसाद उमटला नाही.

युरपपासून फारकतलेल्या व एका अ- वैज्ञानिक व्यवहारवादानं झपाटलेल्या अमेरिकन 'मिशनरी' भाषाविज्ञानानं संरचनावादाचा झेंडा उभारून स्वतःचा जो उदोउदो चालविला होता त्याच्या अशास्त्रीयतेवर ज्यानं प्रथम जारोचा हल्ला केला तो म्हणजे नोअम चोम्स्की [७] यानं. नवव्या आंतरराष्ट्रीय भाषाविज्ञानी परिषदेच्या १९६२ या वर्षीच्या अधिवेशनात त्यानं 'भाषावैज्ञानिक सिद्धान्ताचा तात्त्विक पाया' हा निबंध वाचला. त्याची सुधारलेली आवृत्ती 'भाषावैज्ञानिक सिद्धान्तातील आधुनिक समस्या' या नावानं १९६४ साली प्रसिद्ध झालेल्या 'भाषेची संरचना' या ग्रंथात दिली आहे. मानवी भाषेसंबंधी 'नवे' म्हटले जाणारे सर्व आधुनिक सिद्धान्त सतराव्या शतकातील युरपमधील रने देकार्त (१५९६-१६५०) या तत्वज्ञानं मांडलेल्या विचारांना तोंड देण्यास असमर्थ असून अमेरिकन भाषाविज्ञानींच्या नव्या संरचना पद्धती तर्कशास्त्रदृष्ट्या किती चुकीच्या आहेत हे चोम्स्कीनं आपल्या निबंधात स्पष्ट केलं. या निबंधाच्या अगदी पहिल्या परिच्छेदात चोम्स्की लिहितो:

माणूस हा पोपटासाराखं अनुकरण करणारा किंवा शब्दाला शब्द जोडून वाक्य निर्माण करणाऱ्या यंत्रासारखा नाही. तसा तो असता तर त्याला आपल्या भाषेत बदल घडवून आणता आला नसता... भाषा बोलणं म्हणजे ऐकलेले शब्द जसेच्या तसे बोलणं असं नसून त्यांच्या अर्थाचे इतर व त्यांना संवादी असे दुसरे शब्द अथवा रचना योजणं हे मानवी भाषाव्यवहाराचं लक्षन आहे. भाषेच्या या नवनिर्मितिक्षमतेचं स्वरूप ज्यात स्पष्ट केलं जात नाही अशा भाषिक किंवा व्याकरणिक सिद्धान्तांचा उपयोग बेताचाच आहे, असं समजावं."

भाषेच्या नवनिर्मितिक्षमतेविषयी लिहिताना चोम्स्कीनं दोन सिद्धान्तांची चर्चा केली आहे, एक व्हिटनीचा व दुसरा हूंबोल्टचा. व्हिटनीचा सिद्धान्त त्याला मुळीच पटला नाही, कारण व्हिटनीच्या मते "भाषा म्हणजे एक खजिना, मनुष्यांनी आपले विचार प्रगट करण्यासाठी बनविलेला शब्दांचा व प्रयोग-

नियमांचा पेटारा." युरपातला जो भाषाविज्ञानी चोम्स्कीला विशेष आवडला तो म्हणजे हूंबोल्ट. भाषेच्या नवनिर्मितिक्षमतेविषयी हूंबोल्टनं जे म्हटलं आहे ते जर्मन भाषेत, इंग्रजीत भाषांतर न करता, चोम्स्कीनं उद्धृत केलं आहे ते असं : (die sparche) मास daahervon endlichen Mittein einem unendlishen Geprauch machen.(याचं इंग्रजी भाषांतर : (Language) must therefore make unlimited use of limited means) याचा आशय असा की भाषा ही एक अशी व्यवस्था आहे की जी माणसाला त्यानं आत्मसात केलेल्या थोड्या रचनांच्या आधारे दुसऱ्या अनंत रचना घडविण्याची क्षमता देते. लहान मूल आपल्या अज्ञानावस्थेत भाषा शिकतं म्हणजे ही क्षमता मिळवितं. ज्या युरपिअन तत्त्वज्ञानाच्या विचारांवर हुंबोल्टचे हे विचार आधारलेले होते त्याविषयी चोम्स्कीनं आपल्या या निबंधात अवाक्षरही लिहिलं नाही तसंच हुंबोल्टवर अमेरिकेत १८८५ साली दोन पुस्तकं[८] लिहिली गेली होती त्यांचाही उल्लेख केला नाही.

ग्रिमची शतसंवत्सरी १९६३ साली साजरी झाली. त्यानंतर चारच वर्षांनी येणारी फ्रान्झ बोप (१७११-१८६७) या भाषाविज्ञानाच्या दुसऱ्या संस्थापकाची शतसंवत्सरी कुठं साजरी झाल्याचं ऐकिवात नाही. आपल्या ध्वनिसमीकरणांच्या नियमामुळे ग्रिम अमेरिकेत लोकप्रिय झाला होता (त्याच्या 'परी –कथा' तर लोकप्रिय होत्याच) तसं बोपचं नव्हतं. बोप हा तुलनात्मक पद्धतीनं भाषांच्या रूप-व्यवस्थांचा अभ्यास करणारा विद्वान होता. याबद्दल सोस्युरनं त्याला भाषाविज्ञानाचा आद्य संस्थापक हा मान दिला होता. बोपचे ग्रंथ समजायला प्राचीन भाषांचा ऐतिहासिक अभ्यास जरूर होता. आणखीही दुसऱ्या गोष्टींचं ज्ञान जरूर होतं. या सर्व गोष्टींची चर्चा पी. ए.बेरबुर्ग यानं 'लिंग्वा' या मासिकाच्या १९५० मधील आपल्या लेखात विस्तृतपणे केली होती.[९] ती कोणी फारशी विचारात घेतलेली आढळत नाही. बोपविषयीचा अधिक सखोल अभ्यास मिशेल फूको [१०] या प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञाच्या १९६६ मध्ये प्रसिद्ध झालेल्या ग्रंथात प्रगट झाल्यानंतर बोपकडे भाषाविज्ञानींचं लक्ष गेलं.

देकार्तच्या मृत्यूनंतर (१६५०) युरपात जी 'तात्त्विक व्याकरण' (grammaire gmrale) नावाची विचारप्रणाली सुरू झाली तिच्यातल्या भाषाविषयक भूमिकेनं बोपचा अभ्यास आकार पावला होता. ही विचारप्रणाली फ्रांसमध्ये मान्यता पावली होती कारण तिचा उद्गाता सिल्वेस्त्र द सासी (१७५७-) हा[११] पॅरिसमध्ये सेमिटिक भाषांचा प्राध्यापक होता व 'तात्त्विक व्याकरणा' वरील त्याचा आद्य ग्रंथ १७९९ मध्ये प्रसिद्ध झाला होता. या सुमारास नेपोलिअननं इजिप्तवर स्वारी केल्यानं फ्रांसचं इंग्लंडशी वैर झालं त्यामुळे हा महत्वाचा भाषा-तत्त्व -विचार इंग्लंडकडे पोचला नाही. बोपच्या विचारांची घडण "साचीनं आपल्या या ग्रंथात बोसुए (Bossuet) या सेमिटिक भाषाभ्यासूच्या विश्लेषण-पद्धतीला लीबनिझच्या तार्किकी —गणित- पद्धतीची जी जोड दिली होती"[१२] तिच्यातून आकारली होती. बोपला हे कसं समजलं व महत्त्वाचं वाटलं ते जाणण्यासाठी त्याच्या जीवनाची थोडी माहिती आवश्यक आहे.

बोपचा जन्म जर्मनीतील आशव्हेनबुर्ग या गावी १७९१ मध्ये झाला. तिथल्या शालेय शिक्षणात गणित हा त्याचा आवडीचा विषय होता. वयाच्या २१ व्या वर्षी तो उच्च अभ्यासासाठी पॅरीसला गेला व तिथं त्यानं दहा वर्ष शिक्षण घेतलं. जन्मानं जर्मन असूनही शिक्षणानं तो फ्रेंच बनला. पॅरीसला त्यानं प्रथम संस्कृतचा अभ्यास केला. नंतर सासीशी परिचय झाला. सासी हा उत्तम संस्कृतज्ञ असून सेमेटिक भाषांचा प्राध्यापक होता. लौकरचा सासी हा फ्रांसमध्ये १८२२ मध्ये स्थापन झालेल्या 'सोसिएने आशिआतिक' या संस्थेचा पहिला अध्यक्ष म्हणून नेमला गेला. बोप जेव्हा बर्लिनमध्ये १८२२ साली भाषाविज्ञानाचा प्राध्यापक बनला तेव्हा त्यानं सासीच्या 'तात्त्विक व्याकरणा'च्या दृष्टीनं ग्रिमच्या ध्वनिसमीकरणांवर टीका करणारा ग्रंथ (पहिली आवृत्ती १८२७; दुसरी १८३६) लिहिला. त्यात त्यानं भाषांचा वैज्ञानिक अभ्यास त्यांच्या ध्वनिव्यवस्थांऐवजी रूपव्यवस्थांवर व तुलनेबरोबर 'विरोध' या तत्त्वानुसार करायला हवा असं आपलं मत प्रगट केलं.

फ्रांसमधील आपल्या वास्तव्यात बोपनं अनेक भाषाविज्ञानींचे तत्वज्ञांचे व गणितज्ञांचे विचार आत्मसात केले. श्लेगेल, हेर्डर, कान्ट, हुंबोल्ट, सासी यांच्या विचारांचा त्यानं चांगला अभ्यास केला. पण या सर्वात त्याला ज्याचे विचार भाषाभ्यासाठी अत्यंत सखोल वाटले तो म्हणजे गणिती –तर्कज्ञ लीबनिझ. प्रतीक व्यवस्थांची सारी तात्त्विक भूमिका व त्यांच्या तुलनात्मक – विरोधात्मक अभ्यासाच्या पद्धती त्यानं लीबनिझच्या लेखनावरून समजून घेतल्या व त्यांचं प्रात्यक्षिक निरूपण स्वाभाविक भाषांच्या रूप-व्यवस्थांच्या अभ्यासाद्वारा करण्याचं ध्येय ठरविलं .

युरपातल्या नव्या तर्कशास्त्राचा पाया लीबनिझनं घातला हे आता सर्वसामान्य झालं आहे. यासाठी त्यानं गणिती दृष्टीचा उपयोग केल्यामुळे तो तत्त्वज्ञांत फारसा लोकप्रिय बनला नाही. आपल्या नव –तर्क पद्धतीमुळे अॅरिस्टॉटलप्रणीत रूढ सिद्धान्तांना धक्का बसेल व त्यामुळे आपणाला तत्त्वज्ञ वाळीत टाकतील या कल्पनेनं लीबनिझनं आपलं लेखन शेवटपर्यंत प्रसिद्ध केलं नाही. जॉर्ज बूलनं लीबनिझच्या गणिती –तर्क विचारांना उजेडात आणलं. हे करीत असता त्यानं त्याचे भाषाविषयक विचारही प्रगट केले. १८३९ साली प्रसिद्ध झालेल्या 'केंब्रिज अॅन्ड डब्लिन मॅथिमॅटिकल जर्नल' मधील आपल्या एका लेखात बूल लिहितो :

"माझ्या या प्रबंधात भाषा म्हणजे 'चिन्हांचा पेटारा' असं न मानता भाषा म्हणजे 'विचाराभिव्यक्ती प्रतीक –व्यवस्था' असं मी मानलं आहे. जे विचार व्यक्त करायचे असतात ते या व्यवस्थेतल्या घटकांचे पार्थिव गुण व अर्थ यांच्या नियमांनी घडल्या जाणाऱ्या प्रतीक –संरचना होत असं मी मानलं आहे."

भाषेचा घटक ध्वनी किंवा शब्द नसून 'प्रतीक' (semeion) असतात असं जॉन लॉक[१३] , (१६३२-१७१४) पासूनचे युरपातले तत्त्वज्ञ मानीत आले व लीबनिझनंही तेच मानलं. प्रतीक म्हणजे कुठलं तरी पार्थिव चिन्ह (ध्वनी, रंग, चित्र, अक्षर, शरीर-भाव इ.) व अर्थ, म्हणजेच चिन्हांक (Signifier) व अर्थांक

(Signified) या दोघांच युग्म असतं. या युग्माचे दोन भाग वेगळे करता येत नाहीत. "एकाच कागदाची वरील बाजू व मागील बाजू यांच्याप्रमाणे" (सोस्युर)[१४] ते एकमेकांशी जोडलेले असतात. या प्रतीक-व्यवस्थेनं आपण कुठलीही विचार-संहिता घडवू शकतो.

भाषा ही एक प्रतीक-व्यवस्था (semiotic) आहे असं मानण्यानं भाषाविज्ञानाच्या अभ्यासात निर्माण झालेल्या कितीतरी असंबद्ध प्रश्नांचं निराकरण करता येतं. शब्द आणि अर्थ हे एकमेकांशी कसे जोडले जातात हा कित्येक युगं चर्चिला गेलेला विषय हा एक 'मतिभ्रम' ('deformation' – R. Bartles) ठरतो कारण प्रतीक हे मुळातच ध्वनी व अर्थ यांचं युग्म मानलं जात असल्यानं त्यांना वेगळं करणं ही आपल्या एकांगी बुद्धीची चूक ठरते. त्याचप्रमाणे भाषा ही तार्किक की व्याकरणिक? या प्रश्नाचे उत्तर सरळ आहे. व्याकरण व तर्क हे भाषेच्या प्रतीक-व्यवस्थेकडे पाहण्याचे दोन दृष्टीकोन आहेत. केवळ चिन्हांक-व्यवस्थेचा विचार केला तर ती व्याकरणिक वाटते व अर्थांक-व्यवस्थेचा विचार केला तर तार्किक वाटते. परंतु हे दृष्टीकोन केव्हातरी एकत्रित करावे लागतात. ग्रिमला भाषाविज्ञानाच्या अभ्यासाचं उद्दिष्ट म्हणजे "स्थलकाळात बदलणाऱ्या भाषेच्या स्थिरतत्त्वांचा अभ्यास" असं वाटलं ते स्वाभाविक होतं. भाषा (बोलण्यातली) ही सदैव चंचल, अस्थिर व वैविध्यपूर्ण व्यवस्था असते. काही व्यावहारिक काराणांसाठी (उदा. लेखन, शिक्षण, कोशरचना इ.) तिचं रूप स्थिर मानून किंवा ठरवून तिच्यातल्या घटकांचे वर्ग, त्यांचे एकमेकांशी होणारे संबंध, त्यांचे प्रयोग व नियम शोधावे किंवा ठरवावे लागतात. कोणत्याही भाषेच्या व्यवस्थेत तिचे घटक कालतत्त्वाच्या पूर्वापार संबंधांनी तसचं स्थलतत्त्वाच्या सहवासी संबंधांनी गुंफले जातात. यामुळे भाषाभ्यासात भाषेचा एककालिक (synchronic) व कालक्रमिक (diachronic) असे दोन्ही दृष्टीकोन एकत्रित करून एक व्यापक सार्वकालिक (panchronic) दृष्टीकोन निर्माण करावा लागतो. रूढ व्याकरणाभ्यासापेक्षा हा दृष्टीकोन अगदी निराळा आहे. याचं एक साधं उदाहरण सोस्युरनं दिलं आहे. इंग्रजीत foot (पाय) या शब्दाचं बहुवचन feet असं होतं. सामान्यत: भाषाविज्ञानात न

शिरणारे व्याकरणकार या रूपाला रूढ इंग्रजीत एकवचन-बहुवचन या रूपव्यवस्थेतला ‘अपवाद’ मानतात. परंतु या रूपांकडे ऐतिहासिक दृष्टीनं पाहिलं तर त्यांच्यात अपवादात्मक असं काही नाही. या शब्दांची मुळातल्या प्राची इंग्रजीतील रूपं पुढीलप्रमाणे होती:

ft : * fti

कालांतरानं बहुवचनाच्या अंत्य -* या पुरोग स्वराचा -- या (पार्श्व) स्वरावर परिणाम होऊन तो -- असा पुरोग स्वर बनला.म्हणजे जी नवी रूपं प्रतीयोजित झाली ती अशी :

t : fti

यानंतर त्या काळातल्या इंग्रजीतील सारे अंत्य स्वर लुप्त झाल्यानं fti चं ft असं रूप स्थापन झालं.यानंतर च्या काळात सबंध इंग्रजी स्वर-व्यवस्थेत एक ऊर्ध्वगती (जिला The Great Vowel Shift असं नाव दिलं जातं) प्रतीयोजित झाली. तिच्यायोगे -- चे -- व -- चे -*- असं प्रतीयोजन झालं. या साऱ्या प्रतीयोजानेच्या कालक्रमिक पायऱ्या पुढीलप्रमाणे मांडता येतील:

ft : * fti

ft : fti

T ft : ft

f : f t

यावरून आधुनिक लेखन [foot (fut) : feet (fit)] असं बनलं

या उदाहरणावरून भाषेतील रूपव्यवस्थेत एककालिक व ऐतिहासिक यांचा कसा मिलाफ होत गेला आहे हे स्पष्ट होईल. रूढ व्याकरणानं मानलेली

'नियमित' व 'अनियमित' किंवा 'अपवादरूप' हा प्रकार किती कृत्रिम आहे व ' 'ऊ' चा 'ई' होतो' असलं ध्वनिशास्त्रीय विधान किती अर्थहीन आहे हे यावरून लक्षात येईल असं सोस्युरनं स्पष्ट केलं आहे.

भाषाही स्थलकाळात संततपणे घडत राहणारी प्रतीक-व्यवस्था मानली तर तिच्यात घडणारे व्यापार हे परिवर्तन व प्रतीयोजन या दोन्ही प्रकारचे असतात. परिवर्तन व्यक्तिसापेक्ष किंवा समाजसापेक्ष असतं; प्रतीयोजन हे व्यवस्थासापेक्ष असतं. त्यामुळे ते अधिक व्यापक, परोक्ष व तार्किक ठरतं. पाणिनीला जरी परिवर्तन मान्य असलं तरी त्याच्या 'आष्टाध्यायी'ची भूमिका प्रतीयोजनवाडी आहे. प्रतीयोजनेच्या मुळाशी जी प्रक्रिया मान्य करावी लागते ती परिवर्तानासारखी मौखिक-शारीरिक-यांत्रिक नसून शेरेर यानं मानलेली अर्थमूल-मानसिक-समानीकरणात्मक मानावी लागते.या दृष्टीनं पाहिलं तर जुन्या भूमितिकारांप्रमाणे युक्लिडप्रणीत भूमिती व युक्लिडेतर भूमिती असे भेद करण्याऐवजी आपली स्थलसंहिता (topology) व्यापक करून फेलिक्स क्लेइननं जसे हे तिचे विशिष्ट विभाग मानले त्याप्रमाणे भाषाविज्ञानात व्हायला हवं हा विचार प्रामुख्यानं पुढं आला.

संदर्भ व टिपा

१. John T. Waterman : Perspectives in Linguistics (chicago, 1963)

२. William Bright : Sociolinguistics

३. William Labov

W. D. Whitney : Language and the Study of Language (1867) The Life and Growth of Language (1874)

L. Bloomfield : Language (1933). "Linguistic change interests us especially becuse it offers the only possibility of explaining the phenomena of Language." (p. 281)

৬. Z. Harris : Methods in Stuructural Linguistics (chicago. 1951)

N. Chomsky : 'Current Issues in Linguistic Theory' in The Sturucture of Language (ed. J.A. Foder/ J.J. Katz). Prentice Hall, 1964

Daniel Brinton : The Philosophic Grammer of American Languages as set forth by Humboldt (1885)

James Byrne : General Principles of the Sturucture of Language (1885)

P. A. Verburg : The Background to the Linguistic conceptions of Bopp,' Lingua, vol. II 4,1950

১০. Michel Foucanlt : Les Mots at les choses (Gallimard. 1966)

১১. Silvestre de Sacy (1757) : Principes de grammaire gnrale (1799)

"Sacy was the one man able to reconcile 'the goals of Leibniz with the 'effarts of Bossuet' (Duc de Broglie : 'Elogu de Silvestre de Sacy', 1833)" — Edward W. Said. Orientalism, 1978; Penguin. 1995, p.124.

১২. John Locke (1632-1714)

F. de Sausure : “Language can also be compared with a sheet of paper : thought is the front and the sound the back.” (Course. p.113)

१०. इतिहासाचा मागोवा

इ. स. १७५५ साली इंग्लिश भाषेचा पहिला शब्दकोश ज्या विद्वानानं एका हाती, कोणाच्याही आर्थिक मदतीशिवाय, तयार केला त्याचं नाव आज सर्वांना ठाऊक आहे, तो म्हणजे सॅम्युअल जॉनसन (१७०९-१७८४). ज्या अर्ल ऑफ चेस्टरफील्ड या श्रीमंताकडे सात वर्षापूर्वी या कार्यासाठी मदत मागायला गेला तेव्हा चेस्टरफील्डनं त्याला वाटेला लावलं. परंतु शब्दकोश प्रसिद्ध होणार हे ऐकताच चेस्टरफील्डनं तो आपणाला 'अर्पण' करावा व त्याबद्दल योग्य तो आर्थिक मोबदला देण्याची इच्छा प्रदर्शित करताच जॉनसननं स्वाभिमानी भाषेत चेस्टरफील्डला जे पत्र लिहिलं ते इंग्रजी भाषा जोपर्यंत जिवंत राहील तोपर्यंत वाचलं जाईल असे जॉनसनच्या अनेक चाहत्यांनी उद्गार काढले आहेत. पदार्थांचा स्पर्शगुण हा त्यांचा 'प्राथमिक' स्वभाव नाही हे सांगणाऱ्या आपल्याच देशचा तत्त्वज्ञ बाकली[१] यानं हे मत आपल्याला पटत नाही हे सिद्ध करण्यासाठी जॉनसननं आपल्या मित्र परिवाराच्या देखत लंडनमधील ज्या फ्लीट स्ट्रीटमधून तो नेहमी ये-जा करीत असे तिथल्या एका दगडाला जोरानं लाथ मारून 'हे पाहा माझे बाकलीचे खंडन!' असे उद्गार काढले त्याच जॉनसननं चेस्टरफील्डच्या संपत्तीवर अधिक जोरानं लाथ हाणून दिलेलं उत्तर सरस्वतीचा महान विजय ठरला. लक्ष्मीच्या दास्यातून सरस्वतीची मुक्तता एका सहित्यिकापेक्षा एका शब्दज्ञानींन केली हे महत्वाचं आहे. तो दिवस होता -७ फेब्रुवारी १७५५!

जॉनसनचा मित्रवर्ग मोठा होता. फ्लीट स्ट्रीटवरील एका सामान्य मधुशालेत स्थापन केलेल्या 'मंडळा' तील आपल्या खुर्चीला तो 'सर्व सुखाचं सिंहासन' म्हणत असे व या सिंहासनावर तो बसला की त्याच्याभोवती जमणाऱ्या मित्रांत जॉशुआ रेनल्ड्स हा चित्रकार, एडमंड बर्क हा वक्ता, गिबन हा इतिहासकार, अॅडम स्मिथ हा अर्थशास्त्रज्ञ, शेरिडन हा नट, गोल्डस्मिथ हा कादंबरीकार, बॉझवेल हा चरित्रकार आणि विल्यम जोन्झ हा

पौर्वात्यविद्याविशारद हे असत. अनेक भाषांवर प्रभुत्व असणाऱ्या जोन्झला त्यानं "अत्यंत प्रबुद्ध मानवपुत्र"[१२] मानलं होतं. याच जोन्झनं २ फेब्रुवारी १७८६ साली कलकत्त्याला रॉयल एशिअॅटिक सोसायटीत जे भाषण केलं त्यातल्या त्याच्या एका वाक्यानं पौर्वात्य व पाश्चिमात्य भाषांच्या तुलनात्मक अभ्यासाची मुहूर्तमेढ उभारली गेली. युरपच्या इतिहासात पंधराव्या शतकात ग्रीक व लॅटिन भाषांच्या ज्ञानामुळे जी नव-ज्ञान-जागृती (Renaissance) झाली तिच्यानंतरच्या युरपातली ही दुसरी महत्त्वाची ज्ञान-जागृती होती. पहिलीनं 'ग्रीक –केंद्री – ज्ञानवाद' (Greeco-contusm) उसळून आला; दुसरीनं 'पौर्वात्यवादा' ची प्रचंड लाट आणली.

जोन्झच्या भाषणानंतर युरपचे विद्वान पौर्वात्य देशांच्या भाषा, धर्म, संस्कृती यांच्या अभ्यासाकडे वळले. परंतु त्यांच्यात दोन वर्ग बनले. जोन्झनं भारताची संस्कृती व संस्कृत भाषा याकडे काहींना वळविलं –हा एक वर्ग. दुसरा वर्ग त्या अगोदरच मध्य –पूर्वेतील भाषा व त्यांची संस्कृती यांचा अभ्यास करू लागला होता. सॅम्युअल जॉनसननं या मध्यपूर्वेचं कौतुक, काल्पनिकरीत्या, आपल्या छोट्याशा History of Rasselas, Prince of Abyssinia (1759) या कादंबरीत केलं आहे. आपल्या आजारी आईच्या भेटीस जाण्यासाठी पुरेसे पैसे जवळ नसल्यानं प्रकाशकाकडून ते मिळविण्यासाठी एका आठवड्याभरात लिहून काढलेल्या कादंबरीत भारतातील सुरत व 'इंदोस्तानची राजधानी' आग्रा यांचा उल्लेख आहे. बाकी सर्व कथानकाची पार्श्वभूमी इजिप्त व तिथले 'पिरागिद' यांची आहे. या कादंबरीची अनेक भाषांत भाषांतरं झाली. कृष्णशास्त्री चिपळूणकर यांनी मराठीत 'शाळापत्रका' च्या अंकातून १८७१ पासून क्रमशः भाषांतर करून पुस्तकरूपानं ती १८७६ साली 'रासेलस' या नावानं प्रसिद्ध केली. त्या वेळच्या महाराष्ट्रात ती सर्वत्र वाचली गेली.

भारतातील गुजरातमधील ज्या सुरत गावाचा उल्लेख जॉनसननं आपल्या 'रासेलस'मध्ये केला आहे त्याविषयी त्यानं कुठं वाचलं किंवा ऐकलं असेल याबद्दलची माहिती मिळत नाही. परंतु विल्यम जोन्झपूर्वी भारतात आलेल्या एका

फ्रेंच व्यक्तीचं नाव कदाचित त्याच्या कानावर पडलं असावं. ती व्यक्ती म्हणजे आंकेतिल दु पेरॉं (१७३१-१८०५).[३] ज्या वर्षी जॉनसनचं 'रासेलस', प्रसिद्ध झालं (१७५९) त्याच वर्षी आंकेतिल सुरत या गावी पारसी लोकांच्या 'अवेस्ता' या धर्मग्रंथाचं भाषांतर करीत होता. लौकरच ते पूर्ण करून, इतर अनेक ग्रंथांची हस्तलिखितं घेऊन, १७६१ साली तो इंग्लंडमधील ऑक्सफर्ड इथं गेला. तिथं तो १७७१ पर्यंत 'अवेस्ता' चा अभ्यास करीत राहिला. नंतर आपले शेवटचे दिवस त्यानं पॅरिसमध्ये काढले.

आंकेतिलसारख्या अभ्यासूंमुळे फ्रांसमध्ये जी पौर्वात्य संस्कृती पोचली ती मध्य-पूर्वेची-इराणच्या 'अवेस्ता'ची. ही भाषा व संस्कृत यांच्यातला साम्यसंबंध विल्यम जोन्झच्या नजरेत भरला होता. अरबी, हिब्रू, पहेलवी, फारसी या मध्य-पूर्वेकडील भाषा त्यानं भारतात पाऊल टाकण्यापूर्वी अभ्यासिल्या होत्या. परंतु भारतातल्या संस्कृतातल्या 'शकुन्तल' व 'गीतगोविंद' नं त्याच्यावर अशी काही मोहिनी घातली की हा सर्व अभ्यास एकत्रित करण्यास त्याला वेळ मिळाला नाही. भारतातील आपल्या अवघ्या अकरा वर्षांच्या वास्तव्यात या हजारो वर्षांपूर्वीच्या पौर्वात्य संस्कृतींना तो कसा गवसणी घालू शकणार?

आंकेतील आणि विल्यम जोन्झ यांच्याप्रमाणे पौर्वात्य संस्कृतींचं ज्याच्या कल्पनाशक्तीला जबरदस्त आकर्षण वाटलं तो म्हणजे नेपोलिअन (१७६९-१८२१) तरुण वयातच त्यानं अलेक्झांडच्या चरित्रात पौर्वात्य देशांविषयी अनेक 'सुरस व चमत्कारिक गोष्टी' वाचल्या होत्या.आणि म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांतीनंतर १७९६ साली जेव्हा तो इटलीतील फ्रेंच सैन्याचा अधिपती बनला तेव्हा त्यानं इजिप्तवर स्वारी करण्याचा बेत आखला. या बाबतीत त्याचा उद्देश जितका लष्करी विजयाचा होता त्यापेक्षाही अधिक ज्ञान-विजयाचाही होता. इजिप्तकडे नेणाऱ्या आपल्या जहाजाचं नाव त्यानं L'Orient असं ठेवलं. आपल्याबरोबर त्यानं फ्रेंच विद्वानांचा एक मोठा ताफा नेला होता. यातले बरेच विद्वान त्यानं स्वत: पॅरीसमध्ये स्थापन केलेल्या 'अँस्तित्यु द' एजिप्त या संस्थेत सिल्वेस्त्र द सासी याच्या हाताखाली शिकलेले होते.

जरी इजिप्तवरील आक्रमणात नेपोलिअनचा नाविक पाडाव झाला तरी त्याच्या सैन्यातील एका गोलंदाजानं भाषाविज्ञानाच्या अभ्यासात एका महान शोधाची भर घातली. इजिप्तच्या अलेक्झांड्रिआ या बंदराच्या पूर्वेस ९० कि. मी. दूर रोझेटा या गावाजवळ चिणलेल्या एका भिंतीतून जुन्या लिप्या कोरलेला एक दगड त्यानं शोधून आणला. इजिप्तचा राजा पाचवा टोलेमी (१९६ इ. स. पू.) याचा एक करार या प्रस्तरावर हायरोग्लिफिक (१४ ओळी), डेमॉटिक (३२ ओळी) व ग्रीक (५४ ओळी)अशा तीन लिप्यांत कोरलेला होता.यातल्या हायरोग्लिफिक लिपीचा प्रथम उकल करणाऱ्या (१८२१ मध्ये) झां-फ्रांझा शांपोलिआँ (१७९०-१८२४)[४] याचं नाव केवळ भाषाविज्ञानाच्या व पुरवास्तुविद्यांच्या अभ्यासातच नव्हे तर साऱ्या मध्य-पूर्वेकडील इतिहासाभ्यासात अमर झालं आहे.

शांपोलिआँ जणू कुठलंतरी जुनं अज्ञात विश्व नव्यानं शोधून काढण्यासाठीच जन्माला होता. फ्रांसमधील फिझाक (figeac) हे त्याचं जन्म स्थान. त्याच्या जन्माच्या वेळी मंत्र विद्या जाणणाऱ्या जाकूऊ नावाच्या एका माणसाला आणावं लागलं. त्यानं शांपोलिआँच्या आईच्या पलंगाखाली कुठल्यातरी औषधी वनस्पतींचा धूर केला व मंत्र म्हटला : “तुझ्या या प्रसववेदनेतून असा मुलगा जन्मास येईल की तो येत्या अनेक शतकांना ज्ञानप्रकाश पुरवील.” मग बाळ जन्मला. प्रसूतिकार्यासाठी तिथं असलेला फ्रेंच डॉक्टर या बाळाला पाहून आश्चर्यचकित झाला. बाळाचा रंग ऑलिव्ह फळासाराखा होता. केस पूर्वेकडील लोकांसारखे काळे-कुळकुळीत होते व डोळे काळे असले तरी त्यांच्या पांढऱ्या भागात पिवळी छटा होती! बाळाच बालपण फारसं सुखात गेलं नाही; भीती आणि चिंता या सदैव त्याच्या पाठीशी होत्या. तो अडीच वर्षांचा असताना त्या गावी एक प्रचंड वादळ झालं. घराचं छप्पर उडून गेलं, बाळाचं काय झालं म्हणून आईवडील माळ्यावर त्याला झोपवलं होतं तिथं गेले. माळ्यावरील आकाशखिडकीवरील दोन उंच खांबांमध्ये त्याचा पाळणा अडकला होता. डोकं उंचावून, हात लांब पसरून बाळ टकमक आकाशाकडे पाहत होता. या अवस्थेत, लहानशा प्रॉमीथ्यूसप्रमाणे, आपणाला

आकाशात एका अपूर्व लख्ख प्रकाशाचं दर्शन झालं असं तो नंतर आपल्या आईला सांगत असे.

संस्कृतमुळे भाषाविज्ञानाच्या अभ्यासात जसा इंडो-युरपिअन या स्रोत्र-भाषेचा शोध लागला तसा शांपोलिआँनं रोझेटा (Rosetta) प्रस्तरावरील हायरोग्लिफिकच्या केलेल्या उकलामुळे कित्येक शतकं झोपी गेलेली सारी इजिप्शिअन संस्कृती जागी झाली. पण या दोन्ही पौर्वात्य मैत्रिणींची एकमेकींशी भेट व्हायला व ओळख पटायला एक शतक थांबावं लागलं. इंग्लिश आणि फ्रेंच यांच्या राजकीय वैरामुळे, फ्रांसमध्ये सासीच्या काळापासून जो सेमेटिक भाषांचा अभ्यास झाला त्याची इंडो-युरपिअन विद्वानांनी कधीच दखल घेतली नाही. तसं म्हटलं तर हिब्रू, अवेस्तन, अरबी या भाषांत लिहिलेल्या धर्मग्रंथांचा अभ्यास करणारे त्या त्या समाजाचे अनेक विद्वान भारतात होते, पण या भाषा म्लेंछांच्या म्हणून त्यांचा कोणाही भारतीयानं अभ्यास केला नाही. इंग्लिशांच्या आगमानानंतर त्यांच्या व जर्मन विद्वानांच्या 'संस्कृत' प्रेमामुळे पूर्वाभिगमापेक्षा 'ग्रीकवाद' व त्यातून निर्माण झालेला 'युरपकेंद्री' दृष्टीकोन आमच्या बुद्धीला अधिक प्रगतिपर वाटला. म्हणूनच संस्कृतभाषी आर्यांचं मूळ वसतीस्थान युरपात कुठंतरी होतं हे आम्हाला स्वाभाविक व रोचक वाटलं.

ज्या संस्कृत भाषेवर भिस्त ठेवून आम्ही या कल्पना उराशी बाळगल्या तिच्या व्यवस्थेत बोपपासूनच्या भाषाविज्ञानींना आपल्या वैज्ञानिक तुलना-पद्धतीच्या मदतीनं काही 'विसंगतता' आढळून आली; आधी तिच्या स्वर-व्यवस्थेत, नंतर तिच्या व्यंजन-व्यवस्थेत, मग उरलं काय? हा शोध संस्कृतच्या 'सदोष' व्यवस्थेचा द्योतक म्हणून नव्हे तर भाषाविज्ञानाच्या 'वैज्ञानिक' पद्धतीचा विजय म्हणून महत्वाचा मानायला हवा. भाषाविज्ञानाचं उद्दिष्ट 'स्थळकाळाबरोबर बदलणाऱ्या भाषेच्या स्थिर तत्त्वांचा अभ्यास' असं ग्रिमनं निश्चित केलं होतं. पण या अभ्यासातून हाती लागली ती संस्कृतची स्थिर म्हणून मानली गेलेली तत्त्वचं मुळी बदलेली आढळली तर काय करणार? हाच प्रश्न सोस्युरच्या लॅरिंजीअलच्या सिद्धान्तानं खडा केला. त्याला आम्ही उत्तर देऊ

शकलो नाही. १९२० नंतरचं इंग्रजांचं व आमचं भाषाविज्ञान संस्कृत – केंद्री रूढ इंडो- युरपिअनच्या समीकरणातच घुटमळत राहिलं. या काळातल्या एकाही विद्वानानं सोस्युरच्या मूळ प्रबंधाचा (१८७९) अभ्यास करण्याचा प्रयत्न केला नाही. ज्यानं सोस्युरच्या 'कोर्स' या फ्रेंच ग्रंथाचं प्रथम इंग्रजी भाषांतर (१९६०) केलं तो वेड बास्किन[५] आपल्या प्रस्तावनेत लिहितो : "त्याचा (सोस्युरचा) फ्रिजिअन शिलालेखांचा व लिथुआनिअन बोलींचा अगदी उच्च दर्जाचा अभ्यास इतका अभिनव होता की त्यामुळे जिनिव्हा विद्यापीठातील त्याची १९०६-११ मधील व्याख्यानं ऐकणाऱ्या विद्यार्थ्यांना त्याच्या श्रेष्ठ बौद्धिक गुणांनी आकर्षित केलं असावं." बास्किनच्या या वाक्यातील गर्भितार्थ इंडो-युरपिअनच्या इंग्रज पंडितांच्या ध्यानात आला नाही. आमच्याकडील या विषयाचे पंडित तर इंडो-युरपिअनला सोडून अमेरिकेतील मिशनरी छत्र –छायेत केव्हाच पळून गेले होते!

सोस्युरच्या अगोदर लिथुआनिअन भाषेचा अभ्यास ओगुस्त श्लेइखर (१८२१ -६८)[६] यानं आपल्या १८५६-७ मध्ये छापलेल्या ग्रंथात केला होता. तो सोस्युरला उपयोगी वाटला असेल. श्लेइखरलादेखील भाषा म्हणजे केवळ ध्वनिव्यवस्था एवढंच हे मान्य नव्हतं. परंतु तिचं अंतरंग कसं समजवावं यासाठी त्यानं डार्विनच्या उत्क्रांति–तत्त्वाचा आश्रय घेऊन Darwinian Theory and Linguistics (1863)[७] हे पुस्तक लिहिलं. त्यातील श्लेइखरचा भाषा ही निसर्ग्व्यवस्था (organic) आहे हा विचार सोस्युरला पटला नाही हे त्याच्या 'कोर्स' मधील उदगारावरून[८] स्पष्ट आहे.

मग सोस्युर आपल्या भाषाविज्ञानाच्या अभ्यासात जी नवी दिशा आणि नव्या पद्धती सांगू पाहत होता त्यांची प्रेरणा त्याला केवळ आपल्या स्वत:च्या विचारातून सुचली की दुसऱ्या कोणाच्या? या प्रश्नाचं उत्तर देणं कठीण आहे. त्याच्या १८७८मधील प्रबंधाच्या आधी तीस वर्षं पॅरीसमधील सेमेटिक भाषांचा विद्वान अर्नेस्त रनां (१८२३-१८९२)[९] यानं, L Avenir de la science हे पुस्तक १८४८ मध्ये लिहिलं होतं (परंतु त्यानं ते १८९० मध्ये प्रसिद्ध केलं.) यातील

काही विचार सोस्युरच्या कानांवर आले असतील का? रनां हा येशूख्रिस्ताचा पहिला वस्तुनिष्ठ चरित्रकार; तो सेमेटिक भाषांचा विद्वान होता व या भाषांच्या अभ्यासामुळे, भाषांच्या वैज्ञानिक अभ्यासासाठी, केवळ 'समय' या तत्त्वापेक्षा अधिक व्यापक अशा 'विरोध' या भूमिकेचा आश्रय घ्यायला हवा असा विचार त्याने या पुस्तकात व्यक्त केला होता. हा विचार रनांला जर्मानिक भाषांच्या अभ्यासावरून सुचला असं त्यानं म्हटलं आहे. इंडो-युरपिअन कुळातल्या शब्दांची किंवा ध्वनिसमीकरणांची फारच थोडी तत्त्वं जर्मानिक भाषांत आढळतात, आणि तरीदेखील जर्मानिक कुटुंब हे इंडो-युरपिअन कुळात गणलं जातं, असं का? हा रनांपुढील महत्त्वाचा प्रश्न होता. या संबंधात त्यानं मांडलेल्या काही विचारांचे पडसाद सोस्युरच्या लेखनात आढळतात. उदा. भाषांच्या अभ्यासात प्राचीन-अर्वाचीन असा कालभेद करण्यामुळे 'विज्ञानदृष्ट्या' जुनं काय व नवं काय यांचं मूल्य कसं ठरवायचं हा महत्त्वाचा विचार दाखल झाला होता. या संबंधात सोस्युर लिहितो : "लिथुआनियन भाषेचे नमुने इ. स. १५४० नंतरचे मिळतात, पण याचा अर्थ असा नाही की दहाव्या शतकापासून आलेल्या जुन्या स्लाविक किंवा ऋग्वेदाच्या संस्कृतपेक्षा तिचं मूल्य कमी आहे." (पान २१६) सोस्युरच्या या विचारांवर रनांच्या विचाराची स्पष्ट छटा उमटली आहे. सोस्युरच्या 'कोर्स' मध्ये चौथ्या भागात त्यानं जे विचार प्रगट केले आहेत त्यातले बरेच रनांच्या विचारांशी मिळते येतात. पान १९१-२ वर सोस्युर लिहितो : "भाषाविज्ञानाच्या अभ्यासात भाषांमधली भौगोलिक विविधता हे अगदी पहिलं अवलोकन म्हणता येईल. वैज्ञानिक अभ्यासाचं पहिलं पाऊल, अगदी ग्रीकांच्या काळापासून, या अवलोकनानं निश्चित केलं. दोन बोली वेगळ्या आहेत असं लक्षात आल्यानंतर एखादा माणूस त्यांचं साम्य शोध्यला जातो. आधुनिक भाषाविज्ञानात साम्य या तत्त्वावर आधारलेल्या अनेक भाषाकुळांचा अभ्यास झाला. पण त्यासाठी त्यांच्यातील विविधता का झाकून ठेवावी लागली? या कुळामधील विविधतेची तुलना केली तर अधिक व्यापक संबंध ध्यानात येतात. फिनो-उग्रिक आणि इंडो-युरपिअन, किंवा इंडो-युरपिअन आणि सेमिटिकयांचा असा अभ्यास

करण्याचे प्रयत्न झाले. पण अशा अभ्यासाला फारच कठीण समस्यांना तोंड द्यावं लागतं. यासाठी भाषाविज्ञानानं कोणती पद्धती अथवा कोणता मार्ग शोधावा?" सोस्युरनं मांडलेल्या या विषयाला धरून रनांनं १८७८ साली (ज्या वर्षी सोस्युरनं आपला लॅरिंजीअल ध्वनीसंबंधीचा प्रबंध प्रकाशित केला) सॉरबाँ येथे On the services Rendered by Philology to the Historical Sciences हे आपलं व्याख्यान दिलं. सोस्युरच्या कानांवर त्यातले विचार पडले नसतील असं वाटत नाही.

लिबनिझ, हेर्डर, कान्ट, हुंबोल्ट श्लेगेल, वगैरे अगदी पहिल्या पिढीच्या भाषाविज्ञानींत रनांची गणना करावी लागते ती अशा अर्थानं की या सर्वांना 'भाषा' ही गोष्ट मानवानं आपल्या उत्क्रांतीत मिळविलेली महान सिद्धी वाटत होती. आपल्या पशुअवस्थेवरील तो त्याचा विजय होता तसंच आपल्या भविष्यातल्या प्रगतीची किल्लीही तिच्यात दडलेली होती. या दृष्टीनंच रनांला भाषाविज्ञान हे एक 'नवं विज्ञान' वाटत होतं. या विज्ञानाचे प्रेरित पौर्वात्य देशांत आहेत, त्याचे 'डॉक्टर' पाश्चिमात्य देशांत निर्माण होतील ही त्याची आशा होती. यासाठी पूर्व व पश्चिम असं विरोधाभासी 'नाटक' काढून टाकून त्या जागी 'नव्या विज्ञाना' ला प्रस्थापित करावं असं त्याला सुचवायचं होतं. सारी मानवजात ज्या बाबेलच्या मनोऱ्यात परमेश्वरी शापानं विभक्त झाली ती या 'नव्या विज्ञाना'नं एकरूप होईल अशी त्याची आशा होती.

भाषांच्या तुलनात्मक अभ्यासानं 'साम्य' हे तत्त्व हाताशी घेऊन समानधर्मी भाषांना एकत्र आणून त्यांची 'कुळं' बनविली खरी. परंतु त्यांच्यात जे समान नव्हतं ते त्यानं आपल्या दिवाणखान्यातील गालिच्यांखाली दडवून टाकल्यानं खऱ्या विज्ञानाभ्यासाच्या तत्त्वांना हरताळ फासला ही रनांची टीका सोस्युरच्या कानी गेली नसेल असं वाटत नाही. शेरेरचं मत पटल्यामुळे त्यानं जसं 'समानीकरण' या रीतीला भाषाविज्ञानात मानाचं स्थान दिलं तसं रनांचं मत पटल्यामुळे त्यानं 'भाषा' या आपल्या अभ्यासविषयाला केवळ इतिहासाच्या कुंपणात न बांधता त्याला भूगोलाच्या विविध – परिमाणी व्यापक क्षेत्रात आणून

सोडलं. या दृष्टीनं भाषांच्या कुलव्यवस्थांना पुनर्विचार करायला हवा असं वाटून आपल्या 'कोर्स' मधील प्रकरण ५.५ यात सोस्युर लिहितो :

"भाषा ही ती बोलणाऱ्या माणसांच्या मनांनी अगदी एकरेषावर्ती अशी घडविलेली व्यवस्था नाही. तिच्या व्यवस्थेत अशा अनेक घटना घडलेल्या असतात की त्यांचं त्या बोलणाऱ्यांना काहीसुद्धा भान नसतं रूढीगत तत्त्वांमुळे प्रगट होणाऱ्या एका चुकीच्या विचाराकडे मी तुमचं लक्ष वेधू इच्छितो तो असा की, कोणतंही भाषाकुळ अगदी सुरुवातीपासून कोणा एका विशिष्ट भाषाप्रभेदात (Language Type) ती जखडलेली राहत, पण असे होत नाही. एखाद्या भाषाकुळातल्या भाषा कोणत्या विशिष्ट प्ररूपात मोडतात असा प्रश्न विचारणं म्हणजे भाषा या परिवर्तनात्मक व्यवस्था आहेत हे विसरणं. याचा अर्थ असा होतो की भाषांच्या उत्क्रांतीत कुठंतरी एक स्थिर –तत्त्व आहे. ज्या व्यवस्थेवर कुठलंही बंधन नाही तिच्यावर असं एखादं बंधन लादणं कितपत योग्य आहे ?... इंडो-युरपिअन कुळातील भाषांचं उदाहरण घ्या.तिच्या आद्यस्वरूपाची जी पुनर्रचना मान्य झाली आहे तिच्यातल्या अनेक गोष्टींत नंतरच्या भाषांत इतका फरक झाला, आणि काहींत तर त्या इतक्या अदृश्य झाल्या, की तिच्या कुळातल्या म्हटल्या जाणाऱ्या इंग्लिश, अर्मेनिअन, आयरिश या भाषा अगदी वेगळ्या भाषिक प्रभेदात घालाव्या कां असा प्रश्न उद्भवतो... या सर्व विचारातून एकच सारांश निघतो तो हा की, न बदलणारं असं एकाही तत्त्व भाषांत कुठंही आढळत नाही." (पान २२८-३०)

इंडो-युरपिअन कुळाच्या अतिबंदिस्त कल्पाचा हा अंत एका नव्या भाषाविज्ञानाच्या अभ्यासाचं नवसर्जन ठरलं.

वर दिलेल्या परिच्छेदात सोस्युरनं जो विचार मांडला आहे तो मुख्यत्वे फ्रांस व रशिया या देशातील विद्वानांत प्रामुख्यानं आढळतो. ज्या इंग्रजांनी पूर्वेकडील देशांवर, विशेषत: भारतावर, आपलं स्वामित्व स्थापन केलं त्यातील एक सोस्युरचा समकालीन लॉर्ड कर्झन (१८५९-१९२५)[१०] याच्या विचारात

इतिहासापेक्षा भूगोलाभ्यासाचं महत्व अधिक आढळतं. लंडनमधील 'पौर्वात्य व आफ्रिकन विद्याभ्यास संस्था' या संस्थेत भाषण करताना त्यानं सांगितलं की, "पूर्व हे एक असं विद्यापीठ आहे की जिथं विद्यार्थ्याला आपली शेवटची पदवी कधीच मिळविता येत नाही." कर्झनच्या या वाक्याचा असा अर्थ होता की पौर्वात्य देशांवर राज्य करणाऱ्याला प्रत्येक क्षणी नवनव्या विरोधी प्रश्नांना तोंड द्यावं लागतं व ते त्याच्यानं सुटत नाहीत. कर्झनच्या काळात पौर्वात्य देशांवर स्वामित्व गाजविणाऱ्या त्याच्या देशबांधवांना दोन महान शत्रूंना तोंड द्यावं लागलं, फ्रेंच व रशियन. फ्रान्सच्या द लेपेप्स (१८०५-१८९४) या इंजिनिअरानं १८५९-६९ या दशकात सुएझचा कालवा बांधून पूर्व व पश्चिम यांमधील भौगोलिक सीमारेषा पुसून टाकली. फ्रांसमध्ये नेपोलिअननं स्थापन केलेल्या 'सोसिएने द जेऑग्राफी अॅन्ड पारि' या संस्थेत सुएझ कालव्याच्या विचारांनी आकार घेतला होता. आपल्या देशातही भूगोलाभ्यासाला वाहिलेली संस्था असावी असं कर्झनला वाटलं व अशी संस्था १९१२ साली स्थापन झाली तेव्हा तिच्यापुढे भाषण करताना कर्झन म्हणाला :

"आपण भूगोलाला इतिहासाची दासी मानतो... पण भूगोलाभ्यासापासून आपण जरा विचलित झालो तर आपणाला भूस्तरशास्त्र, प्राणिशास्त्र, संस्कृतिशास्त्र, रसायन, पदार्थविज्ञान इत्यादी अनेक शास्त्रांत शिरावं लागतं. म्हणून मला वाटतं की भूगोलाभ्यास हे सर्व विज्ञानाभ्यासाचं आदि-विज्ञान मानायला हवं." फ्रेंचांप्रमाणे रशियानांनादेखील भूगोलाचं महत्व पटलं व त्यांनी आपली दक्षिणपुर्वेकडील सरहद्द चीन, मंगोलिया व भारत या राष्ट्रांपासून रक्षिण्यासाठी अनेक विज्ञानींना तिथं अभ्यासार्थ पाठविलं. त्यातल्या सिएग व सिगेलिंग[११] यांनी चिनी तुर्कस्तान या भास्गात 'तोखारिअन' भाषा शोधून काढली. जितकं राजकारणात तितकंच विद्याभासात भूगोलाभ्यासानं एक मोठं परिवर्तन घडवून आणलं.

एका बाजूस सेमिटिक भाषा व दुसऱ्या बाजूस तोखारिअन. फिनो-उग्रिक इत्यादी भाषांनी व्यापलेल्या प्रदेशात वावरणारे इंडो-युरपिअनभाषी लोक

आपल्या बोलींची आणि संस्कृतींची देवघेव करीत करीत आशिया-मायनर. इराण, अफगाणिस्तान या वाटेनं भारतापर्यंत येऊन पोचले. आपल्या इंडो-युरपिअन भाषाकुळातला आदर्श व स्थिर मानून त्याच्यातल्या नियमांनी सारं 'भाषाविज्ञान' उभारण्याचं त्यांच्या वंशजांचं स्वप्न हे स्वप्नच ठरावं हे काय सांगायला हवं? या दृष्टीनंच 'दिदास्केलिकॉन'[१२] नावाच्या ग्रंथाचा लेखक ह्युगो लिहितो : ज्याला आपल्या मायदेशाचं प्रेम वाटतं तो ज्ञानाभ्यासातला अगदी कोवळा विद्यार्थी समजावा; ज्याला हे विश्वचि माझे घर' असं सर्व राष्ट्रांविषयी प्रेम वाटतं तो जरा समंजस मानावा; पण ज्याला हे सारं विश्व अगदी परकं वाटतं तो पूर्ण पक्क मानावा.'' आणि म्हणूनच सोस्युरनं भाषेचा अभ्यास 'केवळ भाषा म्हणून व केवळ भाषेसाठीच' करायाचं ठरविलं.

जेव्हा एखादं विज्ञान आपल्या अभ्यासविषयाच्या स्वरूपात, त्याला अभ्यासण्याच्या पद्धतीत आणि त्या अभ्यासाच्या उद्दिष्टात काहीच ताळमेळ ठेऊ शकत नाही इतकंच नव्हे तर त्याला अभ्यासणाऱ्या विद्वांनात संकुचित जातीय, राष्ट्रीय, वा तात्त्वज्ञानिक वृत्ती बळावतात अशा विज्ञानाचं भविष्य निराशाजनक ठरतं. अशा विज्ञानाला पार नवं स्वरूप देण्याशिवाय गत्यंतर नसतं. भाषाविज्ञानाच्या अभ्यासात अशा गोष्टी क्रमशः प्रगट झाल्या व त्या अभ्यासाचं स्वरूप इतकं बदलत गेलं की सोस्युरनंतरच्या अर्धशतकात भाषाविज्ञान हे केवळ नावाचं विज्ञान म्हणून राहिलं. सोस्युरचा अकाली मृत्यू हे त्याच्या नाशाचं कारण ठरलं. पण त्यापेक्षाही अधिक महत्वाचं कारण हे की भाषाविज्ञानींना भाषांच्या इतिहासाकडून त्यांच्या भूगोलाकडे वळण्यासाठी आवश्यक ती भूमिका व पद्धती शोधता आल्या नाहीत. असं का झालं? या शतकांत पौर्वात्याभिगमाविषयी[१३] ज्यांनी सखोल अभ्यास केला व ज्यांचा पौर्वात्य विद्वानांनी आदरपूर्वक उल्लेख केला आहे त्यांनी एकमुखानं म्हटलं आहे की. "हे सुस्पष्ट आहे आणि सर्वांना पटेल अशी गोष्ट आहे की पाश्चत्यांपेक्षा पौर्वात्यांना, आत्मा किंवा ब्रह्म अशा इंद्रियातील गोष्टींचा विचार करणं, त्यानचं ध्यान करणं अगदी सहज व स्वाभाविकपणे शक्य असतं व त्यामुळेच त्यानचं जीवन सुसह्य बनत असावं, परंतु ज्या दृश्य किंवा इंद्रियगम्य गोष्टी आहेत त्यांच्यात त्यांना

कुठलीही व्यवस्था शोधता आली नाही.'' (मॅक्डोनल्ड) भाषाविज्ञान हे एका असं विज्ञान होतं की ज्याच्या बाबतीत आम्ही आमच्या पूर्वजांची दिशा तर विसरलोच, पण नवी साधनं हाती असतानाही नवा मार्ग शोधू शकलो नाही. युरपातील इतर विज्ञानाभ्यासात असं झालं नाही हे स्पष्ट करण्याकरता पुढे दिलेला इतिहास मार्गदर्शनासाठी उपयोगी पडावा म्हणून दिला आहे.

युरपच्या इतिहासात तीन क्रांतिकारी विचारवंत एकमेकांपासून एक-एक दशकाच्या अंतरांर जन्मले; कोपरनिकस १४७३ मध्ये, मार्टिन ल्युथर १४८३ मध्ये व पॅरासेल्सस १४९३ मध्ये[१४] कोपरनिकसच्या 'सूर्य-केंद्री सिद्धान्तानं ख्रिस्ती धर्माच्या एका महत्वाच्या मान्यतेला व व्यवस्थेला उखडून टाकलं. याचं अत्यंत धारिष्टपूर्ण प्रात्यक्षिक मार्टिन ल्युथरनं रोमच्या पोपच्या आज्ञा चव्हाट्यावर जाळण्यानं जनतेला करून दिलं. कोपरनिकसच्या सिद्धान्तानं दुसरं एक रहस्य झुगारून दिलं ते हे की मानव व निसर्ग यांच्यासंबंधीची अशी मान्यता होती की देवानं ही सारी सृष्टी व तिच्यावरील निसर्ग मानवांना पृथ्वीवर सुखानं राहता यावं म्हणून देणगी रुपानं घडवून दिले आहेत. नव्या सिद्धान्तानुसार मानव हा निसर्गाचा अंश आहे, तो निसर्गाच्या धीन आहे, निसर्गाच्या ज्ञानानं व उपयोगानं तो आपलं जीवन सुकर करू शकेल, पण यासाठी त्याला निसर्गाच्या निसर्गाच्या नियमांचं परिश्रमपूर्वक संशोधन करावं लागेल. सेल्ससनंतर कित्येक वर्षांनी सामान्य वर्गात एक माणूस जन्मास आला. १५१४ च्या सुमारास तो दक्षिण जर्मनीत एका खाणीत कामगार म्हणून नोकरी करीत होता. त्यानंतर तो तिथल्या धातुकामाच्या भट्टीत काम करू लागला, आणि त्यानंतर त्यानं रसायन हा विषय प्रायोगिक रीतीनं हाताळत वैद्यकीय व्यवसाय सुरू केला. बाझल (Basle) येथील शिक्षण संस्थेत डॉक्टर म्हणून तो नोकरीस लागला. डॉक्टरी व्यवसायातील आपल्या पहिल्या व्याख्यान-प्रयोगाला त्यानं आमंत्रण दिलं ते तिथल्या रसायनं करणाऱ्या वैदूंना व वस्तऱ्यानं शस्त्रक्रिया करणाऱ्या नाव्ह्यांना. त्यांच्यासमोर त्यानं प्रथम त्या काळापर्यंत उच्चभ्रू विद्वानांत मान्यता पावलेल्या गेलन या ग्रीक आणि अॅव्हिसेना या पर्शियन वैद्यांचे ग्रंथ जाळून टाकले. नंतर त्यानं लॅटिन ऐवजी सामान्य लोकांना

समजणाऱ्या जर्मन बोलभाषेत व्याख्यान दिलं व सेल्सस या प्राचीन वैद्याचा काळाच्या पुढे धावणारा विचार आपण पुढे चालवतो आहोत हे सुचविण्यासाठी त्याने ‘पॅरासेल्सस’ हे नाव धारण केले.

पॅरासेल्ससचा हा अभिमान व उद्योग व्यार्थ नव्हते, कारण रोग्यांना दिल्या जाणाऱ्या औषधात निरनिराळ्या धातूंचा उपयोग करून त्यांना जीवनदान देण्याच्या कामात त्याची चिकित्सा उपयोगी ठरली. त्याच्या लोहभस्मानं अनेक रोगी बरे झाले. धातूंचा अभ्यास व त्यांचा औषधी प्रयोग याविषयात पॅरासेल्ससचा दृष्टीकोन फारच अभिनव ठरला. त्यामुळे त्याला ‘रसायनाचा ल्युथर’म्हणून गौरावोन्यात आलं.

पॅरासेल्ससचा काळापर्यंत युरपातील विद्वान खगोल-व्यवस्थांच्या अवलोकानात्मक अभ्यासात दंग होते. पॅरासेल्ससनं त्यांना निसर्ग- व्यवस्थांच्या प्रायोगिक अभ्यासाकडे वळविलं. १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात होलबाख[१५] यानं पॅरासेल्ससच्या विचारांवर आधारित असा आपला ग्रंथ, निसर्ग-व्यवस्था, प्रसिद्ध केला. तेव्हापासून मानवी ज्ञानात एक नवा विषय व नवी पद्धत दाखल झाली. खगोल-व्यवस्थांपेक्षा निसर्ग-व्यवस्था वेगळ्या आहेत हे पॅरासेल्ससच मत जरी आपणाला पटलं तरी होलबाखच्या ग्रंथातील निसर्ग आपणास पटत नाही अशा आशयाचं मत तत्कालीन जर्मनीचा श्रेष्ठ कवी ग्योटे (१७४९-१८३२)[१६] यानं व्यक्त केलं . तो लिहितो: “ज्या अपेक्षेनं मी होलबाखचं हे पुस्तक उघडलं त्यानं ती अपेक्षा मुळीच पूर्ण झाली नाही. निसर्ग – आमचा आवडता विषय! त्याविषयीचे होलबाखचे विचार वाचून मी अगदी निराश झालो. काळोख्या रात्रीच्या अंधारात आम्ही चाचपडायला लागलो. या काळोखात फळाफुलांनी समृद्ध अशी ही पृथ्वी, तिच्यावरील आकाशात लुकलुकणारे तारे ...सारं सारं नाहीसं झालं. आमच्या आशा, आकांक्षा, कल्पना यांचा मनमोकळेपणा कुठंच लुप्त जाला. अगदी खिन्न. पोकळ मनांनी आम्ही निसर्गाचे गुलाम बनलो.”

होलबाख हा जडवादी विज्ञानी, ग्योटे हा कवी; एक फ्रेंच, दुसरा जर्मन. या दोघांच्यातील फरक हा जितका राष्ट्रीय परंपरांचा, तितकाच स्वभावांचा. पण खरा फरक होता मानवाच्या ज्ञान- विषयांचा. ज्या सुमारास हा फरक प्रगट होऊ लागला त्या वेळी पॅरासेल्सस याचा अनुयायी हेलमोन्ट (१५७७ -१६४४)[१७] यानं एक नवा समन्वयात्मक दृष्टीकोन मांडला. खगोलापेक्षा निसर्ग हा जरी आता महत्त्वाचा अभ्यास –विषय बनला तरी तो संपूर्णतया गतिमान किंवा संपूर्णतया स्थित्यात्मक नाही. त्याचं अंशतः स्थिर व अंशतः गतिमान असं स्वरूप असतं. या दोन अंशांना अगदी काटेकोरपणे वेगळं करता येत नाही. गती आणि स्थिती या एकीला जोडून एक किंवा एकीतून एक अशा युग्म-घटना असाव्यात. या सिद्धान्ताला त्या काळात lactrochemistry असं नाव दिलं गेलं. हेलमोन्टचा अनुयायी याकोब बोएम्हे (१५७५-१६४४)[१८] यानं या सिद्धान्ताविषयी असे उद्‌गार काढले की “अशा प्रकारचा निसर्ग कल्पिला नाही तर त्याची खरी तत्त्वं कधीच कळणार नाहीत व मानवाला त्याचा उपयोग करून घेता येणार नाही.”

होलबाख, हेलमोन्ट व व्योमे यांचे विचार लिबनिझला पटले व हेलमोन्टचा मुलगा फ्रान्सिस (१६१८-१६९९) याच्याशी जेव्हा पॅरिसमध्ये मैत्री झाली तेव्हा लीबनिझला हे विचार चांगलेच अभ्यासायला मिळाले. या मताचे विज्ञानी त्यांना मान्य असणाऱ्या निसर्ग-व्यवस्थांच्या घटकांना अणू न मानता ‘रचनागर्भ’ (archeus), म्हणजे रचनांनी आकारत जाणारे घटक, मानू लागले. असल्या व्यवस्थांत स्थिती व गती या दोन्ही अथवा एकमेंकीशी संवादित राहून साध्य होत जातात असं त्यांचं मत होतं. या विचारांच्या आधारे किएलमेयेर (१७६५-१८४४)[१९] यानं मानवी व इतर सर्व जीव आपल्या गर्भावस्थेत आपल्या कुळाच्या पूर्व रचनांच्या स्थितींचा क्रम संक्षिप्तरूपानं संचित करून ठेऊन विकसतात असा सिद्धान्त [२०] मांडून त्याचं प्रात्यक्षिकही तो प्रयोगशाळेत शिकवू लागला. हा सिद्धान्त व त्याचे प्रयोग पाहून ग्योटेनं आपला मित्र हेर्डर (१७४४-१८०३)[२१] याला एक पत्रात लिहिलं :

"कोणत्याही सजीव देहात त्याचे स्वत:चे रचनागर्भ निगूढ असतात. असा एखादा आंशिक नमुना व त्याच्या रचनागर्भाच्या नियमावलीच्या पायऱ्यांची किल्ली आपल्या हाती आली तर आपल्याला त्या जीवाचा सारा प्रपंच कसा विकसत गेला हे सांगता येईल इतकंच नाही तर जीव रचनांच्या विकासक्रमी आवृत्त्या कल्पून आपण त्यांच्या काल्पनिक स्थितींमधील कड्यांचाही विचार करू शकू."

ग्योटे या कवीतून ग्योटे हा विज्ञानी निर्माण झाला ही अपूर्व गोष्ट सिद्ध करण्यासाठी आणखी काय पुरावा हवा?

कोपरनिकसपासून सोस्युरच्या मृत्यूपर्यंतच्या कालमानातील ज्ञानाभ्यासाची ही वळणं मांडण्याचा उद्देश हा की या अभ्यासात कितीतरी गोष्टी अशा क्रमानं आकार घेत गेल्या की जुन्या व्यवस्था, त्यांची मोडजोड व त्यातून निर्माण होणाऱ्या नव्या व्यवस्था यांचा प्रात्यक्षिक म्हणून उपयोग व्हावा. यांत्रिक खगोल-व्यवस्थांतून रचनागर्भ निसर्ग-व्यवस्था व त्यांच्यातून निर्माण होणाऱ्या प्रतीक-व्यवस्था हा कल्पक्रम ज्ञानाभ्यासदृष्ट्या जसा सूचक आहे तसा त्यांचा समाजसापेक्ष विचार उच्चभ्रूंनी शास्त्रग्रंथात कोंडलेल्या रूढींकडून सामन्यांची निसर्गाकडील वाटलाच हा अभ्यासही महत्त्वाचा आहे. नव्या भाषाविज्ञानाच्या अभ्यासाची ही नांदी हीच अपेक्षा आहे.

या सर्व विवेचनांती एक असं मत प्रगट करावसं वाटतं की विश्वातल्या कोणत्याही विषयाच्या व्यवस्था अभ्यासण्यासाठी असं मानलं पाहिजे की या अभ्यासाला जसं केवळ यांत्रिक तत्त्वाधारे मांडता येत नाही तसं केवळ आध्यात्मिक तत्त्वाधारेही मांडता येत नाही. टी. एच. हक्स्ली[२२] या विज्ञान-तत्त्वज्ञानीनं आपल्या एका पुस्तकात म्हटले आहे की "तत्त्वाभ्यासात माझं असं एक अवलोकन आहे की त्यात भौतिकवाद व अध्यात्मवाद ही दोन टोकं आपल्यातल्याच एका असंबद्धतेची लक्षणं आहेत. ही असंबद्धता म्हणजे आपणाला भौतिक किंवा आत्मिक अंशांचं संपूर्ण ज्ञान होणं शक्य आहे ही

मान्यता!” हा विचार उचलून धरणाऱ्या मॅग्डूगल यानं असं मत प्रगट केलं आहे की याचा अर्थ असा नाही की ‘हेही खरं व तेही खरं.’ जी भूमिका आपल्याला मान्य होते व जो मार्ग आपणाला अभिप्रेत असतो त्या मार्गावर पुढचं पाऊल टाकण्याची पद्धती व साधनं शोधणं हे महत्त्वाचं आहे. याचं उदाहरण देताना मॅग्डूगलनं १८६५ मध्ये ओगुस्त केकुले[२३] यानं बेनझिन या रासायनिक पदार्थातील घटकांची व्यवस्था स्पष्ट करण्यासाठी जी नवी प्रतीक-रचना केली तिचा उल्लेख केला आहे. सहा कार्बन व सहा हायड्रोजन अणूंच्या त्याच्या षडंगी प्रतीक-रचनेमुळे साऱ्या सजीव-रसायनविज्ञानाची उभारणी झाली, हजारो नवी रसायनं तयार करता येऊन प्रायोगिक रसायनविज्ञानात क्रांती घडली. “गणितज्ञापेक्षा तो जी प्रतीकं घडवितो ती त्याच्यापेक्षा शहाणी असतात,” हे फेलिक्स क्लेइनचे उद्‌गार किती खरे ठरले! फुलातला मध गोळा करणारी माशी म्हणजे ‘मधमाशी’ एवढं सांगितलं की भाषाविज्ञान संपलं, पण ही माशी मधाची घनता जाणून तो ज्यात जास्तीत जास्त राहू शकेल असं मेणाचं षट्‌कोनी ‘मधुकोश’ बनवू लागली तेव्हा ती मधमाशी बनली हे सांगायला गणिती व विज्ञानी यांची जरुरी आहे.

संदर्भ व टिपा

१. Geoge Berkeley, 1965 1753.

२. ‘the most enlighten’d of the sons of men’:

३. Abrahsm Hyancinthe Anquetil du Perron. 1731-1805

४. Joun – Francois Shampollion, 1790-1824

५. Wade Baskin, Translator’s introduction’ to Course in Genaral Linguisties (1960)

६. August Schleicher, 1821-68 : Handbuch der litauischen Sprache (Prague, 1856-7)

७. Die darwinsche Theorie and die Sprachwissenschaft (Weimar,1863)

"We now realize that Schleicher was wrong in looking upon language as an organic thing eith its own law of evolution." (Course. 1960- p. 231)

९. Ernest Renan 1823-1892

१०. Curzon, 1859-1925, Viceroy of India.

११. Sieg : Sigeling

१२. Didascalicon of Hugo st. Victor (Ref. Edward W. Said Orientalism, 1991, p. 259)

१३. एडवर्ड सैइद यांनी आपल्या वर उल्लेखिलेल्या ग्रंथात (पान २७६-७) :

Edward W. Said Orientalism, 1991, p.176-7:

H. A. R. Gibb : 'LouisMassignon, 1882- 1962.' Journal of Royal Asiatic Society, 1962

Albart How? ? ?: 'Sir Hamilton Gibb, 1895-1971,' Proceeding of the British Academy, 58, 1972.

३. D. B. Macdonald : The Religious Altitude and Life in Islaam (1908)

१४. N. Copernicus (1473-1543): M. Luther (1483- 1546); Paracelsus (1493-1541)

१५. Holbach (1723-89) : System of Nature (1770)

१६. Goethe (1749-1832)

१७. Helmont (1577-1644)

१८. Jacob Boehme(1575-1624)

१९. Kielmeyer (1765-1844)

२०. 'Recapitlation Theory'

२१. J. G. Herder (1744-1803)

२२. T. H. Huxley (1825-95)

२३. A. Kekule (1829-96)

११. भाषेच्या अंतरंगाकडील वाट

एक शतकभर परिश्रम करून 'इंडो-युरपिअन' नाकाचा नवा मनोरा रचण्यानं बायबलमधील सिनार पर्वतावरील बाबेलाच्या अर्धवट राहिलेल्या मनोऱ्याचं 'बाबेल विमुक्ती'[१] करण्यात भाषांच्या तुलनात्मक-ऐतिहासिक-भौगोलिक भाषाभ्यासाला जे यश मिळालं ते जरी आजच्या इतर विज्ञानांच्या सिद्धीइतकं नजरेत भरणारं नव्हतं तरी भाषाभ्यासाला बौद्धिक विज्ञानाच्या पद्धतीच्या शिखरावर नेण्याच्या दृष्टीनं महत्वाचं होतं. इंडो-युरपिअन हा असला अभ्यास-पद्धतीचा एक श्रेष्ठ नमुना (मोडेल) होता इतकंच नाहीतर विदग्ध भाषांचं संशोधन करणाऱ्या विद्वानांच्या बुद्धीला अनेक अंगांनी तो आव्हानरूप होता. अजूनही युरपात या विषयाला वाहिलेलं संशोधन लेख-व-ग्रंथ रूपानं प्रसिद्ध होत असतं; इंडो-युरपिअन या विषयाला वाहिलेली अनेक पाक्षिकं प्रसिद्ध होत असतात व विविध विद्यापीठांत त्यावर प्रतिवर्षी चर्चासत्रं होत असतात. भारतातील विद्याभ्यासात मात्र हा विषय प्राणिसंग्रहालयातील डायनोसारचा सापळा या रुपात उरला आहे.

ज्यावेळी युरपात भाषाविज्ञान फोफावलं होतं त्यावेळी तिथल्या विद्यापीठांत नव्यानं दाखल होऊ पाहणाऱ्या विद्यार्थ्यांपुढे गणित किंवा भाषाविज्ञान हीच काय ती श्रेष्ठ बौध्दिक विषयातली पसंदगी असे. गौस या सर्वश्रेष्ठ गणितज्ञापुढे ती होती व त्यानं प्रथम भाषाविज्ञान हा विषय पसंत केला, परंतु अगदी शेवटच्या घटकेला गणित हा विषय शिकण्याचं ठरविलं. एका श्रेष्ठ विचारवंताला भाषाविज्ञानानं गमावलं खरं, पण क्तत्या युगातले गणित विषयाचे अनेक विद्वान भाषाविज्ञानाचा कौतुकानं अभ्यास कारीतानी काहींनी तर त्यात महत्वाची भर घातली आहे.

भाषाविज्ञानाची आणि इतर विज्ञानाभ्यासांची, विशेष करून गणितभ्यासाची, ही जी मैत्री होती तिच्यात जरी, अमेरिकन व्यक्तिवादीपणामुळे, थोडी ढील आली तरी १९५० नंतरच्या काळात ती नव्यानं

निर्माण होण्याचा योग आला. याचं मुख्य कारण संगणकादी नवी यंत्रं, संगणकाच्या तांत्रिक भाषांच्या सूत्रपद्धतीमुळे, विज्ञानाभ्यासातील 'व्यवस्था' या कल्पामुळे, सोस्युरनं मांडलेल्या 'यदृच्छा' या संकल्पनेमुळे व निसर्ग-व्यवस्थांच्या अभ्यासात प्रगटलेल्या 'रचनागर्भ' या कल्पामुळे भाषेसाठी जर नवा वर शोधावा लागला तर तो तिचं अंतरंग ओळखू शकेल असा गणित-क्षेत्रातालाच असायला हवा असं सर्वांनाच वाटू लागलं.

विसाव्या शतकाच्या मध्यात, मनुष्य हा इतर पशूंपेक्षा विशेषतः पुच्छहीन महाकाय वानरांपेक्षा —कोणत्या बाबतीत वेगळा व उच्च मानावा असा वैज्ञानिक प्रश्न निर्माण झाला. या प्रश्नाला जोडूनच तो दुसरा प्रश्न मानवविज्ञानाभ्यासात निर्माण झाला तो असा की मानवातल्या 'नैसर्गिक' व 'सांस्कृतिक' या दोन प्रवृत्तींच्या सीमारेखांत काप कुठं व कसा करावा? मानवाला संस्कृती साधली व तिच्याजोगे तो इतर प्राण्यांपासून वेगळा, आर्थिक प्रगतिप्रवण बनला तो कसा? लेव्हि-स्त्रॉसच्या काळात या सर्व प्रश्नांना एक वेगळं रूप आलं : मानवातील संस्कृतिप्रवणता त्याच्यातल्या नैसर्गिक प्रवणतेपेक्षा कोणत्या घटकांमुळे वेगळी व उच्च मानावी?

या प्रश्नाचं उत्तर देण्यासाठी लेव्हि-स्त्रॉसनं प्रथम फ्रॉयड[२] या मनोविश्लेषणविज्ञानीच्या विचारांचा आधार घेतला व असं मत मांडलं की मानवात 'जाणीव' व 'नेणीव' अशा अवस्था आढळतात. त्यातील 'नेणीव'-अवस्था पूर्णांशी निसर्गाधीन म्हणजे जीवशास्त्रीय नियमांनी नियंत्रित आहे, परंतु 'जाणीव'-अवस्था मानवानं आपल्या प्रयत्नशील कृतींनी व ज्ञानसाधनेनं आपल्या अलीकडच्या उत्क्रांतीत नव्यानं विस्तारली आहे. अद्यापर्यंतच्या ज्ञानभ्यासानं नेणिवावस्थेला स्पर्श न करता केवळ जाणिवेलाच सर्वाधिक महत्त्व दिलं. कदाचित ही गोष्ट अॅरिस्टॉटलसारख्या तत्त्वज्ञानं 'माणूस हा विचारप्रधान प्राणी' आहे अशी व्याख्या केल्यामुळे, किंवा मध्ययुगीन ख्रिस्ती धर्माच्या इंद्रियदमनाच्या उपदेशामुळे, किंवा 'मी जाणतो, म्हणून मी आहे' (cogito, ergo sum) या देकार्तच्या तात्त्वज्ञानिक भूमिकेमुळे मानवातल्या नेणीव

अवस्थेचा अभ्यास झाला नाही व त्यामुळे त्याच्या सुप्त व्यक्तिमत्वाचा पुर्णांशानं कधीच सुरचित अभ्यास झाला नाही. यानंतर तरी मानवाच्या मनात नेणिवेचा जो निम्न स्तर आहे त्याचा अभ्यास व्हायला हवा. हा निम्न स्तर फ्रॉयडच्या मते, मनातल्या मनात लैंगिकतेच्या अभ्यासानं शोधता येईल. युंगचं [३] उत्तर मानवातल्या स्वप्न व मिथ्य यांच्या अभ्यासानं तो दृग्गोचर होईल. मालिनोव्हस्किचं [४] मत वनवासी जमातींच्या रीतिरिवाजांच्या अभ्यासानं प्रगट होईल आणि लेव्हि-स्त्रॉसच्या मते मानवाच्या मेंदूतील 'भाषा' या प्रेरणेच्या 'अंतरंगी' अभ्यासानं होईल, असं होतं. मनुष्याला देवानं भाषा ही देणगी दिली अथवा मानवानं ती आपल्या जैविक उत्क्रांतीत प्राप्त केली असं काहीही म्हटलं तरी मनुष्याला जी संस्कृतिप्रवणता साधते ती त्याला आपल्या बालपणात, म्हणजे नेणिवावस्थेत प्राप्त होणाऱ्या'भाषा' या साधनेमुळेच, लेव्हि-स्त्रॉसचं मत याकोबसनची व्याख्यानं ऐकल्यानंतर ठाम झालं होतं.

लेव्हि-स्त्रॉसचं मत सर्वांनाच पटलं असं नाही. याला अनेक कारणं होती. भाषा या गोष्टीचं जे व्याकरणी क्लिष्ट स्वरूप सर्वजण शाळकरी वयात नाखुषीनं शिकतात त्यानं मानवाचा वैश्विक विकास होतो या गोष्टीवर कोणाचीही श्रद्धा बसणार नव्हती. त्या ज्ञानात व्यवहारोपयोगी साधनांनी मोजता-मापता येणारे प्रयोग नव्हते.किंबहुना ध्वनिशास्त्रातील र-ट-फ किंवा लेखनातील ग-म-भ-न यांनी मानवी संस्कृती पुढे गेली आहे. यावर कुणाचाही विश्वास नव्हता. रसेलसारख्यांच्या मते तर भाषेनं वैचारिक गोंधळ निर्माण केला आहे असं होतं. भाषेखेरीज ज्ञानाचे अनेक मार्ग मानावापुढे असतात. यामुळे लेव्हि-स्त्रॉसपुढे जो प्रश्न होता तो सोस्युरच्या मूलगामी विचारांना सुस्पष्ट करण्याचा. सोस्युरनं ज्या अर्थानं 'भाषा ही मानवाच्या विकासाची प्रेरणा मानली ती देकार्त, लॉक, लीबनिझ इत्यादी तत्त्वज्ञांना मान्य असणारी 'प्रतीक-व्यवस्था होती. या प्रतीकातील ध्वनी हा पार्थिव अंश, व निर्देश हा अपार्थिव अंश यांचा संपृक्त संबंध ज्या 'यदृच्छा'-तत्त्वात घडतो त्याचं सोस्युरनं केलेलं विवेचन कोणीच नीट समजून घेतलं नव्हतं. 'प्रतीक' तसंच 'यदृच्छा'-तत्त्व या कल्पांप्रमाणे सोस्युरचे इतरही पुष्कळ विचार नीटपाने अभ्यासले गेले नव्हते. काहीतर विपर्यस्त

स्वरूपात आजच्या भाषाविज्ञानात वावरत आहेत. त्याचा पुढील एक विचार पाहा. आपल्या 'कोर्स'च्या प्रस्तावना विभागाच्या पाचव्या प्रकरणात सोस्युर म्हणतो:

"भाषा ही एका प्रतीक-व्यवस्था आहे. प्रत्येक प्रतीक-व्यवस्था स्वतःची एक रचना घडवीत राहते.अशा रचनेच्या अभ्यासासाठी प्रत्येकानं तिचं अंतरंग व बहिरंग यांच्यातला फरक नीट शिकायला हवा... मी 'भाषे'ची जी व्यवस्था केली आहे तिच्यातून साऱ्या बहिरंगी तत्त्वांना वगळलं आहे. एखाद्या व्यवस्थेचं अंतरंग आणि बहिरंग यांना कसं वेगळं करायाचं हे ठरवायचं असेल तर पुढील नियम वापरावा: जे जे त्या व्यवस्थेला या ना त्या प्रकारे विकसित होण्यास हेतुरूप बनतं ते तिच्या अंतरंगाचं तत्त्वं मानावं."

सोस्युरनं वर मांडलेल्या विचाराधारे भाषाविज्ञान रचायचं झालं तर ते भाषा या व्यवस्थेतल्या 'स्थिर' तत्त्वांपेक्षा, म्हणजे तुलनेपेक्षा, 'अस्थिर' तत्त्वांच्या. म्हणजे विरोध (difference) यां कल्पाधारे रचलं तर आधुनिक सूचक होऊ शकेल, नव्या भाषाविज्ञानाचा हा ओनामा व्हायला हवा. रूढ व्याकरणानं व तुलनात्मक भाषाविज्ञानानं – जे बहुतांशी विदग्ध भाषांच्या व्याकरणी रूपाचा आधार घेत आलं-जी सुरवात केली ती शब्दाकोशांतर्गत, व्याकरणी, बंदिस्त झालेल्या भाषेच्या स्वरूपावरून . म्हणूनच भाषांच्या चौकटी बनवून त्यांना नावं मिळाली. प्रत्यक्ष व्यवहारातल्या विविध अस्थिर तत्त्वांना स्पर्श न केल्यामुळे भाषांच्या संततपणे बदलणाऱ्या नावनिर्मितिक्षम अंगांचा प्राचीन व्याकरणात तसंच आधुनिक भाषाविज्ञानात प्रवेश झालाच नाही. यामुळे सारा भाषाभ्यास निव्वळ बहिरंगी बनला.

लेव्हि-स्ट्रॉसच्या मते मानवाचा मानव म्हणून जो विशिष्ट जैविक गुण आहे तो म्हणजे त्याला 'भाषा' येते. याचा अर्थ असा की त्याच्या जैविक विकासात त्याचा मेंदू अशा प्रकारे घडला गेला की तो कोणतीही प्रतीक-व्यवस्था बनवून तिला साधन म्हणून ते वापरून ते साधन हव्या त्या परिमाणाम विकासावू

शकला.स्थल, काळ, संदर्भ, अभिभाव अशा अनेक परिमाणांत त्या साधनाचा आकार किंवा व्यवस्था बदलते. या साऱ्या विकास प्रक्रियेचं प्रत्यानुकरण किंवा 'मॉडेलिंग' करणं त्या काळी शक्य झालं नाही. भाषेचं लेखन, गणिताचं अंकरेखाटन, संगीताचं नोटेशन अशा अनेक प्रकारांचं 'मॉडेलिंग' झालं, पण त्यात क्रियेपेक्षा स्थिरताच व विकासापेक्षा रेखीवताच प्रभावी ठरली. लेव्हि-स्त्रॉस याच्यावर लिहिलेल्या एका पुस्तकाचा लेखक एडमंड लीच[५] म्हणतो :

"मिथ्य, संगीत, स्वप्नं यांच्यात जे काही सामान्य आहे ते हे की, लेव्हि-स्त्रॉसच्या शब्दांत, ही सारी काळ या तत्त्वाला डावलाणारी मानसिक 'यंत्र' आहेत.संगीताचा पहिला ठेका किंवा सूर गायकाच्या अज्ञात मनात घडविल्या जाणाऱ्या विशिष्ट रागदारीच्या पूर्ण रूपातल्या शेवटच्या सुरानं आधीच निश्चित होतो. स्वप्नांचं किंवा मिथ्यांचंही तसचं होतं. त्यांचा आदि आणि अंत एकमेकांना भिडलेले असतात. असल्या गोष्टींना जेव्हा आपण पायरी-पायरीनं समजण्याचा प्रयत्न करतो तेव्हा असं आढळून येतं की त्यांच्या अज्ञात स्वरूपातला अविष्कार आपणाला कळेनासा होतो. मानवानं संस्कृती निर्माण केली तरी निसर्गाशी जोडलेली आपली नाळ कायम ठेवली आहे. बाह्य कालमानात व्यक्त होणाऱ्या एकरेषावर्ती, सहप्रथित घटकांचं, बहुस्तरीय यांत्रिकी स्वरूप उमलावणारं कल्प-बीजगणित (semantic algebra, p.35)त्यानं आपल्या अंतर्यामात छपवून ठेवलं आहे. त्याला कोणत्याही वर्गीकरणी, व्याकरणी, गणिती जाळ्यात पकडून ठेवता येणार नाही."

लहान मूल आपल्या बालवयात आपली मातृभाषा सहजगत्या आत्मसात करतं.या वयात त्याच्या मेंदूत बुद्धि-तत्त्व पूर्णांशानं विकास पावलेलं नसतं. अशा या वयात कुणाचही व्याकरण न घोकता, कुठलाही परिप्रश्न न विचारता, ते मूल स्वतःच्या भाषाविश्वात मुक्तपणे संचारू लागतं. आपली भाषा घडवू लागतं, हव्या त्या प्रतीकांना समजू शकतं, घडविल्या गेलेल्या प्रतीकांच्या रचना सहजगत्या उकलू शकतं. एका गणितज्ञानं आपल्या लहा मुलाविषयी अशी एक आठवण लिहून ठेवली की तो नुकताच ए बी सी लिहायला लागला तेव्हा एकदा

मी त्याला विचारलं की तुला कोणता महिना आवडतो? त्यावर तो छोटा मुलगा म्हणाला : 'सप्टेंबर' 'का ?' असं मी विचारलं तेव्हा तो म्हणाला, 'तो किती सहज लिहिता येतो' असं म्हणून त्यानं

S P

T E M

B R

'माझ्या लक्षात हे कधीच आलं नव्हतं,' असं त्या गणितज्ञानं[६] म्हटलं आहे. गौस[७] या नामांकित गणितीच्या लहानपणातील अशी कहाणी आहे की तो ज्या प्राथमिक शाळेत शिकत होता तिथल्या त्याच्या वर्गशिक्षकाला एका दुपारी आपल्या खुर्चीत बसून झोपेची डुलकी घ्यायची होती. म्हणून त्यानं वर्गातल्या मुलांना एक गणित करायला सांगितलं ते असं की

१+२+३+४+५+६+ ......

असे शंभरपर्यंत अंक लिहून त्या सर्व अंकांची बेरीज पाटीवर लिहा. मास्तरांना वाटलं की हा सर्व गणिती व्यायाम करायला अर्धा तास तरी लागेल. तेवढा वेळ डुलकीला पुरे, असा विचार करून मास्तर खुर्चीवर बसून पाय लांब करणार तोच आठ वर्षांचा एक मुलगा 'सर, माझं उत्तर!' असं म्हणून आपली पाटी पुढं करून त्यांच्यासमोर उभा राहिला. त्यानं उत्तर लिहिलं होतं : ५०५०. ते पाहून मास्तर गोंधळले. त्यांनी स्वत: अशी कधी बेरीज केली नव्हती. त्यांची झोप उडाली व ते स्वत: बेरीज करायला लागले. त्या मुलाचं उत्तर खरं होतं. पण त्यानं ते इतक्या लौकर कसं मिळविलं म्हणून मास्तरांनी त्याला विचारलं. त्यानं समजविलं, समजा

१+२+३+४+५+६ +७+8+ ....

अशा संख्या क्रमात, पहिल्या व शेवटून पहिल्या, दुसऱ्या व शेवटून दुसऱ्या इ. अशा अंकांची बेरीज
सारखीच असते; उदा. १+८ = २+७ = ३+६ = ४+५ = ९ चार वेळा ९ म्हणजे ३६. याचा नियमानं १ ते १०० पर्यंतच्या संख्यांची बेरीज ५०५० इतकी होईल. बाल वयात गौसला सुचलेला अंकरचनेसंबंधीचा हा निर्णय त्याच्या अभिजात बुद्धिमत्तेचा गुण होता. या गोष्टीला आपण 'प्रतिभा' म्हणतो. लहान मुलांच्या भाषाज्ञानाच्या मुलाशी अशीच प्रतिभा दडलेली असते. व्यवहाराच्या चार भिंतीत त्यांचं शरीर रूढिमान्य व्याकरणी भाषाभ्यासात त्यांचं मन कोंडल गेलं की त्यांच्या मेंदूतलं कल्पक 'अकाल-यंत्र' बंद पडत असावं.

युरपातील मध्ययुगीन काळात अॅरिस्टॉटलच्या तत्त्वज्ञानावर आधारलेली 'सार्वधारणिक व्याकरण'.नावाची एक तत्त्वज्ञानाची काही विद्वानांनी मांडली होती. या तत्त्वज्ञांना 'मोडिस्टी' (modistae) म्हणत.त्यांच्या मते भाषेचं अंतरंग हे 'तार्किक' स्वरूपाचं असतं व मुखावाटे बाहेर पडतं ते तिचं 'बाह्यस्वरूप 'व्याकरणी' असत. अंतरंगातील 'राम' व चालणं' हे घक़्तक बाह्यांगात 'राम चालतो' असे बनतात. भाषेचे अंतरंग हे तार्किक असून सर्व मानवी समाजात ते एकाच रुपात मानवी मेंदूत रुजलेला असतं; विशिष्ट भाषांची व्याकरणं ही केवळ त्याची बाह्यांगं असतात. असाच काहीसा विचार सोस्युरच्या 'भाषा' (langue) व 'बोलणं' (parole) व चोम्स्कीच्या 'शक्ती' (competence) व 'कृती' (performance) या विचारात प्रगट झाला आहे. या सर्व अध्याहृतींच्या मुळाशी 'अकाल-तत्त्व' व 'क्षणाक्षणानं प्रगट होणारं, पायरी-पायरीनं जाणारं बाह्य स्वरूप' असा वैज्ञानिक फरक असल्यानं त्याचं आजच्या विज्ञानातील विवेचन जाणणं महत्वाचं आहे.

कारण परिणाम, म्हणजे आधी कारण व नंतर त्याचा परिणाम अशा साध्या व्यवहारी कालमानाला मानणाऱ्या विज्ञानाला आइनस्टाइनच्या सापेक्षता-सिद्धान्तानं बाजूस सारल्यानंतर, म्हणजे १९२५ नंतरच्या युगात, जे नावं विज्ञान आकार पावू लागलं ते म्हणजे परमाणु-विज्ञान. न्यूटननंतरच्या काळात पदार्थांचे

घटक कोणते याविषयी विज्ञानींत मतभेद होता, काहींच्या मते ते घटक लहरीरूप आहेत; इतरांच्या मते ते अणुरूप आहेत. १९ व्या शतकाअखेरच्या पदार्थविज्ञानात त्यांचं लहरीरूप बरंच मान्यता पावलं व त्यासाठी हॅमिल्टन[८] या विज्ञांनीनं (हॅमिल्टोनिअन) समीकरणांचं गणित रचलं. या गणिताधारे खगोललक्षी सापेक्षता-सिद्धान्त घडविता आला तरी परमाणुलक्षी पदार्थविज्ञानाला त्यामुळे बराच जटिल स्वरूप आलं. पी. ए. एम. डिरॅक[९] या प्रसिद्ध पदार्थविज्ञांनीनं १९२९ त अशी कबुली दिली की "जरी पदार्थ व रसायन या विषयात आपण पुष्कळ प्रगती केली असली तरी एक मोठी अडचण ही आहे की या विज्ञानातील हॅमिल्टोनिअन समीकरणांनी परमाणूंचं रहस्य उलगडणं हे फार श्रमाचं होऊन बसलं आहे.'' १९३० साली त्याला आपण परमाणु-विज्ञानावरील सर्वमान्य परंतु अतिशय अवघड ग्रंथ याच गणिताधारे लिहावा लागला.

विज्ञानाच्या प्रगतीत नवे विचार व नवे प्रयोग करणं हे जितकं म्हत्त्वाचं असतं तितकंच रूढ प्रणाली झुगारून देणं म्हत्त्वाचं ठरतं. परमाणु –विज्ञानात वर उल्लेखिलेल्या रूढ प्रणालीची पकड सैल करण्याचं श्रेय रिचर्ड फाइनमन[१०] याला दिलं जातं. फाइनमन आपल्या एका ग्रंथात लिहितो : "आपण किती विचित्र दुनियेत राहत आहोत जिथं आपलं ज्ञानक्षेत्रातलं पुढचं पाऊल अशा रोखानं टाकावं लागतं की ज्यायोगे गेली दोन हजार वर्षं मानवजातीनं जो मूर्खपणा आचरला असेल तोच आपणाला पुढे ठेवावा लागतो." फाईनमनला असल्या दोन मुर्खपणांना तोंड द्यावं लागलं . पहिला, लहरीसिद्धान्तावर आधारलेल्या हॅमिल्टोनिअन समीकरणांचा व दुसरा नव्यानं उपजलेला. सारं साठीचं दशक अमेरिकेत नवं, नवं, आणखी नवं, अशा नाविन्यवेडानं भारलेलं होतं. अशा दशकात शिक्षणक्रमात एक नवं गणित दाखल करण्यात आलं ते 'सेट'-सिद्धान्ताचं. फाइनमनला आपल्या छोट्या मुलांना गणित शिकवताना त्याचा परिचय झाला. तो लिहितो : "लहान मुलांच्या शिक्षणात अलीकडे 'नवं गणित' नावाची टूम निघाली आहे. या गणिताचा राष्ट्रीय शाळांत फार

झपाटयानं प्रचार होत आहे. मुलांच्या आईवडिलांची त्यानं तिरपीट उडवून दिली आहे.” “फाइनमननं या नव-गणिताची मुळीच दखल घेतली नाही. उलट त्यानं या तथाकथित नव-गणिताचा बुडबुडा ब्लेडच्या धारदार पातीनं कापावा तसा कापून टाकला. मुलांना शिकवला जाणारा हा गणित प्रकार किती खोट्या प्रचारकी थाटाचा ‘ढोंगी शहाणपणा होता हे त्यानं अमेरिकेतील शिक्षणखात्यातील अधिकाऱ्यांना दाखवलं. त्यातल्या नव्या म्हणविल्या जाणाऱ्या व्याख्या केवळ शाब्दिक, अर्थहीन पोकळ शब्द होते, त्याच्या मते विज्ञानाला लागलेला हा नवा रोग होता. ‘सेट’- पद्धतीतल्या ‘कप’ (∪) व ‘कॅप’ (∩) या प्रतीकांची पदार्थविज्ञानाला कधीच जरूर वाटली नाही.”[११] सारं रूढ तसंच सारं नवीन स्वीकारणीय असतं असं मुळीच नाही. ज्ञानक्षेत्रातल्या एका संकुचित समजुतीचा पडदा फाइनमननं फाडून टाकला. नंतर त्याने आपलं सारं लक्ष दुसऱ्या गोष्टीवर केंद्रित केलं. पदार्थविज्ञानाचा त्यानं जिथं अभ्यास केला त्या अमेरिकेच्या एम.आय.टी. या संस्थेनं उच्च पदार्थविज्ञानाच्या अभ्यासात हॅमिल्टनची रीत वगळून लाग्रांज [१२] याची रीत मान्य केली होती. पदार्थाचे घटक लहरीरूप नसून अणुरूप आहेत या मान्यतेवर लाग्रांजची समीकरणं आधारलेली होती. त्यांच्यात स्थल-काळ यांच्याऐवजी ‘कार्य’[१३] या कल्पाला म्हत्त्व होतं, आपल्या शालेय शिक्षणातील शेवटच्या वर्षात फाइनमनला आपला शिक्षक अब्रम बॅडर[१४] याच्याकडून ती शिकायला मिळाली होती. पण त्या काळात त्याला तिथं महत्त्व वाटलं नाही.

१९४१ सालातील एका संध्याकाळी फाइनमन प्रिन्स्टन येथील नासो हॉटेलात एका पार्टीला गेला असताना तिथं युरपकडून आलेल्या हर्बर्ट येहले[१५] नावाच्या पदार्थविज्ञानीशी त्याची भेट झाली. विज्ञानातील गोष्टींविषयी बोलताना फाइनमननं त्याला प्रश्न केला : “स्थळ-काळ यांच्याऐवजी ‘कार्य’ या कल्पाला केंद्रवर्ती मानून परमाणु-विज्ञान रचण्याचा काही मार्ग तुला ठाऊक आहे का?” यावर हर्बर्ट ‘नाही’ असं उत्तर देऊन नंतर चाचरत म्हणाला, “पण मला असं आठवतं की डिरॅकनं लाग्रांज समीकरणं वापरून असं करण्याचा

प्रयत्न सात-आठ वर्षांपूर्वी लिहिलेल्या एका प्रबंधात केला होता." दुसऱ्या दिवशी दोघांनी प्रिन्स्टनच्या ग्रंथालयातून तो प्रबंध[१६] शोधून काढला. फाइनमनला हवं ते रचनागर्भ विकासप्रवण गणित हाती येताच परमाणु-विज्ञानाच्या अभ्यासाची नवी दिशा गवसली. लाग्रांजच्या अज्ञात राहिलेल्या प्रतीक-व्यवस्थेनं एक क्रांती केली. विज्ञानात पुढचं पाऊल योग्य त्या प्रतीकांनीच टाकतां येतं हे फेलिक्स क्लेइनचं मत पुन्हा एकदा विज्ञानींच्या प्रत्ययास आलं. लाग्रांजच्या गणित-व्यवस्थेला हाताशी घेऊन फाइनमननं सप्टेंबर १९६१ ते मे १९६३ या दोन वर्षांत दिलेल्या व्याख्यानांनी अभिनव पदार्थविज्ञान रचलं. त्या व्याख्यानांचं ग्रंथरूपानं प्रकाशन १९६३ ते १९६५ या वर्षांत झालं.

फाइनमनच्या या विचारानं 'व्यवस्था' या कल्पात 'विकास' या कल्पाची फार महत्त्वाची भर पडली. काही व्यवस्थांतील घटक एकरेषावर्ती काळात पुढे तसचं मागे जाऊ शकतात, उदा. आगगाडीचे डबे. पण काही व्यवस्थांत ते शक्य नसतं. उदा. अंडं फोडून त्याचं आमलेट बनविल्यानंतर ते आमलेट आपली पूर्वावस्था आक्रमून पुन्हा अंडं बनू शकत नाही. फाइनमननं 'काळ' या कल्पाला परमाणुविज्ञानातून कसा गच्चू दिला ते जर अभ्यासलं तर भाषेच्या 'निम्न' स्तराच्या अभ्यासाला थोडी मदत होऊ शकेल. इलेक्ट्रॉनची ऊर्जा (E) मोजण्यासाठी डिरॅकच्या समीकरणात जे प्रमाण होतं त्याला 'काळ' (t) या तत्त्वानं गुणावं लागत असे : Et समजा, फाइनमन म्हणाला, याच्या उलट बोलायचं आहे, म्हणजे – (Et) हवं असलं, तर आपण (-E)(t) किंवा (E)(-t) असं म्हणू शकतो. यातील दुसऱ्या पदानं असं सूचित केलं जातं की इलेक्ट्रॉन'मागे' जात आहे. काळ मागे जाऊ शकतो!

आपल्या ग्रंथाविषयी बोलताना फाइनमन लिहितो: :मी योजिलेल्या नव्या गणिती पद्धतीनं आपणाला कार्यकारण व निश्चितता यांच जे ज्ञान मिळतं ते मक्की उच्च कोटीचं आहे. पण ते अशा एका प्रतीक- पद्धतीनं मिळालं आहे की जिच्या रचनेचा मूळ उद्देश अगदी निराला होता... गणिती विचारातील कल्प नवनव्या

प्रतीक-व्यवस्थांना जन्म देतात. त्यातल्या काही विश्वाचं रहस्य उकलण्याला उपयोगी पडतात... जितका 'भाषा' आणि 'अनुभव' यांच्याविषयीचा विचार करावा तितक्या त्या गोष्टी एकमेकीनपासून वेगळ्या वाटतात...भाषांच्या अनेक व्यवस्था आपण साधू शकतो, त्यांचे अनेक नियम गोठवू शकतो, त्यातला काही तर्कनियमित, काही सामाजिक विचारांच्या नियमांनी बांधलेल्या... कसंही असलं तरी प्रतीकांद्वारा जे कल्प व्यक्त होतात त्यांना जोपर्यंत आपण विश्वाराचानेच्या संबंधात हाताळू शकत नाही तोपर्यंत आपण विश्वाचं ज्ञान मिळवू शकत नाही...स्थल, काळ हे कल्प अणूंच्या विश्वात अस्तित्व धारण करू शकत नाहीत, ते अनावश्यक आहेत हे आपण पाहिलं. मग 'संख्या' या कल्पाचीही तीच गत कशावरून होणार नाही? आणि म्हणूनच माझं असं मत आहे की गणिताला पौर्वधारणिक मानण्याची रूढी झुगारून त्याला रचनागर्भ मानण्याची नवी प्रथा सुरू करायला हवी... सर्व विज्ञानानुभावाला स्थिर सांख्य-प्रातीकांनी मांडण्याची जी प्रथा अनेक शतकांपासून रूढ आहे ती आता सोडायला हरकत नाही कारण 'अनुभव' हा स्थिर तुकड्या- तुकड्यांनी बनलेला नसतो. एखाद्या प्रक्रियेचा विकास किंवा विस्तार्या रुपात तो प्रगट होतो.'' फाइनमनच्या या दृष्टीमुळे एका 'अ-काल-स्थल' बीजगणिती विश्वाचं दालन उघडलं गेलं. ज्ञानाचा घटक स्थिर अणू, परमाणू किंवा लहर नसून तो एका रचनागर्भ (archeus) म्हणजे संयोगी रचना उलगडत, विकासात जाणारा असतो हे निश्चित झालं.

फाइनमन आणि चोम्स्की हे दोघेही एम. आय. टी. या अमेरिकेतल्या उच्च संशोधन संस्थेतले विद्वान, दोघेही बुद्धिवादी, गणिती. एक अणूंच्या दोबळ विश्वाकडून परमाणूंच्या अतिसूक्ष्म विश्वात शिरू पाहत होता. दुसरा भाषेच्या बाह्यस्वरुपाकडून तिच्या अंतरंगी विश्वात शिरू पाहत होता. फाइनमनला आपला मार्ग डिरॅकनं केलेल्या लाग्रांजच्या गणिताच्या नवसर्जनानं गवसला; चोम्स्कीला के. एस्. लॅश्ली[१७] यानं लिहिलेल्या मानव-मस्तिष्क-विज्ञानावरील प्रबंधानं सुचविला. या दोन्ही ज्ञानमार्गांचा शोध व त्यांच्याद्वारा साधणाऱ्या प्रगतीची दिशा या दोन गोष्टी दोन दशकांच्या समयावकाशात घडल्या. परंतु

फाइनमनला आपली क्षेत्रात जितकं यश लाभलं तितकं चोम्स्कीला लाभलं नाही. याचं कारण फाइनमनच्या संबंधात वर दिलेल्या माहितीवरून स्पष्ट होईल.अगदी वरच्या अभ्यासावरूनदेखील दोन्ही गोष्टी नजरेत भरतील. फाइनमन रूढ पदार्थविज्ञानातील गणिती विचारांच्या शृंखला तोडायला तयार झाला इतकंच नव्हे तर त्यानं गणिताचं स्वरूपच बदलून टाकलं; त्याला नावनिर्मितिक्षम केलं. चोम्स्कीनं भाषाभ्यासात पदार्पण केलं त्यावेळी सोस्युरचा 'प्रतीक-व्यवस्था' हा विचार हाताशी असताना, हुंबोल्टचा 'मर्यादिततेकडून अमर्यादिततेकडे' जाण्याच्या मानवी मेंदूच्या शक्तीचा सिद्धान्त ठाऊक असतानाही तो रूढ व्याकरणाची 'संतत' व्यवस्था सोडू शकला नाही.सोस्युरच्या लेखनात भाषा ही एक विलक्षण रम्य 'बीजगणित' (algebra) आहे; ती एक संरचनात्मक 'आकृती'त आहे; ती एक संगीताची 'सुरावली' आहे... अशा विविध कल्पना चोम्स्कीपुढे असूनही तो केवळ 'पारोल' व 'लांग' या सोस्युरच्या कल्पांना नव्हते ते अर्थ देत राहिला.

सोस्युरनंतर जो तात्त्विक गणिती भाषाभ्यास प्रथम नजरेस आला तो चोम्स्कीच्या १९५७ मधील 'वाक्यान्वयाच्या संरचना'[१८] या पुस्तकात. या पुस्तकाच्या लाखो प्रती खपल्या असं म्हणतात. या पुस्तकातल्या 'वाक्यान्वय' हा शब्द छद्‌मी होता. 'व्हिएन्ना वर्तुळाच्या रुडोल्फ कार्नाप या तर्कज्ञानं १९३४ मध्ये छापलेल्या आपल्या ग्रंथाच्या[१९] नावात तो शब्द प्रथम वापरला होता, पण त्या शब्दाआधी त्यानं 'तार्किक' हे विशेषण वापरलं होतं. संगणकांच्या यंत्र-भाषांचा उद्भव कार्नापच्या या 'तार्किक वाक्यबंधा'तून होणार होता. हा यंत्र-भाषांतील काही कल्प, प्रक्रिया व व्यापार समजविण्यासाठी तत्कालीन तर्कज्ञ कुठंकुठं स्वाभाविक भाषेतील, विशेषतः इंग्लिशमधील उदाहरणं देत असत. यंत्र-भाषांचा अशा तऱ्हेचा गणिती अभ्यास चोम्स्कीनं १९६३ मध्ये प्रकाशित झालेल्या 'गणिती मानसशास्त्राचा अभ्यास भाग २'[२०] या ग्रंथात समाविष्ट झालेल्या लेखात पूर्णत्वास नेला. या लेखात चोम्स्कीनं ज्या चार गणिती भाषांच्या व्यवस्था अभ्यासल्या त्यातली एकही स्वाभाविक भाषेच्या

विकासतत्त्वांना अथवा निर्मितिक्षमतेला स्पर्श करू शकली नाही. काळाच्या पायरी पायरीनं घडणाऱ्या क्रमाला फाइनमन जसा पदतळी घालू शकला तसं चोम्स्की करू शकला नाही. ज्या रेषात्मक क्रमाविषयी लॅश्ली धोक्याची सूचना देत होता ती चोम्स्की लक्षात घेऊ शकला नाही. अमेरिकनांची अधू दृष्टी हीच चोम्स्कीच्या भाषाविज्ञानाची फलश्रुती! यंत्र हे बोलून-चालून यंत्राच; त्याला कितीही गती दिली, त्याच्या घटकांत कितीही वाढ केली, त्याच्या सूत्रनियमांचा कसाही कितीही क्रम गोठवला तरी ते यंत्र नवनिर्मितिक्षम अथवा विकसनशील अशा 'भाषा' या व्यवस्थेला घडवू शकत नाही. चोम्स्कीनं जे 'गणिती भाषाविज्ञान' रचलं त्यात बूल-प्रणीत 'सेट'-सिद्धान्त रसेलप्रणीत तर्कशास्त्र वीनर-वॉयमन-प्रणीत स्वनियमयंत्र-सिद्धान्त[२१] असल्या उच्च, परंतु स्थिर गणिती रचनांचा अंतर्भाव होता. परंतु जीवविज्ञानात नव्यानं आकार घेत असलेल्या विकासक्षम-व्यवस्था (development systems) या कल्पाचा यात कुठंही स्पर्श नव्हता.चोम्स्कीची निर्मितिक्षम (generative) व्याकरणाची कल्पना फोल ठरली. ही गोष्ट तत्कालीन श्रेष्ठ तर्कज्ञ तार्स्कि, क्लीनी, रोझेनब्ल्यूम वगैरेंनी मान्य केली. भाषा हे लहान मुलांच्या मेंदूत टंकित होत नाही, ती बालकांच्या मनात बीजरूपानं रुजते, फुलते, उमलते, पांगरते या विकासक्रियेला अभिव्यक्त करणारं गणित जोपर्यंत निर्माण होऊ शकलं नाही तोपर्यंत भाषेचं अंतरंग समजणार नव्हतं हे निश्चित!

संदर्भ व टिपा

१. C. K. Ogden: Debabelization (1931)

२. Sigmund Freud, (1856-1940)

३. C. G. Jung, 1875-

४. B. Malinowsk

Edmund Leach: Lvi-Strauss (Fontana, 1970), ch. 7. Also 'structure and society, by Dileep Padgaonakar, Tol, 21-4-1989

६. W.W. Sawyer: Prelude to Mathematics (Pelican, 1955), p. 20

७. Gauss, 1777-1855

८. William Rowan Hamilton, 1805-1865

९. P. A. M. Dirac, 1902-1984. The Principles of Quantum Mechanics (Oxford, 1930)

Richard Feynman, 1918-1988. The Feynman Lectures on Physics, Vol 1-3 (Addison-Weslay, 1963)

११. Glaick, J. : Genius (Rupa & Co. 1992), p. 399-401

१२. Joseph Louis Lagrange, 1736-1813

१३. action

१४. Abram Bader

१५. Herbert Jehle

'The Lagrangian in Quantum Mechanics ,' Physikalische Zeitschrift der Sowjetuniaon, 1933

१७. K. S. Lashley: 'The Problem of Serial order in Behavior.' 1951

१८. N. Chomsky :Syntactic Structures (Mouton, 1957)

Vienna Circle, 1924-36, R. Carnap: The Logical Syntax of Language (Eng. ed. Kegan Paul, 1937)

Handbook of Mathematical Psychology, vol , ed.Luce, Bush and Galanter (Wiley, 1963)

२१. Cybernetics ; Information theory: Automate Theory

१२. उपसंहार

न्यू मेक्सिकोतील अॅलॅमोगोर्दो[१] या गावाच्या वायव्य दिशेस साठ मैलांवर असलेल्या एका वाळवंटातील झोर्नादा देल मुएर्तो[२] ('मृत्यूचा प्रवास') येथे सोमवार जुलै १६, १९४५ रोजी पहाटे ५:२९:४५ वाजता पृथ्वीवरील मानव-निर्मित पहिला अणु-बाँब-स्फोट-प्रयोग यशस्वीपणे करण्यात आला. असं सांगतात की तो प्रचंड स्फोट पाहून 'त्रिमूर्ती'[३] नावाच्या या प्रकल्पाचे धुरिणत्व ज्यानं केलं त्या संस्कृतभाषाप्रेमी पदार्थ विज्ञानी रॉबर्ट ओपेनहायमर[४] यानं उदगार काढले : "कालो*स्मि लोकक्षयकृत् प्रवृद्धः"[५] काळाचं इतकं प्रत्यक्ष, इंद्रियगोचर पण भयंकर प्रात्यक्षिक ओपेनहायमर याला त्या क्षणी दिसलं की त्याचं वर्णन करण्यासाठी त्याला भारतीय तत्त्वज्ञानाच्या संस्कृतभाषेचा आश्रय घ्यावा लागला.

विज्ञान हे प्रयोगनिष्ठ असतं; प्रयोगानं त्याच्या सिद्धान्तांना बळकटी येते. गीतेनं वापरलेला 'काल' हा शब्द गूढार्थी होता, पण या क्षणी मात्र तो प्रत्यक्ष बनला. विज्ञानातला 'काळ' हा कुठल्यातरी साधनानं (उदा. गोलक, वालुकायंत्र, घटिकापात्र, घड्याळ इ.) मोजता येणारं एक परिमाण आहे; प्रतीकरूपात ते गणितात मांडलं जातं. गीतेचा 'काल' हा साऱ्या पदार्थमात्राला व्यापून त्याचा अंत करून उरणारा कल्प आहे. मानवानं ज्याला विनाश किंवा मृत्यू मानलं त्याचं स्वरूप म्हणजे 'काल'. परिमाण या स्वरूपातील काळाला आइनस्टाइनच्या सापेक्षता सिद्धान्तांनी (१९०५;१९१५) नाहीसं करून टाकलं होतं; त्यामुळेच तर मानव झोर्नादा देल मुएर्तोत 'काल'. प्रत्यक्षपणे प्रवृद्ध करू शकला. ओपेनहायमर याला प्रत्यक्षात दिसलं ते गीतेतलं लोकक्षय करणारं विराट सत्य होतं –अजर, अमर. हे सत्य जेव्हा प्रत्यक्ष बनलं तेव्हा त्याची शक्ती किती प्रचंड होती की याचा अनुभव ही आजच्या युगातील मानवाच्या प्रायोगिकविज्ञानभ्यासातील एक महान सिद्धी होती; त्याच्या कल्पकतेची, बुद्धीची, यंत्रकृतीची ती प्रचंड झेप होती. त्यानंतर त्याच्या साऱ्या वैश्विक

ज्ञाननियोजनाची पद्धती या प्रकल्पानं आखली जाणार होती. तसा त्याचा सिद्धान्त लगेच प्रगट झाला १९४६ साली, महान स्फोट[१६] या नावानं!

भाषाविज्ञानाच्या दृष्टीनं सिद्धान्ताचं महत्त्व हे की अठराव्या शतकातील युरपातल्या भाषाभ्यासापुढे भाषेचा उदगम —व —विकास हा प्रश्न निर्माण होऊन त्यानं त्या अभ्यासाला जसं विज्ञानप्रवृत्त केलं तसं आता पदार्थविज्ञानापुढे विश्वाचा उदगम- व विकास या प्रश्नानं केलं. आतापर्यंतचं पदार्थविज्ञान पदार्थांची घटना, स्थिती व त्यांच्यातल्या नियमांचा अभ्यास एवढ्यापुरतं मर्यादित होतं. त्यात विश्वरचना, मानव, त्याचं मन, त्याचा समाज, त्याची प्रतीकं यांचा अंतर्भाव नव्हता.'महान स्फोटा' नंतरच्या विज्ञानभ्यासाला जी नवी दिशा गवसली तिच्या स्वरूपाची आपल्या क्षेत्रातल्या अभ्यासापुरती जाणीव भाषाविज्ञानींना एक शतकभर अगोदर झाली. ही नवी दिशा म्हणजे वैविध्याचा अभ्यास, त्या अभ्यासातून उकलत जाणारं 'विकास' (development) हे तत्त्व व त्याच्या अभ्यासातून होणाऱ्या त्याच्या स्त्रोतांच किंवा उदगमाचं तात्त्विक दर्शन या सर्वांना ज्या एका सूत्रानं बांधायचं ते म्हणजे केवळ मानवी मन.

एकोणीसाव्या शतकातील विज्ञानाभ्यासात ही जाणीव भाषाविज्ञानानंतर भूस्तर-विज्ञानात व जीव- विज्ञानात प्रगट झाली. अनुक्रमे जेम्स हटन[७] व चार्ल्स डार्विन[८] हे त्या विज्ञानांचे प्रणेते होत. या साऱ्या विज्ञानांत मांडलं गेलेलं तत्त्व एकच, पण ते विविध विज्ञानांत विविधपणे प्रगट झाल्यामुळे ते एकाच पद्धतीनं हाताळता येईल का हा मानवापुढे खडा झालेला नवा प्रश्न होता. या ज्ञानमार्गाचं दर्शन युरपातल्या विद्वानांना कोपरनिकसाच्या काळापासून झालं होतं. तेव्हापासूनच या ज्ञानमार्गाला अनुसरण्यासाठी जी बौद्धिक साधनं हाताशी घ्यावी लागली ती चार आहेत असं नक्की करण्यात आलं होतं. ती म्हणजे अवलोकन, तर्क, गणित व प्रयोग या साधनांनी त्या त्या ज्ञानविषयाचं आकलन करण्याच्या धडपडीत मानवाला आपल्या या चार ज्ञान-साधनांनादेखील अधिकाधिक धारदार, काटेकोर, परोक्ष बनवावं लागलं. आइनस्टाइननं

सापेक्षता-सिद्धान्त रचला खरा, गणितानं तो सयुक्तिक ठरविला, पण परोक्ष प्रयोगानं तो सिद्ध करता आल्याशिवाय त्याच्यावर विज्ञानाचं धिक्कामोर्तब होणार नव्हतं. या प्रयोगासाठी आवश्य ती प्रयोगशाळा विश्वाइतकी विशाल हवी होती. ती कशी मिळणार? सुदैवानं १९१८ साली होणाऱ्या खग्रास सूर्यग्रहणानं ती उपलब्ध करून दिली. पृथ्वीवरील दोन वेगवेगळ्या ठिकाणच्या प्रयोगशाळांनी तो सिद्धान्त प्रयोगसिद्ध झाल्याची ग्वाही दिली. एडिंगटन[९] या विज्ञानीनं तो प्रयोग सिद्ध झाल्याची तार आइनस्टाइनला पाठविली त्यावेळी आइनस्टाइन आपल्या प्रयोगशाळेत इतर काही लेखनात दंग होता. तर वाचून त्याची सेक्रेटरी आनंदभारानं धावत-धावत गेली व त्याला म्हणाली, "सर,तुमचा सिद्धान्त प्रयोगानं सिद्ध झाल्याची तार आलीय्" आपण लिहित असलेल्या कागदांवरून नजर वर न करता शांतपणे आइनस्टाइन तिला म्हणाला, "तुला त्याविषयी शंका वाटत होती का ?"

आइनस्टाइनच्या या प्रयोगसाक्ष सापेक्षता-सिद्धांतानंतर 'विज्ञान' हा विषय सर्वमान्य ज्ञानविषय बनून त्यावर अनेक पुस्तकं लिहिली गेली. त्या सर्वांचा मुख्य आशय हा की ज्ञानाच्या साधनेसाठी विज्ञानानं जे चार आधारस्तंभ मानले – अवलोकन, तर्क, गणित व प्रयोग – त्यांचं रहस्य काय? तर्काची आद्य रचना जरी ग्रीकांच्या काळात अॅरिस्टॉटलनं केली तरी आधुनिक काळात लीबनिझ व त्यानंतर बूल यांनी ती साफ अमान्य ठरवून तर्कपद्धती रचल्या. या नव्या तर्कपद्धतीदेखील एकीमागून एक कोलमडून पडायला लागल्या. फ्रेगे[१०] याच्या व्यवस्थेला ग्योडल यानं चीत केलं. मग विज्ञानात तर्कव्यवस्था असते ती कोणती? कोणत्या तर्कव्यवस्थेच्या आधारावर विज्ञान आपले पाय घट्ट रोवून उभं राहतं?

असाच प्रश्न गणिताच्या बाबतीत निर्माण झाला. प्लेटोसारख्या श्रेष्ठ तत्त्वज्ञानं आपल्या अॅकॅडमीत प्रवेश करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना 'तुम्हाला जर यूक्लिडची भूमिती येत नसेल तर प्रवेश बंद' असा इशारा दिला. गणिती व्यवस्थांनीच सत्यदर्शन घडू शकते असं वाटून त्यानं आपल्या लोकशाहीत

कवींना स्थान नाही असं स्पष्ट म्हटलं. पण यानोस बोइलाइ[११] यानं १८३१ साली लिहिलेल्या अवघ्या २६ पानांच्या एका पुरवणीत हजारो वर्ष मान्य झालेल्या यूक्लिडच्या भूमितीला एका फुंकरीनं उडवून भूमिती-रचना कुठल्याही वैश्विक सत्यावर अधिष्ठित नसून मानवी मान्यतेवर रचल्या जातात असं सिद्ध केलं. लौकरच यूक्लिडेतर व्यवस्था प्रगट झाल्या.

तर्क आणि गणित यांच्यानंतर अवलोकन याची पाळी आली. 'अवलोकन म्हणजेच विश्वास' (To see is to believe) असं जरी युरपातले लोक शेकडोशे वर्षं म्हणत आले तरी अनेक नेत्राभास (पाण्याच्या पेल्यात टाकलेली काडी सरळ आहेकी वाकडी आहे?) समजविण्यासाठी कुठल्यातरी अध्याहृतींचा आधार घ्यावा लागे. जून २०, १८७७ मध्ये आपला गणिती मित्र डेडेकिन्ड[१२] याला लिहिलेल्या पत्रात, दोघांची मातृभाषा जर्मन असूनही तत्कालीन विज्ञानाच्या फ्रेंच भाषेत कान्टोर[१३] या श्रेष्ठ गणितज्ञानं लिहिलं : "अवलोकन म्हणजे अविश्वास!"

विज्ञानाचे भक्कम म्हटले गेलेले आधारस्तंभ अशा रीतीनं एकामागून एक कोलमडून पडायला लागल्यानंतर त्याचा शेवटचा आधार उरला तो केवळ प्रयोग! खगोल किंवा परमाणू यांच्यातील सिद्धान्तासाठी प्रयोगशाळा निर्माण करणं जवळ जवळ अशक्यच. त्यामुळे शेवटी उरतं काय तर मानवी मेंदू व त्यातील प्रतिक-व्यापार. त्यातही स्थल, काल, कार्य, कारण, नियम, रचना, व्यवस्था असले कल्प व अर्थ, सत्य, असत्या,सैन्दार्य, पवित्र असली मूल्यं अस्तंगत झाली. मग उरला तो विषय एकच: विश्वातील निसर्ग- व्यवस्था व या व्यवस्थेत मानव व त्याच्या मेंदूत घडणाऱ्या प्रतीक- व्यवस्था. या विषयाची सुस्पष्ट मांडणी रॉजर पेन्रोझ[१४] या विज्ञांनीनं आपल्या 'राजाचं नव मन' (१८८९) या ग्रंथात प्रथम केली. त्याची भूमिका समजायला पुढील आकृती उपयोग ठरेल:



मानवी मेंदू, त्याची प्रतीक-प्रक्रिया व तिच्या योगे निर्माण होणारी कल्प-व्यवस्था एवढंच उद्दिष्ट ठेवून करावयाच्या या अभ्यासाच्या (ज्याला हल्ली mrthodology म्हणजे 'रीतिशास्त्र' हे नाव मिळालं आहे) बाबतीत दोन मतं आहेत. एक मत असं की मानवी भाषा ही प्रक्रिया मानवी मेंदूच्या विकासात इयाक्या अलीकडे निर्माण झाली आहे की तिला विश्वाचा व मानवाचा उद्‌गम-व-विकास ही समस्या कधीच उकळता येणार नाही. या बाबतीत ज्ञानेश्वर म्हणतात त्याप्रमाणे पर्वतावरून उतरून पुढे पुढे वाहत जाणाऱ्या नदीला आपल्या उगमाकडे परतता येत नाही किंवा वर-वर वाढणाऱ्या वृक्षाला आपल्या जमिनीतल्या मुळांना स्पर्श करता येत नाही तसं घडणार. मग हा हव्यास कशाला? दुसरं मत असं की प्रत्येक युगातली माणसं 'हे कसं शक्य होईल?' असं विचारीत आली. पण नंतरच्या युगात त्या गोष्टी शक्य झाल्या असं आढळतं भाषा ही प्रतीक-व्यवस्था मानली तर ज्या विविध चिन्हं- व्यवस्था मानव आपल्या सामाजिक परिसरात घडवू शकतो त्यांना तो आपला अभ्यास-विषय मानून त्यांचा विकास व उद्‌गम यांचा बौद्धिक आराखडा तो निर्माण करू शकतो. भाषाविज्ञानात इंडो-युरपिअन हा असा आराखडा निर्माण झाला.तासाचा पदार्थविज्ञानात सापेक्षता किंवा परमाणु-सिद्धान्त हे असेच आराखडे आहेत.त्यात जरी विज्ञानींना अनेक प्रकारची मोडजोड करावी गली तरी ते

आराखडे सयुक्तिक असले तर त्यातल्या अनेक गोष्टी कालांतरानं 'तथ्य' ठरतील.

प्रतीक-व्यवस्था, तिचा विकास व उद्‌गम यांचा अभ्यास करू पाहणाऱ्या विद्वानांना या क्षणी जो एक युक्तिबाज प्रश्न विचाराला जातो तो असा की प्रतीक-व्यवस्थांच्या अभ्यासानं मिळणारं ज्ञान हे ज्ञानच राहतं, ते कधी अनुभवात रूपांतरित हित नाही, असं का? हा प्रश्न विचारणारांना हे ठाऊक असायला हवं की 'ज्ञान' आणि 'अनुभव' यांची कधीच भेट होत नसते. पाणी हा प्रवाही पदार्थ दोन हायड्रोजन अणू आणि एक ऑक्सिजन अणू यांनी बनलेला आहे असे आपण विज्ञानात शिकतो, प्रतिकांनी मांडतो व प्रयोगानं सिद्ध करतो. पण आपण जेव्हा पाण्यात हात घालतो व त्याचा 'ओलेपणा' अनुभवतो त्या ओलेपाणाच्या अनुभवाला समजविण्याला विज्ञानाची प्रतीक-व्यवस्था थिटी पडते. मग ज्ञान म्हणजे काय? अनुभव की प्रतीक?

यावर विज्ञानींचं मत असं आहे की अनुभव हा अनुभवच राहतो व तो त्या त्या व्यक्तीपुरता मर्यादित असतो. माझी दाढदुखी ही माझ्या अनुभवाचा भाग असते, ती दुसऱ्याची कधीच होत नाही. प्रतीक ही वास्तुमात्रांच्या ज्ञानकल्पांची सामाजिक चिन्हं असतात; त्यांची आपण आपापसात देवघेव करू शकतो. दगड या वस्तूचं द-ग-ड हा शब्द मराठी समाजाच्या भाशेताल्म प्रतीकआहे. 'हा दगड जड आहे' असं जेव्हा आपण म्हणतो तेव्हा या उक्तित दगड या शब्दाच्या जागी आपण ती वस्तू ठेवीत नसतो; जवळ पडलेल्या या वस्तूकडे बोट दाखवून एक प्रतीक वापरतो. या प्रतीकाचंही प्रतीक आपण बनवू शकतो. ' 'दगड' हा तीन अक्षरी शब्द आहे', असा जिव्हा आपण बोलतो तेव्हा आपण त्या वस्तूविषयी न बोलता तिच्या मराठीतल्या प्रतीकाविषयी बोलतो.

अनुभव आणि प्रतीक यांच्यातला हा फरक कळला तर वर दिलेल्या प्रश्नाचं उत्तर सरळ आहे. अनुभव हा ज्ञानाचा विषय खरा, पण तो प्रतीकांशिवाय आकारू शकत नाही. प्रतीकांच्या द्वारे आकारलेल्या ज्ञानाला मग

आपण एकमेकात वाटू शकतो, हजारो वर्षे स्मृतीत जतन करू शकतो, लेखनात वापरून चिरस्थायी करू शकतो, त्यांच्या व्यवस्था घडवून वास्तुमात्राला आपल्या कल्पनेप्रमाणे निरनिराळे आकार देऊ शकतो. अनुभव हा अनुभवच राहतो, ज्ञान मात्र वाढत राहतं.

म्हणूनच विज्ञानी हा ज्या क्ल्पांची व त्यांच्या प्रतीकांनी आपलं विज्ञान घडवीत राहतो त्याची पद्धत समजवून घेणं हा आजच्या रीतिशास्त्राचा महत्त्वाचा भाग आहे. प्रयोगशाळेत प्रयोग करणारा विज्ञानी हॉटेलात जातो तेव्हा तो तिथल्या वेटरला 'मला H_2O दे' असं म्हणत नाही; 'मला पाणी दे' असं म्हणतो. विज्ञानीला आपल्या प्रतीकांचा उपयोग कोणत्या अर्थ-व्यवस्थेत कशा प्रकारे करावा हे ठाऊक असतं. आपल्या विज्ञानासाठी तो जी प्रतीकं घडवितो, त्यांची स्वरूपं त्यांच्या रचना, नियम, उपयोग, अर्थ घडवीत त्यांचा विकास साधीत राहतो, त्यांच्या रचनेनं त्याला आपल्या विज्ञानाच्या फटीतून विश्वदर्शन घडत राहत. हे करीत असता त्याच्यापुढे जे उद्दिष्ट असतं ते त्या-त्या विषयाचं खोल अंतरंगी स्वरूप कळावं हे असतं. ही गोष्ट आपल्याकडील विद्वानांना भाषाभ्यासाच्या बाबतीत फार पूर्वी प्रतीत झाली होती. त्या काळातल्या भाषेच्या संबंधात प्राचीन शिक्षाकारांनी जी व्यंजनव्यवस्था रचली ती ध्वनिशास्त्राधारित अगदी सोपी, सरळ व सुरचित होती. तीच आपण शिकू शकतो; उदा.

क ख ग घ ङ

च छ ज झ ञ

ट ठ ड ढ ण

त थ द ध न

प फ ब भ म

या व्यवस्थेत पाच (स्फोटक) वर्गांचे ध्वनी व त्यांचे पाच प्रकारच्या उच्चारणातील प्रकार असे पंचवीस घटक नीट मांडले होते. परंतु पाणिनि या भाषाविज्ञानीं आपल्या ‘अष्टाध्यायी’ च्या सुरुवातीस जी वर्णमाला मान्य केली आहे तिच्यात ही व्यवस्था नाही. उदा. तो ‘कपय्’ असं दोन (क् व प्) वर्णांच एक सूत्र देतो; दुसरं ‘जबगडदश्’ असं पाच वर्णांच देतो; इ. पूर्वीची सुव्यवस्था विस्कटून त्यानं जे काही ‘विचित्र’ केलं ते का याचं ज्ञान त्याची उद्दिष्टं व नव्या व्यवस्थेचं त्याचं रीतिशास्त्र अभ्यासल्याशिवाय होणार नाही. पाणिनीचं उद्दिष्ट अज्ञ लोकांना संस्कृतभाषा शिकवण्याचं मुळीच नव्हतं; रीतिशास्त्राधारे मान्य भाषेच्या प्रतीकव्यवस्थेला अधिक सयुक्तिक स्वरूप देण्याचं होतं. हे समजण्यासाठी एक सोपं उदाहरण घेऊ. संस्कृतमधील कम्प, कन्द, कण्ठ, पङ्‌क, इत्यादी शब्द- ज्यात अनुनासिक वर्ण असतात असे — घेतले तर असं आढळतं त्यांच्यातील अनुनासिक वर्ण व त्या पुढे येणारा व्यंजन-वर्ण यांचा वर्ग एकच असतो; म् व प एकाच प —वर्गातले, न् व द हे त —वर्गातले, ण् व ठ एकाच ट वर्गातले, तसंच ङ्‌ व क एकाच वर्गातले. हा उच्चारण नियम लक्षात येताच पाणिनी अथवा त्याच्यापूर्वीच्या कोणीतरी व्याकरणकारानं या साऱ्या अनुनासिक वर्णांसाठी एक प्रतीक (ं) बनवून आपल्या रीतिशास्त्राला अधिक सयुक्तिक केलं : कंप, कंद, कंठ, पंक. त्यायोगे वर्णव्यवस्थेत काटकसर झाली, लेखन सुलभ झालं व त्या भाषेच्या अंतरंगातील एका नियमाचं दर्शनही झालं. आज एखाद्या पाश्चात्य माणूस संस्कृत शिकतो तेव्हा त्याला संस्कृतमधील (ं) या प्रतीकांच ध्वनिशास्त्रीय कार्य (function) त्याच्यापुढे येणाऱ्या व्यंजनाच्या वर्गातील अनुनासिक वर्णाचं असतं असं ‘ज्ञान’ आपण देऊ शकतो. उच्चारण करणं किंवा ऐकणं हा अनुभव, पण प्रतीक हे ज्ञानव्यवस्थेचं मुख्य माध्यम व साधन बनतं.

लीबनिझ किंवा सोस्युर ज्या प्रतीक-व्यवस्थेची तरफदारी करीत होते तिला त्यांच्यानंतरच्या युरपातील भाषाविज्ञानी समजू शकले नाहीत; त्याचप्रमाणे पाणिनीच्या रीतिशास्त्राला- विशेषतःत्याच्या सूत्रवलीबधांना- आमच्याकडील भाशाभ्यासू समजू शकले नाहीत. यामुळे आधुनिक

भाषाविज्ञानाच्या अभ्यासात अनेक खोटे, अपप्रचारी प्रश्न निर्माण केले गेले आहेत. याचं एक साधं उदाहरण असं की मराठी शिकविणारा शिक्षक व सर्व मराठी-भाषी लोक ‘कृष्ण’ हा संस्कृत शब्द ‘क्रुश्ण’ असा बोलातात्. संस्कृत ‘ऋ’ या स्वराचं व ण् या व्यंजनाचं उच्चारण नंतरच्या (प्राकृत) काळात तत्पूर्वीहोतं तसं राहिलं नाही. बोली बदलत राहतात; त्यांच्यातील उच्चरणांप्रमाणे लेखन मात्र बदलत नाही. बोलणं ही नैसर्गिक क्रिया आहे; लेखन ही सामाजिक रूढी आहे. खुद्द गीतेचा कृष्ण स्वत: जरी भारतात आला व म्हणाला, ‘माझं नाव कृष्ण आहे’ तर महाराष्ट्राचे ‘क्रुश्ण’ म्हणणारे लोकच काय, पण गुजरातचे ‘क्रष्ण’ म्हणणारे व राजस्थानचे ‘क्रिश्न’ म्हणणारे लोकही त्याला ओळखू शकणार नाहीत; लेखनानं मात्र ओळखतील.

विज्ञानाचं उद्दिष्ट प्रतीक-व्यवस्था निर्माण करून त्या त्या अभ्यासविषयाचा विकास व उद्‌गम यांचा शोध करण्याचं असतं. त्याप्रमाणे पाणिनीनं आपल्या काळातील भाषेसंबंधात केलं. हे करीत असता त्यानं हे रीतिशास्त्र रचलं त्याच्या नियमानं त्या व्यवस्थेतील संज्ञा, सूत्र, सूत्रबंध रचून त्याद्वारा हव्या त्या रूपव्यवस्थेची सिद्धी प्राप्त होईल याची काळजी घेतली. दुर्दैवानं पाणिनीनं घडविलेल्या रीतिशास्त्रासारखं शास्त्र इतर भाषांच्याच नव्हे तर इतर अभ्यासविषयांच्या बाबतीत रचलं न गेल्यामुळे आमची ही विज्ञान- पद्धती पुढे प्रगत झाली नाही.

कोणत्याही प्रतीक-व्यवस्थेला रीतिशास्त्राच्या भूमिकेचा व तत्त्वांचा आधार असावा लागतो तो असा की त्या व्यवस्थेला दोन प्रकारे अंतर्मुख बनावं लागतं : एक, स्वत:च्या रचनेत अंतर्गत सुसंगती कोणत्या तर्कपद्धतीनं साधली आहे हे स्पष्ट करण्यासाठी. या प्रकाराला आइनस्टाइननं अंतर्गत सुयुक्तता (inner perfection) असं नाव दिलं आहे. दुसरं, आपली रचना ज्ञानाच्या विविध अभ्यासविषयांसाठी वापरली जात असता तिची आकृतिक समष्टी (representational isomorphism) साधताना निर्माण होणाऱ्या पूर्णापूर्णतेच्या बाबतीत जी काळजी घ्यावी लागते ती सुस्पष्टपणे मांडण्यासाठी. या प्रकाराला

आइनस्टाइननं 'बाह्य समर्थन' (external confirmation) असं नाव दिलं आहे. पाणिनीसारख्या विद्वानानं आपले सारे परिश्रम भाषेसारख्या अत्यंत चंचल व्यवस्थेच्या रीतिशास्त्रावर खर्चिल्यामुळे त्याची प्रतीक-व्यवस्था थोड्याच शतकांत निकामी ठरली. उलट युक्लिडची प्रतीक-व्यवस्था त्या मानानं काळात बरीच टिकाव धरून राहिली. रूढ पदार्थविज्ञानात युक्लिडची व्यवस्था सुसंगत ठरली. पण जेव्हा खगोलव्यवस्थांचा अभ्यास सुरू झाला तेव्हा ती मागे पडली व नव्या युक्लिडेतर व्यवस्था रचाव्या लागल्या. म्हणूनच तर आइनस्टाइनला रूढ पदार्थविज्ञानापलीकडे जाऊन आपला सापेक्षता-सिद्धान्त मांडता आला.

आमच्याकडे एक श्रेष्ठ दर्जाचं रीतिशास्त्र निर्माण होऊन ते लौकरच लयाला गेलं. त्या बाबतीत युरपातला विज्ञानभ्यास नवनव्या प्रतीक-रचना घडवीत राहिला. या उद्योगातच तिथल्या विद्वानांना विश्वासंबंधी नवनवे शोध लागले. यामुळे आजच्या 'वैज्ञानिक' रीतिशास्त्राची भूमिका प्रथम समजून घ्यायला हवी. 'भाषिक' रीतिशास्त्र हे त्यांच्या तुलनेत दुय्यम ठरतं. या दोन्ही रीतिशास्त्रांना एकमेकांची जरूर आहे ही जाणीव हेच अलीकडील वीस वर्षांच्या विज्ञानाभ्यासाचं महत्त्वाचं प्रदान आहे.

आजच्या विज्ञानाभ्यासाच्या दृष्टीनं पाहिलं तर एका व्यापक विश्वघटनेत साऱ्या निसर्ग-व्यवस्था घडल्या गेल्या व या निसर्ग-व्यवस्थांतील कुठल्यातरी एका निसर्ग-व्यवस्थेतील इतर प्राण्यांप्रमाणे मानवाची घडण झाली. मानवाच्या या घडणीत त्याचा अनुभव व त्याच्या मेंदूला प्राप्त झालेली प्रतीक-प्रक्रिया यांचा विकास झाला. या दोन्ही गोष्टींनी त्याचा विज्ञानभ्यास जसा प्रगत होणार होता तशी त्यांच्या नियंत्रणाची पकडही त्याच्यावर बसणार होती. इंद्रियानुभवद्वारा तो जसा आपलं जैविक अस्तित्व व त्याचा विकास साधू शकला तसा प्रतीक-प्रक्रियेद्वारा तो आपलं सामाजिक व संवादित्व त्याचा विकास साधू शकला :



मानवी भाषांची मुळं जशी त्या-त्या माणसांच्या जैविक विकासात प्राप्त झालेल्या मेंदूतील पेशीत[१५] रुतलेली असतात तशी ती त्या मेंदूला जे समाज-संवादित्व लाभलेलं असतं त्यात रुतलेली विज्ञानदृष्ट्या याचा अर्थ असा की 'भाषा' ही मानवाच्या जैविक व सामाजिक वातावरणातील घटकांनी निश्चित होणारं एक संकुल (complex) म्हणून अस्तित्व धारण करते. मूल जन्मतं ते आपल्या मेंदूत हे संकुल घेऊन जन्मतं मराठी-भाषी समाजात ते मराठी बोलू लागतं; जपानी समाजात जपानी बोलतं. मानवी मेंदूतलं हे संकुल, या किंवा त्या विशिष्ट भाषेचा वापर करण्यापूर्वीचं, कसं असेल हा आजच्या 'मस्तिष्क-विज्ञाना' चा (Neuroscience) विषय आहे. या विषयावरचा पहिला मान्य ग्रंथ एरिक कॅण्डेल[१६] यानं १९८५ साली लिहिला.

मस्तिष्कविज्ञानावरील पहिला महत्त्वाचा शोध पॉल ब्रोका[१७] यानं १८६१ साली लिहिलेल्या एका प्रबंधात मिळतो. ब्रोकाच्या शोधानंतर व्हेर्निके[१८] यानं मेंदूतील, भाषेशी संबंधित अशा, दुसऱ्या एका केंद्राचा शोध लावला. ब्रोका व व्हेर्निके यांनी शोधलेली केंद्रं मेंदूच्या अनुक्रमे डाव्या व उजव्या भागात असून त्यांना ज्या नसगुच्छांनी जोडलेलं आहे त्याला areuate fasciculus असं नाव आहे. या तिन्ही गोष्टींचा शोध फार महत्त्वाचा होता. या संबंधात सोस्युरनं लिहिलं : "या संशोधनावरून हे स्पष्ट होतं की बोलभाषेत जे दोष निर्माण होतात ते लेखी भाषेशी संबंधित असतात इतकंच नाही तर भाषेच्या विशिष्ट

क्रियेपलीकडे मेंदूत अशी एक सामान्य मेधा (faculty) असावी की जिच्यामुळे प्रतीक-क्रिया शक्य होत असावी.” (कोर्स, १०-११) सोस्युरचा तर्क खरा ठरला. कारण लौकरच असं स्पष्ट झालं की याच केंद्रात व त्यांना जोडणाऱ्या नसगुच्छामुळे अक्षर-लेखनाची, हाताच्या बोटांच्या हालचालींची (अंक मोजताना, वाद्य वाजविताना, विणकाम करताना, इ.) क्रिया शक्य होते. यानंतर याच विज्ञानात विविध वाग्दोषांची चिकित्सा झाली. निरनिराळ्या औषधी रसायनांनी मेंदूच्या सर्वसामान्य अवस्थेत काय फरक घडून येतात ते अभ्यासलं गेलं. मेस्कॅलीन नावाच्या एका कॅक्टस वनस्पतीच्या रससेवनानं मानवाच्या कल्पकतेत गमतीदार फरक होत असत. त्याचा अभ्यास हॅवेलॉक एलिस यानं केला व अॅल्डस हक्स्लीनं[१९] तर स्वत:वरच हा प्रयोग करवून घेऊन त्या रसाचा मेंदूवर अंमल होत असता लिहिलेलं ‘संवित्तीची दारं’ हे त्याचं पुस्तक खूप गाजलं. मस्तिष्कविज्ञानाच्या अलीकडील अभ्यासाला दोन नवी वैज्ञानिक साधनं मिळाली आहेत. पाहिलं, मेंदूच्या विविध भागांत शस्त्रक्रिया करण्यासाठी किरणोत्सर्गी साधनं वापरून त्यात घडणाऱ्या सूक्ष्म हालचालींचं बाह्यतः दिसू शकणारं चित्रण व दुसरं, संगणकांच्या साह्यानं या सर्व घटनाक्रमाचं गणितीकरण. संगणकांच्या साह्यानं केल्या जाणाऱ्या गणिती अभ्यासाला महत्त्वाची चालना मिळाली ती फेब्रुआरी २८, १९५३ या दिवशी प्रसिद्ध जीवपेशीविज्ञानी वॉटसन व क्रिक यांनी D N A या नावानं ओळखल्या जाणाऱ्या जीवपेशीतल्या एका रसायनाच्या मांडलेल्या helix या रचनेनं. या शोधानं जीवपेशींच्या अभ्यासात प्रतीक-व्यवस्थेचा शिरकाव झाला व जैविक अक्षरमाला (genetic alphabets) रचण्याचं महत्त्वाचं कार्य सुरू झालं.

या सर्व अभ्यासशाखांनी मानवी भाषेच्या मुळाशी असलेल्या प्रतीक-मेधेचा सुसंगत अभ्यास करण्याची संधी भाषाविज्ञानीच्यां दाराशी आणून ठेवली आहे. तिचं ते कसं स्वागत करतात व उपयोग करतात याकडे सर्व विद्वानांचे लक्ष लागलं आहे.

आतापर्यंतचा सारा विचार 'भाषा' हा विज्ञानाचा विषय आहे व तो वैज्ञानिक पद्धतीनंच हाताळला पाहिजे असं मानून केला. १८१६ त प्रसिद्ध झालेल्या सोस्युरच्या 'कोर्स' पर्यंतच्या एका शतकभराच्या भाषाभ्यासात मुख्यत्वे विज्ञानदृष्टीनंच 'भाषा' हा विषय, इतिहास (विकास) व भूगोल (विस्तारण) या परिमाणांत, कसा हाताळला गेला याकडे लक्ष पुरविलं. ते करीत असता कुठं-कुठं काही 'तात्त्वज्ञानिक' प्रश्न निर्माण झाले. त्यांचा आता थोडक्यात परामर्ष घेऊ.

भाषेसंबंधी जे आद्य तात्त्वज्ञानिक प्रश्न निर्माण झाले ते ग्रीक काळात. पहिला प्रश्न असा की भाषा ही निसर्गदत्त गोष्ट (physis) मानावी की रूढी-निर्मित (thesis)? याचं उत्तर असं दिलं गेलं की भाषेचा सारा आधार मानवी उच्चारण प्रक्रियेवर असल्यामुळे ती निसर्गनिर्मित मानावी पण तिची सारी घडण सामाजिक परिसरात होत असल्यानं ती रूढी-निर्मितही मानावी. दुसरा प्रश्न असा की भाषा ही जर उच्चारण प्रक्रियेवर आधारलेली असते असं मानलं तर तिचा स्वरूप दिवसानुदिवसअधिक नियमित(analogic) होत जातं की विस्कळीत, अनियमित (anomalic) ? भारतातील विद्वानांना आपली भाषा ' म्लेंच्छित' होत आहे अशी भीती वाटत होती तशी ग्रीकांनाही आपली भाषा 'बार्बारिक' होत आहे अशी भीती वाटत होती. तसं होऊ नये म्हणून या दोन्ही संस्कृतींत 'व्याकरण' या व्यवस्थेची रचना झाली. इथूनच भाषेच्या सामाजिक परिसरात व त्यांच्याविषयीच्या तत्त्वज्ञानात नवे प्रश्न निर्माण झाले.

सॉक्रेटिसानंतर प्लेटो व अॅरिस्टॉटल यांनी जे तत्त्वज्ञान रचलं त्याचा मुख्य रोख त्यांच्या काळातील 'सोफिस्ट' या नावानं ओळखल्या जाणाऱ्या भाषाभ्यासूंविरोधी होता. सोफिस्टाचं मत असं होतं की जसं मानवी अनुभवाचं क्षेत्र विविध असतं तसं मानवी भाषेच्या अभिव्यक्तीचं क्षेत्रदेखील वेगवेगळं असतं. भाषेचा व्यवहार एकाच व्याकरणानं किंवा तर्कशास्त्रानं निश्चित करता येणार नाही. हे समजविण्यासाठी सोफिस्टांनि 'उक्तिविलास' (rhetoric) नावाचे ग्रंथ लिहिले. त्यात त्यांनी मानवी व्यवहारातील भाषेचे विविध उपयोग

स्पष्ट केले, ज्यांना व्याकरणानं बंद करता येत नाही. मराठी भाषेतील उदाहरणं द्यायची झाली तर सामान्य व्यवहारात आपण 'नळ आला' असं म्हणतो, त्याचा अर्थ 'नळाला पाणी आलं' असा असतो. 'पायात बूट घाल' असं आई सांगते तेव्हा लहान मुलालाही कळतं की बूट हा पायावर घालायचा असतो. गाडीनं प्रवास करताना 'नागपूर आलं' याचा अर्थ गाडी नागपूरला पोचली[१] असा असतो. 'सूर्य उगवला' म्हणजे सकाळ झाली असं आपणाला कळतं; सूर्याला कोणी आणि कुठं उगवलं असं आपण विचारीत नाही. सोफिस्टांचं मत असं की व्याकरणापेक्षा व्यवहारानंच भाषा घडत जाते व ती आपण सहज समजू शकतो. त्यासाठी व्याकरण किंवा तर्कशास्त्र यांची जरूर नाही.

सोफिस्टांचं हे मत प्लेटो अॅरिस्टॉटल यांना पटलं नाही. विश्वात सत्य कुठंतरी दडलेलं आहे व ते शोधण्यासाठी आपणाला बुद्धी ही एकच शक्ती वापरली पाहिजे व तिच्या पायावरच ज्ञान-विज्ञानांची उभारणी व्हायला हवी असा त्यांचा आग्रह होता. अॅरिस्टॉटलनं रचलेल्या तर्काला शह देण्यासाठी सोफिस्ट पुढीलसारखी उदाहरणं देत —सैपाकखोलीत विस्तव आहे; सैपाकखोली घरात आहे; म्हणून घरात विस्तव आहे,' हा तर्क सयुक्तिक आहे, मग 'पायात ठणका आहे; पाय बुटात आहे; म्हणून बुटात ठणका आहे' असं म्हणणं सयुक्तिक का नाही?

सोफिस्टांच्या विचारांचा अभ्यास व्हायला हवा हा विचार युरपात प्रथम हेगेल[२०] यानं मांडला व ग्रीक तत्त्वज्ञानाचा इतिहास लिहिणाऱ्या ग्रोटे (Grote) या विद्वानानं आपल्या ग्रंथाचा सातवा खंड त्या विचारांना वाहिला. तरीदेखील ख्रिस्ती धर्माचा पगडा जोपर्यंत जनतेच्या मनावर होता तोपर्यंत सोफिस्टांच्या बाजूनं बोलायला कोणीही पुढं आलं नाही. त्यांचा कैवार घेणारा आधुनिक तत्त्वज्ञ फ्रीडारेख नीत्से[२१] हा होय.

फ्रांसमध्ये संरचनावादाविरुद्ध जी बौद्धिक बंडाळी माजली त्या वेळी नीत्से प्रसिद्धीस आला. राजकीय, सामाजिक, साहित्यिक, कलात्मक स्वातंत्र्याच्या

या काळात सर्वांनाच ‘भाषा’ या गोष्टीचा नव्यानं विचार करायला हवा असं वाटू लागलं. ‘व्हिएना वर्तुळा’ चा संस्थापक मोरिट्झ श्लिक[२२] यानं उदगार काढले की, “जगातल्या महान तत्त्वज्ञांनी ‘भाषा’ नावाची काहीतरी स्वाभाविक प्रक्रिया आहे तिचा गंभीरपणे विचार केला असता तत्त्वज्ञानाच्या इतिहासाला एक निराळंच वळण मिळालं असतं.” या काळातले भाषाविज्ञानी विदग्ध भाषांना हाताशी घेऊन त्यांच्या भूतकाळाच्या अभ्यासात गर्क होते. भाषाविज्ञानाच्या ध्वनिशास्त्रीय नियमांवर जेव्हा शुखार्टनं जोराचा हल्ला केला तेव्हा रशियातील कझान (Kazan) येथील भाषाविज्ञानी[२३] बोदुअँ द कुर्तने, त्याचा विद्यार्थी क्रुसझेवस्कि व सोस्युर या तिघांनी – ते एकमेकांना भेटले होते – ध्वनिशास्त्राऐवजी वर्णव्यवस्था रचण्याचं कार्य हाती घेतलं. त्यामुळे पूर्वीचा ध्वनींचा अभ्यास, त्यांच्यात होणारं परिवर्तन, या परिवर्तनांमुळे होणारी भाषेची संरचना व तिच्यातला ऐतिहासिक बदल हे विचार मागे पडले. परंतु नव्या वर्णव्यवस्था कशा रचाव्या याचे सोस्युरच्या ‘कोर्स’ मधील विचार जसे कोणी समजून घेतले नाहीत तसा त्याचा ‘भाषा’ ही एक प्रतीक-व्यवस्था आहे हा विचारही कोणाला समजला नाही. असल्या प्रतीक-व्यवस्थेची मांडणी कशी करावी हे समजविणारा फ्रेगे[२४] या गणितज्ञाचा ‘कल्प-व्यवस्था’ (१८७९) हा अवघ्या ८२ पानांचा ग्रंथ अद्याप दृष्टीस पडणं कठीण!

सोफिस्टांप्रमाणे इंग्लंडमधील तत्त्वज्ञ विट्गेनस्टाइन[२५] यानं भाषाभ्यासाच्या रूढ व्याकरणपद्धतीवर बंड पुकारलं. तो म्हणतो : जेवणाच्या टेबलाशी बसल्यानंतर मी म्हणतो, Salt, please I want salt, please असं कधीच बोलत नाही. मग Salt, please हेच ‘वाक्य’ असं का मानू नये? एडिंगटन या पदार्थविज्ञानीनं त्याची री ओढली : ‘दोन आणि दोन म्हणजे चार’ असं मी म्हणतो तेव्हा दोन म्हणजे एक+एक असं मला कळतं, पण ‘आणि’ म्हणजे काय? आपल्या दैनंदिन भाषेतल्या प्रयोगांचं व्याकरण कोणाजवळही नसतं आणि तरीदेखील आपला व्यवहार सुरळीत चालतो. ‘हे पुस्तक वाचून टाक’ असं म्हटलं तर ते पुस्तक वाचल्यानंतर कोणी ते घराबाहेर फेकून देत

नाही. संस्कृतसारख्या विदग्ध भाषेतही असे प्रयोग होते. अव्ययांना प्रत्यय लागत नाही म्हणून त्यांना 'अव्यय' म्हणतात असं व्याकरणकार सांगताना आढळतात. पण 'नक्तं' (रात्री) या अव्ययाला द्वितीयेचा प्रत्यय आधीच लागलेला आहे. 'शनैः शनैः' या शब्दाला तृतीया बहुवचनाचा प्रत्यय आधीच लागला आहे व त्याचा वापर द्वित्त्व योजनेनं होतो. तुकारामाच्या गाथेत 'सुख पडिले सांठवणे । सत्ता वेचे शने शने ॥ (११४०) असा प्रयोग आहे. पण या प्रयोगावर कोणी विचार केलेला आढळत नाही. 'शन' याचा प्राचीन काळात 'दगड' असा आठ होता. पर्वताळ प्रदेशातून वाहणाऱ्या नद्यांच्या प्रवाहाला ओलांडून जाण्याकरता पाण्यातील दगडांवर सांभाळून हळू-हळू एकेक पाय ठेवीत जावं लागतं, त्यामुळे या प्रयोगाला (दगडा-दगडांनी) 'हळूहळू' असा अर्थ आला.

सोफिस्टांच्या विचारसरणीला अलीकडील काळात ज्या तत्त्वज्ञानानं उचलून धरलं आहे त्याला 'विघटनवाद' (Deconstruction) हे नाव आहे व त्याचा आजचा अर्ध्वयू फ्रेंच तत्त्वज्ञ जाक देरिदा[२६] याला भारताच्या ४८ व्या राष्ट्रदिनानिमित्त भारतात येण्याचं आमंत्रण दिलं गेलं. डिसेंबर १९९६-जानेवारी १९९७ मधील भारतातील आपल्या वास्तव्यात त्यानं दिल्ली व इतर ठिकाणी व्याख्यानं दिली. त्यांव्हां विषय होता "अनृतांच राज्य, राज्याचा अपलाप."[२७] माणसानं भाषा प्राप्त करून इतर प्राण्यांपेक्षा तो श्रेष्ठ ठरला हे मान्य, पण इतर प्राणी- त्यांना जी प्रतीकं साधतात त्यांनी —फक्त 'तथ्य' जाणतात; त्यांना 'सत्य' जाणण्याची बुद्धी नाही; पण माणसाला सत्याशी अपलाप करण्याची शक्ती कुठून आली, का आली... या प्रश्नांची उत्तरं भाषेच्या विज्ञानींपेक्षा तत्त्वज्ञांनी द्यायची आहेत असं देरिदांचं मत आहे. सोस्युर जिवंत असता तर त्याला देरिदांचं मत पटलं असतं का नाही याबद्दल शंका आहे कारण त्यानं आपल्या 'कोर्स'मध्ये अगदी स्पष्टपाने म्हटलं आहे: "भाषा कधीही चुकत नाही."[२८]

भाषा ही प्रतीक-व्यवस्था मानली तरच भाषाविज्ञानाला आपण त्याच्या सत्य स्वरूपात पाहू शकतो व भाषेचं खरं स्वरूप आपणाला कळतं. पाणिनीचा ग्रंथ ही एक प्रतीक-व्यवस्था आहे. असल्या प्रतीक-ग्रंथांना प्राचीन काळी आपल्याकडे 'सिद्धांत' म्हणत. या संबंधात जॉन म्युर२९ नावाच्या इंग्रजानं १८३५ च्या सुमारास लिहिलेल्या 'मतपरीक्षा' या संस्कृत पुस्तिकेत लिहून ठेवलेली आठवण लक्षात घेण्यासारखी आहे. हिंदवासियांच्या धर्माधर्मविचारांपेक्षा त्यांचे गणित-सिद्धान्त अधिक महत्त्वाचे आहेत हे एका सामान्य इंग्रजानं ताडलं असं तो लिहितो. या इंग्रजाचं नाव लॅन्सेलॉट विल्किन्सन.[३०] विल्किन्सन हा मध्यभारतात भोपाळ, सिहोर इत्यादी ठिकाणी ईस्ट इंडिया कंपनीच्या नोकरीत होता. खगोल, गणित या विषयांवर तेथील विद्वानांशी चर्चा करीत असता तो पाश्चात्यांचे कोपरनिकसाच्या सिद्धान्ताविषयीचे विचार त्यांच्यापुढे मांडीत असे. त्या वेळी त्याला असं आढळून आलं की कोपरनिकसानं ज्या प्रकारचं खगोलशास्त्र रचलं तसं 'सिद्धान्त' ग्रंथ लिहिणारांनी कितीतरी शतकं अगोदर रचलं होतं. पण ते न समजल्यामुळे किंवा आपल्या रूढीप्रियतेमुळे नंतरच्या भारतीयांनी पुराणातल्या वांग्यांवरच आपली उपजीविका चालिविली होती.ही परिस्थिती सुधारण्यासाठी विल्किन्सननं आपल्याभोवती ज्या विद्वानांना गोळा केलं त्यात सोमनाथ अथवा सुभा(बा)जी बापू नावाचे महाराष्ट्रीय गृहस्थ होते. विल्किन्सननं त्यांना प्राचीन 'सिद्धांतां'चं महत्व पटवून त्यातील खगोल गणित कोपरनिकसाच्या सिद्धान्ताला धरून असल्यामुळे जनतेला ते देण्यास प्रवृत्त केलं. सुभाजीनं त्या दृष्टीनं मराठीत 'सिद्धान्तशिरोमणिप्रकाश' नावाचा ग्रंथ १८३६ मध्ये लिहिला. त्याचं १८३७ मध्ये ओंकार भट यानं हिंदीत भाषांतर केलं व आपल्या ग्रंथाला नाव दिलं 'भूगोलसार'.[३१] सुभाजी व ओंकार यांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या आधारे ज्योतिर्गणाना किती बिनचूक करता येतात यासंबंधी विल्किन्सननं 'एशियाटिक सोसायटी'च्या १८३७ च्या अंकात (४०१) एक लेख लिहिला.

सुभाजीनं एका इंग्रजाच्या नादी लागून भलतेच विचार मांडले आहेत अशी इतर विद्वानांनी त्याच्यावर टीका केली. परंतु सुभाजी उत्तम गणितज्ञ होता व

विल्किन्सनची ओळख होण्यापूर्वी १८२४ पासून तो या विषयावर विचार करीत होता असं त्यानं आपल्या अविरोधप्रकाश नावाच्या ग्रंथात म्हटलं आहे. त्याच्या विषयी विल्किन्सन काय म्हणतो ते त्याच्या १८३७ च्या लेखावरून जाणून घेणं नाहात्वाचं आहे. विल्किन्सन लिहितो : (मध्य भारतात) कोटा याठिकाणी नोकरीत असताना माझा 'सिद्धान्त' ग्रंथांशी चांगला परिचय झाला. नंतर सिहोरला बदली झाल्यावर सुभाजी बापू या विद्वानाशी या विषयावर चर्चा करताना त्याच्या तल्लख गणिती बुद्धीचा मला चांगलाच अनुभव आला. पाश्चात्य खगोल-गणितींचं व पौर्वात्य 'सिद्धान्त' पंडितांचं एकमत आहे हे जाणून सुभाजीलाही आश्चर्य वाटलं. विचारशक्तीत तो फार श्रेष्ठ होता व इतर पंडितांवर त्याचा चांगला प्रभाव होता. पृथ्वी गोल आहे, ती स्वतःच्या आसाभोवती फिरते व सूर्याभोवती फिरते असं मानण्याने किती तरी खगोलगणना बिनचूक करता येतात हे त्याच्या प्रत्ययास आलं. आपल्या पूर्वजांनी केलेल्या गणिती विचारांना बाजूला सारून आपल्या काळातल्या पंडितांच्या खुळचट पौराणिक कल्पनांना नावं ठेवून तो त्यांच्यावर चिडत असे. काही बाबतीत तर तो आधुनिक होता. समुद्रपर्यटन, तसच विधवापुनर्विवाह, यांसारख्या सामाजिक बाबतीत तो नव्या मताचा होता.

विल्किन्सनच्या बैठकीतल्या पाश्चात्यांनी सुभाजीचं भरपूर कौतुक केलं. १८३४ मध्ये त्यांनी सुभाजीला हवा असलेला 'भू-गोल' चांदीचा बनवून त्याला नजर केला. या दिवसाची जी हकीगत 'एशियाटिक सोसायटी' च्या नोंद वहीत मिळते ती अशी : 'सुभाजीला चांदीचा भू-गोल व दोन कलमदान्या असलेली एक सुंदर वस्तू भेट देण्यात आली. तिच्यावर एका भारतीय पंडित 'सिद्धान्त' शिकण्यासाठी त्या भू-गोलाचा कसा उपयोग करावा हे आपल्या विद्यार्थ्यांना शिकवीत आहे असं चित्र कोरलं होतं. कलमदान्यांच्या खाली स्थानकाच्या महिरपीवर बारा राशी-चिन्हं कोरली होती व त्यांच्या खाली संस्कृत श्लोकही लिहिलेले होते. ही सुंदर वस्तू सुभाजीला गव्हर्नर-जनरल-इन-कौन्सिल यांनी योजिलेल्या बहुमान प्रसंगी भरत देण्यात आली.' *

सोस्युरच्या प्रतीक-व्यवस्थेचा विचार १९६४ साली नव्यानं मांडण्याचा प्रयत्न दोन फ्रेंच विद्वानांनी केला : रोलंड बार्थ यानं 'प्रतीक-व्यवस्थेची मूलतत्त्वं'[३२] या पुस्तकात व देरिदा यानं एका प्रबंधात. देरिदाचं अत्यंत प्रभावी पुस्तक 'प्रतीक-व्यवस्थेविषयी'[३३] याचं इंग्रजी भाषांतर गायत्री चक्रवर्ती स्पिव्हाक हिनं १९७७ मध्ये प्रसिद्ध केलं. या पुस्तकातील देरिदाचा 'सोस्युर' वरील निबंध हा आजच्या एका फ्रेंच विद्वानाचे एका श्रेष्ठ भाषाविज्ञानीवरील विचार या दृष्टीनं फार महत्त्वाचा आहे.

सोस्युरनं 'प्रतीक' या घटकात निसर्ग व संस्कृती या दोन्ही कल्पांना अविभाज्यपणे जोडलं आहे असं सांगून देरिदा लिहितो : "बोलणं (उच्चारण) ही क्रिया मानवी विकासात प्रथम गणली गेली व लेखन दुय्यम मानलं गेलं हे खरं, पण उच्चारणाकडून लेखनाकडे जातानाच मानवाला प्रतीकांचं रहस्य कळलं. पण यामुळे एक विरोध (difference) निर्माण झाला. या विरोधाच्या पोटी देकार्तपासूनच्या तत्वज्ञांनी प्रत्येक वस्तुमात्रात स्थिती व गती यांना वेगळं मानून गतीला स्थितीत गोठविण्याचा प्रयत्न केला. न्यूटननं गणितात हा प्रयोग केला, आज चोम्स्की हा भाषेच्या बाबतीत असाच प्रयोग करीत आहे. रूढ धर्मांनी जसं नीतीचं काटेरी कुंपण उभारून खऱ्या धर्मतत्त्वांना विकसू दिलं नाही तसं आजचे भाषाविज्ञानी भाषेला जुन्या व नव्या व्याकरणी बंदिशी रचून त्यांना विकसू न देण्याचा उपक्रम करीत आहेत. भाषेच्या जिवंतपणाला, तिच्या निर्मितीक्षमतेला कोणीही स्पर्श करीत नाही. याचं कारण भाषाविज्ञानाला प्रथमपासूनच ध्वनिशास्त्राशी जोडण्यात आलं यामुळे हा प्रकार झाला आहे. माणूस हा प्रतीकं लिहिणारा, खोदणारा, चिंतणारा प्राणी आहे असं सांगून भाषाविज्ञानाचा अभ्यास करणारं एक तरी पुस्तक आहे का? या प्रतीकांत त्याचा संवाद, विचार, मिथ्यं, कल्प, स्वप्नं, इतकंच नव्हे तर त्याचा ध्वनि, ताल, तान इत्यादी सारं काही अंकुरतात."

देरिदाचे हे विचार वाचताना आठवण होते ती उमर खय्याम (उमर अल्-खय्यामी, १०४८-११२६) या प्रसिद्ध खगोल-गणितज्ञाच्या एका रुबायाची. तो

म्हणतो : "अय अस –झिफ्र- ए नादान... हे नादान, पोकळ शून्य! शाश्वततेचा आणि अनंततेचा शोध घेण्याच्या वेडानं, हिंदकडून आलेल्या तुझ्या पोकळीतून संख्यांची जी भुतावळ जागी झाली, तिच्याशी मी मुकाबला केला... नि थकलो. मग गुरूनं सांगितलं, आता यवनांच्या भूमितीचा अभ्यास कर. पायथागोरसच्या अर्हेतानला उराशी धरून रात्रंदिवस मी त्याच्या 'पाथ्य'च्या बिंदूपुढील संख्या गणायला बसलो... त्या हूरींनी तर मला पार चीत केलं. आता प्रिये, तुझ्या गालावर रुळणाऱ्या रेशमी केशवलयांआड लपलेल्या या इवल्याशा तिळाचं कौतुक करून तरी मला विसावा मिळेल का?"

अज्ञयतेच्या अपार कृष्णविवरात शिरल्याशिवाय सत्याचं दर्शन होणं शक्य नसतं.

संदर्भ व टिपा

१. Alamogordo (New Mexico)

२. Jornada del Muerto ('Journey of Death')

३. Trinity

४. Roberty oppenheimer

५. Gita: 11.32

६. The Big Bang

७. James Huton (1726-97): Theory of the Earth (1795)

८. Charles Darwin (1809-82): Origin of the Species (1859)

९. Eddington (1882-1944)

१०. G. Frege (1848-1925): Begriffsschrift (1879)

११. J. Boluayi (1802-1860)

१२. R. Dedekind (1831-1916)

१३. G. Cantor (1845-1918);"Je Le vois, mais je ne le crois pas."

१४. R. Penrose : The Emperor's New Mind (Oxford, 1989)

"Humaans and great apesshare an unusual type brain cell that may have heloed thwm to evolvelanguage skills, enhanced self-control and awareness . In a syrvey of the brains of 28 primate species and other mammals such as whales, PatrikHof of the Mount Sinal School of Medicines in New York and his colleagues found that only humans and closely related apes have the spindle-shaped cells associated with these abilities...The concentration of spindle cells appears to have risen quickly in brain areas associated with language over the past 15 million years of evolution. 'It gives a measure of the speed of which a cortical region can change over time.' says Hof." (New Scientist, 8 May 1999, No. 2185, p. 25)

१६. Eric Kandel : Principles of Neuroscience (1985)

Paul Broca : Remarques sur le sige de la fault' du language articul, Bulletin de la Socit d' Anthropologie de paris, 6, 1861

१८. Wernicke

१९. Aldous Huxley : The Doors of Perception

२०. G. W. F. Hegel (1770- 1831)

२१. F. Nietzsche (1844-1900)

Moritz Schlick (1882-1936): "The whole Hisatory of philosophy might have taken a very different course if the minds of the great thinkers had been more deeply impressed by the remarkabale fact that there is such a thing as language."

२३. Baudouin de Courtenay (1845-1929); Kruschewiski (1851-1887)

२४. G. Frege (1848-1925)

२५. L. Wittgenstein (1889-1951)

२६. Jaques Derrida (1930-)

२७. 'The State of the Lie, the Lie of the State' (TOI. 29-1-1997)

२८. 'Language never errs'(Saussure, Course, p. 183)

२९. John Muir (1810-82)

'Brief Notice of the late Lancelot Wilkinson of the Bombay Civil Service'. London. by John Muir.

Bhatt, Omkara(Onkar Bhat): bhgolasra, arthat jyotisa candrik (Agra School Book Society, 1841

३२. Roland Barthes: Elements of Semiology (1964)

J. Derrida: Of Grammatology (tr.Gayatri Chakrvorti Spivak, John Hopkins Univ. Baltimore, 1977)

* ही माहिती माझे मित्र डॉ. सिद्धार्थ वाकणकर यांनी मला उपलब्ध करून दिली याबद्दल त्यांचे मन:पूर्वक आभार मानतो.

राज्य मराठी विकास संस्थेची भाषा विषयक नवीन प्रकाशने

शिक्षण, शिक्षक व अभ्यासक्रम

वासुदेव बळवंत पटवर्धन

♦

मराठी भाषा : वाढ आणि बिघाड

श्री. के. क्षीरसागर

♦

‘वृद्धीः ..’ – भाषेचे आणि भाषाभ्यासाचे विकसन

दिनेश द. माहुलकर

♦

बेलभाषा

सुमन बेलवलकर

♦

भाषा – आपली सर्वांचीच

अविनाश बिनीवाले

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

‘वृद्धी:’ हा शब्द गणिती अर्थाचा आहे. त्याचा अर्थ ‘वाढ’, ‘विकास’ असा आहे. ज्याचा विकास किंवा वाढ होते असा पदार्थ निसर्ग सृष्टीतला वृश-वेली यांसारखा किंवा नदी-ओढा यांसारखा असतो. पाणिनीचा अभ्यास-विषय ‘भाषा’ होता. आपल्या या अभ्यास-विषयाच्या अंतरंगात त्याला तिचं जे दर्शन झालं ते तिच्या सदैव नवनिर्मितीक्षम तत्वाचं. या तत्वांचं द्योतक म्हणून त्यांना हा शब्द वापरला असं म्हणण्याचं धाडस मी करू इच्छित आहे.

नदी ही ज्याप्रमाणे पर्वतातल्या कुठल्यातरी अगम्य दरीतून उगम पावते व सदैव पुढे पुढे आपला मार्ग विकसित करीत जाते, तीरावर राहणाऱ्या प्राणी, वनस्पती यांना आपल्यात सामावून, बाजूच्या प्रदेशांना फलद्रूप करीत वाहत राहते, त्याचप्रमाणे भाषा आपला उगम गुप्त ठेवून पुढील विकास साधत राहते. अधिकाधिक विशाल होत राहते...

-दिनेश द. माहुलकर